शेतकरी
संघटना

# विचार आणि कार्यपद्धती

# शेतकरी संघटना

## विचार आणि कार्यपद्धती


शरद जोशी

शब्दांकन
प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे
प्रा. सुरेश घाटे



जनशक्ती वाचक चळवळ™

शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती । शरद जोशी

Shetkari Sanghatana vichar ani
karyapaddhati - Sharad joshi

© शरद जोशी

'अंगारमळा'
मु. पो. अंबेठाण,
ता. खेड, जि. पुणे ४१०५०१
दूरध्वनी : (०२१३५) २५२३५४

**मुखपृष्ठ**
सरदार

**अक्षरजुळणी**
प्रविण योगी
जनशक्ती वाचक चळवळ,
औरंगाबाद.

**मूल्य** । १५०रुपये

**प्रकाशक**
जनशक्ती बुक्स ॲण्ड पब्लिकेशन प्रा. लि.
जनशक्ती वाचक चळवळ,
'पिनाक', २४४, समर्थनगर,
औरंगाबाद - ४३१ ००१.
☎: (०२४०) ६९९ २०५०

**प्रथमावृत्ती** नोव्हेंबर १९८२
(पूनर्मूद्रण १९८५, १९८८)
**द्वितीयावृत्ती** ८ नोव्हेंबर २००८
**शेतकरी संघटना**
११ वे संयुक्त अधिवेशन औरंगाबाद.

**मुद्रक**
रुद्रायणी, औरंगाबाद

*शेतकरी आंदोलनात*
*बळी पडलेल्या*
*हुतात्म्यांना*

## प्रकाशकाचे मनोगत

शरद जोशी यांची तीन पुस्तके 'स्वातंत्र्य का नासले?', 'खुल्या व्यवस्थेकडे खुल्या मनाने', 'अंगारमळा' आम्ही प्रकाशित केली. शेतकरी प्रकाशनाने त्यांची पूर्वी प्रकाशित केलेली पुस्तकेही आपण पुनर्प्रकाशित करावी हा आमचा मानस होता. त्या अनुषंगाने यापूर्वी प्रकाशित झालेले आणि अतिशय महत्वाचे ठरलेले शरद जोशी यांचे पूस्तक 'शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती' नवीन स्वरुपात सिद्ध करीत आहोत. भारतीय शेतीची पराधीनता हा लेख या पुस्तकास परिशिष्ट म्हणून जोडला आहे. आदरणीय सुरेशचंद्र म्हात्रे सरांच्या सूचनेनुसार जुन्या पुस्तकाची मांडणी तशीच ठेवलेली आहे. त्यात शब्दाचाही बदल केलेला नाही. तसेच पूर्वीच्या दोन्ही पुस्तकांना लिहीलेल्या प्रस्तावना तशाच ठेवलेल्या आहेत. पुस्तकातील आकडेवारी त्या काळातील आहे. इतका मुद्दा सोडला तर सर्व विवेचन आजच्या काळातही महत्वाचे ठरते हे वेगळे सांगावयाची गरज नाही.

आमच्या प्रकाशन संस्थेवर विश्वास ठेवून सुरेशचंद्र म्हात्रे सरांनी शेतकरी प्रकाशनाची पुस्तके पुनर्प्रकाशित करण्याची परवानगी दिली त्या बद्दल त्यांचे आभार. संसदेच्या समितीपुढे खासदारांनी लिहीलेली पुस्तके सादर करण्यास सांगण्यात आले आणि शरद जोशी यांच्या असे लक्षात आले की आपण यादी तर दिली पण प्रत्यक्षात पुस्तके मात्र उपलब्ध नाहीत. ही खंत त्यांनी दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी बोलून माझ्याजवळ दाखवली होती. त्यांची सर्व पुस्तके प्रकाशीत करून त्यांची खंत दूर करण्याचा हा आमचा छोटासा प्रयास.

औरंगाबाद येथे संपन्न होणाऱ्या ११ व्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर हे पुस्तक प्रकाशित होत आहे याचा माल विशेष आनंद आहे. माझे सहकारी प्रविण योगी, श्रीकांत झाडे, संभाजी वाघमारे, भिमराव वाघमारे तसेच चित्रकार सरदार यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच पुस्तक अल्पकाळात देखण्या स्वरूपात प्रकाशित होऊ शकले.

**श्रीकांत अनंत उमरीकर**
औरंगाबाद

दि. ०३ नोव्हेंबर २००८

**सप्रेम नमस्कार... विनंती विशेष,**

नोव्हेंबर १९८० मध्ये उसाचं आंदोलन नासिक भागात सुरू होऊन मुंबई-आग्रा हमरस्ता अक्षरश: रोखला गेला तेव्हाच प्रथमत: बड्या वर्तमानपत्रांतून त्याअगोदर दोन वर्षे शेतकऱ्यांत सुरू झालेल्या जागृतीसंबंधी वाचावयास मिळू लागले. त्याचबरोबर शरद जोशी हे नाव वाचावयास मिळू लागले. शेतकऱ्यांत नव्याने मूळ धरू लागलेली आणि प्रथमच आर्थिक पायावर उभी असलेली शेतकरी चळवळ कशी चालली आहे हे पाहावे या कुतुहलापोटी माझे एक ज्येष्ठ मित्र प्रा. डॉ.अरविंद वामन कुलकर्णी यांच्या प्रेरणेने आणि सोबतीने मी नासिक भागात एक फेरफटका मारला. तेव्हा सर्व नेते मंडळी अटकेत असल्यामुळे शेतकरी संघटनेच्या तत्त्वज्ञानाशी फारसा परिचय झाला नाही; परंतु इतकी दडपशाही होऊनही अजूनही तुरुंगाबाहेर असलेले अडाणी (?) शेतकरी रस्त्यावर येत होते, त्यानंतर बायकामुलेही घरच्या गुराढोरांसह रस्त्यावर येण्याचा निर्धार करून बसले होते. हे पाहून संघटनेने दिलेला विचार तितकाच मौलिक असला पाहिजे याची खात्री पटली आणि संघटनेबद्दल एक आकर्षण निर्माण झाले.

पुढे मार्च १९८१ मध्ये निपाणी येथे तंबाखूउत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू असताना डॉ. कुळकर्णींबरोबर जाण्याची संधी मिळाली आणि तेथे शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांची प्रत्यक्ष भेट झाली आणि मग हा परिचय वाढतच राहिला.

२० सप्टेंबर १९८१ रोजी म्हणजे नासिक विभागातील ऊस-आंदोलन संपल्यानंतर जवळ जवळ वर्षभराने पिंपळगाव-बसवंत येथे शेतकऱ्यांचा एक मेळावा झाला. या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा प्रचार केवळ वर्तमानपत्रांत जाहिराती देऊन केला होता. त्यामुळे दुपारी बारा वाजेपर्यंत श्री. माधवराव मोऱ्यांसारखा निधडा माणूसही किती शेतकरी जमा होतील याबद्दल साशंक होता. पण दुपारी बारानंतरच्या रणरणत्या उन्हात तेथे सतत येत राहिलेला शेतकऱ्यांचा लोंढा आणि त्यांचा उत्साह अवर्णनीय होता.

जानेवारी १९८२ च्या १।२।३ तारखांना सटाणा येथे शेतकरी संघटनेचे पहिले अधिवशन भरले. या अधिवेशनात पंधरा रुपये प्रतिनिधित्व शुल्क भरून साऱ्या महाराष्ट्रातून तीस हजार शेतकरी स्वखर्चाने आणि आपली आपली शिदोरी बांधून आणून सामील झाले होते. इतका या संघटनेच्या विचारांचा अभ्यास आणि प्रसार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून व्हावा असे वाटू लागले.

फेब्रुवारी १९८२ मध्ये श्री. शरद जोशी यांनी रायगड जिल्ह्याच्या पेण आणि अलिबाग तालुक्याचा दौरा केला त्यावेळी त्यांनी त्यांच्या अंबाजोगाईच्या कार्यकर्ता-प्रशिक्षण- शिबिराच्या ध्वनिमुद्रित कॅसेट्स नकलून काढण्यासाठी माझ्याजवळ दिल्या. त्यातूनच हे पुस्तक निर्माण झाले आहे.

अंबाजोगाई (बीड) येथे २६ आणि २७ फेब्रुवारी १९८१ असे दोन दिवस मोरेवाडीचे श्री. श्रीरंग मोरे यांच्या साहाय्याने श्री. शरद जोशी यांनी घेतलेल्या या शिबिरास पन्नासेक प्रशिक्षणार्थी कार्यकर्ते हजर होते. ते सर्वच ग्रामीण भागातून आलेले आणि मुख्यत: कोरडवाहू शेतकऱ्यांपैकी असल्यामुळे त्यांच्यात बरेचजण अल्पशिक्षित होते. त्यामुळे या शिबिरात शेतकरी संघटनेच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची जी चर्चा झाली ती अगदी सोप्या भाषेत आणि सुटसुटीतपणे झाली. या सर्व चर्चेचे शब्दांकित स्वरूप म्हणजेच हे पुस्तक आहे. अर्थात् ही चर्चा केवळ दीड दोन दिवसांतच झाल्यामुळे या पुस्तकाला काही मर्यादा आहेत. या पुस्तकाची हस्तलिखित प्रत श्री. शरद जोशींकडून तपासून घेत असताना ही गोष्ट प्रकर्षाने जाणवून गेली.

तरीही जाहीर सभांतून श्री. शरद जोशी किंवा अन्य नेत्यांची भाषणे ऐकून शेतकरी संघटनेचे कार्य करण्याची प्रेरणा मिळालेल्या कार्यकर्त्यांना हे पुस्तक निश्चितपणे उपयुक्त मार्गदर्शन करू शकेल अशी खात्री वाटते. आतापर्यंत शेतकरी संघटनेच्या विचारसरणीबद्दल आणि कार्याबद्दल अनेक नियतकालिकांतून लिहून आलेले आहे पण त्याचा सलगपणे अभ्यास करता येईलच असे नाही. काही ठिकाणीतर संघटनेबद्दल अतिशयोक्त विपर्यस्त मजकूरही छापून आलेला आहे. त्यादृष्टीने हे पुस्तक संघटनेचे तत्त्वज्ञान अधिक सलग आणि व्यापक स्वरूपात देणारे ठरेल. अर्थात हे पुस्तक १९८१ च्या फेब्रुवारी महिन्यातील शिबिरावर आधारलेले असल्यामुळे यातील उत्पादनखर्च, बाजारभाव वगैरेची आकडेवारी आणि संदर्भ १९८० मधील आहे हे लक्षात घ्यावयास हवे.

शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गावागावांतून या पुस्तकाचे सामुदायिक वाचन जरी केले तरी शेतकरी संघटनेचे प्रचारकार्य जोमाने पुढे जाईल आणि म्हणूनच या पुस्तकाची किंमत ना नफा ना तोटा या विचाराने अगदी कमी ठेवली

आहे. तसेच स्वत: श्री. शरद जोशींनी या पुस्तकाचे सर्व स्वरूपाचे हक्क सर्व जनतेच्या स्वाधीन केले आहेत. अर्थात अपेक्षा अशी आहे की, यातील कोणत्याही भागाच्या पुनर्मुद्रणाच्या बाबतीतील माहिती मुद्रित प्रतींसह त्यांच्याकडे पोहोचावी.

या पुस्तकाच्या कामात डॉ. अरविंद वामन कुळकर्णी यांचे तसेच माझ्या ज्या इतर अनेक मित्रांचे सहकार्य मिळाले त्यांच्या आणि तपस्या मुद्रणालयाचे श्री. चिंतामण जोशी, मुद्रणालयाचा कामगार वर्ग आणि प्रकाशिका सौ. सुमित्रा अरविंद कुळकर्णी यांच्या ऋणाचा निर्देश न करणे चुकीचे ठरेल.

श्री. शरद जोशींकडून मिळालेले विचारांचे हे विशुद्ध बियाणे एका दाण्यातून शंभर दाणे काढण्याची शक्ती असलेल्या शेतकरी भावाबहिणींच्या हाती देताना एक विशेष आनंद होत आहे. या पुस्तकाच्या प्रत्येक प्रतिमागे शेतकरी संघटनेचा एक एक कार्यकर्ता जरी तयार झाला तरी श्रमाचे सार्थक झाल्यासारखे होईल.

अलिबाग
२३-११-८२

आपला
**सुरेशचंद्र म्हात्रे**



# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रास्ताविक ........................................ | ११ |
| शेतकरी आंदोलनाचे अंतिम उद्दिष्ट ................ | १९ |
| शेतीमालाचा उत्पादन खर्च ........................ | २४ |
| शेतीमाल : अस्मानी संकट आणि सुलतानी शोषण | ३९ |
| ‘इंडिया’ आणि ‘भारत’........................... | ५६ |
| ‘भारत’विरोधी प्रचलित उद्योगनीती................ | ६२ |
| ‘भारता’तील वर्गविग्रह (?)....................... | ७१ |
| ‘इंडिया’चं ‘भारता’च्या शोषणाविषयीच पंचशील.. | ८९ |
| संघटनेला काय हवे आहे?........................ | ९७ |
| एक कलमी मागणीचे अर्थशास्त्रीय परिणाम......... | ११० |
| संघटनेची मागणी आणि ग्राहक ................... | ११४ |
| संघटनेचे सध्याचे स्वरूप.......................... | ११९ |
| आंदोलनाचे तंत्र .................................. | १३० |
| भारतीय शेतीची पराधीनता ...................... | १४९ |

प्रकरण : १

# प्रास्ताविक

आजपर्यंत शेतकरी संघटनेचा विचार मांडण्याच्या हेतूने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जाहीर सभा, मेळावे, प्रशिक्षण -शिबिरे, असे वेगवेगळे कार्यक्रम झाले. पुढेही होत राहतील; परंतु हे सर्व मर्यादित वेळांचे कार्यक्रम आहेत. जाहीर सभांतून विचार मांडायला आणि ऐकायला एक किंवा दीड तास मिळतो. इतक्या थोड्या वेळात फार खोलात जाऊन विचार मांडता येत नाही. सभेस हजर राहणारा सर्वसामान्य शेतकरी असतो त्याला खोलात जाऊन तात्त्विक विचार करण्याची वा समजून घेण्याची कुवत वा फुरसत नसते आणि साधारणपणे काय चाललेले आहे हे जाणून घ्यावे या औत्सुक्याने तो सभेस आलेला असतो; परंतु ज्यांना गावोगावी संघटनेच्या विचाराच्या प्रसाराचे काम करावयाचे आहे त्यांना इतका जुजबी अभ्यास पुरेसा नाही. खेड्यात कुणी वेडेवाकडे प्रश्न विचारले, डिवचून टोचून प्रश्न विचारले तरीसुध्दा त्यांची योग्य उत्तरे देता आली पाहिजेत. त्या दृष्टीने परिपूर्ण अभ्यास व्हावा म्हणून मेळावे आणि प्रशिक्षण-शिबिरांचे कार्यक्रम घेतले जातात. पण तेथेही वेळ अपुराच वाटतो. मुळातच संघटनेच्या विचारांचा अभ्यास नसल्यामुळे अशा कार्यक्रमात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या मनातील प्रश्न आणि शंका यामुळे कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण यादृष्टीने हा वेळही अपुरा पडतो. कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणातील ही अडचण दूर करणे हा या पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे. या पुस्तकाच्या अभ्यासामुळे एक दोन दिवसांच्या प्रशिक्षण-शिबिरातून कार्यकर्ते तयार होणे सुलभ होईल. काही ठिकाणी तर अशा शिबिरांचीही आवश्यकता उरणार नाही. प्रशिक्षण- शिबिरास येऊ न शकणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना संघटनेचा विचार आत्मसात करण्याच्या दृष्टीने हे पुस्तक निश्चितच उपयोगी पडेल.

आपला विषय तसा कठीण विषय आहे. महाविद्यालयांत, विद्यापीठांत हा विषय अभ्यासला जातो. त्या मंडळींनासुध्दा हा विषय समजायला कठीण जातो. हा कठीण विषय लक्ष देऊन अभ्यासला जावा हा या पुस्तकाचा हेतू आहे. महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक यांना ज्या एका गोष्टीची कल्पना नाही ती

आपल्याला आहे त्यामुळे त्यांना हा विषय जितका कठीण वाटतो तितका आपल्याला वाटणार नाही. पुण्यातील एक सुप्रसिद्ध प्राध्यापक एका कार्यक्रमाला होते. त्यांनी विचारले, 'महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जो विचार समजणे कठीण जाईल तो विचार खेड्यापाड्यातील अशिक्षित शेतकऱ्यांना तुम्ही कसा समजावून देता?' शेतकऱ्यांना हा विषय समजायला कठीण नाही कारण प्रत्येक शेतकऱ्याला वर्षातून एकदा तरी 'उलट्या पट्टी'चा अनुभव येतो. उलटी पट्टी म्हणजे दलालामार्फत भाजीपाल्यासारखा शेतीमाल बाजारात पाठविल्यावर त्याच्या किमतीची जी पट्टी येते त्यात वाहतूक, दलाली, हमाली, पॅकिंग वगैरेंचा खर्च वजा जाता काही शिल्लक न राहता शेतकऱ्यांच्याच अंगावर काही देणे राहते. हा अनुभव ज्याला एकदा आलेला आहे त्याला शेतमालाच्या किमतीचा प्रश्न समजावून देणं आणि त्यांनी तो समजावून घेणं कठीण राहत नाही. ज्याला आपली परिस्थिती दिवसेंदिवस ओढगस्तीची होत चाललेली आहे हे अनुभवाने माहीत आहे त्याला हा विषय समजायला कठीण नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांपुढे जो विषय मांडणे जड वाटते तो सबंध महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी फार जलद गतीने समजावून घेतला आहे. आत्मसात केला आहे. इतका की त्यानंतर दोन दोन लाखांच्या संख्येने शेतकरी चळवळीत सामील झाले, तुरुंगात जायला तयार झाले, लाठ्या खायला तयार झाले. असा या विचाराचा प्रभाव आहे.

या विचारांचा प्रसार करताना कार्यकर्त्यांनी काही गोष्टी पाळायला हव्यात. त्यासाठी कार्यकर्त्यांना काही सूचना :

इतक्या मोठ्या प्रमाणावर शेतकरी आंदोलन प्रथमच उभे राहत आहे असे ठिकठिकाणी लिहिले/बोलले जात असले, तरी कार्यकर्त्यांनी या अगोदर झालेल्या शेतकरी आंदोलनाविषयी, चळवळींविषयी उपहासाने बोलू नये.

पूर्वी लहान लहान शेतकरी आंदोलने झाली, त्यामुळे शेतकऱ्यांत हळूहळू जागृती होऊ लागली. त्या प्रत्येक आंदोलनामुळे शेतकऱ्यांचे डोळे थोडे थोडे उघडले; परंतु त्यांतील अपयशांमुळे शेतकऱ्यांमध्ये निराशा निर्माण झाली. निराशा-जागृती-निराशा या फेऱ्यात सापडलेला शेतकरी त्याच्या पूर्वानुभवामुळेच आपण संघटित करू शकलो, त्याचे आंदोलन उभे करू शकलो.

पूर्वीच्या शेतकरी आंदोलनांचा विचार करायचा झाला तर महाराष्ट्रात जुन्यातलं जुनं आंदोलन म्हणजे तंट्या भिल्लाचं म्हणावं लागेल. त्या दृष्टीने तंट्या भिल्ल हा शेतकरी आंदोलनांचा मूळ प्रवर्तक म्हणावा लागेल. त्या काळी कुळांवरील अन्याय



फार असह्य झाले होते. सावकारी पाश भयानक झाले होते. रयतेला काय करावं सुचेनासं झालं होतं. त्यावेळी, आपल्यातला एखादा भडक माथ्याचा तरुण ज्याप्रमाणे 'आपल्याला तुमचं हे काही पटत नाही, मी मला हवं तसं करतो' म्हणून उठतो त्याचप्रमाणे तंट्या भिल्लानं सावकार आणि व्यापारी यांच्या घरांवर दरोडे घालायला सुरुवात केली. शेतकऱ्यांच्या पिळवणुकीचा प्रश्न अशा तऱ्हेने मांडणारा हा दरोडेखोर जेव्हा हैदराबाद राज्यात पकडला गेला तेव्हा त्याला इतर दरोडेखोरांप्रमाणे फाशी दिले नाही. एका खड्ड्यात चुन्याची कळी घालून त्यात तंट्याला ठेवून वरून पाणी ओतले. कारण राज्यकर्त्यांनी ओळखले होते की हा साधासुधा दरोडेखोर नसून शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न मांडतो आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्य-समरानंतर चार पाच वर्षांत शेतकऱ्यांचे एक महत्त्वाचे आंदोलन इथे महाराष्ट्रातच झाले. इंग्रज यायच्या आधी खेडेगावातील कर्ज देणारा सावकार महत्त्वाची आसामी समजली जात असे. बारा बलुतेदारांइतकीच त्याची प्रतिष्ठा होती. इंग्रजांनी रोख साऱ्याची पद्धत सुरू केली. शेतकऱ्यांवर रोख खर्चाची सक्ती पहिल्यांदाच झाली. परिणामत: मोठमोठे शेतकरीही सावकारांकडे जमिनी गहाण ठेवून बसले. कर्ज फेडता येत नाही म्हटल्यावर जमिनीचे लिलाव होऊ लागले.

शेतकऱ्यांनी उठाव केला. सुरुवात पुणे जिल्ह्याच्या सासवड तालुक्यात झाली. इतर तालुक्यांत चळवळ पसरली. अहमदनगर जिल्ह्यात गेली. शेतकरी सावकारांच्या घरांना घेराव घालायचे. मारहाण नाही, रक्तपात नाही. फक्त सावकाराचे कागदपत्र जमा करायचे आणि जाळून टाकायचे. सरकार अर्थात सावकारांच्या मदतीस धावले. लक्षात ठेवा १८६१ म्हणजे जवळ जवळ सव्वाशे वर्षांपूर्वी तीन हजार शेतकऱ्यांना अटक करण्यात आली.

सावकारांविरुद्ध रोष निर्माण झाला. तसाच जमीनदारांविरुद्ध झाला. अनेक चळवळी झाल्या. मुळशी धरणासारखे शासनाविरुद्धचेही आंदोलन झाले. शेतकऱ्यांच्या दु:खाचे खरे मूळ दीडदमडीचा सावकार, जमीदारांत नाही. वाघाने शिकार मारल्यानंतर त्यावर हात मारणाऱ्या खोकडांपलीकडे त्यांना काही महत्त्व नाही. पण आजवर शेतकरी आंदोलनांना आर्थिक विचार, ऐतिहासिक तत्त्वज्ञान नसल्यामुळे त्यांची दिशा चुकली. कुत्र्याला कोणी दगड फेकून मारला की ते धावत जाऊन चेवाचेवाने दगडालाच चावते, तसे या शेतकरी आंदोलनाचे झाले. जेव्हा जेव्हा ग्रामीण भागात उद्रेक उभे राहू लागले तेव्हा तेव्हा ते ग्रामीण भागातीलच

एखाद्या घटकाविरुद्ध-सावकार, जमीनदार, एखादी जात, एखादी पात, एखादा धर्म याजविरुद्ध वळवून देण्यात आले. प्रचंड ताकदीच्या पहिलवानास लहान पोराने जणू चलाखीने फसविले. वासुदेव बळवंत फडके, जोतिबा फुले यांनीही शेतकऱ्यांच्या दारिद्र्यावर विचार मांडले. आपण तेच विचार नव्या भाषेत मांडीत आहोत. स्वातंत्र्याआधी आणि नंतर कुळकायदे झाले. त्याची चळवळ, स्वातंत्र्यानंतरची सहकारी चळवळ या सर्व चळवळींनी आपलं एक एक पाऊल पुढं टाकलं. लहान मूल जसं सुरुवातीला पडत पडत चालायला शिकतं, तसंच शेतकऱ्यांनी जो आधार सापडेल तो पकडत पकडत पुढे जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे सर्व कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवायला हवे. गावात बोलताना आजवर शेतकऱ्यांत जागृती झालीच नाही, आम्हीच काय ती करायला सुरुवात केली आहे, अशा तऱ्हेचा अहंकार कार्यकर्त्यांनी बाळगू नये आणि मानू नये.

१९८० साली शेतकरी आंदोलन चालू झालं आणि सुरुवातीच्या काही चकमकीत यशही मिळालं. वर्तमानपत्रे, रेडिओ, इतर प्रचारमाध्यमे यातून प्रसिद्धी मिळाली. परदेशातही प्रसिद्धी मिळाली. पंजाब, हरियानातील शेतकऱ्यांच्यात तर विचार सुरू झाले की, शेतकऱ्यांचे प्रश्न जर सुटायचे असतील तर नाशिकच्या पद्धतीने आंदोलन केले पाहिजे. आपलं आंदोलन इतकं यशस्वी झालं त्याला तशी महत्त्वाची कारणंही आहेत.

आपण ८० साली आंदोलन केले हे भाग्य! कारण ८० ऐवजी जर आपण ७५ साली आंदोलन सुरू केलं असतं तर यश मिळालं नसतं. ८० साल दोन प्रमुख दृष्टीनं वैशिष्ट्यपूर्ण आहे. एक म्हणजे १९७७ सालापर्यंत देशात सर्व धान्ये कडधान्ये आणि इतर शेतीमालाचा तुटवडा होता. त्यावेळी जास्त पीक आलं की जास्त पैसा हाती लागत असे. पण ७७ सालापासून शेतीमालाची मुबलकता निर्माण झाली. मालाचा उठाव होईना. विकण्याची चिंता शेतकऱ्यांना भेडसावू लागली. भाव गडगडले. जास्त पीक आले तर पदरी तोटा अशी परिस्थिती प्रथमच निर्माण झाली. यंदा तर नाशिक जिल्ह्यात संकरित ज्वारीचे पीक बंदा रुपया आलं. सरकारी खरेदी यंत्रणा नाही. त्यामुळे शेतकऱ्याला ज्वारी ६५ पैसे किलो भावाने विकावी लागली. पदरी आलेल्या तोट्याने डोळ्यातून पाणी आले. पीक जास्त आले, आता कसं करायचं अशी चिंता पडायला लागली. अशी स्थिती प्रथमच आली आहे. त्यामुळे ८० साली आंदोलन प्रभावी होऊ शकले.

दुसरं म्हणजे राजकीय परिस्थिती. ७५ सालातील आणीबाणी, ७७ सालात



निवडणुका, त्यानंतर पुन्हा निवडणुका, यामुळे एक पक्ष सत्तेवरून जाऊन दुसरा येणे आणि अल्पावधीत पुन्हा पहिलाच पक्ष सत्तेवर येणे, त्याचबरोबर पुढाऱ्यांच्या पक्षोपपक्षातील कोलांटउड्या यामुळे सामान्य जनतेच्या मनात सर्व राजकीय पक्षांविषयी निराशा निर्माण झाली. त्यांच्याबद्दल घृणा निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर '३३ वर्षे शासन शेतकऱ्यांना फसवीत आलं आहे' हा आपला विचार आपण ताठ मानेने, जोरजोराने शेतकऱ्यांपुढे मांडतो. लोक ऐकतात आणि टाळ्या वाजवतात. ७५ साली अशी निराशा नव्हती. तेव्हा जर आपण असे बोललो असतो तर कदाचित् लोकांनी ऐकून घेतलं नसतं. आज परिस्थिती बदलली आहे. अनुभवाचे चटके बरीच वर्षे खाल्ल्यामुळे लोकांना हा विचार पटतो. म्हणूनच ८० साल शेतकऱ्यांच्या नवीन युगाची सुरुवात आहे. अशा परिस्थितीत ८० साली आपल्याला शेतकरी आंदोलन करायला मिळालं हे आपलं भाग्य आहे. या आधी ज्यांनी प्रयत्न केले त्यांना अतिशय प्रतिकूल परिस्थितीशी सामना द्यावा लागला. चटके खाऊन पराभव पत्करावा लागला आणि घोर निराशा पचवावी लागली.

निपाणीला तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांची एक परिषद घेण्यात आली. तिला चौदा हजार शेतकरी जमले होते. शेतकऱ्यांची परिस्थिती बदलेल अशा हालचाली झाल्या नाहीत तर १४ मार्चपासून तंबाखूच्या भावासाठी लढा देण्याचे ठरले आहे. *निपाणी शहरातील तंबाखूचा व्यापार संपूर्णपणे खाजगी व्यापाऱ्यांच्या हातात आहे. ते शेतकऱ्यांवर जबरदस्त अन्याय करीत आहेत. निपाणी भागात १९५६ पासून तंबाखूची लागवड मोठ्या प्रमाणात सुरू झाली. तेव्हापासून शेतकरी अधिक भावाची मागणी सतत करीत आहेत; परंतु व्यापारी शेतकऱ्यांना फक्त लुटत आहेत. शेतकऱ्याने व्यापाऱ्याच्या दारी तंबाखूचा नमुना घेऊन जायचे. मग व्यापारी तंबाखूचा भाव ठरवतो. प्रथमच भाव ठरवताना व्यापारी शेतकऱ्याला मारतो. पुढे जर तंबाखूचे भाव घसरले तर व्यापारी सौदा विसरून शेतकऱ्याला सोडून देतो.

* १४ मार्च १९८१ रोजी निपाणी परिसरातील तंबाखू उत्पादक आणि शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांच्या जाचातून सुटण्यासाठी आणि शेतीमालाला किंमत मिळावी या मागणीसाठी आपले आंदोलन सुरू केले. ४० हजार शेतकरी आपल्या बैलगाड्यांसह पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर येऊन बसले आणि वाहतूक बंद पाडली. या महामार्गाच्या सुमारे ३ कि.मी. भागाला एखाद्या नगरीचे स्वरूप प्राप्त झाले होते. या भागाला 'आंदोलन नगरी' असेच नाव देण्यात आले. धाकदपटशा, प्रलोभन, भेदनीती या कशालाही दाद न देता सर्व शेतकरी सतत २३ दिवस शांततेने आणि

अशा वेळी शेतकऱ्याला व्यापाऱ्याचे पाय धरून कमी भावात तंबाखू विकण्याशिवाय गत्यंतर राहत नाही. तंबाखूचे भाव जर सौद्याच्या भावापेक्षा वधारले तर मात्र व्यापारी सौद्याच्या कमी भावानेच खरेदी करतो. अशा तऱ्हेने भावात मारल्यावर मालाचे प्रत्यक्ष वजन करताना काडीसूट, मातीसूट, हवासूट अशा तऱ्हेच्या अकरा तऱ्हांनी वजनात कपात करण्यात येते. अक्कोळच्या सुप्रसिध्द कडक तंबाखूच्या ६० किलोच्या एका बोदातून १।। ते २ किलो हवासूट वजा करण्यात येते. व्यवहार पूर्ण झाल्यावर रोख पैसा मिळत नाही. झालेल्या रकमेवर ५ ते १२ टक्के सूट कापली जाते. एकूण रक्कम २४४२ रु. झाली तर वरचे ४४२ रु. सोडून देऊन फक्त दोन हजारच देतात. अशा तऱ्हेने लूट होऊनसुद्धा शेतकरी उघडपणे तक्रार करू शकत नाहीत इतके दहशतीचे वातावरण निपाणीच्या व्यापारपेठेत आहे. अशा स्थितीत १४ हजार शेतकरी भव्य मंडप उभारून एकत्र जमू शकतात यावर कुणाचा विश्वासच बसत नाही. १९७२ साली अक्कोळच्या तंबाखू उत्पादक तरुणांनी आंदोलन केले होते. त्यांनी ६४ व ७८ साली रास्ता रोको आंदोलने केली होती. त्यामुळे चाकण-नाशिक भागात जी आंदोलने झाली त्यात नवीन काही आहे असे म्हणणे बरोबर नाही. मुख्य गोष्ट आता शेतकऱ्याची वेळ आली आहे. म्हणूनच ८० सालचे आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रभर वणव्यासारखे पसरते आहे.

शेतीमालाचे भाव वाढले म्हणजे पर्यायाने महागाई वाढत जाईल असे शहरांमधून राहणाऱ्या डॉक्टर, वकील, ऑफिसर्स, कारकून आणि इतर मध्यमवर्गीयांना वाटत आहे. शेतकऱ्यांच्या रास्त भावाच्या मागणीचे परिणाम ग्राहकावर काय होतील हा आपला अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे, तो आपण नंतर अभ्यासू; परंतु शहरातील ग्राहकांशी संबंध येणाऱ्या कार्यकर्त्यांनी 'उत्पादक शेतकरी आणि ग्राहक हे दोघेही

---

वाढत्या निग्रहाने रस्त्यावर बसून होते. या सत्याग्रहाच्या काळात दि.५ एप्रिल रोजी शेतकऱ्यांनी पाडव्याचा सण साधेपणाने गुढ्या उभारून आंदोलन नगरातच पार पाडला. ६ एप्रिलच्या पहाटे कर्नाटक शासनाच्या पोलिसांनी आंदोलनाच्या नेत्यांना अटक केली आणि त्यांच्याबरोबरच सर्व सत्याग्रहींनाही अटक केल्याचे जाहीर केले. सकाळी आठ वाजेपर्यंत काही सत्याग्रहींना पकडून बसेसमधून बल्लारी व गुलबर्गा येथील तुरुंगात रवाना केले. अटक करवून घ्यायची वाट पाहात रस्त्यावर शांतपणे बसलेल्या शिल्लक सत्याग्रहींच्या प्रचंड जमावावर शेवटी अश्रूधूर, लाठीमार आणि अमानुष गोळीबाराचा मारा करून पोलिसांनी आंदोलन नगरी उद्ध्वस्त करून टाकली. या आंदोलनात १२ शेतकरी हुतात्मा झाले आणि शेकडो जखमी झाले. (प्र.)



एकाच व्यवस्थेखाली भरडले जात आहेत' ही गोष्ट ग्राहकांच्या मनावर प्रथमतः सवली पाहिजे; परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की शेतकरी व ग्राहक यांच्यात भांडण लावून शेतकरी आंदोलनाचा पराभव करण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे. तेव्हा ग्राहकांशी किंवा मध्यमवर्गीयांशी बोलताना हे आंदोलन ग्राहकविराधी आहे, त्यांना त्रास देणारे आहे, या शंकावर सध्या जास्त भर देऊ नये. या विषयाचा अभ्यास करताना ग्राहकांना कोणते त्रास व का होणार आहेत, तसेच फायदे कोणते होणार आहेत याचा अभ्यास करू. पण प्रचार करताना ग्राहकांच्या होणाऱ्या फायद्यांवर जास्त जोर दिला पाहिजे. काही दिवसांनी अशी काळजी घेण्याचे कारणही उरणार नाही.

शेतकरी आंदोलन अजून बाल्यावस्थेत आहे, तरीसुद्धा वर्तमानपत्रीय टीका अभ्यासहीन आहे. हल्लीचे संपादक क्रिकेटपटूपासून शेतकरी-आंदोलनापर्यंत सर्वविषयी सारख्याच अधिकाराने सल्ले देत असतात. बहुतेकांची धोरणे ही परिस्थितीनुरूप बदलत असतात. युरोपमधील फ्रांसचा बादशहा सम्राट नेपोलियन याच्या राज्यात एकदा बंड झाले आणि त्याला पकडून दूरवर एल्बा बेटावर तुरुंगात ठेवले गेले. नेपोलियनने तिथून आपली सुटका करून घेतली. त्यावेळी पॅरिसच्या वर्तमानपत्रांनी 'दरोडेखोर नेपोलियनचे तुरुंगातून पलायन' अशा ठळक मथळ्याखाली ही बातमी प्रसृत केली. पुढे नेपोलियनने सैन्य जमा करून प्रदेशामागून प्रदेश काबीज केले. जसजसा नेपोलियन राजधानी पॅरिसच्या जवळ येऊ लागला, तसतसे वर्तमानपत्रांचे मथळे बदलत गेले आणि नेपोलिनयन पॅरिसच्या वेशीपाशी सेनेसह आला तेव्हा वर्तमानपत्रांनी 'सम्राट नेपोलियचे भव्य स्वागत' असे ठळक मथळे दिले. तात्पर्य, शहरातील काही लोकांची विचारसरणी ही दबावप्रणीत असते. डोक्याने विचार करणारे थोडे, खिशाने विचार करणारे जास्त. आपल्याला एखाद्या गोष्टीपासून काही तोशीस पडणार नसेल तर दुर्लक्ष, नाहीतर पहिल्यापासून विरोध करण्याची प्रवृत्ती जास्त.

आज आंदोलनाची ताकद अत्यंत लहान आहे. नाशिकला २८ नोव्हेंबरला आंदोलन स्थगित केल्यापासून फक्त १४ जिल्ह्यांतून संघटनेचा प्रसार झाला आहे. नाशिक जिल्ह्यात दोन लाख शेतकरी संघटनेत सामील झाले आहेत. नवीन १४ जिल्ह्यांतून पाच लाख तरी शेतकरी बाहेर येतील. म्हणजे आता संघटनेची ताकद ७ लाखांची झाली. अशा तऱ्हेने ताकद वाढवत नेली तर लोक म्हणतील शेतकरी

झोपला होता ते बरे होते. पण आता तो जागा झाल्यामुळे आज हा रस्ता बंद, उद्या तो रस्ता बंद. म्हणजे वाहतुकीत अडचणीच निर्माण होणार. या तकतकीपेक्षा ज्वारीला पन्नास पैसे जास्त दिलेले बरे. असं जेव्हा ताकदीचं वातावरण तयार होईल तेव्हाच आंदोलन यशस्वी होईल आणि आज जे आंदोलनाविषयी तुच्छतेने बोलत आहेत तेसुद्धा व्यवस्थितपणे बोलू लागतील.

आपला विचार स्पष्टपणे मांडावा पण त्यात कुणालाही दुखावण्याचा प्रयत्न करू नये. तशी काही माणसे आपोआप दुखावली जातात. आपण तसा प्रयत्न मुद्दाम करू नये. शेतकरी-संघटनेचे यश हे अनेक राजकारणी पुढाऱ्यांच्या आयुष्याचे अपयश आहे. 'शेतकऱ्यांच्यामध्ये जागृती व्हावी असे म्हणत आम्ही वर्षानुवर्षे घालवली; परंतु आम्हाला ते जमलं नाही. पण एक शेतकरी-आंदोलन केवळ दहा महिन्यात उभं राहतं. सर्व शेतकरी, जात-पात-धर्म-पक्ष कशाचाही विचार न करता एकत्र येतात. मोठा शेतकरी, छोटा शेतकरी, शेतमजूर असे भेदसुद्धा विसरून एकत्र येतात,' हेच त्यांचं अपयश आहे. हेही आंदोलन उभं राहिलं नाही तर त्यांना म्हणायला वाव राहिल की शेतकऱ्यांची संघटना होऊच शकणार नाही. एक पुढारी तर म्हणतात, 'एक वेळ कुत्र्याचं शेपूट सरळ होईल पण शेतकऱ्यांची संघटना होणं शक्य नाही.' आज संघटना उभी राहताना दिसते, तेव्हा त्यांना प्रश्न पडतो- हे जर शक्य होत तर आपण का केलं नाही? आणि हे डाचत असल्यामुळेच संघटनेला विरोध करण्याची प्रवृत्ती आहे. आज आपल्याला माणसं मिळवीत जायचं आहे. संघटना बांधत जायचं आहे. माणसं तोडायची नाहीत. तोडणं सोपं असतं. ज्यांना आंदोलन करावयाचे आहे त्यांनी एक लक्षात ठेवायला पाहिजे की माणूस, मग तो कसाही असो आपल्याविरुद्ध असण्यापेक्षा आपल्या बाजूच्या एखाद्या कोपऱ्यात का असेना, असणे बरे.

सारांश, प्रचार करताना या आधीच्या काळातील शेतकरी आंदोलनांच्या प्रयत्नाविषयी आदर बाळगून प्रचार करावा. १९७७ पासूनची धान्याची मुबलकता, राजकीय पक्षांविषयींचा भ्रमनिरास या गोष्टी १९८० सालचं आंदोलन प्रभावीपणे उभं राहण्यामागील प्रमुख बाबी आहेत. ग्राहकांच्या बाजूनं काळजीपूर्वक विचार मांडायला हवेत.

****



**प्रकरण : २**

# शेतकरी आंदोलनाचे अंतिम उद्दिष्ट

शेतकरी आंदोलनाचा हेतू स्पष्ट आहे. केवळ शेतकऱ्यांचा फायदा करून देणे हे या आंदोलनाचे उद्दिष्ट नसून सर्व देशातील गरिबी हटवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. वर्तमानपत्रांतून आपल्याल वाचायला मिळतं की कामगार पगारवाढीसाठी आंदोलन करतात, पगार चांगला असेल तर बोनससाठी, बोनस मिळत असेल तर रजा, नोकरीसाठी जास्त चांगल्या अटी यासाठी आंदोलनं करतात. महिना २५०० रु. पगाराची नोकरी असलेले पायलट यांत्रिक बिघाड, खराब वातावरण आदी कारणांसाठी कुठे अधिक वेळ थांबाव लागलं तर ओव्हर टाइम किती मिळाला पाहिजे यासाठी संप करतात. मला कसं जास्त मिळेल यासाठी जो तो संघटित होतो आणि आंदोलन करतो. शेतकरी-संघटनेचा एक कलमी कार्यक्रम-शेतमालाला रास्त किंमत-ही मागणी कामगारांच्या मागणीसारखीच दिसेल. असं वाटेल की आता शेतकरी म्हणतो, 'मलासुद्धा आता जरा जास्त द्या.' इतरांप्रमाणेच आमच्या कष्टाला योग्य मोल द्या, अशी त्याची मागणी आहे. या मागील भूमिका केवळ शेतकऱ्याला जास्त मिळावे अशी नाही. मला जास्त द्या अशी मागणी एखादा छोटा गट करू शकतो. कामगारांचा गट छोटा आहे, वैमानिकांचा गट छोटा आहे, सरकारी नोकरांचा गट छोटा आहे. पण शेतकरी वर्ग देशाच्या ७० ते ७५ टक्के आहे. तो मला जास्त द्या अशी मागणी केवळ स्वार्थबुद्धीने करीत राहिला आणि त्याच्या श्रमाला योग्य मोल मिळत असतानासुद्धा जर जास्त मागू लागला तर ती मागणी व्यवहारात उतरवणे शक्यच होणार नाही आणि शक्य झाले तरी एकूण देशावर निश्चितपणे वाईट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. पण हा बहुसंख्य गट केवळ स्वार्थाचा विचार करून ही मागणी करीत नाही, तर एकूण देशातल्या परिस्थितीचा विचार करून देशातले जे मोठे प्रश्न आहेत ते सोडविण्याकरिता ही मागणी करतो आहे. शेतीमालाला रास्त भाव मागतो आहे. तो देशातील दारिद्र्य दूर करण्याकरताच. शेतकऱ्यालाच फायदा व्हावा म्हणून नाही; तर देशातील दारिद्र्य दूर व्हावे या करताच शेतीमालाला रास्त भाव मागणे हा एक कलमी

झोपला होता ते बरे होते. पण आता तो जागा झाल्यामुळे आज हा रस्ता बंद, उद्या तो रस्ता बंद. म्हणजे वाहतुकीत अडचणीच निर्माण होणार. या तकतकीपेक्षा ज्वारीला पन्नास पैसे जास्त दिलेले बरे. असं जेव्हा ताकदीचं वातावरण तयार होईल तेव्हाच आंदोलन यशस्वी होईल आणि आज जे आंदोलनाविषयी तुच्छतेने बोलत आहेत तेसुद्धा व्यवस्थितपणे बोलू लागतील.

आपला विचार स्पष्टपणे मांडावा पण त्यात कुणालाही दुखावण्याचा प्रयत्न करू नये. तशी काही माणसे आपोआप दुखावली जातात. आपण तसा प्रयत्न मुद्दाम करू नये. शेतकरी-संघटनेचे यश हे अनेक राजकारणी पुढाऱ्यांच्या आयुष्याचे अपयश आहे. 'शेतकऱ्यांच्यामध्ये जागृती व्हावी असे म्हणत आम्ही वर्षानुवर्षे घालवली; परंतु आम्हाला ते जमलं नाही. पण एक शेतकरी-आंदोलन केवळ दहा महिन्यात उभं राहतं. सर्व शेतकरी, जात-पात-धर्म-पक्ष कशाचाही विचार न करता एकत्र येतात. मोठा शेतकरी, छोटा शेतकरी, शेतमजूर असे भेदसुद्धा विसरून एकत्र येतात,' हेच त्यांचं अपयश आहे. हेही आंदोलन उभं राहिलं नाही तर त्यांना म्हणायला वाव राहिल की शेतकऱ्यांची संघटना होऊच शकणार नाही. एक पुढारी तर म्हणतात, 'एक वेळ कुत्र्याचं शेपूट सरळ होईल पण शेतकऱ्यांची संघटना होणं शक्य नाही.' आज संघटना उभी राहताना दिसते, तेव्हा त्यांना प्रश्न पडतो- हे जर शक्य होत तर आपण का केलं नाही? आणि हे डाचत असल्यामुळेच संघटनेला विरोध करण्याची प्रवृत्ती आहे. आज आपल्याला माणसं मिळवीत जायचं आहे. संघटना बांधत जायचं आहे. माणसं तोडायची नाहीत. तोडणं सोपं असतं. ज्यांना आंदोलन करावयाचे आहे त्यांनी एक लक्षात ठेवायला पाहिजे की माणूस, मग तो कसाही असो आपल्याविरुद्ध असण्यापेक्षा आपल्या बाजूच्या एखाद्या कोपऱ्यात का असेना, असणे बरे.

सारांश, प्रचार करताना या आधीच्या काळातील शेतकरी आंदोलनांच्या प्रयत्नाविषयी आदर बाळगून प्रचार करावा. १९७७ पासूनची धान्याची मुबलकता, राजकीय पक्षांविषयींचा भ्रमनिरास या गोष्टी १९८० सालचं आंदोलन प्रभावीपणे उभं राहण्यामागील प्रमुख बाबी आहेत. ग्राहकांच्या बाजूनं काळजीपूर्वक विचार मांडायला हवेत.

****



**प्रकरण : २**

# शेतकरी आंदोलनाचे अंतिम उद्दिष्ट

शेतकरी आंदोलनाचा हेतू स्पष्ट आहे. केवळ शेतकऱ्यांचा फायदा करून देणे हे या आंदोलनाचे उद्दिष्ट नसून सर्व देशातील गरिबी हटवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. वर्तमानपत्रांतून आपल्याल वाचायला मिळतं की कामगार पगारवाढीसाठी आंदोलन करतात, पगार चांगला असेल तर बोनससाठी, बोनस मिळत असेल तर रजा, नोकरीसाठी जास्त चांगल्या अटी यासाठी आंदोलनं करतात. महिना २५०० रु. पगाराची नोकरी असलेले पायलट यांत्रिक बिघाड, खराब वातावरण आदी कारणांसाठी कुठे अधिक वेळ थांबाव लागलं तर ओव्हर टाइम किती मिळाला पाहिजे यासाठी संप करतात. मला कसं जास्त मिळेल यासाठी जो तो संघटित होतो आणि आंदोलन करतो. शेतकरी-संघटनेचा एक कलमी कार्यक्रम-शेतमालाला रास्त किंमत-ही मागणी कामगारांच्या मागणीसारखीच दिसेल. असं वाटेल की आता शेतकरी म्हणतो, 'मलासुद्धा आता जरा जास्त द्या.' इतरांप्रमाणेच आमच्या कष्टाला योग्य मोल द्या, अशी त्याची मागणी आहे. या मागील भूमिका केवळ शेतकऱ्याला जास्त मिळावे अशी नाही. मला जास्त द्या अशी मागणी एखादा छोटा गट करू शकतो. कामगारांचा गट छोटा आहे, वैमानिकांचा गट छोटा आहे, सरकारी नोकरांचा गट छोटा आहे. पण शेतकरी वर्ग देशाच्या ७० ते ७५ टक्के आहे. तो मला जास्त द्या अशी मागणी केवळ स्वार्थबुद्धीने करीत राहिला आणि त्याच्या श्रमाला योग्य मोल मिळत असतानासुद्धा जर जास्त मागू लागला तर ती मागणी व्यवहारात उतरवणे शक्यच होणार नाही आणि शक्य झाले तरी एकूण देशावर निश्चितपणे वाईट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. पण हा बहुसंख्य गट केवळ स्वार्थाचा विचार करून ही मागणी करीत नाही, तर एकूण देशातल्या परिस्थितीचा विचार करून देशातले जे मोठे प्रश्न आहेत ते सोडविण्याकरिता ही मागणी करतो आहे. शेतीमालाला रास्त भाव मागतो आहे. तो देशातील दारिद्र्य दूर करण्याकरताच. शेतकऱ्यालाच फायदा व्हावा म्हणून नाही; तर देशातील दारिद्र्य दूर व्हावे या करताच शेतीमालाला रास्त भाव मागणे हा एक कलमी

कार्यक्रम आहे.

या देशात दारिद्र्य आहे. ते हटवायचे आहे, दूर करावयाचे आहे. 'गरिबी हटाव' च्या घोषणा आपण गेली कित्येक वर्षे ऐकत आहोत. प्रत्यक्षात काहीही घडलेले नाही. ही गरिबी आहे कुठे? गरिबी हटवायची आहे ना? मग तिचा शोध घेतला पाहिजे. गरिबी शहरात आहे का? शहरात झोपडपट्ट्या आहेत. तिथे बेकार आहेत, भिकारी आहेत, गलिच्छ वस्त्यांत राहणारे आहेत. तेव्हा शहरातही दारिद्र्य आहे. खेडेगावातील दारिद्र्य आपण कोरडवाहू भागात बघतोच आहोत. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील शेकडो शेतकरी चाकण भागात भुईमुगाचा हंगाम सुरू झाला की गाढवावर गाडगी मडकी लादून जातात-पोट भरण्यासाठी. कोरडवाहू शेतीतील दारिद्र्य आपल्याला सांगायला नको. पण गरिबी मुळात सुरू कुठे होते हे पाहायलाच हवे. शहरात की खेड्यात? याच उत्तर येतं- सर्व गरिबीचे/दारिद्र्याचे मूळ कोरडवाहू शेतीत आहे. शहरात गरिबी आहे. तिथं गलिच्छ वस्त्या आहेत, बेकार आहेत, भिकारी आहेत. पण या मंडळीशी जर आपण बोललात तर असं आढळून येईल की या पिढीत किंवा गेल्या पिढीत, नाहीतर त्या अगोदरच्या एक दोन पिढ्यात ही सर्व मंडळी कोरडवाहू शेतकरी होती- महाराष्ट्र, आंध्र, तामिळनाडू, केरळ वगैरे राज्यांत. तिथं कोरडवाहू शेतीवर पोट भरता येईना म्हणून एक दिवस-बहुतांशी दुष्काळाच्या वर्षी-जी काय जमीन असेल ती येईल त्या किमतीत फुंकून टाकायची, बैलं जी जिवंत राहणार असतील ती विकून टाकायची आणि काय गाडगी मडकी असतील ती बांधून शहरात रोजगारासाठी, पोटाकरता जाऊन राहायची. शहरातील त्यांची राहण्याची अवस्था भयानक, गलिच्छ, अतिशय घाण असूनसुद्धा ते तिथंच राहणं पत्करतात कारण त्यांचं गावातलं कोरडवाहू शेतीवरचं आयुष्य त्याहूनही भयानक होतं. एखाद युद्ध झाल्यावर जर एखाद्या शहरावर बॉंब पडला, आगी लागल्या असं झालं म्हणजे घरदारं नाहीत म्हणून तेथील होक उठून दुसरीकडे जाऊन निर्वासित म्हणून राहतात त्याचप्रमाणे कोरडवाहू शेतकरी म्हणून जगणं अशक्य झालं, म्हणून शहरात जाऊन राहिलेली ही निर्वासित मंडळी आहेत. म्हणून दारिद्र्याची मूळ सुरुवात कोरडवाहू शेतीत आहे. म्हणून दारिद्र्याच्या प्रश्नाचा अभ्यास करताना पहिली गोष्ट ही लक्षात ठेवली पाहिजे की देशातील दारिद्र्याचे मूळ कोरडवाहू शेतीत आहे.

मुंबईतील झोपडपट्ट्यांत राहणाऱ्या लोकांचा शास्त्रीय अभ्यास अनेकांनी



केला आहे. * त्यांचे निष्कर्ष पाहण्यासारखे आहेत.

-मुंबईत आलेले पहिले शेतकरी पक्क्या चाळीत राहिले. निर्वासितांची संख्या वाढली तसे ते पत्र्याच्या चाळीत राहू लागले. तेथून झोपडपट्टी आणि आता फुटपाथ.

-झोपडपट्ट्यांत आणि फुटपाथवर राहणाऱ्यांत ग्रामीण भागात जगता येत नाही म्हणून निघून आलेल्यांचे प्रमाण प्रचंड आहे.

-झोपडपट्ट्यातील वा फुटपाथवरील भयानक आयुष्य हेही ग्रामीण भागातील उपासमारीपेक्षा बरे असा आर्थिक सुज्ञतेचा विचार करून ही मंडळी शहरात राहणे पत्करतात.

दारिद्र्याविषयी दुसरा महत्त्वाचा, लक्षात ठेवण्यासारखा मुद्दा म्हणजे कोरडवाहू शेतीतील दारिद्र्य हे वाढतं आहे. ते कमी होत नाही आणि आहे तितकंचही राहत नाही. ४०/५० वर्षे वयाचे शेतकरी आहेत त्यांनी आठवून पाहावं की आपण १०/१२ वर्षांचे होतो तेव्हा आपल्या घरी दररोजच्या जेवणात काय काय असायचे? भाजीपाल्याचे कालवण किती वेळा असायचे? ताटात ताक, दूध, दही किती वेळा असायचे? कालवणाला निदान दोन थेंब तेलाची फोडणी किती वेळा असायची? आपल्या घरात आईला, आजीला धड लुगडी किती वेळा असायची? आणि आता हेच उलटे विचारून पाहू. आता स्थिती काय आहे? आपल्या घरातील दहा वर्षाचं पोर, नातवंड जेवायला बसलं तर त्याच्या ताटात ताक, दूध, दही किती वेळा पडतं? घरातील स्त्रीला धड लुगडी किती असतात? या प्रश्नांची उत्तरेच आपल्याला दारिद्र्य खऱ्या अर्थानं वाढतं आहे हे समजावून देतील. सरकारी आकडेवारीतसुद्धा दारिद्र्य वाढतं आहे असं नमूद केलेलं आहे. पण आपल्या अभ्यासात या सरकारी आकडेवारीवर आपण कुठेही विश्वास ठेवणार नाही. विसंबून राहणार नाही. कारण ही आकडेवारी कधी आणि कशा पद्धतीने मांडली जाईल हे सांगता येत नाही. ही जर एकदा आपण गृहीत धरली तर तिच्या

*पाहा :-

1) The Urban Poor --- A.M.Singh & Alfred de Souza.
2) Pavement Dwellers in Bombay --- P. Ramchandran.
3) Study of a large heterogeneous sulm in Bombay --- Desai & Pillai.
4) The Urban Poor & Social Change --- Mujumdar.

आधाराने आपली फसगत होण्याची शक्यता आहे. ती आकडेवारी कशी तयार झाली हे तपासून पाहण्याची आपल्याला संधी नाही. म्हणून ती न वापरता प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांना काय दिसतं, प्रत्यक्ष दररोजच्या आयुष्यातील अनुभव काय आहे त्या अनुभवावरूनच आपण शहाणपणा शिकायचा आहे. शंकराचार्यांनी जसं म्हटलं आहे, अग्नी-निखारा थंड आहे असे हजार वेदांनी जरी सांगितले तरी ते मी मानणार नाही, तसं सरकारी रिपोर्टात जरी सांगितलं ... शेतकऱ्यांची परिस्थिती आता चांगली आहे, शेतकरी सुखी आहे तरी ते मी मानायला तयार होणार नाही. गंमत कशी असते बघा. दिल्लीला शेतकऱ्यांचा एक मेळावा झाल्यानंतर पंतप्रधानांनी एक भाषण दिले-मेळाव्यानंतर. त्यात त्या म्हणाल्या, 'हे जे बोलणं चाललं आहे की शेतकऱ्यांची परिस्थिती बिघडत चालली आहे हे मला मान्य नाही. मी जेव्हा जेव्हा गावागावात जाते, तिथं माझ्या अस लक्षात येतं की आता शेतकऱ्याची परिस्थिती सुधारू लागली आहे.' जी मंडळी खुर्चीवर/सत्तेवर बसतात ती म्हणतात, 'तुम्हाला वाटते इतकी काय वाईट परिस्थिती नाही. शेतकऱ्याचं सध्या बर चाललं आहे.' पुढं ही मंडळी खुर्चीवरून उतरली की म्हणू लागतात, 'प्रश्न फार भयानक आहे.' तेव्हा या मंडळींच्या चर्चेच्या जंगलात आपण सापडू नये. आपल्याला प्रत्यक्ष काय अनुभवायला येतं त्याच्या आधारावर आपण आपले विचार तयार करू.

आणि आज कुणी आहे का '३० वर्षांपूर्वी आमच्या घरात जी परिस्थिती होती त्यांच्यापेक्षा चांगली आहे 'असं म्हणणारा? म्हणणारे भेटतील, पण कोण? तर ते ज्यांनी शेतीच्या पलीकडे काही धंदा व्यवसाय केला आहे. ज्यांनी निदान राजकारण केलं- पंचायत समितीत गेले, जि.प.त गेले, आमदार-खासदार बनले असे लोक तसं म्हणणारे भेटतील. किंवा कुणी काही खटपटी करून पेट्रोलपंप, टेंपो, ट्रक मिळविले असे म्हणतील. पण ज्यांनी केवळ शेती केली त्यांच्या घरची परिस्थिती सुधारली असं एकतरी उदाहरण इथ आहे का? असेल तर सांगा. आपण त्याचा अभ्यास करू. ३३ वर्षात सोसायटी पूर्णपणे फेडली आणि मेला किंवा कर्जफेड करून कर्जमुक्त झाला असं एकतरी उदाहरण आपल्याला सापडेल काय?

कोणत्याही अर्थानं घेतलं तरी ग्रामीण भागातील शेतकऱ्याचं दारिद्र्य सतत वाढतं आहे. या दारिद्र्याविषयी आपण दोन प्रमुख गोष्टी पाहिल्या. (१) या दारिद्र्याच मूळ कोरडवाहू शेतीमध्ये आहे आणि (२) शहरी भागातील दारिद्र्य हे



ग्रामीण भागातील दारिद्र्याचा परिणाम आहे.

ताटातील अन्नपदार्थांचे उदाहरण किंवा सोसायट्यांच्या कर्जाचे उदाहरण याबरोबर आपण आणखी एक उदाहरण पाहू. ज्या गावात सर्व व्यवहार फक्त शेती व्यवसायावरच अवलंबून आहे अशा गावात जर भू-विकास बँक किंवा पंचायत समितीची एखादी नवी इमारत असेल तर तेवढेच त्या गावातील नवीन बांधकाम. अंबेजोगाईच्या मोरेवाडीत दगडी बांधकामाच्या मोठमोठ्या इमारती आहेत. सर्व ढासळलेल्या, पडायला आलेल्या. एखादी भिंत पडली तर सावरायची ताकद नाही. पूर्वी बांधलेल्या मोठ्या वाड्यात भिंती घालून किंवा कुडं उभी करून शेतकऱ्यांची विभक्त कुटुंब राहतात. पण नवीन इमारती झालेल्या दिसत नाहीत. तेव्हा शेतकरी काय खातात, कसे राहतात, कपडे काय घालतात यावर विचार करा म्हणजे लक्षात येईल की दारिद्र्य हे वाढतं आहे.

हे दारिद्र्य हटवणे हे शेतकरी आंदोलनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साधण्यासाठी शेती किफायतशीर केली पाहिजे म्हणजेच शेतीमालाचा उत्पादनखर्च भरून निघाला पाहिजे.

****

प्रकरण : ३

# शेतीमालाचा उत्पादन खर्च

उत्पादन खर्च म्हणजे काय? त्याचा हिशेब कसा करायचा? त्याचा उपयोग काय? या विषयांचा अभ्यास हे वेगळे शास्त्र आहे. याचा अभ्यास महाविद्यालयात फार वरच्या वर्गात केला जातो.

आपल्याला सर्वसाधारणपणे हा विषय समजावून घ्यावयाचा आहे. कोणतेही एक पीक घेण्यासाठी काय काय लागते? त्या सगळ्यांची एक यादी बनवा.

तुमच्या यादीत बी-बियाणे, कीटकनाशके, बुरशीनाशके, तणनाशके इत्यादी औषधे, पेट्रोल, डिझेल, वीज लिहावयास तुम्ही विसरला नसाल. जमिनीची मशागत (नांगरट, पाळी), पेरणी, सऱ्या किंवा वाफे करणे, पाभार व फराट चालवणे, बी टिपणे किंवा फुंकणे, कोळपणी (माणसांची वा जनावरांची), खुरपणी, माती सावरणे, सऱ्या सावरणे, खते देणे, औषधे फवारणे, पिके काढणी (तोड), बांधणी, झोडपणी, उफणणी, गंजी लावणे, पोती भरणे, बाजारासाठी माल तयार करणे, साठवण, वाळवणे, जनावरांची देखभाल इत्यादी कामांची लागणारी मजुरीही धरायला तुम्ही विसरला नसाल. पण ही कामे घरातली माणसं करीत असली तर तुम्ही खर्चाच्या यादीत त्यांचे श्रम धरले नसतील. श्रम रोजावरील मजुरांनी केलेले असोत वा घरच्यांनी केलेले असोत त्याचा खर्च धरावयास पाहिजे.

शेतीला लागणारी खते, वरखते, औषधे, अवजारे लांब अंतरावरून आणावी लागतात. या वाहतुकीस खर्च येतो. माल बाजारात नेण्यासाठी खर्च येतो. या वाहतुकीचा खर्च तुमच्या यादीत आहे का? असला तर तुम्ही कृषिमूल्य आयोगाच्या विद्वान सदस्यांपेक्षा बुद्धिमान आहात; कारण गेली १५ वर्षे हा खर्च लक्षात घेण्याचे हे विद्वान विसरूनच गेले होते. बियाणे, खते, औषधे असली म्हणजे शेती होते असे नाही. याखेरीज काही भांडवली खर्च असे असतात की, जे एकापेक्षा जास्त पिकांच्या उपयोगी पडतात. शेती करायला अनेक हत्यारे, अवजारे, औते यांची गरज आहे. ट्रॅक्टर, नांगर (लोखंडी वा लाकडी), नांगऱ्या, कुळव, पेटारा,



मोघड, पाभार, फरट, जोळ, कुळपी अशी औते अवजारे, तसेच टिकाव, खोरी, पहार, घण, हातोडी, विळे, खुरपी, पाट्या, घमेली, दोर चप्टारे, मुसक्या इत्यादी साधने लागतात. पाण्याच्या व्यवस्थेसाठी मोट, इंजिन, मोटर, पंप, स्टार्टर, पाईप यांची गरज आहे. काही वस्तू दर हंगामात घ्याव्या लागतात, काही वर्षभर टिकतात, काही जास्त टिकतात. प्रत्येक पिकाला या वस्तूंचा ज्या प्रमाणात उपयोग होईल त्या प्रमाणात त्या वस्तूंची किंमत खर्चाच्या यादीत घ्यावयास हवी.

या वस्तूंची नुसती किंमत धरून भागणार नाही. या वस्तूंच्या रूपाने रोख रक्कम अडून राहते. त्यावरील व्याज बुडते. तोसुद्धा एक खर्चच आहे.

औत अवजारांना दुरुस्ती करावी लागते. हा खर्च विसरून चालणार नाही. कृषिमूल्य आयोगाने दुरुस्तीखर्च गेली १५ वर्षे लक्षात घेतला नाही.

बैलांची गरज आहे. त्यासाठी गोठ्याची गरज आहे. उन्हाळ्यात मांडव करायला पाहिजे.

जमिनीची प्रत टिकावी, निदान धुपणी होऊ नये यासाठी दरवर्षी बांधबंदिस्ती, चर, पाट यांची डागडुजी करणे, पेटारणे, जमिनीची तपासणी करून घेणे हे काही फुकट होत नाही.

आणि सगळ्यात मोठा खर्च म्हणजे शेतजमीनच. वर्षानुवर्षे घाम गाळून कमावलेली जमीन, केलेली बांधबंदिस्ती, खोदलेल्या विहिरी ही प्रचंड गुंतवणूक आहे. या गुंतवणुकीवरील व्याज आणि घसारा धरला पाहिजे. आपली जमीन वाडवडिलांकडून मिळाली, मग तिचा खर्च काय धरायचा असे म्हणू नका. जमीन वाडवडिलांकडून उसनी घेतली आहे असे समजून त्यांना ती निदान आपल्या हाती आली तेव्हा होती इतक्या तरी चांगल्या अवस्थेत पोचवायला हवी.

हे वेगवेगळे खर्च प्रत्यक्षात कसे काढावे याचा थोडा तपशिलात विचार करूया.

आपण जी जमीन वापरतो त्या जमिनीचं शेतजमीन म्हणून स्वरूप कायम राहण्याकरिता आपल्याला जे खर्च करावे लागतात त्या पोटी त्या जमिनीच्या आजच्या किमतीच्या १० % रक्कम खर्च म्हणून धरली पाहिजे. जमीन आज विकली तर तिची जी किंमत येईल ती बँकेत मुदतीच्या ठेवीने ठेवली तर काही कष्ट न करता, अगदी इकडची काडी तिकडे न करता १० % व्याज खाता येईल. शेती करायची ठरवली की शेतकरी ही रक्कम गमावतो. हा खर्चाचा पहिला घटक.

शेतीसाठी लागणाऱ्या इतर गोष्टी म्हणजे बैल, गोठा, औतं-औजारं, विहीर इत्यादींवरील खर्च धरावयास पाहिजे. हा सर्व भांडवली खर्च आहे. त्यामुळे तो एकाच वर्षाच्या पिकावर टाकायचा नाही. समजा बैलासाठी बांधलेला गोठा १० वर्षे टिकत असेल तर त्याचा खर्च विभागून १० वर्षांच्या पिकांच्या खर्चात विभागून धरायचा. म्हणजे एका वर्षाच्या पिकावर गोठ्याच्या एकूण खर्चाचा एक दशांश धरायला पाहिजे. लोखंडी नांगर ६ वर्षे टिकतो. त्याचा खर्च ६ वर्षांच्या पिकावर टाकला पाहिजे. बैलसुद्धा त्याच पद्धतीने जितकी वर्षे काम करू शकेल तितक्या वर्षांच्या पिकांवर त्याची किंमत विभागली पाहिजे. अर्थात् बैलांवरील खाणे, देखरेख इत्यादींवरील दैनंदिन खर्च त्या त्या वर्षाच्या पिकांवर धरला पाहिजे. समजा विहीर खोदण्यासाठी, बांधण्यासाठी ५० हजार रु. खर्च आला असेल आणि विहीर २०/२५ वर्षे टिकते तर तिचा खर्च तितक्या वर्षांच्या पिकांवर धरला पाहिजे. त्याशिवाय अडकलेल्या भांडवलावर व्याजही आकारले पाहिजे.

नंतर मजुरी. शेतीकामासाठी आपल्याला रोजगारावर माणसे घ्यावी लागतात. त्यांची मजुरी या खर्चात धरली पाहिजे. पण रोजगारावरील माणसांबरोबर किंवा ती नसतानासुद्धा आपल्या घरची माणसे शेतीची कामं करत असतात. त्यांचीही मजुरी खर्चात धरली पाहिजे? ती कोणत्या पद्धतीनं धरली पाहिजे? आपल्या घरच्या माणसांसाठी रोज दोन वेळचे जेवण आणि वर्षासाठी कपड्याचे दोन जोड एवढीच जबाबदारी नसते. त्यांच्या आजारपणात औषधपाण्याचा खर्च असतो. मुलांच्या शिक्षणाचा खर्च असतो. मुलीच्या लग्नकार्याचा खर्च असतो. दशपिंडाचा खर्च असतो. हे आणि असे सर्व खर्च घरच्या माणसांच्या मजुरीत धरले पाहिजेत. हे धरले नाहीत तर शेती फायद्याची दिसेल पण मुलीच्या लग्नासाठी जमीन गहाण टाकून कर्ज काढावं लागेल; शेती किफायतशीर वाटेल तरी दशपिंडांसाठी कर्ज काढावं लागेल- जमीन गहाण टाकून. घरच्या माणसांच्या मजुरीचा विचार करताना आपल्या दर्जाला, परंपरेला योग्य असा खर्च लक्षात घेतला पाहिजे. नाहीतर किमान बाहेरच्या माणसाला आपण जी मजुरी देतो तितकी तरी मजुरी धरली पाहिजे. आजपर्यंत आम्ही संघटनेतर्फे जे हिशेब केले त्या बाहेरची माणसं ज्या दरानं काम करतात त्याच दरानं घरची माणसं काम करतात असं धरलं आहे. म्हणजे आपली माणसं दुसऱ्याच्या शेतात काम करतात आणि शेजारची माणसं आपल्याकडे काम करतात आणि आपण त्यांना रोख मजुरी देतो असं धरलं आहे.



आपली शेती चार पाच महिनेच असते. इतर वेळी पाण्याअभावी पडून असते. घरच्या माणसांना मात्र आपल्याला बाराही महिने जेवू घालायचे (जगवायचे) असते. तरी खर्च काढताना प्रत्यक्ष जितके तास काम होतं तितक्या तासांचीच मजुरी धरली जाते. जास्त नाही. हे मुद्दाम सांगण्याचे कारण, पुढे अभ्यास करताना उत्पादन खर्चाचा आकडा येनकेनप्रकारेण मोठा काढला अशी शंका येण्याची शक्यता आहे. आपण प्रत्यक्ष केलेल्या कामाचीच मजुरी धरतो.

उत्पादन खर्चातील इतर मुद्दे जे आहेत ते समजायला सोपे आहेत. आपण शेतात जी खते घालतो-रासायनिक खते, शेणखत, बकऱ्या बसविणे, कुणी ताग मोडत असतील तर ते- यांचा खर्च घेतला पाहिजे. बी-बियाण्यांची किंमत-जरी घरचं बियाणं वापरलं असलं तरी त्याची किंमत खर्चात धरायला हवी, त्यानंतर औषधे वापरावी लागतात. त्यांची किंमत आणि फवारणी वगैरेची मजुरी एकूण खर्चात धरली पाहिजे.

शेतात मजुरी काय द्यावी लागते या विषयी आपण सविस्तर बोलू शकतो. पण शेतासाठी फक्त मजूरच लागतात का? कारखान्यात नुसते कामगार नसतात. सुपरवायझर असतो, मॅनेजर असतो. तसं शेतीमध्ये काय असतं काय? आमच्या चाकण भागामध्ये साधारणपणे ज्या घरात ५ एकरापर्यंत जमीन असते तिथं घरातला एक मनुष्य-ज्याला कारभारी म्हणतात, सतत शेतीच्या बाहेरच्या कामासाठी फिरत असतो. कधी तरी ८/१० दिवसांनी शेतावर जातो. त्याची काम कोणती असतात? यंदा पीक कोणचं घ्यायचं ते ठरवणं, चांगल्या दर्जाची बी-बियाणं मिळवणं, मजूर मिळत नसतील तर मिळवून आणणं, बाजारात मालाच्या विक्रीची व्यवस्था करणं, व्यापाऱ्याकडून पैसे वसूल करण्यासाठी हेलपाटे घालणं, लागतील तेव्हा तलाठ्याकडून ७-१२ चे उतारे आणणं, गाव नमुना ८-अ चे उतारे आणणं, कर्जासाठी सोसायटीकडे जाणं, बँकांकडे जाणं, कोर्टात काही दावा असेल तर तारखेला कोर्टात जाऊन बसणं आणि पुढची तारीख घेऊन परत येणं आणि इतकं सर्व करून कर्ज फेडता येणार नसेल तर या माणसाला भेट, त्या आमदाराला भेट, त्या चेअरमनला भेट आणि 'आपल्या घरची जप्ती टाळ बाबा' म्हणून पाय धर या सगळ्या गोष्टींसाठी घरचा एक माणूस कायमचा अडकलेला असतो. याचा खर्च कसा धरायचा? शेती व्यवसायाला व्यवस्थापन आहे किंवा नाही? यावर काही मंडळी हरकत घेतात. ते उपहासाने म्हणतात, 'हा कारभारी बाजारच्या ठिकाणी

जातो आणि चहा मिसळ खातो किंवा चहा भजी खातो. त्याचा कसला खर्च धरायचा? हा उनाड मनुष्य आहे.' कारखान्याच्या बाबतीत सेल्स मॅनेजर असतो; विक्री करणारा मनुष्य असतो. किर्लोस्करची इंजिनं विकणारी हजारो माणसं गावोगाव हिंडतात. चांगल्या चांगल्या हॉटेलात राहतात आणि इंजिनं विकली जावीत म्हणून पाच, दहा, पंधरा हजार रुपयांच्या मेजवान्या देतात. हा खर्च त्याला कारखान्याकडून भरून मिळतो. याचा अर्थ तुम्ही जेव्हा इंजिन विकत घेता तेव्हा त्याच्या किमतीत तुम्ही या मेजवानीची वर्गणी भरता. हे जर मेजवानीचे पैसे इंजिनाच्या उत्पादन खर्चात येतात तर आमच्या कारभाऱ्याने खाल्लेल्या चहा मिसळीचे पैसे शेतमालाच्या उत्पादन खर्चात का येऊ नयेत? यायलाच हवेत. आम्ही उत्पादन खर्चात व्यवस्थापनाचा खर्च कमीत कमी धरला आहे-एका एकराला एका दिवसाला फक्त एक रुपया धरला आहे.

दुसरा महत्त्वाचा खर्च म्हणजे 'धोका.' आपल्याकडच्या पावसाच्या अनिश्चितपणामुळे प्रत्येक वर्षी जरी तितकीच ज्वारी पेरली तरी हंगामाच्या शेवटी ज्वारीचे पीक किती मिळेल हे कुणाही शेतकऱ्याला सांगता येत नाही. कापणी सुरू व्हायच्या आधी महिनाभरसुद्धा तो केवळ अंदाजच सांगत असतो. शेवटच्या दिवसापर्यंत काय होईल सांगता येत नाही. कारण पाऊस, पाखरं, रोग काहीही असू शकतं. एखाद्या कारखान्यात चाक तयार करीत असतात. दहा चाकं तयार केली आणि त्यातली जर साधारणपणे तीन तुटकी निघत असतील तर त्यांचा खर्च कारखानदार स्वत:च्या खिशातून भरत नाही. तो दहा चाकांचा खर्च सात चाकांवर मारून किंमत ठरवतो. एका एकरात साधारण २०/२५ पोती (क्विंटल) ज्वारीच पीक आलं तर बंदा रुपया पीक आलं अस आपण म्हणतो. आपण वीस पोत्याचा खर्च हिशेबासाठी धरू. पीक काहीही येणार असलं तरी भांडवली खर्च, बियाणं-मशागतीचा खर्च, यात काही फरक पडत नाही. मग पीक कमी आलं तर सरासरी खर्चांचा आकडा वाढणार. मग ज्वारीच्या एका क्विंटलचा उत्पादन खर्च काढताना उत्पादन किती धरायचे? गेल्या सलग ७ वर्षांतील पिकांचे आकडे जमा केले तर कोरडवाहू भागात सरासरी पीक फक्त ५३ पैसेच येतं असं लक्षात येतं. म्हणजे ७ वर्षांच्या काळात पीक सरासरी ४७ पैशांनी बुडतं. मग इतका खर्च केल्यावर पीक किती येईल हे कसं काढायचं? २० पोती हे बंद रुपया पीक असलं तरी उत्पादन खर्च किती पिकातनं वसूल करायचा हे काढण्यासाठी इतकं पीक धरून चालायचं



नाही, तर प्रत्यक्षात सरासरी पीक किती हे धरायला पाहिजे किंवा आपण कोणत्या प्रकारची जमीन निवडली आहे, बी-बियाणे काय प्रकाराचं पेरल आहे आणि खतं कोणत्या प्रमाणात घातली आहेत लक्षात घेऊन त्यात काय पीक आलं असतं ते धरून त्यातून सरासरीचे ५३ पैसे पीक हिशेबात घेतलं पाहिजे. उदाहरणार्थ, निपाणी भागात एकरी ११०० किलो तंबाखू काढलेले शेतकरी आहेत. पण तो एक चमत्कार होता. ८०० किलो तंबाखू काढणारे पाच दहा शेतकरी सापडतील. पण सर्वसाधारणपणे सरासरी २४० ते २८० किलो असं सरासरी उत्पादन आहे. परवडत नाही म्हणून दरवर्षी शेतीत घातला जाणारा खर्च कमी कमी होत जातो. तरीसुद्धा संघटनेने हा आकडा एकरी ३२० किलो धरला आहे. सरासरीपेक्षा जास्त का धरला आहे? तर आपल्याला प्रथम सरकार किंवा व्यापाऱ्यांकडून उत्पादन खर्च भरून निघाला पाहिजे ही कल्पना मान्य करून घ्यायची आहे. उसाचंसुद्धा महाराष्ट्रातील सरासरी उत्पादन एकरी ४० ते ४२ टन आहे. तरीसुद्धा उसाला टनाला ३०० रु. भाव मागताना आपण ते एकरी ५० टन धरले आहे. आमचं म्हणणं, उत्पादन थोडं जास्त धरा पण आमचा खर्च मान्य करा.

अशा पद्धतीनं आपल्याला उत्पादन खर्च काढायला हवा. काही खर्च उघड उघड असतात, आपल्याला डोळ्यांनी दिसत असतात, आपल्याला मोजायला लागतात. त्यांच्याबरोबर काही खर्च डोळ्यांनी दिसत नाहीत. आपल्याला प्रत्यक्ष मोजायला लागत नाहीत. असे सर्व खर्च लक्षात घेऊन एका बाजूला खर्च काढायला पाहिजे आणि दुसऱ्या बाजूला उत्पादन किती होतं ते काढायला पाहिजे. खर्चाच्या रकमेला उत्पादनाच्या आकड्यानं भागलं म्हणजे आपल्याला तंबाखूच्या एका किलोमागे, ज्वारीच्या एका क्विंटलमागे किंवा उसाच्या टनामागे काय खर्च येतो ते कळेल. म्हणजे वाण्यानं १००० रु. चा माल आणला तसं आपण जो माल तयार करून विक्रीस आणला त्याचा खर्च किती आला हे आपल्याला त्यावरून मिळेल.

काही उत्पादनांचे उत्पादन खर्च आणि त्यांना मिळत असलेल्या बाजारभावाचे आकडे पुढीलप्रमाणे - *

१९७९ साली भुईमुगाचा उत्पादन खर्च किलोला ४.३० पैसे होता. यंदा तर

---

* हे हिशेब १९८० सालातील आहेत.

५० टक्के पीक बुडालं आहे. त्यामुळे उत्पादन खर्च वाढेल; परंतु हंगामामध्ये भुईमुगाच्या किलोला रु. २.५० ते २.६० च्यावर भाव कधीही मिळाला नाही.

उसाचा उत्पादन खर्च टनाला रु. २८८ पै. १० आहे. पण आतापर्यंत उसाला टनाला रु. १४२ मिळत आहेत.

कांद्याचा उत्पादन खर्च ७६ साली ४५ ते ६० रु. क्विंटल होता. पण भाव मात्र रु. १८ ते २५ पर्यंतच मिळत होता. सध्या मात्र आम्ही सरकारची मानच पकडून ठेवली आहे त्यामुळे सध्या स्थिती बरी आहे.

तंबाखूचा उत्पादन खर्च किलोला ११.४० रु. येतो. काहींना ८ ते ९ रु. भाव मिळतो; परंतु शेतकऱ्याला सरासरी रु. ३.६० भाव मिळाला आहे.

संकरित गाईच्या दुधाचा उत्पादन खर्च रु. ३.८० दर लिटरला आहे. पण किंमत मात्र रु. २.१० ते रु. २.५० मिळते. भाताचा प्रकार तर भयानक आहे. भंडारा जिल्ह्यात भाताचा उत्पादन खर्च किलोला रु. ३.२२ पेक्षा कमी असूच शकत नाही. भाताचा संपूर्ण अभ्यास अजून व्हावयाचा आहे. कदाचित हा खर्च याहूनही जास्त निघेल. पण कित्येक वर्षे भाताला फक्त रु १.२० ते रु. १.४० चाच भाव मिळतो. काही गावात तर ८५ ते ९० पैसे किलोने भात खरेदी केले जाते. कपाशीचा उत्पादन खर्च सरकारी आकडेवारीनुसार क्विंटलला रु. ६८७ आहे. पण सरकारी खरेदी यंत्रणा शेतकऱ्याला क्विंटलला सरासरी रु. ५०० चा दर देते. पूर्वी अशी म्हण होती, एका क्विंटल कापूस विकावा आणि एक तोळा सोनं घ्याव. आज एक तोळा सोनं घ्यायचं झालं तर ४ ते ५ क्विंटल कापूस विकावा लागतो.

ही जर परिस्थिति असेल आणि शेती व्यवसायात शंभराचे साठच होत असतील तर जे काही थोड्या ठिकाणी वैभव दिसतं ते शेतीतनं आलं किंवा नाही याबद्दल जबरदस्त प्रश्न आपण निर्माण करतो.

सारांश, शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना शेतीमध्ये आपण जे जे भांडवल गुंतवतो त्यावरील व्याज, औतं, औजारं, बांधकामे यांच्या दुरुस्तीचा खर्च, मजुरी- घरच्या माणसांचीसुद्धा, बैलावर खर्च वगैरे सर्व खर्चाचा विचार केला पाहिजे. नैसर्गिक खतं, वरखतं, औषधं, बी-बियाणे यांचा खर्च, तयार झालेला माल साठवणुकीसाठी, वाहतुकीसाठी येणारा खर्च, कारभाऱ्याचा खर्च अशा सर्व खर्चाची बेरीज करून एकूण उत्पादन खर्च काढायला हवा. नंतर प्रत्यक्ष किती पीक येते, त्यातून सरासरी तूट लक्षात घेऊन सरासरी उत्पादनखर्च काढायला हवा. खर्चाचे



आकडे कसे काढायचे? एकाच्या शेतामधले आकडे आणि दुसऱ्याच्या शेतामधले आकडे याच्यात एका गावातसुद्धा फरक पडतो.

सरकारी समितीच्या आकडेवारीतसुद्धा उत्तर प्रदेशातील गव्हाचा उत्पादन खर्चाचा आकडा आणि नाशिक भागातील उत्पादन खर्चाचा आकडा यात तिपटीचा फरक आहे. मग हा आकडा काढायचा कसा आणि शेतकऱ्यांनी जो उत्पादन खर्च भरून मागितला आहे तो कोणता भरून द्यायचा? याकरता शासनाने एक युक्ती योजली आहे. शेतीमालाचे भाव ठरविण्यासाठी कृषिमूल्यआयोग म्हणून एक समिती नेमलेली आहे. ती काय करते? देशातील ५।। ते ६ हजार शेतकऱ्यांची शेतं निवडते. निवडते म्हणजे लॉटरीचे जसे नंबर काढतात तसे सर्वेनंबर काढतात. त्यामुळे यात वेगवेगळ्या गावांतील, राज्यातील शेतं निवडली जातात. कुणाचही शेत निवडलं जाण्याची शक्यता असते. या शेतातील प्रत्येक बाबीवरील खर्चाचे आकडे घेऊन त्यांची बेरीज करून सरासरी खर्च काढून एकूण सरासरी उत्पादन खर्च काढला जातो. या पद्धतीत दोष आहे. सहा हजारांपैकी साधारणपणे ५५०० शेतकरी हे गरीब, लहान शेतकरी असतात. आर्थिक दारिद्र्यामुळे त्यांना आधुनिक तंत्रांचा, वरखतांचा, औषधांचा वापर करणे शक्य होत नाही. याचा परिणाम उत्पादन खर्च काढण्यावर होतो. ही सहा हजार शेतं जर ऊस लागवडीखालील असतील तर सरासरीच्या तंत्राप्रमाणे औषध फवारणीचा खर्च हेक्टरी रु. १०.७३ येतो कारण ५५०० शेतकरी औषधफवारणी करीतच नाहीत. त्यामुळे त्यांच्या नावापुढे त्या रकान्यात काहीच रक्कम नसते. उरलेल्या ५०० जणांचा खर्च सहा हजारांवर विभागला जातो आणि मग हेक्टरी १०.७३ रु. असा विचित्र आकडा येतो. आपल्याला सर्वांना ठाऊकच आहे की हेक्टरला रु. १०.७३ पाणी फवारण्यालासुद्धा पुरत नाहीत.

उत्पादन खर्च काढण्याचा सरासरी तंत्राचा दुसरा दोष असा-

ज्वारी बाजारात जाते ती कुणाची? जे शेतकरी आधुनिक तंत्र आणि वरखतं, औषधे वगैरेंचा वापर करून बरी शेती करू शकतात त्याच ६००० पैकी ५०० जणांची. उरलेले ५५०० लहान शेतकरी खर्च परवडत नसल्यामुळे फक्त घरच्यापुरती ज्वारी करतात. पण बाजारात ज्वारीची किंमत जे ज्वारी बाजारात पाठवित नाहीत अशा अधिक खर्च करू न शकणाऱ्या शेतकऱ्यांचा खर्च गृहीत धरून ठरविली जाते. त्यामुळे खर्च करणाऱ्यांचा खर्च भरून निघत नाही. आर्थिक असमर्थतेमुळे

५५०० शेतकरी चांगलं बियाणं, वरखतं, औषधं वापरत नाहीत. हा न केलेला खर्च विचारात न घेता जर त्याला किंमत देत राहिलं तर त्याची स्थिती सुधारणार कशी आणि तो आपली शेती सुधारणार कशी? कुठं तरी पाच रुपये जास्त मिळाल्याशिवाय तो वरखतं वापरणार कसा? तो खर्च करीत नाही म्हणून किंमत मिळत नाही आणि त्याला किंमत मिळत नाही म्हणून तो खर्च करू शकत नाही. अशा दुष्टचक्रात लहान शेतकरी अडकला आहे.

हे दोष टाळण्याकरता आपण शेतकरी संघटनेमध्ये उत्पादन खर्च काढताना शास्त्रीय उपाय योजना आखलेली आहे. शेतीमालाचा उत्पादनखर्च कृत्रिम नमुना पद्धतीने (Synthic Model Method) काढला पाहिजे. सरासरीने काढून चालणार नाही. मध्यावर १५-२० फूट खोल असलेल्या नदीची सरासरी खोली चार फूट असली तरी ती घोड्यावर बसून पार करता येईल?

कोणत्याही एका प्रकारच्या मगदुराची जमीन घेऊन खर्चाचा हिशेब काढला पाहिजे. उत्तम प्रतीची जमीन असेल तर जमिनीचा खर्च कमी असेल; परंतु मशागतीचा-खुरपणीचा खर्च जास्त असेल. पीक कमी येईल. म्हणजे सरासरी खर्चात फारसा फरक पडणार नाही. उदाहरणादाखल घेतलेल्या शेतीवर कशा प्रकारे शेती करावयाची आहे? अत्याधुनिक पद्धतीने की अति सनातन पद्धतीने? आधुनिक शेतीसाठी लागणाऱ्या सामग्रीची उपलब्धता लक्षात आणि शेतकऱ्यांची कुवत लक्षात घेता या दोन टोकांच्या पद्धतीत सुवर्णमध्य साधावा लागेल. शेतीची तांत्रिक तसेच कार्यक्षमतेची एक पातळी गृहीत धरावी लागेल. ही पातळी दरवर्षी तत्त्वत: वाढवली पाहिजे, परंतु दुष्काळासारख्या प्रसंगी क्वचित उतरवावीही लागेल.

गृहीत धरलेल्या तांत्रिक व कार्यक्षमतेच्या पातळीच्या संदर्भात कृत्रिम नमुना पद्धतीने उत्पादन खर्च काढला पाहिजे. या पातळीच्या वर असलेल्या शेतकऱ्यांना खास फायदा मिळवता येईल, खाली असलेल्यांना तोटा सहन करावा लागेल.

कृषिमूल्य आयोग उत्पादन खर्च काढताना जमिनीच्या भाडेपट्टीचा जरूर विचार करते. पण तसा विचार करताना महसूल खात्याने जमिनीची किंमत (नुकसान भरपाईच्या दृष्टीने) ठरविलेली असते ती धरते. धरणाखाली असणाऱ्या जमिनीची भरपाई ८०० रु. एकरी असते. बाजारात मात्र या जमिनीची किंमत ८ ते १० हजार रु. एकरी असू शकते. कुठे जमिनीची प्रत, गावापासून अंतर वगैरेनुसार ती एकरी २० ते २५ हजार असू शकते. तेव्हा नमुन्यासाठी आपण जी जमीन निवडू तिची



महसुलाची किंमत न धरता बाजारची किंमत धरली पाहिजे. नमुना म्हणून आपण ५००० रु. किमतीची जमीन घेतली तर मशागत, आंतरमशागतीचा खर्च वाढेल. त्याबरोबर उत्पादनही कमी येईल. जमीन गावापासून दूर असेल तर वाहतूकखर्च वाढेल. उलट जास्त किमतीची जमीन नमुना म्हणून घेतली तर मशागत, आंतरमशागतीचा खर्च कमी येईल आणि उत्पादन अधिक असेल. अशा नमुना जमिनीत आधुनिक तंत्र वापरून चांगलं बियाणं, नैसर्गिक खतं, वरखतं, औषधं किती प्रमाणात वापरली असता उत्पादन काय यायला पाहिजे याचा अंदाज घेऊन उत्पादन खर्च काढता येईल. या पद्धतीचा फायदा म्हणजे उत्पादन खर्च काढण्याच्या 'सरासरी' पद्धतीतील दोष बऱ्हंशी दूर होतील. वेगवेगळ्या भागातील उत्पादन खर्चामध्ये जी तिपटीपर्यंत तफावत येते ती दूर होईल. औषध फवारणीचा हेक्टरी खर्च रु. १०.७३ यासारखे वेडेवाकडे, वस्तुस्थितीपासून फार दूरचे खर्चाचे आकडे येणार नाहीत. मिळणाऱ्या किमतीतून शेतकऱ्याला शेती सुधारण्यास वाव मिळेल. आज ज्यांना चांगल्या पद्धतीने शेती करणे जमत नाही त्यांना उद्या तरी जमेल.

हा झाला उत्पादन खर्चाच्या तांत्रिक बाजूचा अभ्यास. उत्पादन खर्च भरून निघाला नाही तर काय होईल? एक हजार रुपयांचा माल आणून पाचशे रुपयांना विकणाऱ्या वाण्यासारख दिवाळं वाजेल. आपल्याकडील शेतकऱ्यांचं दिवाळं वाजून ते शहरात पोट भरण्यासाठी जातात हे कुणीही मान्य करील. सगळेच जात नाहीत हे मान्य. मग प्रत्यक्षात काय होत? तर सध्या मिळत असलेल्या किमतीत चालू खर्च जेमतेम भरून निघतो. पण भांडवली खर्च अजिबात भरून निघत नाही हा आजचा अनुभव आहे. त्यामुळे शेतकरी भांडवल खाऊनच जगतो असं म्हणावं लागतं. जर गोठा पडला किंवा बैल मेला म्हणून नवीन घ्यावा लागला, नवीन औत-अवजार घ्याव लागली, घरात काही खर्चाचा प्रसंग आला, आजार उद्भवला, कुणाचं लग्न असलं किंवा जमिनीच्या बांधबदिस्तीचं काम निघालं तर अशा खर्चासाठी खासगी सावकार, सोसायटी किंवा बँकेकडून जमीन गहाण ठेवून कर्ज घ्याव लागतं आणि शेतीत फायदा होत नसल्यामुळे हे कर्ज फेडणाऱ्यांची संख्या जवळजवळ शून्य आहे. म्हणूनच शेतकरी भांडवल खाऊन जगतो असं म्हणावं लागतं. एखाद्या घरातील कुणी शहरात नोकरीला असतो. तो जे काय ५-५० रुपये मनिऑर्डरने पाठविल त्यावर गुजराण करावी लागते. मावळ तालुक्याच्या डोंगराळ भागातील प्रत्येक घरातील एक मनुष्य मुंबईत आहे. ते कचेरीतल्या

लोकांना जेवणाचे डबे पोहोचविण्याचे काम करतात आणि घरी पैसे पाठवितात. हे डबेवाले मावळ भागातील भात ग्राहकाला स्वस्त भावात देतात आणि त्यांची घरे मनिऑर्डरी आणि जमिनीच्या गहाणवटीपोटी घेललेल्या कर्जावर चालतात. आता तुम्ही म्हणाल की शेतकऱ्याला फक्त शारीरिक श्रम करावे लागतात. त्याचे श्रममूल्य ठरवताना त्यांची बौद्धिक श्रमांशी तुलना कशी करता येईल ? शेतकरी शेतीचे काम करीत असताना शहरातील एखाद्या कचेरीतील साहेबापेक्षा अधिक प्रमाणात डोक्याचा उपयोग करतो. शेतकऱ्याचे सामान्यज्ञान अधिक असते. खगोलशास्त्राची, आकाशातील नक्षत्रे आणि ग्रह यांची माहिती शेतकऱ्याला किती आहे आणि शहरातल्या शिकलेल्या, कॉलेज पास झालेल्या माणसाला किती हे तपासून पाहिले पाहिजे. शेतकरी मातीची परीक्षा करतो, जमिनीत खोद किती आहे, पाणी कुठपर्यंत लागतं, जमीन कोणत्या प्रकारची आहे हे त्याला माहिती असतं. निदान आपापल्या भागामधल्या भूगर्भशास्त्राची/ भूस्तरशास्त्राची शहरी माणसाला किती माहिती असते ते तपासून पाहा. प्रत्येक शास्त्राची थोडी थोडी माहिती शेतकऱ्याला असतेच. आपण सामान्य ज्ञानाचा विचार करतो आहोत. शेतकरी हा काही विद्वान नसतो, पण त्याला पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, कीटकशास्त्र या प्रत्येकाचे सानुभव ज्ञान असते. शेतीच्या कारभाराला तर कोणत्या हंगामात कोणतं पीक घ्यावं, पीक आल्यानंतर कोणत्या वेळी ते बाजारात नेलं म्हणजे अधिक फायद्याचं होईल याचे वेळोवळी आडाखे बांधावे लागतात. अशा अनेक दृष्टींनं शेतकऱ्याला शेतीच्या कामात डोक्याचा-बुद्धीचा वापर अवश्य करावा लागतो.

शेती उत्पादनाच्या बाबतीत वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे उत्पादनखर्च आलेले दिसतात त्यामुळे काही मंडळी चिंतातुर झालेली दिसते. त्यांना काळजी वाटते की रास्त किंमत मिळू लागली तर काही शेतकऱ्यांना खूप फायदा होईल तर काहींना खूप तोटा होण्याची शक्यता आहे.

वेगवेगळे साखर कारखाने घेतले तरी त्यांचा उत्पादनखर्च सारखा नसतो. उत्पादन खर्चातील ही तफावत फक्त शेतीतच नसते; इतरत्रही आहे. एकच गोष्ट तयार करणाऱ्या १० कारखान्यांत उत्पादनखर्च वेगळा आहे. त्यांच्या हिशेबात जी पद्धत वापरली जाते तीच आपण वापरतो.

जमिनीची महसुलाची किंमत धरण्याऐवजी बाजारची किंमत धरली तर यातील जवळ जवळ निम्मे खर्च कमी होतील. अर्थात् अशास्त्रीय शेती किंवा अकार्यक्षमता



यामुळे येणारे फरक भरून निघणार नाहीत. तशी अपेक्षाही करू नये. शेवटी तो माल लोकांना विकत घेऊन खाता आला पाहिजे. तरीसुद्धा शेतीमालाचा उत्पादन खर्च कमी यावा यासाठी सध्या आम्ही काही युक्त्या योजल्या आहेत. कारण आम्हांला 'उडतं' मागायचं नाही. किमान जरी मागितलं तरी आज आहेत त्याच्या दुप्पट भाव होतात. जर पाच पटीनं भाव मागितले, मागताना आनंद होईल, तर ते मिळणारही नाहीत आणि मिळाले तर संपूर्ण देशाची आर्थिक व्यवस्था एका वर्षात कोलमडून पडेल. उदाहरणार्थ, गाईच्या दुधाला आम्ही रु. ३.८० दर लिटरला मागण्याचा विचार करीत आहोत. हा भाव ठरवताना आम्ही काय गृहीत धरलं आहे? शेतकरी एक एकर जमीन घेऊन त्यावर ४० गाई ठेवतो. त्यात प्रत्येक गाईवर सरासरी खर्च किती आणि गाईचं सरासरी दूध किती याचा विचार केला आहे. गाईचा खर्च काढताना एका वर्षात गाईचं माजावर येणं किती वेळा, वेत किती दिवसांनी, किती काळ गाय भाकड राहते यांचाही विचार केला आहे. ज्याची एकच गाय आहे त्याच्या बाबतीत असे हिशेब काढणे कठीण आहे. पण ४० गाई असल्या म्हणजे हे हिशेब करणे सोपे जाते. सगळ्याच्या सगळ्या ४० गाई संकरित जातीच्या. तिसऱ्या महिन्याला माजावर येणाऱ्या असल्या तरी प्रत्यक्ष तीसच वेळेवर माजावर येतात, काही भाकडच राहातात. एक एकर जागेत या गाई ठेवल्या, म्हणजे टाळता येणार नाही. असा एक खर्च येतो तो म्हणजे त्या सबंध जागेला तारेचं किंवा कसलं तरी कुंपण घालावं लागणार. एक एकर जमिनीला तारेचं कुंपण घालायचं म्हणजे सुरुवातीलाच ४०/५० हजारांचा भांडवली खर्च आला. हा खर्च जर सुरुवातीलाच हिशेबात धरला तर दूध कुणालाच परवडणार नाही. यावर आम्ही उपाय काढला. हा सर्वच्या सर्व खर्च सुरुवातीला करणं शक्य नाही. एकराचं संपूर्ण कुंपण घातलं असं न करता ते टप्प्याटप्प्याने घालणार असं गृहीत धरलं. गाईमागे दर वर्षाला रु. १०० विकास खर्च धरला. कुंपणाबरोबरच पावसाळ्यात शेतापर्यंत ट्रक यावा म्हणून पक्का रस्ता. गोबर गॅस प्लान्ट, दुग्धव्यवसायासाठी टेलिफोन या सोयी या विकास खर्चातून टप्प्याटप्प्याने करता येतील. कारखान्यात जसा विकासनिधी असतो तसा हा विकासनिधी धरा आणि हळूहळू सुधारणा करून घ्या. अशा तऱ्हेने सुरुवातीचा अटळ असा भरमसाट खर्च मोठ्या काळामध्ये विभागून दुधाच्या भावाची पातळी रु. ३.८० पर्यंत खाली ठेवली आहे.

खरं तर आपण जे मागतो तेसुद्धा पुरे नाही. हा मुद्दा महत्त्वाचा आहे. पण आपण जे मागतो आहोत ते आज मिळतं त्यापेक्षा इतकं जास्त आहे की त्याच्यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त होतात. आम्ही जेव्हा उसाला टनाला रु.३०० चा भाव मागितला तेव्हा 'हे काहीतरी भलतंच आहे' असं लोक म्हणाले. आपण दुधाला रु. ३.८० दर लिटरला मिळाले पाहिजेत असं जाहीर केलं तर हाहाकार उडेल. पण मागणी करताना आपण डावपेचात काय मिळवणार आहोत हेसुद्धा पाहायला हवे. तुमची इच्छा आहे शिखरावर जाण्याची. पण आज जे आपण अगदीच तळात गाडलेले आहोत ते दोन पावलं तरी वर चढू–जिथं निदान मोकळेपणाने श्वास घेता येईल इथवर पोहोचू या. त्याच्या पुढच्या पायऱ्या नंतर चढता येतील.

शेतीमालाला भाव वाढवून मिळाला की त्याबरोबरच शेतीसाठी लागणाऱ्या मालाच्याही किमती वाढतात. या वाढत्या खर्चाने पुढील वर्षाचा उत्पादन खर्च वाढतो. त्यामुळे शेतीव्यवसायात 'बॅक लॉग्' निर्माण होतो. गेल्या हजार वर्षांचा नको, पण निदान एका वर्षाचा 'बॅक् लॉग्' तरी भरून निघावा अशी तरतूद आपल्या 'उत्पादन खर्चाच्या' हिशेबात आहे काय?

चालू वर्षातील खर्चाचा बोजा शेतकऱ्याला झेपावा म्हणून बँकांच्या 'पीक कर्जा'च्या योजना आहेत. प्रत्यक्षात किती लोकांना त्याचा फायदा होतो ही गोष्ट अलाहिदा! पण आपण उत्पादन खर्चाच्या हिशेबात पिकाच्या संपूर्ण काळामध्ये जी रक्कम अडकून राहते तीवरील व्याज धरतो. भांडवली खर्चाप्रमाणेच मजुरी बी–बियाणं, खतं–वरखतं, औषधं, वाहतूक यांचे जे खर्च आहेत–चालू खर्च–त्यावर पिकाच्या काळातील व्याज धरले म्हणजे 'बॅक् लॉग्' भरून निघणे शक्य आहे.

शेतकऱ्याला लागणाऱ्या वस्तूंचे भाव हंगामाच्या काळात/त्यांच्या आवश्यकतेच्या काळात भरमसाट वाढतात. उदा. आषाढ महिन्यात जेव्हा शेतकरी स्वत: उपाशी राहील पण बैलाला मात्र पेंड खायला घालतोच–आवश्यकच असते–तेव्हा पेंडीचा भाव २.४० रु. किलो असतो. अशा गोष्टींचेही शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होणार नाहीत. कारण आपण मागताना काय मागायचे आहे. शेतीमालाला उत्पादन खर्चाप्रमाणे भाव मिळायला पाहिजे ही आपली मागणी. मग तुम्ही पेंड २.४० रु. दरानं विका किंवा खत रु. १००० ऐवजी रु. १०,००० टनानं विका. आपण उत्पादन खर्च काढताना शेतीसाठी लागणाऱ्या



वस्तूंचे वर्षातले सरासरी भाव लक्षात घेतो. मागणी करताना उत्पादन खर्चाप्रमाणे भाव न मागता अमक्या वस्तूंच्या भावांवर नियंत्रण आणा, तमक्या गोष्टीसाठी अनुदान द्या, अशा मागण्या करून चालणार नाही. या मागण्या फार भानगडीच्या होतात. आपण कशा कशावर लक्ष ठेवणार? पेंडीचा भाव वाढला, करा आंदोलन–युरियाचा भाव वाढला, करा आंदोलन अशा पन्नास भानगडी निघतील. असं करण्यापेक्षा '–तुम्ही आम्हाला युरिया १०००० रु. टनानं का द्या ना, तो खर्च लक्षात घ्या आणि आमच्या मालाला किंमत द्या' अशीच मागणी केली पाहिजे. युरिया ज्या पदार्थापासून बनतं ते पेट्रोलियम जगातलं संपत चाललं आहे. (वरखतं मिळेनाशी झाली तर आपण कोणत्या प्रकारची शेती करणार आहोत? हा मोठा चर्चेचा विषय आहे.) कोणतंही सरकार आलं तरी पेट्रोलियमचे सर्व पदार्थ महागच करावे लागणार. किती वेळा अनुदानं मागत बसणार? प्रत्येक वर्षी पेट्रोलियम उत्पादनांचे भाव वाढले की काय आंदोलने करीत बसणार? त्यापेक्षा 'तुम्ही काहीही वाढवा. आम्ही जे काही खर्च करू ते लक्षात घेऊन आम्ही जो काय भाव काढू तो आम्हाला द्या. त्याच्यात कुठे कमी घेणार नाही.' इतकीच मागणी केली पाहिजे. त्यामुळे आंदोलनाला निश्चित दिशा येते. गेल्या १० वर्षांत पुष्कळशी युवाशक्ती अनेक चळवळीत तिला निश्चित धोरण न मिळाल्याने फुकट गेली आहे. वैफल्यग्रस्त झाली आहे. यात विद्यार्थी मंडळीचा भरणा जास्त आहे. कुठं बिहारमध्ये एका पोलिस चौकीत एका महिलेवर बलात्कार झाला, लगेच इथं बीडला तलाठी किंवा तहसीलदार किंवा जिल्हाधिकाऱ्यांसमोर मोर्चा गेला आणि काढलं निवेदन, आणखी कुठे काही घडलं की पुन्हा मोर्चा, निवेदन. सहा महिने हा उत्साह टिकतो पोरांच्यात, मग पोरांना वाटतं हे काही खरं नाही. त्यातनं काही मिळत नाही आणि तो अन्याय दूर होत नाही.

तुमच्या आंदोलनाची दिशा जेव्हा निश्चित ठरलेली आहे तेव्हा त्याच्या पलीकडे दुसरं काही टोचत असलं तरी तिकडे बघायचं नाही. टोचत नाही असं नाही; पण अर्जुनाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. त्याला फक्त पक्ष्याचा डावा डोळा दिसत होता. डावा डोळा फोडायचा तर त्याला झाडाची पानं आणि फांद्या दिसून उपयोगाचं नव्हतं– त्याचा नेम चुकला असता.

वेगवेगळ्या ठिकाणी आदिवासी स्त्रियांवर, हरिजन स्त्रियांवर, ग्रामीण स्त्रियांवर जे अत्याचार होत असल्याचे आपल्याला ऐकायला येते त्याचं मुख्य कारण त्यांचं

दारिद्र्य आहे. हे दारिद्र्य जोपर्यंत हटत नाही तोपर्यंत इतर गोष्टींबद्दल तुम्ही ओरडत राहिलात तर तुम्ही तुमची ताकद फुकट घालवता. देशाच्या शरीरातलं सगळं रक्त बिघडलं आहे. त्यामुळे अंगभर फोड आलेत. एकेका फोडाला मलमपट्टी करत बसून उपयोग नाही. त्यानं जरा बर वाटेल. पण एक फोड बरा होतो असं वाटतं तोवर नवीन पाच निर्माण होतात. तेव्हा तात्पुरत्या मलमपट्ट्यांऐवजी रक्तदोषांतकच घ्यायला हवं. त्याचप्रमाणे अन्याय, दु:ख यांचं निवारण करायचं असेल तर, तर त्याचं मूळ कारण दारिद्र्य आहे हे लक्षात घेतल पाहिजे आणि ते हटवायचं असेल तर इतर कोणते तरी उपाय योजण्याऐवजी शेतीमालाचा उत्पादन खर्च शास्त्रशुद्ध पद्धतीने काढून त्याप्रमाणे शेतीमालाला रास्त भाव दिले गेले पाहिजेत.

****



**प्रकरण : ४**

# शेतीमाल : अस्मानी संकट आणि सुलतानी शोषण

आतापर्यंत आपण शेतीमालाचे उत्पादन व तो माल काढण्यासाठी येणारा खर्च म्हणजे उत्पादन खर्च कसा काढायचा हे पाहिलं. हा खर्च शेतकऱ्याला भरून मिळत नाही हेही आपण काही आकडेवारी घेऊन पाहिलं. असं जर सातत्याने होत असेल तर त्यामागची कारणं काय आहेत हेही समजावून घ्यायला पाहिजे. ते आवश्यक आहे.

या परिस्थितीमागं दोन प्रकारची कारणं आहेत–अस्मानी आणि सुलतानी. आपल्या पूर्वजांपासून लोक म्हणत आले आहेत की शेतकऱ्याला अस्मानी आणि सुलतानी अशा दोनही प्रकारच्या संकटांना तोंड द्यावं लागतं.

अस्मानी संकटांपैकी महत्त्वाचं संकट पावसाचं. हेही पुन्हा दोन प्रकारचं असतं. पहिला प्रकार म्हणजे पावसाचा अनिश्चितपणा. एखाद्या दिवशी पडला म्हणजे खूप पडतो आणि एखाद्या दिवशी नाही पडला म्हणजे बाबा तोंडच दाखवत नाही. बहुतेक वर्षी आपल्याला जेव्हा पिकाकरता पाऊस हवा असतो तेव्हा नेमका पडत नाही आणि नको असतो तेव्हा बदाबदा पडतो. यानं शेतकऱ्याचं नुकसान होतं. उदाहरणार्थ, निपाणी भागातल्या शेतकऱ्यानं तंबाखू वाळत घातला आणि जरा जरी पाऊस पडला तर सगळी पानं खलास होतात. पावसाच्या या लहरीपणामुळं होतं काय की पीक बुडतं. आपला खर्च झालेला असतो बंदा रुपया आणि पीक मात्र येतं त्रेपन्न पैसे. याचा अर्थ आपला सरासरी उत्पादन खर्च वाढतो. शेतकऱ्याला संकटात आणणारा पावसाचा दुसरा गुण म्हणजे त्याचा आपल्या देशातील हंगामीपणा. आपल्याकडे सगळा पाऊस जवळ जवळ चारच महिन्यांत पडतो आणि ज्याला शेताला पाणी देण्याची वेगळी काही व्यवस्था करणं शक्य नाही असे सगळेच, जवळ जवळ ९० टक्के शेतकरी आहेत. असे एकाच भागातले

शेतकरी त्याच त्याच वेळी तीच तीच पिकं घेतात. ज्वारी निघाली म्हणजे सगळ्यांची ज्वारी एकाच वेळी निघते. कापूस निघाला म्हणजे सगळ्यांचा कापूस एकाच वेळी निघतो आणि मग सगळ्यांचा एकाच वेळी निघालेला माल एकाच वेळी बाजारात जाऊन पडला की त्याची किंमत खाली येते. म्हणजे पावसाचा नक्की अंदाज नसल्यामुळे, नेम नसल्यामुळे आपल्या उत्पादनाचा सरासरी खर्च वाढतो आणि पाऊस ठराविकच वेळात पडत असल्यामुळे आपल्या मालाच्या किमती खाली येतात. अशा तऱ्हेने एका बाजूला खर्च वाढतो आणि दुसऱ्या बाजूला किमती खाली पडतात अशा कात्रीमध्ये आपण शेतकरी निसर्गत:च सापडतो. हे झालं एक महत्त्वाचं अस्मानी संकट. त्याशिवाय रोगराई, कीड, टोळधाड, वादळे, खराब बियाणे, पेरणीतील उणिवा अशा अनेक कारणांनी पिकांवर परिणाम होतो. अस्मानी संकटांचा आपल्याला सगळ्यांनाच चांगला अनुभव आहे, त्यामुळे त्याबद्दल जास्त बोलण्याची जरूरी नाही.

आजच्या काळात अस्मानी संकटांशी मुकाबला करणे अशक्य नाही. आज मनुष्य चंद्रावर जाऊ शकतो किंवा जिथं दहा-दहा बारा-बारा फूट बर्फ वर्षभर असतं अशा सैबेरियासारख्या ठिकाणीसुद्धा शेती होऊ शकते. तंत्रज्ञान इतकं पुढं गेलेलं आहे. अशा काळामध्ये केवळ निसर्ग आपल्याला अनुकूल नाही म्हणून मनुष्य काही अडून राहत नाही, त्याच्यावर मात करता येते. उदाहरणार्थ, पावसाच्या हंगामीपणामुळे एकाच वेळी पिकं येतात आणि आपल्याला ती एकाच वेळी बाजारात न्यावी लागतात आणि भाव खाली येतात. ठीक आहे. मग आपण ती एकाच वेळी बाजारात न्यायची नाहीत. शेतीमाल साठविण्याची व्यवस्था करावी, त्याला कीड वगैरे लागणार नाही हे बघावं. शेतीमाल बाजूला ठेवावा. आपली जर ऐपत असेल तर आपण थांबू शकतो; पण थांबायची ऐपतच येत नाही. उचल मिळविण्याची व्यवस्था होत नाही. साठवणुकीच्या ऐवजी आपण शेतीमालावर काही कारखानदारी करून वेगळ्या स्वरूपात ते साठविण्याची व्यवस्था करू शकतो. टोमॅटोचे उदाहरण घ्या. गेल्या फेब्रुवारीच्या सुमारास चाकणच्या बाजारपेठेत टोमॅटो शेतकऱ्यांना तीन पैसे किलोच्या दरानं विकावा लागला. नंतर मे-जून मध्ये टोमॅटोचा भाव किलोला ९ ते १० रुपये झाला. फेब्रुवारीत ज्या वेळी टोमॅटोला ३ पैसे भाव मिळतो त्यावेळी जर टोमॅटोचे बाटलीत भरून ठेवण्याजोगे पदार्थ करून ठेवले तर ज्या काळात टोमॅटोचा भाव ९ ते १० रु. होतो त्यावेळी या पदार्थापासून



अगदी ९/१० रुपये नाही मिळाले तरी टोमॅटोच्या किलोमागे दीड दोन रुपये नक्कीच सुटतील. पण अशा तऱ्हेची कारखानदारी आपण उभीच करू शकत नाही. कारण त्यासाठी जे भांडवल लागतं ते आपल्या जवळ नसतं. म्हणजे ऐपत नाही म्हणून साठवण करता येत नाही, प्रक्रिया करता येत नाही की नेहमीचं पीक बदलून दुसरी पिकं घेता येत नाहीत. पण ऐपत असेल तर अस्मानी संकटावर मात करणं तितकं कठीण नाही. शेतकऱ्यांवरचं त्याहूनही मोठं संकट म्हणजे सुलतानी संकट. खरेदी-विक्रीची व्यवस्था सहकारी पद्धतीने एकत्र येऊन केली तरी त्यांना त्यांच्या मालास जास्त भाव मिळू शकेल. पण अशा तऱ्हेचे प्रयत्न सध्याच्या परिस्थितीत अयशस्वीच झालेले दिसतात. जुन्या शोषकांऐवजी नवे सहकारी शोषक तयार होण्यापलीकडे अशा प्रयत्नांतून काहीच निघू शकत नाही. भविष्याबद्दल ज्यांना काहीतरी आशा आहे ते खरेखुरे सहकार्य करू शकतात. एरवी त्यातून पुढाऱ्यांचा स्वाहाकारच निघतो.

सुलतानी संकट म्हणजे शासनानं, समाजानं शेतकऱ्यांचं केलेलं शोषण. शेतकरी संघटनेच्या सबंध विचारामध्ये हा भाग सगळ्यात महत्त्वाचा आहे. आम्ही असं मांडतो की, शेतीमालाला भाव मिळू नये असं शासनाचं अधिकृत धोरण आहे. सगळ्यात वादविवाद होण्यासारखी जागा ही आहे. शेतकऱ्याच्या मालाला भाव का मिळत नाही? हे काही स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचंच धोरण आहे की नाही. त्याच्या आधीपासून अगदी मोगलाईपासूनसुद्धा सैन्याकरता शेतकऱ्याला लुटायचं असं राज्यकर्त्यांचं चालत आलेलं धोरण आहे. आपण जर इंग्रजांच्या काळाचाच विचार केला तर आपल्याला काय दिसतं? इंग्रज या देशात जो आला तोच मुळी इथल्या शेतकऱ्यांकडून कच्चा माल स्वस्तात स्वस्त घेता यावा, फायदा मिळावा या हेतूने. इथून कच्चा माल स्वस्तात स्वस्त घ्यायचा, त्यावर कारखानदारी करायची आणि पक्का माल आणून महाग विकायचा हेच इंग्रजांच धोरण होत. त्यासाठी तर त्यांनी इथं राज्य केलं. हे शोषणाचं धोरण गांधीजींनी जाणलं आणि लोकांना समजावून सांगितलं. गांधीजी उदाहरणादाखल सांगत, 'कापूस स्वस्तात स्वस्त घ्यायचा, आपल्या देशात न्यायचा, त्यापासून धोतरजोडी बनवायची आणि ती इथं आणून महाग विकायची हे इंग्रजांचं धोरण आहे.' - 'यामुळे देशातला शेतकरी गरीब होत चालला आहे आणि इंग्रज इथून गेल्याशिवाय- देशाला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय शेतकऱ्यांचं दारिद्र्य दूर होणार नाही' हा विचार गांधीजींनी

मांडला. एवढ्याकरताच स्वत:च्या चळवळीला त्यांनी चरखा ही खूण दिली. त्यांना अशोकचक्र, कमळ यासारख्या सुंदर वस्तू दिसल्या नसतील असं नाही. चरखा हे त्यांनी पारतंत्र्यात होणारं शोषण दूर करण्याचं प्रतीकात्मक साधन म्हणून निवडलं.

आता आपण एवढ्याचकरता जर इंग्रजांना घालवून दिलं असेल तर स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर पहिल्यांदा शेतकऱ्याकडून कच्चा माल स्वस्तात स्वस्त घेतला जाऊ नये, त्याच्या मालाला चांगला रास्त भाव मिळावा यासाठी काहीतरी उपाययोजना व्हायला हवी होती. झाली का? नाही. स्वातंत्र्य मिळण्याच्या आधी– १९४६ साली इंग्रज सरकापुढे श्री.व्ही.टी.कृष्णम्माचारी अध्यक्ष असलेल्या एका समितीने एक शिफारस ठेवली की, 'नैसर्गिक आपत्तीमुळे देशातला शेतकरी इतका बिकट अवस्थेत आहे की त्याला मदत करणे आवश्यक आहे आणि ती मदत करण्याचा सगळ्यात सोपा आणि परिणामकारक उपाय म्हणजे त्याच्या मालाला बाजाराची आणि भावाची शाश्वती मिळवून देणे होय.' हे लिहिलेले आहे. १९४७ साली जेव्हा आपलं सरकार आलं तेव्हा त्यांच्यासमोर ही शिफारस होती. पण तिच्यावर अंमलबजावणी झाली नाही. उलट १९५१ साली पंचवार्षिक योजना तयार होताना– जी बनवण्यात त्याच कृष्णम्माचारींचा फार मोठा सहभाग होता– जवळ जवळ असा विचार मांडण्यात आला की, 'या देशाचा विकास व्हायचा असेल तर शेतीचं उत्पादन वाढलं पाहिजे आणि शेतीमालाच्या किमती योग्य अशा खालच्या पातळीवर स्थिर राहिल्या पाहिजेत.' म्हणजे शेतकऱ्याचा माल स्वस्तात स्वस्त विकत घेतला जातो आहे हे थांबायला पाहिजे हा विचार मागे राहिला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत हे असं तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत त्याहूनही भयानक स्थिती झाली. कारण या योजनेच्या वेळीच उद्योगधंद्यांची वाढ झाली पाहिजे हा विचार पहिल्यांदा मोठ्या प्रमाणावर पुढे आला. एकामागोमाग एक सरकारी अहवालांतील अनेक उतारे दाखवून आपल्या सरकारनेही शेतकऱ्यांच्या शोषणाचं धोरण चालूच ठेवलं हे सिद्ध करता येईल. पं. नेहरूंचा स्वत:चाच उतारा पाहा– 'जर का या देशामध्ये उद्योगधंद्यांची वाढ व्हायची असल तर शेतीचं उत्पादन वाढवून तो माल स्वस्तात स्वस्त मिळवता आला पाहिजे.'

आपल्याला काही इथं सरकारी अहवालांचा अभ्यास करावयाचा नाही. तरीसुद्धा १९६६ सालाच्या अहवालातील उतारा पाहायला हवा. चौथी पंचवार्षिक



योजना तयार होताना शेतीमालाच्या किमती कशा ठरवाव्यात यासाठी एक समिति तयार करण्यात आली. हा या समितीच्या अहवालातील पान १५/१६ वरील उतारा आहे, त्याचा मथितार्थ असा– शेतकऱ्याच्या मालाला त्याचा उत्पादन खर्च भरून निघेल अशी किंमत देणे व्यवहार्य नाही. कारण शेतमालाचा खर्च काढायचा झाला तर शेतकऱ्याच्या घरच्या माणसांची मजुरी रोजगाराच्या हिशेबाने तरी धरावी लागेल. ती जर तशी धरली तर कारखानदारांना कच्चा माल महाग घ्यावा लागेल– कापडगिरणीवाल्यांना कापूस, विडी कारखानदारांना तंबाखू महाग घ्यावा लागेल आणि धान्याच्या किमती वाढतील, त्यामुळे कारखानदारीचा खर्च वाढला तर त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करणे कठीण होईल. थोडक्यात कारखानदारांना कच्चा माल स्वस्तात मिळावा, कारखानदारांना कामगारांचे पगार वाढवून द्यायला लागू नयेत आणि त्यांना निर्यात करूनसुद्धा फायदा मिळवता यावा यासाठी शेतकऱ्यांच्या घरच्या माणसांनी फुकट राबावं असं अधिकृत धोरण तिथं मांडण्यात आलं आणि आजतागायत ते बदललेलं नाही. शेतकऱ्यांच्या घरच्या माणसांची मजुरी धरू नये या धोरणाचा पाठपुरावा करण्यासाठी १९७६ सालच्या राष्ट्रीय कृषि आयोगानं केलेला युक्तिवाद सोप्या भाषेत असा आहे की, 'शेतकऱ्याच्या घरच्या माणसांचे कष्ट कशासाठी धरायचे? त्यांनी घरच्या शेतावर काम केलं नाही तर काही त्यांना दुसरीकडे नोकरी मिळणार नाही. मग ते कशाकरता धरायचे?' हा आयोग पुढे युक्तिवाद करतो, 'शेतकऱ्याच्या घरची माणसे शेतावर काम करायला लागली की त्यांचा इतका उपयोग केला जातो की 'खरं म्हणजे' त्यांच्या हातून काहीच काम होत नाही. उदाहरणार्थ, घरी दहा वर्षांचा मुलगा आहे, दोन मैलांवर शेत आहे, स्वयंपाक करता करता आईला मिरच्यांची जरूरी लागते, ती मुलाला सांगते, 'जा रे शेतावरनं मूठभर मिरच्या पटकन घेऊन ये.' तो दोन मैल धावत जाऊन मिरच्या घेऊन धावत परत येतो. हिशेबाप्रमाणे चार मैल धावण्याचे श्रम त्यानं आणलेल्या मिरचीच्या किमतीपेक्षा कितीतरी जास्त आहेत. तेव्हा ते धरण्याचे कारण नाही. सगळ्या घरगुती मजुरांना अशा तऱ्हेनं राबवलं जातं की त्यांचे कष्ट मजुरीच्या स्वरूपात धरण्याची आवश्यकता नाही. अशा तऱ्हेने बाहेरून मोठी अभ्यासपूर्ण, विद्वान दिसणारी पण प्रत्यक्षपणे शेतकऱ्यांचं अत्यंत क्रूरपणे शोषण करणारी धोरणं सरकारी अहवालांमध्ये जागोजाग भरलेली आहेत आणि गंमत अशी आहे की कुणीही राजकारणी मंडळींनी ही सरकारी

धोरणं अशी आहेत हे आपल्याला सांगितलेले नाही, समजावून दिले नाही. आता मात्र आंदोलन सुरू झाल्यानंतर एक एक मंडळी कबूल करायला लागली आहेत. दोन उदाहरणं पाहा.

दोन महिन्यांपूर्वी श्री.अण्णासाहेब शिंदे यांना श्रीरामपूरला भेटलो होतो. हे ११ वर्षे केंद्रात कृषी राज्यमंत्री होते. ते म्हणाले, 'तुम्ही शेतकरी संघटनेतर्फे अगदी योग्य मुद्दा हाती घेतला आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळेपर्यंत काहीही प्रश्न सुटणार नाहीत.' मी विचारलं, 'पण मग तुम्ही ११ वर्षे सत्तेवर बसून काहीच कसं केलं नाही?' त्यावर ते म्हणाले, '१९६५ साली जेव्हा कृषिमूल्य आयोग निघाला तेव्हा आमची अशी कल्पना झाली की, हा आयोग आता उत्पादनखर्च व्यवस्थित काढील आणि शेतकऱ्यांना भाव मिळेल. पण आता आमच्या असं लक्षात येतंय की, शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळण्यासाठी जो काही राजकीय दृष्टिकोन असायला पाहिजे, जी काही राजकीय इच्छा (Political will) असायला हवी तीच मुळी नाही.

दुसरे, श्री.सी.सुब्रह्मण्यम् अन्नमंत्री म्हणून ज्यांनी चांगलं काम केलं त्यापैकी हे एक. शेतीच्या बाबतीत जी हरित क्रांती झाली की जिच्यामुळे देशात शेतीमालाची मुबलकता निर्माण झाली, तिचे हे जनक आहेत असे म्हणायला हरकत नाही. हे नेहरूंच्या मंत्रिमंडळात उद्योगमंत्री होते. पुढे लालबहादूर शास्त्रींनी त्यांना अन्नमंत्री केले. त्यांनी महिनाभरापूर्वी एक पुस्तक प्रकाशित केलं आहे. त्यात ते म्हणतात, 'उद्योगमंत्री असताना काही प्रकरण माझ्यापुढं आलं तर त्या उद्योगाला, प्रकल्पाला काही फायदा आहे किंवा नाही हे मी तपासून पाहत असे. ही सवय लागून गेली. मी जेव्हा अन्नमंत्री झालो आणि सवयीनं शेतीच्या प्रकल्पांकडे बघू लागलो तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की, या देशातला सगळाच्या सगळा शेतकरी आपला व्यवसाय तोट्यात चालवत आहे.' हे अन्नमंत्री सक्तीच्या लेव्ही वसुलीबाबत म्हणतात, 'लेव्हीच्या नावाने शेतकऱ्यांकडून ही जी सक्तीची वसुली होत होती ती अगदी क्रूर गोष्ट होती.' शेतकऱ्याला मिळालेल्या किमतीचा प्रश्न वेगळाच.

हे सगळे लोक आता बोलू लागले आहेत- पण सत्तेवरून उतरल्यावर. शेतकऱ्यांच्या शोषणाचं हे धोरण काही विशिष्ट कल्पनांनी चालवलं असं कुणी म्हणेल. आपण त्याबद्दल नंतर बोलू. पण हे धोरण मुद्दाम चालवलं हे निश्चितच आहे आणि महत्त्वाचंही आहे.



या शोषण धोरणाच्या अंमलबजावणीच्या सक्तीच्या लेव्ही वसुलीच्या मार्गाचा अनुभव सगळ्या शेतकऱ्यांना आहेच. १९७५ साली ज्वारीची खुल्या बाजाराची किंमत किलोला एक रुपया पन्नास पैसे होती. त्यावेळी चाकणच्या शेतकऱ्याकडून ज्वारी किलोला ८३ पैसे या भावाने सक्तीने नेली जात होती. शेतकऱ्याकडून ज्वारी न्यायची ८३ पैसे किलोनं. पण जर खरेदी करायची झाली तर त्याला द्यावे लागणार १ रु. ५० पैसे. जर का शेतकऱ्याकडे लेव्ही घालण्याइतकी ज्वारी पिकलीच नसेल तर १ रु. ५० पैसे आणि ८३ पैसे यातील फरक, ६७ पैशांचा जो येतो त्या हिशेबाने कमी भरणाऱ्या ज्वारीवरील रक्कम काढायची आणि मग त्यानं भुईमूग, मिरची जे काय असेल ते विकून, प्रसंगी घरात असल्यास एखादा दागदागिना विकून तितकी रक्कम सरकार दरबारी भरायची. नागपूरच्या शिबिरात एक प्रा. शेणवई जे शेती विषयाचे तज्ज्ञ आहेत, हजर होते. त्यांनी एक उदाहरण सांगितलं– एका गावात एका शेतकऱ्याकडे तीन पोत्यांची वसुली आली. बुडलं सडलं काही लक्षात घ्यायचं नाही. त्याचं त्या वर्षी पीक इतकं बुडालं की पीक तीनच पोती निघालं. डेप्युटी कलेक्टर, मामलेदार यांचं म्हणणं, 'तीन पोती तुला घातलीच पाहिजेत.' तो शेतकरी शेणवईंकडे आला आणि त्यांना आपली हकिकत सांगितली. तिथं मग खूप मोठ आंदोलन करण्याची वेळ आली. मग ऐन वेळी ती वसुली रद्द झाली. तरीसुद्धा इतक्या क्रूरपणे – आपण औरंगजेबाचा झिजिया कर ऐकतो– इतक्या क्रूरपणे शेतकऱ्याकडून लेव्ही वसूल करण्यात आली. आम्ही शेतकरी त्यावेळी झोपेत होतो. कुणी तरी पुढारी आला अन् त्यानं सांगितलं, आपल्या गावाची लेव्ही एक नंबरची झाली पाहिजे की आम्ही वाजत गाजत लेव्ही घालत होतो. पण हा शेतकऱ्यावरचा जुलूम होता आणि तो जुलूम होता हे आज त्यावेळचे अन्नमंत्रीसुद्धा मान्य करतात.

दुष्काळ होता तेव्हा शहरातल्या मंडळींना अन्नधान्य खायला घालायला पाहिजेच होतं; शेवटी ती आपल्याच देशातील मंडळी आहेत. त्यासाठी तुम्ही आमच्याकडून धान्य नेलं त्यावेळी भाव जरा जास्त दिला असता तर ठीक झालं असतं. पण तोही दिला नाही. ठीक आहे, आम्ही तेही विसरून जायला तयार आहोत. पण आज जर ज्वारी जास्त पिकली आहे तर तुम्ही शेतकऱ्याला मदत द्यायला येणार की नाही? ७५ साली तुम्ही ज्वारीला ८३ पैसे तयार होता तोच जर हिशेब धरला आणि आजवरचा महागाई निर्देशांक लक्षात घेतला तर आज निदान

१ रु. ५० पैसे मिळायला हवेत किलोला. पण आज काय स्थिती आहे? आज मुबलक ज्वारी आल्यावर हमी भाव जाहीर न झाल्यामुळे ती आम्हाला ६५ पैशांच्या भावाने विकावी लागत आहे. सरकारी हमी भाव जाहीर होतात पीक आल्यानंतर चार महिन्यांनी आणि त्यानंतर खरेदी चालू होते. दरम्यानच्या काळात शेतकऱ्याची स्थिती वाऱ्यावर सोडून दिल्यासारखी असते. जर तुटवडा असताना आमच्यावर किलोमागं ६७ पैशांचा तोटा लादून आमच्याकडून सक्तीनं धान्य नेलं, तर मग आता मुबलकता आल्यावर शेतकऱ्यांचं जे काही नुकसान झालं असेल तेवढं तरी भरून द्याल की नाही? या वेळी सरकार म्हणतं, 'नाही.' २ ऑगस्ट १९८० ला कांद्याबद्दल मोठा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा लासलगावचं एक शिष्टमंडळ राव बीरेंद्रसिंग, केंद्रीय कृषिमंत्री यांना भेटायला गेलं होतं. तुम्ही काय वाटेल ते पिकवता आणि येऊन आम्हाला विकत घ्यायला सांगता. हे जमायचं नाही. कुणाकुणाला मदत करायची आम्ही? महाराष्ट्रातल्या कांद्याला का पंजाबमधल्या बटाट्याला, उत्तर प्रदेशच्या गव्हाला?' लेव्हीचा प्रकार दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी सुरू झाला. पण १९४७ ते १९७७ या ३० वर्षांचा जरी हिशेब काढला तरी शेतकऱ्याला लेव्हीमुळे जवळ जवळ १२ ते १४ हजार कोटी रुपयांचे नुकसान सोसावं लागलं असं दिसून येतं. थोडीफार हिशेबात चूक असेल! कांदा खरेदीच्या व्यवहारात कुठेतरी एका वर्षी सरकारला ६।। कोटी रुपयांची नुकसानी आली तर हे लोक असं म्हणतात. ही नुकसानी अन्य काही कारणांपेक्षा त्यांच्या भ्रष्टाचारानेच आली आहे, तरीसुद्धा साडेसहा कोटी कुठे आणि चौदा हजार कोटी कुठे? त्यावेळी – दुष्काळात तुम्ही आमच्याकडून मदतीची अपेक्षा केलीत आणि आता आमच्या मदतीला येत नाही. आम्हाला वाऱ्यावर सोडता.

लक्षात घ्या, शोषणाच्या सरकारी धोरणाचं हे पहिलं सूत्र आहे. तुटवडा असला तर लेव्ही लावायची आणि मुबलकता झाली की वाऱ्यावर सोडायचं. तूट असली तर लूट करायची, मुबलकता आली तर लिलाव करायचा. योगायोग पाहा. उसाच आंदोलन चालू झालं त्याच वेळी माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी लेखी मुलाखतीत सांगितलं की 'नियंत्रण वगैरे फक्त तुटवड्याच्या काळातच असावीत आणि मुबलकतेच्या काळात असू नयेत.' हा तर या सूत्राच्या अधिकृतपणाचा पुरावाच झाला. तूट असेल तर लूट आणि मुबलकता असेल तर लिलाव. म्हणजे छाप पडला तरी शेतकरी मेला आणि काटा पडला तरी शेतकरी



मेला–ओली पडो, सुकी पडो शेतकऱ्याचं मरण हेच सरकारी धोरण आहे आणि हे धोरण राबवलं जातं मोरारजीभाईंच्या कारकीर्दीत, १९७७/७८ पर्यंत, साखरेवर लेव्ही होती कारण तुटवडा होता, पण त्या वर्षी उत्पादन वाढलं. त्याबरोबर लेव्ही काढून टाकली, नियंत्रण काढली आणि साखरेचे भाव किलोला १ रु. ६० पैशावर आणून ठेवले. शेतकऱ्याला ऊस जाळावा लागला. 'तूट असेल तर लूट आणि मुबलकता असेल तर लिलाव.' या शोषण धोरणाच्या पहिल्या सूत्राच्या राबणुकीचा आणि त्याच्या परिणामाचा दुसरा दाखला हवाच कशाला? तुम्ही काही करा, तुम्हाला भाव मिळू द्यायचा नाही हे नक्की.

कुठल्याही परिस्थितीत आपल्याला इथं शेतीमालाला भाव मिळू न देणे हे सरकारचं अधिकृत धोरण आहे, हे आपल्या लक्षात आल्यानंतर आपल्यापुढे प्रश्न उभा राहतो, 'याला काही पर्याय नाही का?' आहे, यालासुद्धा पर्याय आहे. आपल्या वेगवेगळ्या शेतीमालाचे उत्पादन खर्च आणि त्यांना इथल्या बाजारात मिळणाऱ्या किमती लक्षात आणा. भुईमुगाचा उत्पादनखर्च आहे किलोला ४ रु. ३० पैसे. तर बाजारात मिळतात फक्त २ रु. ६० पैसे. शेंगदाणा वाटेल तितका परदेशात पाठवता आला असता. एकट्या युरोपमध्ये २५० कोटी रुपयांपर्यंत शेंगदाणा पाठवता आला असता आणि त्याबद्दल शेतकऱ्याला साडेआठ रु. किलोपर्यंत भाव मिळाला असता. ज्वारीचा उत्पादन खर्च किलोला २ रु. ३० पैसे आहे तर बाजारतील किंमत आहे फक्त १ रु. १३ पैसे. हीच ज्वारी मध्यपूर्वेत निर्यात केली असती तर शेतकऱ्याला किलोला २ रु. ३० पैसे, म्हणजे उत्पादन खर्चाइतके तरी पैसे मिळाले असते. आज कांद्याचा उत्पादन खर्च ५० ते ७० रुपये क्विंटल आहे. काही प्रमाणात सरकारी खरेदी हमी भावात होते. बाकीचा कांदा १५ ते २० रु. क्विंटलने विकावा लागतो. हाच कांदा परदेशात पाठवला असता तर क्विंटलला १७० रु. मिळाले असते. म्हणजे शेतीमालाला इथे भाव मिळत नसेल तर निर्यात हा त्यावरील एक पर्यायी उपाय होऊ शकतो. पण या कोणत्याही पदार्थाच्या निर्यातीला परवानगी नाही. अगदी ज्यावेळी कांदा तुडविल्याशिवाय बाजारपेठेतनं चालता येत नव्हतं, त्यावेळीसुद्धा निर्यातीला परवानगी नव्हती. एकदा तर अशी स्थिती होती की नाफेडचे अधिकारी आमच्या अक्षरशः पाया पडत होते आणि विनवत होते की, 'पंधरा दिवस खरेदी थांबविण्याची परवानगी द्या. कारण आम्ही मद्रास कलकत्त्याला कांदा भरून वॅगन पाठविल्या आहेत. तिथं

इतका कांदा झाला आहे की तिथून तारा आल्या आहेत की आता वॅगन्स् पाठविल्या तर आम्ही गाडीच्या गाडी परत पाठवू पण कांदा घेणार नाही.' अशा वेळीसुद्धा कांद्यावर निर्यात बंदी होती. सरकारी शोषण धोरणाचं हे दुसरं सूत्र आहे. इथ तुम्हाला भाव मिळू द्यायचा नाही आणि परदेशात माल पाठवूही द्यायचा नाही. म्हणजे 'आई जेऊ घालीना आणि बाप भीक मागू देईना' असंच हे सूत्र झालं. पण शहरी कारखान्यांचे पाहा. शहरातले कारखानदार कारखान्यात ज्या काही वस्तू तयार करतात त्या जर त्यांनी निर्यात केल्या तर त्यांचं कौतुक होतं. त्यांना नवीन देशभक्त म्हणतात. त्यांनी परकीय चलन मिळवलं म्हणून उदोउदो होतो, सन्मान होतात. कुणाकुणाला पद्मश्री, पद्मभूषण असे किताबही मिळतात. इतकंच नव्हे तर कुठं तोटा आला असेल म्हणून वीस पंचवीस टक्के अनुदानही मिळतं. खरं म्हणजे त्यांच्या निर्यात करण्यामध्ये काहीही कौतुक करण्यासारखं नाही. कारण हे बहुतेक कारखाने परदेशातून यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञान आयात करून उभारलेले असतात आणि ते देतानाच परदेशांनी हुशारीने विचारपूर्वक दिलेले असतात. – स्वित्झर्लंडमध्ये मजुरीचा किमान दर १८० रु. आहे. ते एखादं लहानसं यंत्र थोडासा खर्च करून हिंदुस्थानात बसवतात. इथं सहा ते सात रुपये मजुरीच्या दरानं त्यातून पक्का माल तयार होतो. यामुळे तो त्यांना अतिशय स्वस्तात विकत घेता येतो आणि आपल्या देशात नेता येतो. त्यांच्या देशातील मजुरीचा (भरमसाट) दर आणि आपल्याकडील (अल्प) दर यांचा फरक लक्षात घेता त्यांना अशा तऱ्हेने माल नेणे वाहतुकीच्या खर्चासह परवडते. म्हणजे मग आमच्या लोकांनी निर्यात केली यात त्यांचं कौतुक ते काय? पण त्यांचं कौतुक होतं. शेतकरी निर्यात करू शकतो याचं यांना कौतुक नाही.

कपाशीचंच पाहा. परवा कपाशीच्या भावासंबंधी चर्चा करायला आम्ही दिल्लीला गेलो होतो. तिथं आम्ही सांगितलं की वरलक्ष्मीसारखा लांब धाग्याचा कापूस आज आपल्या देशात खपत नाही. कारण आमच्या गिरण्यांना हा लांब धाग्याचा कापूस वापरता येत नाही. निदान सात आठ लाख गाठी या जातीचा कापूस पडून आहे. तो निर्यात करायला परवानगी द्या. तर दिल्लीचे अधिकारी म्हणतात, 'नाही नाही, यंदा कपाशीचं पीक बुडालं आहे. यंदा तुटवडा आहे. तेव्हा यंदा निर्यात नाही.' हे सगळे कापडगिरण्यांच्या मालकांनी विकत घेतलेले आहेत. आपल्याला कपाशी स्वस्त भावात मिळाली पाहिजे म्हणून कापडगिरण्यांच्या



मालकांनी सगळ्यांचे हात दाबून ठेवले आहेत.

मग आम्ही मुंबईला आलो आणि तिथं एकाधिकार खरेदी योजनेची जी मंडळी कापूस विकतात त्यांच्याशी चर्चा करायला बसलो. त्यांना म्हटलं, 'अहो यंदा आपल्या देशात कपाशीचा तुटवडा आहे. तुम्ही महाराष्ट्रामध्ये एकाधिकार खरेदीखाली ३० लाख गाठी खरेदी करता इतकी तुमची ताकद आहे. ३० लाख गाठी एखाद्या व्यापाऱ्यानं खरेदी केल्या तर तो कोट्यवधी रुपयांचा फायदा एका वर्षात मिळवून मोकळा होईल तर मग तुम्ही तुमच्या ताकदीचा फायदा घेऊन रूईची विक्री जास्तीत जास्त चेपून का करत नाही?' तर मुंबईचे अधिकारी आम्हाला म्हणाले, 'नाही, नाही, देशात कापूस फार आहे आणि आम्ही जर कापूस राखून ठेवला तर आमचा सगळा कापूस बिनविकायचा राहून जाईल.' आहे की नाही गंमत-दिल्ली एक, तर मुंबईला त्याच्या बरोबर उलट. शेवटी काय, काहीही कारणं सांगायची आणि शेतकऱ्याला बुडवायचं.

१९७७ सालापर्यंत दोन लाख टन कांदा महाराष्ट्रातून दरवर्षी निर्यात होत असे. म्हणजे दर वर्षाला ३० कोटी रुपयांचं उत्पन्न होतं. मग या कांद्यावर निर्यात बंदी का? १९७८ साली पावसाळ्यात प्रथमच दिल्लीला किरकोळ बाजारात कांद्याचा भाव सव्वा रुपया किलो झाला. तो झाल्यावर पहिल्यांदा कांद्यावर निर्यातबंदी घालण्यात आली. ताबडतोब चाकणच्या बाजारात कांद्याचा भाव क्विंटलला १७ रु. पर्यंत घसरला. चाकणच्या बाजारात घडलेलं एक उदाहरण सांगतो. एका शेतकऱ्याकडे ७७/७८ साली चार गाड्या कांदा निघाला. आदल्या वर्षी त्याचं कांद्याच पीक फुईमुळे संपूर्ण बुडालं होतं आणि चाकण भागात कांदा हे एकमेव नगदी पीक आहे. गेल्या वर्षी पीक बुडाल्यामुळे त्याला बायकोला लुगडं घेता आलं नव्हतं. तो कांद्याच्या गाड्या घेऊन बाजाराला निघाला तेव्हा बायकोनं सांगितलं, 'माझ्या लुगड्याच्या पार दशा झाल्या आहेत तर येताना, फार खर्चाच नको पण एक धडसं लुगडं आणा– आणि पोराची चड्डी फाटलीय. त्याला मास्तर वर्गात बसू देत नाही म्हणून घरी पळून येतो, त्याला एक चड्डी आणा.' शेतकऱ्यानं चार बैलगाड्या भरून कांदा बाजारात नेला आणि १७ पैसे किलोनं विकून कर्ज, हमाली, दलाली देऊन झाल्यावर त्याच्या असं लक्षात आलं की यंदा काही बायकोला लुगडं घेता यायच नाही आणि पोराला चड्डीही घेता यायची नाही. तो तसाच घरी गेला– त्याचा चेहरा पाहिल्यावर बायकोच्या लक्षात सगळी परिस्थिती

आली. तीच त्याला म्हणाली, 'जाऊं द्या, काही वाईट वाटून घेऊ नका. काढीन एवढ्याच लुगड्यावर आणखी एक वर्ष.' दिल्लीला जी माणसं सात साडेसात रुपयांचं सिनेमाचं तिकीट वेळ आल्यास पंचवीस रुपयांनासुद्धा खरेदी करतात (दिल्लीतले सगळे लोक असे आहेत असं मला म्हणायचं नाही, तिथंही गरीब आहेत, कामगार आहेत. पाच रुपये रोज मिळविणारेही आहेत.) त्यांच्या जेवणातल्या कांद्याचा भाव सव्वा रुपाया झाला तर तो टोचू नये म्हणून कांदा उत्पादक शेतकऱ्याच्या घरी काय स्थिती होईल याचा विचार न करता निर्यात बंदी घातली गेली.

खर तर कांद्याचा प्रश्न सोपा आहे. कांदा ही भाजी आहे. पावसाळ्यात जून पासून सप्टेंबरपर्यंत कांद्याचं नवीन पीक निघत नाही आणि कांदा जास्तीत जास्त किती टिकणार? बागायती कांदा ३/४ महिने टिकतो. त्यातही ३० ते ४० टक्के घट होते. तेव्हा पावसाळ्यात कांद्याचा भाव वाढणं अटळ आहे. याच्यावर आपल्या पूर्वजांनी काय उपाय काढला की पावसाळ्यात म्हणजे चातुर्मासात कांदाच खाऊ नये! किती सोपा उपाय! पावसाळ्यात कांदे खाल्लेच नाहीत म्हणजे कांद्याची काही भानगड होत नाही. पण शहरातल्या नवीन माणसांना ही शास्त्रं वगैरे काही मान्य नाहीत-पावसाळ्यात आम्ही कांदे खाणार. खाणार तर खा. मग तशी किंमतही द्या. तुम्हाला हिवाळ्यात किंवा पावसाळ्यात जर हापूसचे आंबे खायचे असतील तर ते कसे स्वस्त मिळणार? महागच मिळणार. पण अशा मंडळीकडून मागणी झाली म्हणजे शेतकऱ्याच्या घरावर, त्याच्या व्यवसायावर काय परिणाम होतो याचा विचारसुद्धा न करता सरकारची निर्यात धोरणं ठरतात. ठीक आहे. निर्यात बंदी घातलीत ना, पण ती कायमचीच घालता? जून ते सप्टेंबर निर्यातबंदी, उरलेल्या काळात नाही असं तर जाहीर करा. ते मान्य करू. पण एकदा जी निर्यात बंदी घातली ती कांद्याचा महापूर आला तरी चालूच!

दिल्लीतील व्यापारखात्यातील एक सेक्रेटरी दुपारी ऑफीमधून घरी गेला आणि जेवायला बसला. कांदा मागितला तर बायको म्हणाली, 'तुम्हाला माहीतय का कांदा किती महाग झालाय ते?' मग तो ऑफिसमध्ये जातो आणि निर्यातबंदी करतो. तोच कांदा स्वस्त झाला तर मात्र त्याची बायको कधीच सांगत नाही-तिला दुसरंच काही सांगायचं असतं-सिनेमाची तिकीट वगैरे किती महाग झालीत ते.

हे विनोदानं सांगितलं तरी खरं वाटावं इतक्या अशास्त्रीय पद्धतीनं निर्यात



धोरणं ठरवली जातात. ज्याचा परिणाम शेतकऱ्यावर अत्यंत क्रूर होतो अशा पद्धतीनं निर्यात धोरण राबवलं जातं.

शोषणाच्या सरकारी धोरणाची दोन सूत्रे आपण पाहिली. एक म्हणजे, 'तूट असेल तर लूट आणि मुबलकता असेल तर लिलाव' आणि दुसरं, 'आई जेवू घालीना, बाप भीक मागू देइना.' तिसरं सूत्र तर अत्यंत क्रूर आहे. शेतकऱ्यांनी कच्चा माल विकण्याऐवजी पक्का माल तयार केला तर त्यालासुद्धा भाव मिळू द्यायचा नाही.

आणि याच चांगल उदाहरण म्हणजे साखर. आपल्याकडे श्री. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विखे पाटील या मंडळींनी साखरेची सहकारी चळवळ अशा कल्पनेने उभी केली की, शेतकऱ्याला उसाचाही पैसा मिळावा आणि कारखानदारीतला जो काही फायदा असतो तोही मिळावा. प्रत्यक्षात काय घडलं? उसाचा उत्पादन खर्च टनाला २८८ रु. आहे. पण शेतकऱ्याला भाव मिळाला फक्त १४२ रुपये. आता आम्ही आंदोलनाने ३०० रु. चा भाव मिळवून घेऊ. पण या चळवळीचा फायदा शेतकऱ्याला झाला नाही, असं का झालं? कारण साखर कारखाने जरी शेतकऱ्याचे झाले असले तरी त्यात तयार होणारी साखर सरकारचीच राहिली-शेतकऱ्याची नव्हे. म्हणजे गाय शेतकऱ्याची म्हणून शेतकऱ्यानं गाईचं तोंड सांभाळायचं, पण कास मात्र सरकारकडे असं धोरण साखर कारखान्यांच्या बाबतीत झालं. कसं ते सविस्तर पाहू. तयार झालेल्या साखरेपैकी ६५ टक्के साखर लेव्ही म्हणून घेतली जाते. त्याचा भाव काय दिला जातो? साखरेचा उत्पादन खर्च किलोमागे ४ रुपये आहे. आश्चर्य म्हणजे सौ.शालिनीताई पाटलांनी २८ आक्टोबरला ठाण्याजवळ आणि २ नोव्हेंबरला ओझरच्या कारखान्यात अशा दोन सभांतून साखरेचा उत्पादन खर्च किलोला ४ रु. आहे हे कबूल केले आहे. अशा या साखरेतील ६५% साखर सरकार किलोला २ रु. १२ पैसे या भावाने घेऊन जाते. आता राहिलेली ३५% साखर निदान आम्हाला अशी विकू द्यायची की ज्यामुळं आमचा तोटा भरून निघेल. तुम्ही एकदा गरिबाकरता साखर नेली, त्यांना स्वस्तात विकली. आता निदान शिल्लक राहिलेल्या साखरेतून आमचा तोटा भरून काढू द्या की! सरकार म्हणतं, 'नाही.' तुम्ही वर्तमानपत्रातल्या लिलावाच्या जाहिराती बघितल्या असतील. त्यात काय लिहिलेलं असतं? 'कोणतंही किंवा सर्व टेंडरे कोणतंही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आम्ही राखून ठेवला आहे.' फक्त

साखर कारखान्यांना हा अधिकार नाही. दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे आठवड्याला, पंधरवड्याला, महिन्याला ठराविक पोती त्यांनी विकायलाच पाहिजेत-कोणतही टेंडर घेऊन. जर का तेवढ्या काळात तेवढी पोती विकली नाहीत तर साखर कारखान्याच्या अध्यक्षाला गुन्हेगारी कलमाखाली अटक होते. अशा घटना घडल्या आहेत. हा असा फरक का? साखेवर लेव्ही का लावतात? गरिबांना साखर स्वस्त मिळायला पाहिजे म्हणून म्हणे. त्यांची गरिबीची व्याख्या काय माहिती नाही; पण या देशात जे खरे गरीब आहेत ते स्वस्तात मिळत असली तरी साखर खात नाहीत- खाऊच शकत नाहीत. आठवड्यातून एखादे दिवशी कुठे गूळ दिसला तर नशीब. मग गरीब कोण की ज्यांच्या करता सरकारला साखर लागते? शहरातले, झोपडपट्टीत राहाणारे गरीबसुद्धा साखरेचा भाव १५/१६ रु. झाला होता तेव्हा खुश होते. कारण २ रु. ८८ पैशांनी रेशन कार्डावर मिळालेली साखर घेऊन ती १२ ते १५ रु. नी विकता येते आणि ५/१० रु. मिळवता येतात. मग तुम्ही कुठल्या गरिबांकरता साखर घेता?

आमच्या चाकण भागात, मावळात भामनहरचे जे ६४ किलोमीटरचे खोरे आहे त्यात कुठेही रस्ते नाहीत. २५/२५ कि.मी. शेतकरी आणि त्याची बायको बाजाराला चालत येते. घरात कुणी आजारी पडलं तर या ६४ कि.मी. च्या परिसरात एकही डॉक्टर नाही. त्यामुळं पोर आजारी पडलं तर शेतकरी त्याला चाकणला बाजारच्या दिवशी घेऊन येतो. डॉक्टरकडे गेल्यावर पोराला दाखवायचं. या भागात बहुतेक आजार पोटाचे-कारण पाणी अशुद्ध. मग टायफॉईड वगैरे. डॉक्टर म्हणतो, किती उशिरा आणलत पोराला? पटकन औषध द्यायला पाहिजे. डॉक्टर औषध लिहून देतो. चिठ्ठी घेऊन शेतकरी औषधाच्या दुकानात जातो. चिठ्ठी दिल्या दिल्या भीत भीत काय विचारतो, 'याचे किती पैसे होतील हो?' नाहीतर औषधं घेतली नी द्यायला पैसे नाहीत असं व्हायचं! दुकानदार म्हणतो, 'तीन गोळ्या दिल्यात अडीच अडीच रुपयांच्या, म्हणजे साडेसात रुपये होतात. शेतकरी चिठ्ठी घेऊन पायऱ्या उतरतो आणि घराकडे निघून जातो, गोळ्या नं घेताच-पोराला तसंच घेऊन.

गरिबांना स्वस्त साखर मिळावी म्हणून जर तुम्ही स्वस्त साखर कारखान्यांवर लेव्ही लावता तर औषधांच्या कारखान्यावर लेव्ही का लावत नाही? याला तसंच कारण आहे. औषधापेक्षा साखर जास्त जरूरीची गोष्ट आहे काय? साखर खायला



मिळाली नाही म्हणून कुणी मेल्याचं उदाहरण नाही. पण ज्या औषधामुळे जीव वाचतो अशा औषधांवरसुद्धा लेव्ही नाही. पण साखरेवर लेव्ही आहे, याचं कारण एकच की औषधांचे कारखाने शेतकऱ्याचे नाहीत आणि साखर कारखाने शेतकऱ्याचे आहेत.

कच्चा माल देशात विकावा म्हटलं तर 'तूट असेल तर लूट आणि मुबलकता असेल तर लिलाव' हे धोरण. परदेशात पाठवतो म्हटलं तर 'आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना' या धोरणाने निर्यातबंदी आणि जर का पक्का माल तयार करतो म्हटलं तर 'गाय तुमची पण कास आमची' या धोरणानं पुन्हा लूट. अशा पद्धतीनं, आधीच अस्मानी संकटांनी कोंडीत सापडलेल्या तो जिथं जिथं अडचणीत येईल तिथं तिथं तुडविण्याचं शास्त्रशुद्ध, लेखी, अधिकृत धोरण सरकारनं चालवलं आहे.

शेतकऱ्याचं दारिद्र्य हे त्याच्या मालाला भाव न मिळाल्याचा परिणाम आहे. त्याच्या मालाला भाव मिळू नये असं सरकारचं लेखी धोरण आहे आणि ते अत्यंत निर्दयपणे राबवलं जातं. या सर्व विवेचनात आपण सरकार म्हणून जो शब्द वापरतो त्याचा अर्थ अमुक एकच पक्ष असा नव्हे. सगळया पक्षांच्या सरकारचं हेच धोरण आहे. ही कोणत्याही एका पक्षाच्या एका सरकावरची टीका नाही. ते मग पं. नेहरूचं काँग्रेस सरकार असो, लालबहादूर शास्त्रींच असो, इंदिराबाईंचं असो की मोरारजी देसाईंच असो की नवीन इंदिरा सरकार असो-इकडे मुंबईला शरद पवारांचं असो की अंतुल्यांचं असो-बंगाल केरळमध्ये कम्युनिस्टांचं असो की काँग्रेसचं असो, सगळ्या सरकारचं धोरण एकच आहे-शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळता कामा नये. कम्युनिस्टांच्या उल्लेखाने काहीना-विशेषत: काही तरुणांना आश्चर्य वाटेल. पण गेल्या वर्षी प. बंगालमधील अर्थमंत्री अशोक मित्रा यांनी एक पुस्तक लिहिलं आहे. *त्यात त्यांनी आकडेवारीची अशी काही गल्लत केली आहे आणि सिद्ध केले आहे की, '१९४७ पासून शेतीमालाच्या किमती कारखानदारी मालापेक्षा फार जास्त वाढल्या आहेत. त्यामुळे बिचाऱ्या कारखानदारांवर फार वाईट स्थिती आली आहे. बडे बागायतदार आणि मोठे शेतकरी मात्र माजले आहेत.' असं हे तथाकथित, गरिबांच्या बाजूचे कम्युनिस्ट पुढारी लिहितात.

उलट परवा लोकसभेत सादर केलेल्या एका अहवालात म्हटलं आहे की बिर्लांच्या कुटुंबातील भांडवल- संपत्ती गेल्या आठ वर्षात ६०० कोटींपासून

१४०० कोटींवर आली आहे.

या देशातील सर्वसाधारण शेतकऱ्याची स्थिती पाहिली आणि बिर्लांची ही स्थिती पाहिली तरी हे कम्युनिस्ट असं म्हणतील की या देशात गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांनी फार फायदा काढला पण कारखानदारांनी काढला नाही. अजूनही काही मंडळी म्हणण्याची शक्यता आहे की, शेतकऱ्याचाच फायदा होऊन राहिला आहे. पण तुम्ही स्वत: अनुभवलेल्या स्थितीचा आढावा घ्या. १९४० साली बैलगाडीच्या चाकाला फक्त दोन रुपये पडत होते. आज काय पडतं? आज त्याच धावेला अडीचशे रुपये पडतात. डिझेल इंजिन १० वर्षांपूर्वी साधारणपणे १५०० रु. पर्यंत मिळे. आज त्याला ६००० रु. पडतात. युरियाच्या भावाचे पाहा. कोणतीही वस्तू घ्या, प्रत्येक वस्तूचे भाव कितीतरी पटींनी वाढले आहेत. मजुरीचे दर वाढलेले आहेत, तर दुसऱ्या बाजूला विचार केला तर शेतीमालाचे भाव जवळ जवळ वाढलेलेच नाहीत गेल्या दहा वर्षांत. अशा स्थितीत शेतकऱ्यांना फायदा झाला की तोटा?

****



प्रकरण : ५

# ‘इंडिया’ आणि ‘भारत’

आतापर्यंत आपण जो अभ्यास केला त्यात आपण काय काय पाहिलं? शेतकरी संघटनेचा कार्यक्रम हा काही शेतकऱ्याच्या मर्यादित स्वार्थाकरता काढलेला कार्यक्रम नाही. या देशातील दारिद्र्य दूर व्हावे याकरिता हा कार्यक्रम आहे. याचा अर्थ हा कार्यक्रम देशातील सगळ्यांकरता आहे.

शेतकऱ्याच्या दारिद्र्यामागे शेतीमालाला भाव मिळत नाही हे एकमेव कारण आहे. शेतीमालाला भाव का मिळत नाही? तर, शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळू नये हे सरकारचं मुख्य धोरण आहे. हे धोरण कसं राबवलं जातं ते आपण पाहिलं. या धोरणाची तीन सूत्रं आहेत. पहिलं, तूट असेल तर लूट आणि मुबलकता असेल तर लिलाव. दुसरं, शेतीमालावर निर्यातबंदी – म्हणजे ‘आई जेवू घालीना नी बाप भीक मागू देईना’ आणि तिसरं, ‘गाय शेतकऱ्याची पण कास मात्र सरकारची’ – तुम्ही पक्क्या मालाचे कारखाने काढले तरी त्यावर अशी बंधनं घालायची की शेतकऱ्याला फायदा होऊ नये.

ही धोरणं सगळ्या पक्षांनी राबविलेली आहेत. हे एकाच पक्षाचं धोरण आहे, बाकीचे पक्ष चांगले आहेत असं काही नाही. सगळे पक्ष सारखेच चोर आहेत. त्यामुळे ‘निवडणुकीत रस घेऊन आपण पक्ष बदलून दुसरा पक्ष आणू या’ असं म्हणण्यानं काही फरक पडणार नाही–आजपर्यंत पडला नाही.

आता आपण जरा जड विषय घेणार आहोत. जे थोडेफार शिकलेले आहेत त्यांना हा विषय इतका जड वाटणार नाही. आपण अत्यंत थोडक्यात या सर्व प्रश्नांचा इतिहास पाहू.

१६ व्या शतकामध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. प्रथमत: इंग्लंड देशात कारखाने निघाले. तेव्हापासून उद्योगधंद्यांची – कारखान्यांची वाढ सतत चालू आहे. त्यांचं वैभव सतत वाढतं आहे. कारखान्याला जर फायदा व्हायचा असेल, कारखान्याची जर भरभराट व्हायची असेल तर कारखान्याला जो कच्चा माल लागतो तो स्वस्तात स्वस्त मिळवता आला पाहिजे, कारखान्यात काम

करणारे जे कामगार असतात त्यांना कमीतकमी पगार देऊन त्यांच्याकडून जास्तीत जास्त काम करून घेता आलं पाहिजे आणि कारखान्यात तयार झालेला माल जास्तीत जास्त किमतीत ग्राहकांना देता आला पाहिजे. कारखाना चालवताना शेतकरी, कामगार आणि ग्राहक या तिघांची लूट करण्यात येते. हे पहिल्यापासून चालत आले आहे. या तिघांच्या लुटीपैकी कामगारांचे जे शोषण होते त्याचा विचार फार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. मार्क्सवाद, कम्युनिझम यासारखं तत्त्वज्ञान त्यातूनच निघालं. ग्राहकांचं शोषण होतं म्हटल्यावर, विशेषत: सुधारलेल्या देशात ग्राहकांच्या चळवळी उभ्या राहिल्या; परंतु कच्च्या मालाचं जे शोषण होतं त्याचा विचार आजपर्यंत फार थोड्या प्रमाणात झाला. कच्च्या मालाचं शोषण थांबावं म्हणून कोणत्याही तऱ्हेची संघटना प्रभावीपणे उभी राहिली नाही. आपण कामगारांच्या शोषणाच्या संदर्भात भांडवलवाद-समाजवाद किंवा भांडवलवाद साम्यवाद असे शब्द वापरतो. पण कच्च्या मालाच्या शोषणामध्ये भांडवलवाद आणि साम्यवाद यात काहीही फरक नाही. भांडवलवादी देशामध्येसुद्धा शेतकऱ्यांकडून कच्चा माल स्वस्तात स्वस्त घेऊन कारखानदारीचा फायदा करून द्यावा असं धोरण आहे आणि रशियासारख्या कम्युनिस्ट – साम्यवादी देशामध्येसुद्धा शेतीमध्ये तयार होणारा माल कमीत कमी किमतीत मिळवू घेतला पाहिजे, भांडवल तयार केलं पाहिजे, या भांडवलाच्या साहाय्याने उद्योगधंद्याची वाढ केल्यानंतर कामगारांचं वर्चस्व सबंध अर्थव्यवस्थेवर व्हावं अशी विचारसरणी आहे. त्या दृष्टीने पाहता शेतकऱ्यांच्या शोषणाचा प्रश्न भांडवलवादी आणि कम्युनिस्ट देशात सारखाच आहे; परंतु शेतकऱ्यांच्या शोषणाचं हे धोरण समाजवादी देशातही कायमचं राहिलं आहे. आपल्याला थोडाफार अनुभव आहेच.

रशियामध्ये, पूर्व युरोपातील देशांत हा वाद फार गाजला आहे. रशियामध्ये जेव्हा एकदा शेतकऱ्यांनी गव्हाचे भाव बांधून मागावेत असा विचार केला तेव्हा स्टालिनने उच्चारलेल एक वाक्य प्रख्यात आहे. स्टालिननं म्हटलं, 'हे शेतकरी आज गव्हाचेच भाव वाढवून मागतायत. ही मागणी जर आपण मान्य केली तर ही मंडळी उद्या सोन्याची घड्याळं मागतील.' शेवटी रशियातला हा प्रश्न, जे शेतकरी त्यातल्या त्यात जास्त उत्पादन करून बाजारात धान्य पाठवीत असत त्या सर्वांवर रणगाड्यांसकट सैन्य पाठवून त्यांचा समूळ नाश करून सोडवला गेला. मग जी राहिलेली जमीन होती तिच्यावर सहकारी म्हणा, सरकारी म्हणा शेती चालू केली.



त्यामुळे परिस्थिती अशी निर्माण झाली की, अनेक क्षेत्रांमध्ये अत्यंत पुढे गेलेल्या रशियासारख्या देशाला आजही शेतीमालाच्या बाबतीत परदेशावर अवलंबून राहावं लागतं.

आपल्याला महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यावयाचा आहे तो हा की, आपण इथं शेतकऱ्याचा जो प्रश्न उपस्थित करीत आहोत त्याचं तयार उत्तर आजपर्यंत कोणत्याही वादात नाही. कोणत्याही विचारसरणीत नाही. कच्च्या मालाच्या शोषणासंबंधीची आपली ही विचारसरणी पहिल्यांदा मांडली जात आहे. **दुसऱ्या एखाद्या वादाच्या संदर्भात– समाजवादाच्या संदर्भात, साम्यवादाच्या संदर्भात आपल्या प्रश्नाचे उत्तर सापडेल ही कल्पना चुकीची आहे.**

कच्च्या मालाचं शोषण कशा तऱ्हेनं होत आलं? आपण इंग्लंड देशाचंच उदाहरण घेऊ या. कारण तिथेच उद्योगधंद्यांच्या वाढीला–ज्याला औद्योगिक क्रांती म्हणतात, तिला सुरुवात झाली. प्रथमत: त्या देशात जो काही कच्चा माल होता तो वापरायचा प्रयत्न झाला. पण तो देश एवढासा आहे. त्यातल्या मालावर असे कितीसे कारखाने चालणार? तेव्हा बाहेरून माल मिळविण्याची आवश्यकता निर्माण झाली. बाहेरून कच्चा माल मिळू शकत होता, पण तो स्वस्त मिळत नव्हता, पुरेसा मिळत नव्हता. त्यासाठी इंग्लंडसारख्या देशांनी वेगवेगळ्या देशात जाऊन आपलं राज्य प्रस्थापित करायचं–ते देश ताब्यात घ्यायचे आणि राजकीय सत्तेच्या आधाराने मक्तेदारी पद्धतीने तिथला कच्चा माल स्वस्तात स्वस्त घेऊन आपल्या कारखान्यांना आणून द्यायचा अशा तऱ्हेची पद्धत चालू केली. याचा त्यांना आणखी एक फायदा झाला. इंग्लंडमध्ये कारखाने मोठ्या प्रमाणावर सुरू झाले, हिंदुस्थानसारख्या देशांतून कच्चा माल येऊन पडू लागला. एवढ्या मोठ्या कारखान्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात येऊन पडलेला कच्चा माल वापरून जो पक्का माल तयार होऊ लागला तो एकट्या इंग्लंडमध्ये खपणे शक्य नसल्यामुळे तो त्याच देशांतून खपवला जाऊ लागला– अधिक किमतीने म्हणजे हिंदुस्थानसारख्या देशांचा उपयोग दोन पद्धतीने झाला. कच्चा माल स्वस्त मिळू लागला आणि पक्का माल जास्त भावाने विकण्यासाठी नवीन बाजारपेठ मिळाली. अशा तऱ्हेच्या व्यवस्थेतून – जिला मार्क्सवादी वाङ्मयात वसाहतवादी व्यवस्था म्हणतात– कारखानदारीची भरभराट झाली. ही व्यवस्था जवळ जवळ २०० वर्षे टिकली. या २०० वर्षांत केवळ हिंदुस्थान नव्हे तर इतर अनेक देश पार रसातळाला गेले.

एकेकाळी वैभवात असलेले देशसुद्धा रसातळाला गेले.

परंतु जागतिक घडामोडी अशा होत गेल्या की, दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे सन १९४७ च्या आसपास इंग्लंडसारख्या देशांना त्यांनी जी राजकीय सत्ता हाती ठेवली होती ती टिकवणं अशक्य झालं. त्यामुळे जगभर हिंदुस्थानसारख्या ज्या सगळ्या वसाहती होत्या त्या हळूहळू स्वतंत्र होऊ लागल्या. हे स्वातंत्र्य केवळ इंग्रजांना राज्य करणे कठीण होऊ लागले म्हणून मिळाले ही कल्पना चुकीची आहे. त्याचप्रमाणे केवळ आपण लढा केला म्हणून, म. गांधींनी स्वातंत्र्य मिळवून दिले याही कल्पना चुकीच्या आहेत. जगातल्या इंग्लंड, फ्रांस, जर्मनी, स्पेन, अमेरिका या सगळ्या देशांच्या ज्या ज्या काही वसाहती होत्या त्या दुसऱ्या महायुद्धामुळे १९४५ ते १९५२ या सात वर्षांत इतर सर्व देशांबरोबर स्वतंत्र झाल्या. त्यांच्या असं लक्षात आलं की, सैन्याच्या ताकदीवर किंवा राजकीय ताकदीवर या बाजारपेठा आता हातात ठेवणे शक्य नाही त्यामुळे त्यांनी सर्व वसाहती मोकळ्या केल्या.

तरीसुद्धा निघता निघता या मंडळींनी अशी एक व्यवस्था या देशात चालू ठेवण्याचा प्रयत्न केला की, जरी राज्यसत्ता गेली तरीसुद्धा व्यापारात जो फायदा होता तो जास्तीत जास्त प्रमाणात चालू राहावा. कारण त्यांचा येण्याचा मुख्य हेतू व्यापारी होता, राजकीय नव्हता. एव्हाना वसाहतवादी राष्ट्रातील कारखानदारांना प्राथमिक उद्योगधंद्यात फारसे स्वारस्य राहिलेले नव्हते. कारखान्यांना लागणारा माल तयार करणाऱ्या जड उद्योगधंद्यांकडे ते वळले होते. तेव्हा जुन्या वसाहतीतील किरकोळ कारखानदारी वाढायला त्यांचा फारसा विरोध नव्हताच. उलट त्यांच्या जड उद्योगधंद्याच्या भरभराटीसाठी अशा स्थानिक कारखानदारीच्या विकासासाठी हातभार लावायलासुद्धा ते तयार होते.

उदाहरणार्थ, हिंदुस्थानसारख्या देशात काय झालं? व्यापार आणि कारखानदारीच्या साहाय्यानं जी मंडळी वर आली होती त्याच्या संगनमतानं आणि इथं जे शासन आलं त्याच्या संगनमतानं नवी व्यवस्था अशी सुरू झाली की ज्यामध्ये पूर्वी कच्चा माल ज्या भावानं विकत घेतला जात होता त्याच प्रकारच्या भावानं विकत घेतला जाऊ लागला. हळूहळू या देशात कारखाने तयार केले गेले आणि त्या कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालामध्ये याच देशात होऊ लागले आणि तयार झालेला माल गरीब शेतकऱ्यांना, सर्वसामान्य जनतेला पुन्हा महागात



महाग विकला जाऊ लागला. यात फरक काय पडला? कारखानदारी कुठं व्हायची त्याची फक्त जागा बदलली; त्याचा फायदा कुणाला व्हायचा ती माणसं थोड्या प्रमाणात बदलली. पण शेतकऱ्याच्या शोषणाची, दारिद्र्याची, हतभाग्याची व्यवस्था तीच राहिली. म्हणूनच इंग्रजांचं राज्य गेलं ही कल्पना महत्त्वाची नाही. इंग्लंडच्या ऐवजी दुसरंच राज्य चालू झालं आणि ते तितकंच वाईट होतं.

ही कल्पना समजावून सांगण्याकरता आपण असं म्हणतो की, १९४७ साली भारतावरचं इंग्लंडचं राज्य गेलं आणि इंडियाचं सुरू झालं. 'इंडिया आणि भारत' ही काय कल्पना आहे? या कल्पनेवर पुष्कळ वादविवाद होतो आणि पुष्कळांना ही कल्पना समजायला कठीण जाते. आपल्या घटनेमध्ये आपल्या देशाला दोन नावे आहेत. इंडिया म्हणजे भारत असं त्यामध्ये आहे. ही दोन्ही नावं कोणत्याही वेळी वापरली तरी चालतात. आपल्या देशाचं मूळचं, जुनं नाव भारतच आहे. परदेशात याचं नाव इंडिया का पडलं त्याला मोठा इतिहास आहे. म्हणून याला इंडियाच म्हणतात. इंग्रजीमध्ये इंडिया आणि वेगवेगळ्या भाषांत आणखी वेगवेगळी नाव आहेत. आपल्या देशामधील हा जो भाग आहे, ज्यातील मंडळी पूर्वी इंग्रज ज्या पद्धतीनं कारखानदारी चालवीत असत त्याच पद्धतीनं शेतीचे शोषण करून चालवतात, त्या पद्धतीचं राहणीमान ठेवतात, त्या प्रकारचं शिक्षण घेतात आणि एकूणच त्यांच्या पद्धतीनं विचार करतात तो म्हणजे 'इंडिया.' या इंडियाला आणि भारताला अशी काही भौगोलिक सरहद्द नाही की इथून इथं इंडिया आणि त्या बाजूला भारत असं कुणाला म्हणता यावं. काहींच्या मनात गोंधळ होतो की ग्रामीण भाग म्हणजे भारत शहरी भाग म्हणजे इंडिया. पण ही कल्पना चुकीची आहे. शहरात जाताना जिथं जकातनाका लागतो तिथं इंडियाची हद्द सुरू होते ही कल्पनाच चुकीची आहे. या शहरांमध्येसुद्धा काही एक वेगळी प्रवृत्ती आहे. मग ती आर्थिक असो, सामाजिक असो, सांस्कृतिक असो किंवा शैक्षणिक असो. ती इतकी वेगळी आहे की, त्या माणसांमध्ये आणि बाकीच्या ग्रामीण देशामध्ये काहीही साम्य राहत नाही. प्रचंड मजल्या-मजल्यांच्या इमारती, ऐषआरामाच्या सुखसोयी असं राहणीमान मुंबईसारख्या शहरात आहे. तर इकडे कोट्यवधी लोक कुडांच्या फाटक्या, गळक्या झोपडीतून वर्षानुवर्षे राहतात. शहरांमध्ये सिनेमासारखी करमणुकीची साधने अमाप आहेत. खेड्यात काय आहे? शहरांमध्ये वाहतुकीसाठी गुळगुळीत रस्ते तयार होतात. पुण्याला तर दोनदा असं घडलं आहे की पंतप्रधान

यायचे होते, त्यांना लोहगावच्या विमानतळावरून एका लष्करी संस्थेत जायचं होतं. तेव्हा पुण्याचे रस्ते काही इतके वाईट नव्हते, तरीही पंतप्रधानांना धक्के बसू नयेत म्हणून तीन तीन दिवसांत २० मैलांचे रस्ते पुन्हा डांबरी करण्यात आले. उलट आपल्या देशात अडीच लाख खेडी अशी आहेत की तिथं, आपल्याकडचा पावसाळा सुरू झाला की कोणतीही गाडी जाऊ शकत नाही.

एकीकडे दारूबंदी व्हावी की नाही यावर विचार चालू असताना, वेगवेगळ्या प्रकारची दारू कशी तयार व्हावी, बिअर कशी तयार व्हावी यावर विचार चालू आहे आणि दुसऱ्या बाजूला जवळ जवळ दीड लाख खेड्यांमध्ये प्यायच्या पाण्याचीसुद्धा सोय नाही. शहरात मोठमोठे दवाखाने उघडले जातात. कोणताही रोगी असला तरी त्याला उपचार घेण्याचा अधिकार आहे याबद्दल वाद नाही. पण शासन जेव्हा अशा दवाखान्यासाठी खर्च करतं तेव्हा तो कोणत्या प्रमाणात झाला पाहिजे? त्याची उपयुक्तता कशी असली पहिजे? आपल्या देशातले महत्त्वाचे रोग म्हणजे हगवण, नारू आणि बाकीचे त्वचारोग. या तीन रोगांवर जरी सर्वंकष योजना करण्याचं ठरवलं तरी या देशातले ९० टक्के लोक निरोगी होतील. पण या रोगावर उपचार करणारी माणसही नाहीत आणि औषधंही नाहीत आणि आहेत त्या ठिकाणी काहीही सोयी नाहीत. उलट शहरांमध्ये मोठमोठे दवाखाने बांधून त्यातून जिच्यामुळे सबंध देशातील फार तर लाखभर लोकांचा आजार बरा होऊ शकेल अशी मोठी यंत्रसामग्री आणण्याकरता प्रचंड खर्च होतो. बाकीच्या लोकांकरता मात्र काहीच रक्कम उपलब्ध होत नाही. उदाहरणार्थ, चाकणजवळील भामनहरच्या खोऱ्यातील २७ गावांपैकी २४ गावं अशी आहेत की एकदा पावसाळा सुरू झाला की त्यांचा इतर जगाशी अजिबात संबंध राहत नाही. मग सहा महिने त्यांनी तसंच गावात अडकून राहायचं. कुणी आजारी पडलं तर डॉक्टर नाही. बाळंतीण अडली आणि घरच्या माणसांसमोर तडफडत मेली असं दर पावसाळ्यात निदान एक दोन वेळा घडतं. या २४ गावांपैकी १७ गावं सबंध खरजेनं भरलेली आहेत. खरूज हा रोग दिसायला साधा असला तरी त्या गावातनं या रोगाच उच्चाटन करायचं म्हटलं तर ती इतकी सोपी गोष्ट नाही; कठीणच आहे. कठीण म्हणजे काय? या गावांतून खरजेचं उच्चाटन करायचं झालं तर प्रत्येक गावावर दर महिन्याला कमीत कमी ३०० ते ४०० रुपये खर्च करावे लागतील. अशा तऱ्हेने निदान एक वर्षतरी उपचार केले तर या रोगांचे या खेड्यांतून उच्चाटन होईल. प्रत्येक गावाला एका वर्षासाठी



५००० रुपये म्हणजे १७ गावांना मिळून ८५ हजार रुपये लागतील. शहरांमधील दवाखान्यांतून मोठी यंत्रसामग्री आणण्यासांठी ज्या रकमा खर्च केल्या जातात त्या मानानं ८५ हजार रुपये म्हणजे अगदी किरकोळ रक्कम पण तीही आपल्याला उभी करता येत नाही.

पैशाच्या दृष्टीनं ग्रामीण भागात शेतकऱ्याला किंवा शेतमजुराला काय मिळकत होते? सबंध वर्षात त्याला चार महिनेच काम मिळतं असं गृहीत धरलं तर त्याची मिळकत महिना ४५ रुपयांपेक्षा जास्त होत नाही. शहरांकडे पाहा. तिथं काही कारखान्यांची उदाहरणं अशी आहेत की तिथं केवळ झाडू मारण्याचं काम करणाऱ्या कामगारालासुद्धा महिन्याला जवळजवळ १००० रुपये पगार आहे. पुण्यामुंबईत किंवा इथं जे थोडे शिकलेले लोक आहेत त्यांच्या कानावर परदेशात काय पगार मिळतो याचे आकडे येतात. 'अमक्या अमक्याला अमेरिकेत १५००० च्या वर पगार मिळतो' असं कळलं की त्यांना वाटतं, 'काय त्याला भयंकर पगार मिळतो!' अशीच भावना ग्रामीण भागातील मजुराची होते. त्याला जर सांगितलं, 'शहरात झाडूवाला महिन्याला १००० रु. पगार घेतो.' तर तो म्हणतो, 'काय भरमसाट मिळकत आहे त्याची!' तुम्ही अमेरिका आणि आपल्या देशातील 'इंडिया' यांची वेगवेगळ्या दृष्टीने तुलना करून पाहा. जिथं जिथं अमेरिका आणि इंडियात दरी दिसेल, त्याच प्रकारची दरी इथं इंडिया आणि भारत यांच्यामध्ये आहे. साम्य काहीच नाही. आज शहरांमध्ये एकीकडे चांगलेचुंगले कपडे घालून जाणारी माणसं दिसतात; तर दुसऱ्या बाजूला अगदी गाठीगाठीचे कपडे घालून जाणारी माणसंही दिसतात. ग्रामीण भागामध्ये तर परिस्थिती त्याहूनही भयानक दिसते. एकाच देशामध्ये, पुढारलेल्या देशामध्ये आपल्याला हा जो काही फरक दिसतो त्याचे कारण असं की आर्थिकदृष्ट्या प्रत्यक्षात आपल्या देशाचे दोन भाग झालेले आहेत. झेंडा एकच आहे, राष्ट्रगीत एकच आहे, राष्ट्रपती एकच आहे–सगळं एकच आहे– वरवरच्या खुणा सगळ्या एकच आहेत; परंतु आर्थिकदृष्ट्या या देशाचे असे दोन भाग पडले आहेत की, ज्याच्यामधील **एक भाग हा दुसऱ्या भागाच्या शोषणावरच जगतो आहे आणि सतत जास्तीत जास्त शोषण करीत चालला आहे आणि दुसऱ्या भागाचं मात्र शोषण होतच आहे.**

शोषक म्हणजे 'इंडिया' आणि शोषित म्हणजे 'भारत.'

****

प्रकरण : ६

# 'भारत'विरोधी प्रचलित उद्योगनीती

आर्थिकदृष्ट्या या देशाचे जे दोन भाग पडले आहेत त्यातील शोषक 'इंडिया' 'भारता'चे – शोषण अनेक परींनी करीत आहे. या देशात राबविली जाणारी उद्योगनीती ही अशाच उद्देशाने राबविली जाते.

आपल्या देशामध्ये उद्योगधंद्यांची वाढ व्हावी की न व्हावी? काही लोकांचा उद्योगधंद्यांच्या वाढीला विरोध आहे. आपला उद्योगधंद्यांच्या वाढीला विरोध नाही. उद्योगधंदे निर्माण व्हायलाच पाहिजेत. मोठमोठे उद्योगधंदे निर्माण व्हायला लागले तरच जसजशी लोकसंख्या वाढत जाईल तशी तशी ती शेतीवरून काढून या उद्योगधंद्यांमध्ये रोजगारावर लावता येईल. तेव्हा उद्योगधंदे वाढायलाच पाहिजेत. मग अर्थशास्त्रज्ञांचं म्हणणं असं की, 'उद्योगधंदे वाढायला पाहिजे असतील तर त्याच्याकरता या देशातील भांडवल वाढायला पाहिजे. त्यासाठी बचत व्हायला पाहिजे आणि शेवटी अर्थशास्त्रदृष्ट्या भांडवल हे फक्त शेतीतूनच तयार होऊ शकतं.' कारखान्यामध्ये फायदा होतो, पण तो रुपया पैशातला असतो. वस्तूच्या रूपातला फायदा कारखान्यात तयार होत नाही. कारखान्यात एखादी वस्तू आली तर तिचं फक्त स्वरूप बदललं जातं. वेगळी नवीन वस्तू तयार होत नाही. नवीन वस्तू तयार होण्याची म्हणजे एका दाण्याचे शंभर दाणे होण्याची किमया फक्त शेतीतच होऊ शकते. म्हणून खऱ्या अर्थाने वस्तूच्या रूपातील बचत ही फक्त शेतकऱ्याच्या शेतामध्येच होते. म्हणून मग अर्थशास्त्रज्ञ म्हणतात आणि आपल्या सर्व पंचवार्षिक योजनांमधील हा विचार आहे की, 'शेतीमध्ये भांडवल निर्माण होते. हे भांडवल जास्तीत जास्त प्रमाणात वापरून उद्योगधंदे चालू केले पाहिजेत.' याच्याबद्दल काहीही वाद असूच शकत नाही. जर भांडवल फक्त शेतीमध्येच तयार होते आहे आणि उद्योगधंदे सुरू करायचे आहेत त्याला भांडवल लागतं तर जिथं भांडवल आहे तिथून ते घेतलंच पाहिजे. तुम्ही म्हणाल, 'मग इंडियावाले जे करतात त्यात चूक काय?' चूक अशी आहे– शेतीमधनं भांडवल तयार करून ते उद्योगधंद्यात नेलं पाहिजे हे बरोबर, **पण शेतीमधनं भांडवल नेलं पाहिजे**



**म्हणजे शेतकऱ्याकडनं नेलं पाहिजे असं नाही.** शेतीमध्ये तयार झालेलं भांडवल जर शेतकऱ्याकडेच राहिलं आणि ग्रामीण भागातच उद्योगधंदे सुरू करायला त्याला प्रोत्साहनं दिलं तर देशामधल्या उद्योगधंद्याची–कारखान्यांची वाढ होईल. एवढंच नव्हे तर आज ज्या पद्धतीने उद्योगधंद्यांची वाढ चालली आहे त्यापेक्षा चांगल्या पद्धतीने होईल. याचा अर्थ समजून घेण्यासाठी आजच्या उद्योगव्यवस्थेतील काही दोष आणि शेतकऱ्यांच्या हाती भांडवल राहिलं तर ते कसे दूर होतील ते सांगतो.

पहिला दोष म्हणजे – आजच्या व्यवस्थेमध्ये शेतीमधील भांडवल शहरांत –इंडियात नेऊन तिथल्या काही कारखानदार, व्यापारीवर्गाच्या हाती सोपवलं जातं. हे कारखानदार आपला स्वत:चा फायदा कसा होईल याचा विचार करतात. याकरता ते कारखाना कसा चालू करतात? ते परदेशात जाऊन तिथं कोणती यंत्रसामग्री, तंत्रज्ञान मिळतं हे पाहतात आणि अशा तऱ्हेचे कारखाने चालू करतात की जे या देशाला खरोखरीच निकडीचे नाहीत– या देशाला म्हणजे बहुसंख्य लोकांना. उदाहरणार्थ, नायलॉनचे कपडे किंवा टेरीकॉटचे कपडे अशा तऱ्हेचा माल बनविणाऱ्या कारखान्यांची या देशाला काहीही गरज नाही. आपल्या देशामध्ये रंगीतच काय पण काळ्या–पांढऱ्या टेलिव्हिजनचीसुद्धा काही आवश्यकता नाही. पण आम्ही ते पहिल्यांदा तयार करतो आणि लोकांच्या नेहमीच्या गरजेच्या ज्या वस्तू आहेत त्यांच्याकडे लक्षच देत नाही. हा झाला सध्याच्या उद्योगव्यवस्थेचा पहिला दोष. देशाच्या संदर्भात ज्या काही आवश्यक गोष्टी आहेत त्या तयार होत नाहीत. उदाहरणार्थ, जो कच्चा माल वापरून नायलॉनचे कपडे, कृत्रिम धाग्यांच्या वस्तू, प्लास्टिकच्या वस्तू तयार होतात तोच पदार्थ वापरून पी.व्ही.सी. च्या नळ्या–पाईप मोठ्या प्रमाणावर तयार करता आल्या असत्या आणि जर का अगदी लहान पाईप – ५ मि.मी. ७ मि.मी. १० मि.मी. चे–शेतकऱ्यांना अत्यंत स्वस्त दरामध्ये उपलब्ध करून देता आले असते तर आज जो जंगलवाढीचा प्रश्न आपल्या देशामध्ये आहे तो फार मोठ्या प्रमाणावर सुटला असता. आज आम्ही कोरडवाहू भागामध्ये झाडे लावण्याचा प्रयत्न अनेक वेळा करतो आणि उन्हाळ्यात जर त्यांना पाणी पुरवण्याबद्दल काही अडचणी निर्माण झाल्या म्हणून तीन वर्षात १०० पैकी वीसच झाडं जगली, तर आम्ही म्हणतो फार मोठं काम झालं. याकरता इस्रायलसारख्या देशामध्ये थेंबाथेंबानं पाणी पडण्याची योजना आहे. म्हणजे

पाण्याचा नाश होत नाही. सगळ्या झाडांच्या रांगामध्ये एक एक लांब नळी असते. तिच्यामधून प्रत्येक झाडाच्या बुंध्याशी एक टोक काढलेलं असतं. दर चार-पाच मिनिटांनी एक थेंब त्यातून बाहेर सोडला जाईल अशी योजना केलेली असते. आज आपल्या शेतकऱ्याला ही योजना परवडणं शक्य नाही. कारण ५ मि. मी. चा प्लास्टिक पाईप घ्यायचा झाला तर त्याला फुटाला सव्वा रुपया इतकी किंमत मोजावी लागेल. इस्त्रायलमध्ये हा पाईप अक्षरशः वाटण्यात आला. तिकडे वाळवंटामध्ये बागा उभ्या राहिल्या आणि आपल्याकडे मात्र कोरडवाहू जमिनीत झाडं जगवणं कठीण जातं.

कारखान्यांबद्दल बोलताना मी आता टेलिव्हिजनचा उल्लेख केला. समजा शहरामधील लोकांच्या ऐषआराम, सुखसोयींच्या संदर्भात कारखाने काढायचे झाले तर कोणते कारखाने काढावेत म्हणजे त्यांच्या ऐषआरामासाठी नव्हे पण आपली मिळकत वाढविण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना उपयोग होईल? रेफ्रिजरेटर बनविण्याचा कारखाना या दृष्टीने युक्त होईल. रेफ्रिजरटरमध्ये वस्तू-भाजी, दूध वगैरेसारखी ठेवली तर ती कितीही दिवस टिकते. तर या रेफ्रिजरेटर्सचे प्रचंड प्रमाणावर उत्पादन करून ते घरोघर अत्यंत स्वस्त दरात किंवा भाड्याने किंवा फुकटसुद्धा वाटता आले असते तर शेतीमालाचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणावर सुटला असता. आज शेतीमालावर प्रक्रिया करणारे कारखाने आपल्या देशात मोठ्या प्रमाणात वाढू शकत नाहीत आणि घरोघरी फ्रीज नसल्यामुळे स्वस्त प्रकारच्या प्रक्रियासुद्धा आपल्या देशात होऊ शकत नाहीत. ज्या देशात शेतीमालाला भाव मिळू लागलेला आहे आणि म्हणून शेतीतून तयार झालेलं भांडवल शेतकऱ्यांच्याच हातात राहू लागलं आहे तिथं अत्यंत स्वस्त प्रकारच्या प्रक्रिया शेतीमालावर व्हायला लागल्या आहेत. उदाहरणार्थ, तुमचा माल घेऊन त्यामध्ये जंतू राहणार नाहीत अशी काळजी घेऊन तो छोट्या छोट्या प्लास्टिकच्या पिशव्यामध्ये भरून लगेच थंड करायचा किंवा पिशवीतून हवा काढून घेऊन त्या बंद करायच्या. इतक्या स्वस्त प्रकारच्या प्रक्रियासुद्धा आपल्याकडे होऊ शकत नाहीत कारण आपल्याकडे अशा प्रक्रिया करण्याची आणि साठवण्याची सोय आणि ऐपत शेतकऱ्यात येतच नाही; परंतु अशा तऱ्हेची सोय आणि ऐपत आपल्या शेतकऱ्याकडे जर असली तर 'ज्या वस्तूंचे कारखाने आपल्या देशात निघतात त्यांचा संदर्भ या देशातील गरजेशी नसून परदेशात कोणती यंत्रसामग्री मिळते,



कोणत्या प्रकारचं तंत्रज्ञान लाभतं याच्याशी आहे.' हा जो आजच्या उद्योगव्यवस्थेतील दोष आहे तो काढून टाकता येईल.

शहरांमध्ये ज्या प्रकारचे कारखाने उभे राहताहेत त्या कारखान्यांना एक कामगार रोजगारावर ठेवण्यासाठी फार मोठ्या रकमेची यंत्रसामग्री किंवा भांडवल लागतं. सर्वसाधारणपणे अडीच ते तीन लाख रुपयांचं भांडवल खर्च केलं तर एका कामगाराला रोजगार मिळतो. हा आजच्या उद्योग व्यवस्थेतील दुसरा मोठा दोष आहे. आपल्या देशात बेकारीची समस्या आहे-सुशिक्षित बेकारांची, अशिक्षित बेकारांची. (या दोघांतला फरक भ्रामक आहे हे आपल्याला ठाऊक आहे.) ही बेकारीची समस्या जर सोडवायची असेल, बेकारांना रोजगार मिळवून द्यायचा असेल तर ५०० ते ६०० रुपयांच्या भांडवली खर्चामध्ये एका कामगाराला रोजगार उपलब्ध होईल अशा तऱ्हेचे उद्योगधंदे आपल्याकडे चालू करायला पाहिजेत.

सध्या शहरांमध्ये जे कारखाने तयार होतात त्यांचा फायदा काही थोड्या लोकांपुरताच मर्यादित असतो; परंतु असे कारखाने उभे राहावेत म्हणून सर्वसामान्य जनतेचं शोषण होत राहतं. हा चालू उद्योगव्यवस्थेतील आणखी एक दोष आहे. सर्वसामान्यांचं शोषण होतं असं म्हणण्याचं कारण असं की, कारखाने उभारण्यासाठी जे भांडवल लागतं ते सर्वसामान्यांच्या बचतीतून उभं केलं जातं. त्यामुळे कारखाने चालू करूनसुद्धा त्यातून निर्माण होणाऱ्या मालाला मागणी नसते, उठाव नसतो अशी परिस्थिती आहे. उदाहरणार्थ, कापडगिरण्या मोठ्या प्रमाणात तयार झाल्या, काही आधुनिक गिरण्याही निघायला लागल्या; परंतु आज तयार झालेले कापड कापडगिरण्यांना विकता येत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे गावोगाव प्रदर्शनं भरवून- 'आम्ही तुम्हाला कापड कमी भावात देऊ, प्रदर्शनात या आणि कापड खरेदी करा.' अशी जाहिरातबाज आवाहने करून माल खपवण्याचा प्रयत्न त्यांना करावा लागतो. याचं कारण एका बाजूला प्रचंड प्रमाणात माल तयार होतो, तर दुसऱ्या बाजूला तो माल विकत घेण्याची ताकद- ऐपत ग्राहकाकडे राहिलेली नसते. तेच जर कारखाने आणि उद्योगधंदे काढण्यासाठी शेतकऱ्यांचं शोषण झालं नसतं आणि शेतकऱ्याकडे म्हणजेच बहुजन सर्वसामान्यांकडे जर पैसे राहिले असते तर आज ज्या शेतकऱ्याला त्याच्या बायकोसाठी समजा, एकच लुगडं घेणं परवडत असेल त्यानं तीन लुगडी घ्यायला सुरुवात केली असती. एका ऐवजी जर तीन लुगडी शेतकऱ्यांना खरेदी करता आली तर ५२ कोटी लोकसंख्येपैकी

सर्वसामान्यपणे २६ कोटी स्त्रियांना ५२ कोटी अधिक साड्यांची जरूरी लागेल. ही मागणी भागविण्यासाठी आज ज्या कापडगिरण्या आहेत त्यांना दोन्ही नाही तर तीनही पाळ्यात कामं करावी लागतील आणि खपाची जी अडचण आहे तीही सुटेल.

या सर्वांहून मोठा दोष या व्यवस्थेचा असा आहे की, या व्यवस्थेमुळे चलनवाढ आपोआप होते. कारखाने चालू झाले किंवा प्रकल्प उभा राहिला म्हणजे त्यासाठी काही कोटी रुपये खर्च होतात. हे काही कोटी रुपये शेवटी या देशातच खर्च होतात. काही प्रमाणात यातील रक्कम परदेशात जात असली तरी कारखान्याची इमारत बांधणारे, त्यासाठी इतर कामं करणारे जे काही मजूर असतात, ते आपल्या मर्यादित बाजारपेठेत, शहरात असतात. या लोकांच्या हाती पैसा येतो, पण लोकांच्या नित्याच्या गरजेला लागणारा माल पूर्वीइतकाच येत राहतो- या कारखान्यांमुळे त्यात काही वाढ होत नाही. त्यामुळे बाजारपेठेत पैसा जास्त पण माल कमी अशी स्थिती निर्माण होते. बाजारपेठेची अशी स्थिती झाली की चलनवृद्धी होते आणि त्यामुळे वस्तूंचे भाव वाढण्याची प्रवृत्ती तयार होते.

(१) ज्या वस्तूंची गरज या देशाला आहे त्या वस्तू तयार होत नाहीत.

(२) रोजगार देण्यासाठी जास्त भांडवलाची गरज लागते. त्यामुळे पुरेसा रोजगार तयार होत नाही.

(३) कारखान्याचा फायदा थोड्या लोकांनाच मिळाल्यामुळे ग्राहक बाजारपेठ तयार होत नाही म्हणून माल खपवता येत नाही आणि

(४) कारखान्यामुळे चलनवृद्धी होते त्यामुळे भाववाढ होते.

हे आपल्या देशातील औद्योगिकीकरणाच्या आजच्या पद्धतीचे प्रमुख दोष आहेत.

त्याच्याऐवजी आपण दुसरी कल्पना करून पाहू या. 'शेतीमध्ये तयार झालेलं भांडवल आणि बचत इंडियात न नेता ग्रामीण भागातच शेतकऱ्यांकडे राहू द्यावी आणि त्यांना कारखाने आणि उद्योगधंदे सुरू करायला मदत करावी.' अशा तऱ्हेचं उद्योगधोरण असतं तर कशा प्रकारचे उद्योगधंदे तयार झाले असते? अर्थात याचा अर्थ सगळेच उद्योगधंदे शेतकऱ्यांकडे सोपवायचे आहेत असे नाही. लोखंडाचे कारखाने, रसायनांचे कारखाने असे जे कारखाने मोठ्या प्रमाणावर चालवावे लागतात ते सरकारी क्षेत्रामधेच चालवायला हवेत; परंतु जास्तीत जास्त कारखाने



ग्रामीण भागातच आणि आपल्या देशात जीवनोपयोगी असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करणारे कशा पद्धतीने काढता येतील याचा विचार केला पाहिजे.

उदाहरणार्थ, मावळ तालुक्यात चाकण भागामध्ये मुख्ये पीक भुईमुगाचे आहे. ३ महिन्यांचं आणि ५ महिन्यांचं अशी भुईमुगाची दोन पिकं तिथं घेतली जातात. हे पीक निघतं तेव्हा गावातली सगळी माणसं जरी कामाला लागली तरी पुरत नाहीत. अशा वेळी अगदी शाळा बंद ठेवून मुलांनासुद्धा शेंगा उपटण्याच्या कामाला जावं लागतं आणि एकदा शेंगा उपटून झाल्या की जवळ जवळ सहा महिने गावामध्ये मजुरांना काम नसतं. भुईमुगाचा उत्पादनखर्च किलोला ४ रु. ३० पैसे असून गेल्या वर्षापर्यंत किलोला फक्त २ रु. ५० पैसे ते २ रु. ६० पैसे भाव मिळत आला आहे. जर का शेतकऱ्याला या शेंगाकरता उत्पादनखर्च भरून निघेल इतका भाव मिळाला असता तर आपण उत्पादन खर्चाच्या हिशेबात शेतीच्या किमतीवरील व्याज, इतर भांडवली गुंतवणुकीवरील व्याज, घसारा इत्यादी ज्या रकमा धरल्या त्या त्याच्या गाठी राखीव रकमा म्हणून जमा झाल्या असत्या. उदा. बैलाची किंमत १६०० रु. धरली आणि बैल ८ वर्षे काम करतो असं धरलं तर त्याची दर वर्षाला रु. २०० इतकी रक्कम बाजूला ठेवायला पाहिजे. रक्कम बाजूला ठेवायची म्हणजे 'बैलखाते' म्हणून पेटीत ठेवायची का? नाही. कारखान्यांच्या ताळेबंदामध्येसुद्धा अशाच रकमा राखीव ठेवल्या जातात. त्या जशा प्रत्यक्षात अन्य कुठे गुंतवल्या जातात त्याच पद्धतीने शेतकऱ्याला मिळालेली ही राखीव रक्कम त्याला उद्योगधंद्याला लावता येईल. अशा तऱ्हेची गुंतवणूक करून भुईमुगाच्या शेतकऱ्याला किती प्रकारचे कारखाने काढता येतील? शेंगा तयार झाल्यावर त्या बाजारात नेण्याऐवजी लगेच वाळवून घेऊन त्यांची टरफलं काढून त्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रक्रिया करून तेलापासून ते अगदी खारेदाणे-गोडेदाणे, तेल, लोणी असे जवळजवळ ऐंशी पदार्थ बनवता येतात. या ऐंशी उद्योगांपैकी तेलाची मोठी गिरणी उभी करणे शक्य नसले तरीसुद्धा लहान प्रमाणावर घाणी घालून, त्याला चांगल्या प्रकारचे दाणे पुरवून तेलाचा उद्योग सुरू करता येतो. जर दोन अडीच लाख रुपयांचं भांडवल असतं तर गावोगाव लहान प्रकारचे उद्योगधंदे उभे राहिले असते. त्यामुळे काय झाले असते? शेतकऱ्यावर कच्चा माल बाजारात न्यायची सक्ती न झाल्यामुळे त्याच्या मालाला आणखी चांगला भाव मिळाला असता, म्हणजे शेतकऱ्याला त्याचा उत्पादन खर्च भरून मिळालाच असता, शिवाय

कारखानदारीत जो काही फायदा आहे तोही मिळाला असता. हा झाला शेतीतून तयार झालेलं भांडवल आणि बचत इंडियात न पाठवता तिथंच ठेवण्याचा एक फायदा.

शेतीची कामं संपल्यावर शेतमजुरांवर घरी बेकार बसण्याची पाळी येते. जर असे कारखाने ग्रामीण भागातच तयार झाले तर अशी सोय झाली असती की, शेतीची कामं चालू आहेत तोवर कारखाने बंद आणि संपली की कारखाने चालू- अशा तऱ्हेने ग्रामीण भागात वर्षभर रोजगार मिळाला असता आणि बेकारीची समस्या थोड्याफार अंशी सुटू लागली असती. आज बेकारीवर उपाययोजना म्हणून 'रोजगार हमी' सारख्या ज्या योजना सरकारकडनं राबवल्या जातात त्या बेकारीच्या समस्येवरच्या केवळ जुजबी आणि तात्पुरत्या मलमपट्ट्यांसारख्या आहेत. त्यातूनही या योजनांचा काळ शेतीच्या हंगामाच्या काळाबाहेर असा ठरवला नाही तर त्याचा शेतीवर उलटा परिणाम होईल.

ग्रामीण भागामध्ये अशा प्रकारचे कारखाने काढण्याऐवजी पुण्यासारख्या शहरात जर भला मोठा कारखाना काढला तर रोजगार तयार होतील पण ते रोजगार अशा तऱ्हेचे होतील की, जे शेतीव्यवसायाला मारक ठरतील-शेतीला लागणारी मजुरी वाढेल. त्यामुळे शेतीमालही प्रमाणाबाहेर महाग होईल. हे जर टाळायचं असेल तर मघाशी आपण पाहिले त्या प्रकारे ग्रामीण भागातच औद्योगिक वाढ होणे आवश्यक आहे; परंतु आपल्या देशात ही पद्धत पाडली गेली नाही. कारण स्वातंत्र्यानंतर इंडियावादी मंडळींना, इंग्रजांना स्वातंत्र्याअगोदर जे फायदे मिळत होते ते सगळे फायदे आपल्याकडे वळवून घ्यावे अशी इच्छा झाली. इंग्रजांकडे २०० वर्षे जी उद्योगव्यवस्था चालत आलेली होती तीही यांच्याकडे नव्हती. आपण कसं म्हणतो, 'हा जुनाच आमदार निवडून जाऊ द्या. याचं पोट आतापर्यंत भरलेलं असणार. नवीन कुणी पाठवला तर तो आता कुठे खायला सुरुवात करणार रिकाम्या पोटी. त्यापेक्षा जुनाच बरा.' तसं शोषण करून करून इंग्लंडचं पोट थोड तरी भरलेलं होतं. पण या नवीन वखवखलेल्या भांडवलदारांची सगळी भूक राहिलेली होती. त्यामुळे भारताचं शोषण १९४७ नंतर आणखी मोठ्या प्रमाणात झालं.

हा सर्व विचार आपल्या संघटनेच्या प्रचारात फार क्वचित वापरावा लागतो, तरीसुद्धा आपल्या कार्यकर्त्यांना या विचाराची पार्श्वभूमी ठाऊक असणे जरूरीचे



आहे.

सामान्य जनतेची क्रयशक्ती वाढल्यामुळे इंडियात जे उद्योगधंदे आहेत त्यांचासुद्धा काही प्रमाणात फायदा होईल हे निश्चित आहे. मग केवळ त्यांचाच फायदा व्हावा म्हणून आपलं हे आंदोलन आहे का? आपला मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या शोषणावर उभी असलेली जी उद्योगव्यवस्था आहे ती बदलणे हा आहे. इंडियात ज्या तऱ्हेने उद्योगधंद्यांची वाढ झाली आणि होत आहे त्या तऱ्हेची वाढ सर्व विकसित देशांमध्येसुद्धा झालेली आहे. पण आपल्या देशातील ही वाढ भलत्याच वेळी झाली- चुकीचा अग्रक्रम (प्रायॉरिटी) देऊन झाली हा त्यातील मोठा दोष आहे. जेव्हा उद्योगधंद्यांची वाढ सुरू झाली तेव्हा भांडवलसंचय आणि बचत ही शेतकऱ्याकडे राहून शेतीमालाशी संबंधित उद्योगधंद्यांची वाढ व्हायला हवी होती. म्हणजे मग त्या उद्योगधंद्यांतून शेतीमधील जास्तीत जास्त संख्या रोजगारात जात राहिली असती. उद्योगधंद्यांच्या अशा वाढीच्या नंतरच्या एका पायरीला आज ज्या प्रकारचे कारखाने उभे राहताहेत ते उभे राहणे हा नैसर्गिक क्रम होईल.

आपल्याला हवं असो किंवा नसो काही कारखाने शहरांमध्ये उभे राहिले आहेत. तुमची इच्छा असेल तर तुम्ही त्यांची मालकी बदलू शकता. एखादा कारखाना खाजगी असेल तर राष्ट्रीय करा. शेतकरी संघटनेचा त्याच्याशी काही संबंध नाही. कारखाने खाजगी की सरकारी असोत- शेतकरी संघटनेच्या आंदोलनांमुळे सामान्यांची क्रयशक्ती वाढून त्यांच्यातील मंदी नष्ट झाली म्हणजे केवळ हे कारखाने चालविणाऱ्यांचाच फायदा होईल असं धरणं चूक आहे. जर ५२ कोटी साड्या नवीन तयार करायला लागल्या, ५२ कोटी धोतरं नवीन तयार करावी लागली तर त्यामधून भला मोठा रोजगारही तयार होणार आहे आणि शहरातील बेकारीच्या प्रश्नाची सुटका होणार आहे. त्यामुळे क्रयशक्ती वाढल्यामुळे कारखान्यांच्या मालकांना जसा फायदा होणार आहे त्याचप्रमाणे या देशातील नवीन रोजगार तयार करण्याची ताकदही वाढणार आहे.

शेतीमालाला उत्पादनखर्चाइतका म्हणजे रास्त भाव मिळावा या एक कलमी कार्यक्रमातील रहस्य म्हणजे या एका किल्लीने देशातील दारिद्र्याचा प्रश्न सुटू शकतो. ही किल्ली चालवली तर काय होईल?

(१) शेती उत्पादन वाढेल.

(२) गरिबातील गरीब घटकांपर्यंत नवीन उत्पन्नाचा फायदा वाढत्या मजुरीच्या रूपाने पोहोचेल.

(३) ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा निकालात निघेल.

(४) इंडिया-भारत दरी नाहीशी होईल.

(५) ग्रामीण भागात उद्योगधंदे निर्माण होऊन बेकारी हटेल.

(६) आजच्या औद्योगिक विकासाच्या अनर्थ[illegible] धोरणाचे दुष्परिणाम टळतील.

(७) ग्राहकांना आजपर्यंत न मिळालेली उपभोग्य वस्तूंची विविधता दिसेल.

(८) उद्योगधंद्यात तयार होणाऱ्या मालास बाजारपेठेत भरपूर मागणी मिळून त्यांचीही भरभराट होईल.

'गरिबी हटाओ'च्या घोषणा करीत शासन प्रत्यक्षात शेतीमालाचे शोषण करण्याचे धोरण अवलंबते आणि खरोखरी गरिबी वाढविण्याचे काम करते. इतर सर्व कार्यक्रम बाजूला ठेवून फक्त शेतीमालाला रास्त भाव मिळू न देण्याचे धोरण शासनाने रद्द केले तरी गरिबी हटेल. मला दिल्लीत पत्रकारांनी विचारले, 'शेतकरी संघटनेचा गरिबी हटवण्याचा एक कलमी कार्यक्रम आहे असे तुम्ही म्हणता म्हणजे गरिबी हटवण्यासाठी नेमके काय करायला पाहिजे?' तेव्हा मी उत्तर दिले, 'गरिबी हटवण्यासाठी काहीच करण्याची गरज नाही. फक्त गरिबी टिकावी व वाढावी म्हणून शासन जे पराकाष्ठेचे प्रयत्न करत आहे ते बंद केले की पुरे. गरिबी आपोआप हटणार आहे.'

✻✻✻✻



**प्रकरण : ७**

# 'भारता'तील वर्गविग्रह (?)

भारत आणि इंडिया ही संकल्पना समजावून घेताना ग्रामीण भागात जी मंडळी राहतात आणि शेतीव्यवसायावरच आपला उदरनिर्वाह करतात ती सर्व सारखीच आहेत, एकाच पायावर आहेत हे गृहीत धरले पाहिजे. वस्तुतः ग्रामीण भागामध्ये शेती व्यवसाय करणारी मंडळीसुद्धा वेगवेगळ्या प्रकारची आहेत. त्यात बडे बागायतदार आहेत, छोटे बागायतदार आहेत, मोठे शेतकरी आहेत, छोटे शेतकरी आहेत, अल्पभूधारक शेतमजूर आहेत तसेच भूमिहीन शेतमजूरही आहेत. या सगळ्यातला फरक लक्षात न घेता तुम्ही सर्व शेतकरी एक आहेत अशी जी मांडणी करता ती चूक आहे असा युक्तिवाद अनेक वेळा, विशेषतः डाव्या पक्षांकडून मांडला जातो. शेतकऱ्या-शेतकऱ्यांमध्ये फरक नाही असं म्हणत नाही. मोठे शेतकरी, लहान शेतकरी, अल्पभूधारक आणि भूमिहीन शेतमजूर यांच्यामध्ये निश्चित फरक आहे. त्याचप्रमाणे टाटा-बिर्लांपासून त्यांच्या कारखान्यातून, उद्योगधंद्यांतून काम करणारे कामगार किंवा जुनियर अधिकारी वगैरे यांच्यात काही फरक नाही असंही म्हणण्यात काही अर्थ नाही. दोन्ही समाजात- 'भारतीय' आणि 'इंडियन'- वेगवगळ्या पायऱ्या आहेत. आपण संघर्षासाठी जी रेषा ओढली आहे ती अशा ठिकाणी ओढली की जिथला फरक हा सगळ्यात महत्त्वाचा आहे; जिथं शोषणाची सगळ्यात मोठी यंत्रणा आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या वेळीसुद्धा आपण सगळ्या हिंदुस्थानला स्वातंत्र्य हवे असे म्हणत होतो. त्यावेळी केवळ राजकीय स्वातंत्र्य असं म्हणत नव्हतो. आम्हाला स्वराज्य आणि सुराज्य मिळायला पाहिजे या दोन्ही कल्पना होत्या. त्यावेळीसुद्धा या देशात श्रीमंत होते, गरीब होते, जातीचे भेद होते, धर्माचे भेद होते. त्यांचं महत्त्व आज कदाचित कमी झालं असेल. पण त्यावेळी हे भेद असतानासुद्धा 'त्यावेळची शोषणाची मुख्य रेषा ही इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्यातील आहे' या जाणिवेवरच ती चळवळ उभी राहिली. तो प्रश्न जोपर्यंत सुटत नव्हता तोपर्यंत देशातीले बाकीचे अंतर्विरोध सोडविणे कठीण होते. त्याकाळीही समाजकारण आधी की राजकारण आधी असे

वाद होऊन गेले, पण राजकारण आधी की अर्थकारण आधी असा मुद्दा जेव्हा उपस्थित झाला तेव्हा राजकीय प्रश्न- शोषणाची यंत्रणा संपल्याखेरीज अर्थकारणाला सुरुवात होऊच शकत नाही. सर्व जनता आपले अंतर्गत भेद विसरून स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाली, त्याच अर्थानं भारत आणि इंडिया यांच्यातला विरोध आज महत्त्वाचा आहे. तो सुटल्याखेरीज ग्रामीण भागातले आतले विरोध सुटू शकणार नाहीत. कारण ग्रामीण भागातील कमालीचं दारिद्र्य हे तेथील कुणालाच त्याच्या श्रमाचा पुरेपूर मोबदला मिळत नसल्यामुळे आहे. मोठे शेतकरी, छोटे शेतकरी, अल्पभूधारक व भूमिहीन शेतमजूर हे मार्क्सच्या भाषेत वेगळे वेगळे वर्गच नाहीत. हे वेगळे वेगळे वर्ग धरले तर त्यांच्यामध्ये संघर्ष होणे अपरिहार्य आहे हे मान्यच करायला पाहिजे. पण मुळात हे वेगवेगळे वर्गच नाहीत. आज मोठा शेतकरी, ज्याच्याकडे २० एकर जमीन आहे तो आणि ज्याच्याकडे दोनच एकर जमीन राहिली आहे तो किंवा ज्याच्याकडील संपूर्ण शेती गेली आहे आणि जो केवळ शेतमजुरीवरच जगतो आहे किंवा शहरात रोजगार शोधण्यासाठी निघून गेला आहे तो या केवळ ग्रामीण दारिद्र्याच्या वाढत्या पायऱ्या आहेत. ज्या शेतकऱ्याची वीस एकर जमीन आहे आणि त्याचं उत्पन्नाचं तेच एकमेव साधन असेल तर शेतीमधून फायदा होत नसल्यामुळे तो आपल्या २० एकर जमिनीची ४० एकर करून आपल्या दोन मुलांना वीस वीस एकर जमीन देईल याची शक्यताच राहत नाही. म्हणजे मग २० एकरवाल्या शेतकऱ्याची दोन मुलं असली तर ती दहा दहा एकरवाली होतात. त्यांची दोन-दोन मुलं पाच-पाच एकरवाली होतात. पुढील पिढी अगदी भूमिहीन- केवळ शेतमजूर बनते किंवा शहरात रोजगाराच्या शोधात जाते. प्रत्येकी दोन-दोन मुलांचंच गणित जरी आपण धरलं तरी चार पाच पिढ्यांत शेतकरी अधोगतीकडे जायला लागलेला दिसतो आणि याचं प्रत्यक्ष कारण म्हणजे कच्च्या शेतीमालाला न मिळणारा भाव हे आहे. वर आपण जे गणित मांडलं त्यावरून कुणी या अधोगतीला कारण वाढती लोकसंख्या आहे असे म्हणेल, पण प्रत्यक्षामध्ये यात लोकसंख्येचा प्रश्न नाही. लोकसंख्येमुळे दारिद्र्य वाढतंय ही कल्पना चुकीची आहे. सध्याच्या गतीनं लोकसंख्या वाढता कामा नये, ती कमी व्हायला पाहिजे हाही विचार केला पाहिजे. पण आपल्या प्रश्नामागील लोकसंख्या हा काही महत्त्वाचा मुद्दा नाही.

चाकणजवळ आम्ही बोरदरा नावाच्या गावाचा अभ्यास केला. या गावात



जवळजवळ सगळीच कुटुंबं पडवळ नावाची. तशी दोन चार नावं वेगळी आहेत. तीन पिढ्यांपूर्वी पडवळांची शेती ३०० एकरांची होती. पहिल्या पडवळांना १० मुलगे आणि २ मुली होत्या. त्या काळी मुलीलासुद्धा लग्नाच्या वेळी चोळीखणासाठी जमीन तोडून द्यायची, अशी पद्धत होती. (आज ती बंद आहे.) पहिल्या पिढीतील त्या दोन मुलींना जमीन तोडून दिल्यानंतर उरलेली जमीन १० मुलांच्यात राहिली. प्रत्येक पिढीमध्ये वाटप होऊन प्रत्येकाकडील जमीन कमी होत गेली. पडवळांच्या जमिनीपैकी काही बागायती म्हणजे जिच्यात सप्टेंबरपर्यंत पाणी राहते अशी- जिच्यात कांद्यासारख नगदी पीक घेता येत अशी, तर उरलेली वरजिराईत आहे. प्रत्येक वाटपाच्या वेळी जिराईत जमिनीचं वाटप वेगळं आणि बागायती जमिनीचं वेगळं होतं. त्यामुळे सध्या पडवळांची परिस्थिती अशी आहे की एक पडवळ सांगतो, 'माझी विहिरीखाली तीन पाभारे जमीन आहे.' ज्या पडवळाची जमीन ३०० एकर होती त्याचाच नातू आज माझी बागायती जमीन तीन पाभारे आहे म्हणून सांगतो. याच्यात वर्गविग्रह कुठे आला? एका घराण्यात वर्गविग्रह असत नाही असं नाही. एका घराण्यातही वेगळे वेगळे वर्ग असतात, पण शेतकऱ्यांच्यात दिसून येणारे हे जे भेद आहेत ते त्याच्या अधोगतीचे वेगवेगळे टप्पे आहेत, वेगळ्या वेगळ्या पायऱ्या आहेत. एका दृष्टीनं शेतमालक शेतकरी हा सुपातला तर शेतमजूर-भूमिहीन-हा जात्यातला एवढाच फरक आहे.

शेतीव्यवसायावर अवलंबून असणाऱ्या शेतकरी आणि शेतमजूर या घटकांमध्ये फरक आहे, मग दुसरा मुद्दा उपस्थित होतो की शेतकऱ्याला शेतमालाच्या भावामध्ये जर फायदा मिळू लागला तर तो शेतमजुरापर्यंत पोहोचल का? माझ्या अनुभवाप्रमाणे शेतकऱ्याला झालेला फायदा शेतमजुरापर्यंत निश्चित पोहोचेल. चाकण भागामध्ये शेतमजुरीचे दर गेल्या चार वर्षांमध्ये शेतीमालाच्या भावापेक्षा जास्त प्रमाणात वाढले आहेत. १९७७ साली किमान वेतन कायदा झालेला नव्हता तेव्हा कांद्याच्या शेतीत स्त्रीला अडीच रुपये आणि पुरुषाला तीन रुपये मजुरी प्रत्यक्षात दिली जात होती. हे दर लक्षात घेऊन आम्ही उत्पादन खर्च काढला आणि त्याप्रमाणे भाव मिळण्यासाठी आंदोलन केले. त्यामुळे त्या वर्षी कांद्याला ४५ रु. ते ६० रु. चा भाव क्विंटलला मिळू लागला. लगेच स्त्रियांची मजुरी ३ रु. व पुरुषाची ४ रु. झाली. १९८० साली कांद्याची रोपे एक एक काढण्यासाठी मजुरीचा दर रु. ५ हिशेबात धरला गेला. पण तेव्हाही कांद्याला ४५ ते ६० रु. असाच भाव मिळाला.

म्हणजे कांद्याच्या भावात काहीही फरक झाला नाही तरीसुद्धा मजुरीचे दर वाढलेलेच राहिले. अर्थात चाकण भाग पुणे-मुंबईच्या जवळ असल्यामुळे तेथील वाढत्या उद्योगधंद्यांवर रोजगार मिळविण्यासाठी तेथील लोक जाऊ शकतात. त्यामुळे मजुरीच्या दरवाढीचा फायदा शेतमजुरांपर्यंत इतर भागांपेक्षा जास्त गतीने जातो. पण कुठेही तो गेल्याशिवाय राहणार नाही. जात नसेल तर जायला पाहिजे. कारण आपण हा जो सर्व विचार करीत आहोत तो काही केवळ शेतकऱ्यांचं भलं व्हावं म्हणून नव्हे तर या देशाचं दारिद्र्य दूर कसं करता येईल यासाठी करीत आहोत. म्हणून तर आपण आपल्या चर्चेची सुरुवात 'दारिद्र्या'पासून केली. मग जर शेतीमालाच्या भावातील फायदा शेतमजुरापर्यंत पोहोचणार नसेल आणि पोहोचायला पाहिजेच असेल तर काय करता येईल? आजच्या परिस्थितीमध्ये केवळ शेतमजुरांचा प्रश्न उभा करायला गेलात तर संघटना उभी राहणार नाही. गावोगाव निव्वळ डोकी फुटतील आणि शेतमजुरांनाही या डोकेफुटीतून काही मिळण्याची शक्यता नाही. कारण शेतकऱ्याला मुळातच तोटा होत असल्यामुळे तो शेतमजुराला किती देणार याला मर्यादा आहेत. याचा अर्थ मी असं म्हणत नाही की शेतकऱ्याला शेतमजुराला जितकं देता येणं शक्य आहे तितकं तो देत आहे. शेतकरी आणि शेतमजूर दोघे मिळून दोन भाकऱ्यांचे कष्ट करतात पण त्याला दोन ऐवजी एकच भाकरी मिळत आहे. मग ती अर्धी अर्धी वाटप न होता साहजिकच शेतकरी आपल्याकडे पाऊण ठेवून शेतमजुराला चतकोरवरच भागविण्याचा प्रयत्न करतो. या पाऊणाचा किंवा चतकोराचा अर्धा करण्यावरून जर वादविवाद वाढवला तर रोगाचं मूळ बी जे आहे- दोघांचं मुळात होणारं शोषण- ते बाजूला राहील आणि हा वाद मिटू शकणार नाही. आज आपल्याला पहिला लढा हा या शोषणाच्या पातळीवरच दिला पाहिजे. त्याच्यानंतर जर का मजुरी वाढत नाही असं दिसलं तर आपल्याला शेतमजुरांसोबत शेतकऱ्यांच्या विरुद्ध लढा द्यावा लागेल. पण जोपर्यंत शेतीत तोटाच असल्यामुळे अधिक मजुरी देणे शेतकऱ्याला परवडत नाही तोपर्यंत हा वाद निर्माण करून चालणार नाही.

एखादा कारखानदार जर म्हणू लागला की 'धंद्यात मला फायदा होत नाही तर मी मजुरी-पगार कसे काय वाढवून देऊ? तुम्ही का मागण्या करता? तुम्ही का संप करता? अशावेळी कामगार म्हणतील, 'तुझा कारखान्यात फायदा होत नसेल तर तू निघून जा. नाहीतर जे काही किमान वेतन आहे ते तू दिलेच पाहिजे.' मग



कुणी म्हणतील की शेतकऱ्याच्या बाबतीतही शेतमजुरानं असं का म्हणू नये की, 'तुला जर २० रु. मजुरी देणं परवडत नसेल तर शेती विकून टाक आणि निघून जा.' असं म्हणू नये कारण व्यापाराच्या बाबतीत त्याला तोटा व्हावा असं सरकारी धोरण नाही. उलट शेतकऱ्याच्या बाबत तसं धोरण आहे. शेतकरी अकार्यक्षम आहे, आळशी आहे, मूर्ख आहे म्हणून काही त्याला तोटा होत नाही. अकार्यक्षम, आळशी, मूर्ख शेतकरी काही असतील पण सर्वच्या सर्व शेतकऱ्यांना तोटा होतो याला कारण तसं सरकारी धोरण आहे, हेच आहे. सरकारची जी एक विशिष्ट आर्थिक पद्धती आहे त्यामुळेच हा तोटा होतो. शेतीमालाला रास्त भाव मिळूनही जर शेतकरी म्हणू लागला की मी जास्त मजुरी देणार नाही, मला परवडत नाही तर मग त्याला म्हणता येईल की, 'तू नालायक आहेस. तुला जर परवडत नसेल तर तू विकून टाक. शेतमजुराला योग्य ती मजुरी मिळायलाच हवी. नाहीतर तुझ्याकडे कोणीच कामाला येणार नाही-' पण आज मात्र हा युक्तिवाद, जो आपण कारखानदाराबाबत वापरू शकतो तो शेतकऱ्याच्या बाबतीत वापरता येणार नाही.

आतापर्यंत (१) ग्रामीण भागात शेती करणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारात वर्गभेद आहे की नाही? (२) आज आपला लढा दुसऱ्या कोणत्या पातळीवरून-विरोधाच्या रेषेवरून लढविल्यास ते परिणामकारक होईल का? आणि (३) शेतीमालाला रास्त भाव मिळाल्यानंतर तो फायदा शेतमजुरापर्यंत पोहोचणार आहे का? आणि न पोहोचल्यास त्यावर उपाययोजना काय? या मुद्द्यांवर प्राथमिक विवेचन झाले. त्या अनुषंगाने 'शेतकरी आणि शेतमजूर' यांच्यातील संबंधांबद्दल विचार करता येईल.

अनुभव असा आहे की, मजुरीचे दर हे शेतीमालाच्या भावापेक्षा अधिक प्रमाणात वाढत आहेत. आठ वर्षांपूर्वी विहीर खोदण्याच्या कामावर मजुरीचा दर २ रु. होता तो आता ८ रु. झाला आहे. ज्या विहिरीसाठी मजुरीवर ३००० रु. खर्च येत होता त्याच आकारमानाच्या विहिरीला आज १०,००० रु. मजुरी द्यावी लागते. म्हणजे मजुरीचे दर तिप्पटीने तरी वाढले आहेत; परंतु शेतमालाचे भावमात्र दुपटीनेसुद्धा वाढलेले नाहीत. शेतमजुरीचे दर वाढत आहेत त्यामागे शेतमजुरांची संघटना हे काही प्रभावी कारण नाही. त्याला कारण आहे शहरी भागातली वाढती कारखानदारी. उदाहरणार्थ, चाकण परिसराजवळ कारखानदारी आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक रोजगारीसाठी शहरात जातात आणि परिणामत: ग्रामीण भागात मजुरांचा तुटवडा भासू लागतो. भुईमूग तोडण्याच्या वेळी जर मजूर मिळणे

कठीण होऊ लागले तर मग माल खराब होऊ नये म्हणून शेतकरी मजुराला तो जे काही मागेल- ४ रु./५ रु.- तितकी मजुरी देऊन काम करून घेतो. पंजाबचे उदाहरण घ्या. हरितक्रांतीमुळे तेथील शेतीउत्पादन वाढले पण मजुरीचे दर त्या प्रमाणात वाढले नाहीत. कारण हरितक्रांतीनंतर पंजाबी शेतमजूर असा राहिलाच नाही. आपल्याला आकडेवारीवरून हे सिद्ध करता येईल. पंजाबमधला शेतावर काम करणारा असा शेतमजूर तिथे राहिलाच नाही त्यामुळे पंजाबमध्ये बिहारचा मजूर येऊन काम करू लागला. बिहारी मजूर काम मिळतं म्हणून हजारोंच्या संख्येनं पंजाबमध्ये येऊ लागले. त्यामुळे साहजिकच ज्या प्रमाणात शेतीउत्पादन वाढलं त्या प्रमाणात शेतमजुरीचे दर वाढले नाहीत. उलट इथे बीड भागात शेतमजुरी चाकण भागाप्रमाणेच वाढत्या दराने आहे. कारण येथील मजूर ऊस कापणीच्या हंगामात उसाच्या प्रदेशात निघून जातात, शेंगांच्या हंगामात चाकण वगैरे भागात जातात किंवा दुसरीकडे जिथे जिथे जाण्याची शक्यता निर्माण होते तिथे तिथे निघून जातात. त्यामुळे इथे मजुरीचा दर शेतमालाच्या भावापेक्षा जास्तच प्रमाणात वाढत जाईल.

शेतमजूर कामामध्ये आळस करतात तर मग शेतकऱ्याने त्याला जास्त मजुरी काय म्हणून द्यावी? असा प्रश्नही पुढे येण्याची शक्यता आहे. पण मजूर कामामध्ये आळस करतो म्हणून त्याला जास्त मजुरी काय म्हणून द्यावी असं म्हणणं चूक आहे. एखादा मनुष्य काम करतो तेव्हा आपण काय पाहतो? घरचा मनुष्य आपल्या शेतावर अत्यंत कळकळीने काम करतो, तसं मजूर काम करीत नाही. याला आपण मजुराचा आळशीपणा म्हणतो. आपल्या घरची माणसं आपल्या शेतावर काम न करता दुसऱ्याच्या शेतावर करायला गेली तर तो तेच म्हणतो ना? की ही माणसं काय कामाची नाहीत! यातला अन्वयार्थ आपण लक्षात घेतला पाहिजे. मनुष्याच्या कामातील ताकद व उत्साह हा त्याला त्यातून काय मिळणार आहे यावर अवलंबून असतात. जोपर्यंत शेतावर काम करणाऱ्या मजुराला आजच्या परिस्थितीमध्ये तुटपुंज्या मजुरीवर वर्षातून जेमतेम तीन ते चार महिने रोजगार मिळतो आणि सालकरी नसला तर उरलेल्या आठ महिन्यांसाठी त्याला कसल्याही रोजगाराची शाश्वती नसते तोपर्यंत त्याच्याकडून फार कळकळीच्या आणि उत्साहाच्या कामाची अपेक्षा करणं चूक आहे. मी माझ्या शेतावर किमान वेतन कायद्याप्रमाणे मजुरी देतो. त्यांचं काम बघून (शंकरराव वाघांसारखे) लोक मला म्हणतात की



'काय तुमच्या शेतावर लोक काम करतात? अगदी एखाद्या 'कंपनी'त असल्यासारखे काम करतात.' त्यांच्या मते ते तरीसुद्धा आळस करतात, तरीही ते जे काम करतात ते पाहिलं तर आपण जो त्यांना पगार म्हणून देतो त्याची मला लाज वाटते. शेतकऱ्यांनी या प्रश्नाबाबतीत असाच विचार करायला हवा यात काही शंका नाही. आपल्याला मजुरी देणं परवडत नाही ही गोष्ट वेगळी- पण मजुरावर आळशीपणाचा दोष ठेवताना आपण शहरांमधे लोकांना काहीही काम न करता वीस वीस, तीस तीस रुपये मजुरी मिळते हे लक्षात घेत नाही आणि ही गोष्ट जर आपण लक्षात घेत नसू तर आपल्या विरोधी बाजूला जे हवं आहे तेच होणार आहे- शेतकरी आणि शेतमजूर यांच्यातले वाद वाढत राहणार आहेत.

रोजगार हमी योजनेमुळे मजुरीचे दर वाढले आहेत याचा अर्थ एवढाच की जेव्हा जेव्हा रोजगाराची दुसरी संधी निर्माण होते मग ती कारखान्यामुळे असो, उस-तोडणीमुळे असो की रोजगार हमी योजनेमुळे असो, मजुरीचे दर हे वाढणारच.

शेतीमालाच्या भावाचा प्रश्न समाधानकारकपणे सोडवला गेला नसताना किंवा असे भाव दिले जाऊ नयेत असे धोरण शासनाने आखलेल असताना शेतमजुरीच्या प्रश्नाला उत्तेजन देणं हा एक राजकीय डाव आहे आणि त्याला आमच्यातली डावी मंडळी बळी पडतात. रशियामधला जो वाद सांगितला- लेनिनचं शेतीविषयक धोरण, स्टालिनचं शेतीविषयक धोरण त्यासंबंधी तेथील अर्थशास्त्रज्ञांनी ( प्रीब्राझेन्स्की वगैरे) केलेल्या लिखाणामध्ये असं उघड उघड म्हटलं आहे की, 'उद्योगधंद्याच्या वाढीकरता जर जास्तीत जास्त प्रमाणात शेतीमधील भांडवलसंचय उपलब्ध करून घ्यायचा म्हटलं तर त्यातल्या त्यात जो मधला शेतकरी आहे- 'कुलक' म्हणजे मोठा शेतकरी आहे तो त्याला विरोध करणार आहे. कारण त्याला स्वत:चा व्यवसाय म्हणून शेती चालवायची आहे आणि त्याच्या व्यवसायाच्या रूपाने जर आपण माल खरेदी केला तर ते आपल्याला कधीही परवडणार नाही. तेव्हा हा वर्ग संबंध दडपून टाकावा.' म्हणूनच सैन्य पाठवून त्या लोकांना खलास करण्यात आलं. बाकीच्या सगळ्या मजुरांना एकत्र घेऊन तिथं सहकारी शेती-सरकारी शेती सुरू करण्यात आली. शेतमजूर हा डाव्या आघाडीचा आणि शेतकरी मागासलेल्या, सरंजामशाहीचा, बुरसटलेला ही जी डाव्यांमधली, विशेषत: रशियामधली विचारसरणी मांडली गेली ती त्यावेळची जी परिस्थिती होती ती आणि त्यांना जे साधायचं होतं ते लक्षात घेऊन मांडलेली

आहे. तिथला विचार, तिथली वाक्य हिंदुस्थानातल्या परिस्थितीत लागू करणं हे अगदी चुकीचं आहे. ही निव्वळ पोथीनिष्ठा आहे, पुस्तकीपणा आहे. समाजवाद्यांच्यासुद्धा एकामागोमाग ज्या काही बैठका झाल्या-(International) त्यातील तिसरी (Third International) या विषयावर जास्त महत्त्वाची आहे. प्रत्येक देशातल्या कम्युनिस्ट पुढाऱ्याने आपल्या देशातील शेतीची संस्कृती ही मार्क्सवादाशी कशी अपवादात्मक आहे ते सांगितले. शेतीची संघटना हा पहिल्यापासून मार्क्सवादाचा विषय नव्हताच. त्यामुळे रशियामध्ये प्रत्यक्ष कामगारांच्या चळवळीला यश येऊन त्यांच्या हाती राज्य आलं. तेव्हा मग त्यांच्यापुढे प्रश्न पडला की आता शेतीचं काय करायचं? आणि मग जे काही त्या वेळेला जमेलसं वाटलं ते त्यांनी केलं; परंतु त्याबद्दलची पोथीनिष्ठता बाळगणे चूक आहे.

आणि ती जर बाळगायची असेल तर संपूर्ण पोथीनिष्ठता तरी बाळगावी. लेनिननं 'कुलक'ची व्याख्या कशी केली आहे? ज्याच्याकडे निदान २० एकर जमीन आहे तो कुलक. रशियामध्ये सतत थंडी आणि बर्फ असल्यामुळे तिथे बिगरपाण्याची जमीन अशी काही गोष्टच अस्तित्वात नाही. आपल्याकडे २० एकर बागायती जमीन असलेला शेतकरी म्हणजे कुलक हे मी मानायला तयार आहे. आहेत का आपल्याकडे असे शेतकरी? वस्तुत: आपल्याकडे असा काही मोठा शेतकऱ्यांचा वर्ग आहे ही कल्पनाच चूक आहे. बिहारमधल्या परिस्थितीविषयी मी बोलत नाही. मी आज महाराष्ट्रातल्या परिस्थितीविषयीच बोलतो आहे. आपल्याकडे १८ एकर बागायती जमीन असलेल्या मोठा शेतकरी समजले जाते. त्याचा उल्लेख बरेच लोक आपल्या भाषणांतून टाटा-बिर्ला-बडा बागायतदार असा करतात. कुणी खोटी जमीन लपवली आहे, कुणी कुत्र्यामांजरांच्या नावावर जमिनी केलेल्या आहेत. अशी किती उदाहरणे आहेत? मला तरी तसं उदाहरण माहीत नाही. पण जर समजा वेगवेगळ्या भावांच्या नावांनी जमिनी वाटून दिल्या असतील तर त्यात काही अयोग्य आहे असे म्हणता येणार नाही. समजा सगळ्या भावांचा मिळून एक मोठा कारखाना आहे तर आपण त्या मालकीबद्दल काही हरकत घेत नाही. त्याप्रमाणे वेगवेगळ्या (भावांच्या कुटुंबीयांच्या) वाट्याची जमीन एकाच्याच नावाच्या खात्यावर असेल तर त्यावर आक्षेप असण्याचं काही कारण नाही. शहरात एखादा अधिकारी मनुष्य असतो. तो, त्याची बायको आणि दोन मुलं यांच्या उपजीविकेसाठी त्याची एक नोकरी असते. त्याचप्रमाणे इकडे शेतकरी, त्याची बायको आणि दोन



तीन मुले अशा कुटुंबाची १८ एकराची एक शेती असते. ही सगळीच्या सगळी जमीन कालव्याच्या पाण्याची आहे असं गृहीत धरलं तर तिथं तो काय पिकवतो? द्राक्षं, ऊस अशी नगदी पिकं तो घेऊ शकतो. आपण उसाचे हिशेब पाहिले आहेत तेव्हा तो १८ एकरात ऊस घेतो असं समजू. उसामध्ये खऱ्या अर्थाने फायदा होत नाही हे आपण पाहिलं आहे. पण काहीजणांचं म्हणणं आहे की उसाला एकरी ३००० रु. फायदा होतो. वादासाठी हे खरं आहे असं जर धरून चाललं तर १८ एकरवाल्या शेतकऱ्याला आडसाली उसाला (अठरा त्रिक) चोपन्न हजार रुपये फायदा होणार. म्हणजे महिन्याला ३००० रु. झाले. आज ३००० रु. हा शहरामधल्या ज्युनिअर एक्झिक्युटिव्हचा पगार आहे- LIC मधील कारकुनाला १२ वर्षांनी मिळणारा पगार आहे. तेव्हा डाव्या पद्धतीने बोलताना केवळ जिभेची सवय म्हणून टाटा-बिर्ला-बडे बागायतदार असं बोलण हे त्यांच्या तत्त्वज्ञानाशी जुळणारं असेल कदाचित पण प्रत्यक्ष जमिनीवर व्यवहार होतो त्याच्याशी जुळणारं नाही. ज्याला फक्त ४५ रु. महिना मिळतात त्याच्यात आणि ३००० रु. मिळणारात फरक आहे. पण ३००० रु. मिळविणारा आणि आठ वर्षांत ६०० कोटींचे १४०० कोटी करणारा यांच्यातही फरक आहेच की. तेव्हा मधल्या शेतकऱ्याविरुद्ध आघाडी उघडून डावी मंडळीसुद्धा उद्योगधंदेवाल्यांचीच कास धरतात. अशोक मित्रांनी आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे, 'शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळून राहिले आहेत त्यामुळे कारखानदाराची फार पीछेहाट होत आहे.' हे विचार कम्युनिस्ट राज्यातला अर्थमंत्री मांडतो. त्यांनी आपले हे विचार या पुस्तकात फार तपशिलाने मांडले आहेत. त्यांचं म्हणणं आहे, 'मधले शेतकरी अजिबात काढून टाकले पाहिजेत तरच स्वस्ताई येईल. त्यांना काढून टाकल्यानंतर बाकीचे जे राहतील त्यांना घेऊन सहकारी, सरकारी पद्धतीची शेती चालू करावी.' म्हणजे मग कच्चा माल आपल्याला स्वस्तात स्वस्त मिळेल अशी त्यांची कल्पना. रशियात जे वाटोळं झालं तेच इथं होईल वगैरे बाब ते लक्षातच घेत नाहीत. आमच्या चाकण भागातले अगदी ९९% शेतकरी अर्जावर सही करून द्यायला तयार आहोत की, 'आमची जमीन सहकारी करा, सरकारी करा. आम्हाला सरकारी स्केलप्रमाणे पगार द्या. आम्ही अगदी प्रामाणिकपणे कामं करु.'

दुसरा रोजगार मिळण्याची शक्यता झाली म्हणून मजुरीचे दर वाढले ही गोष्ट एका अर्थी खरी आहे. कामगारांची संघटना झाल्यामुळे त्यांनी पगार वाढवून

मागितला हे काही खरं नाही. काही वेळा असं होतं की रोजगारासाठी निरोप पाठवला तर उलट निरोप येतो की यावेळी शेंगा वेचायला ४ रु. मजुरी मिळाली तरच आम्ही येणार. आमच्या भागात ठाकर वगैरे आदिवासी जमातीतले जे लोक मजुरी करायला येतात ते सगळे एका 'तोडी'ने वागणारे असतात. त्यांच्याकडूनही असा निरोप येतो. पण ती जी युती किंवा संघटना आहे ती आधुनिक पद्धतीची- 'युनियन' पद्धतीची युती नाही. आपल्याला परवडत नाही ३ रुपयात तर कशाला जायचं दिवसभर राबायला उन्हात? ही त्यांच्या निरोपामागील भूमिका असते. मग तो मजूर चारपाच रुपये मिळाले तर यायला लागतो. शेतकरी वाढीव मजुरी देतो तेव्हा तो त्याचं नुकसान न होता देतो ही कल्पना मात्र बरोबर नाही. कारण आपण पाहिलं आहे की, उत्पादनखर्च भरून न मिळाल्यामुळे शेतकऱ्याचं जे नुकसान होतं ते झाकलेलं नुकसान आहे. तो भांडवल खाऊन नुकसान सोसतो. अंगात मुरलेल्या तापाप्रमाणे त्याचा परिणाम पुढे कधीना कधी दिसायचा असतो. लगेच दिसत नाही. कारखान्यामध्ये सगळे व्यवहार पैशात असल्यामुळे तिथे एका वर्षात तोटा झाला तर त्याच वर्षात ताळेबंदात तो दिसून येतो. तसा शेतीमधे दिसून येत नाही. मात्र त्या शेतीची प्रत कमी होत जाते, उत्पन्न कमी होत जातं. गोठ्यासारखं एखादं बांधकाम पडलं तर नवीन बांधता येत नाही. गेल्या वर्षी बटाट्याचं पीक काढलं असलं तर बिणाचा खर्चसुद्धा न परवडल्यामुळे शेतकरी भुईमूगावर जातो, भुईमूगही परवडेनासा झाला ती शाळूवर जातो. अशा तऱ्हेनं शेतकरी एक एक पायरी उतरत उतरत जातो.

आणि आज भुईमुगाच्या कामाला शेतमजूर चारऐवजी पाच रुपये मजुरी मागायला लागले तर देणं भाग असतं. कारण भुईमूग खलास झालेला पाहवत नाही. त्याच्या उलटी एक स्थिति होते- शेतमालाच्या कमी भावामुळे होते, वाढीव मजुरीमुळे झाल्याची ऐकिवात नाही. ७७ साली कांद्याचे भाव इतके कमी झाले की लोकांनी शेतातून कांदा काढलाच नाही. शेतं तशीच नांगरून टाकली. पण भुईमूग शेतातनं काढायचाच नाही असं घडल्याचं मात्र ऐकिवात नाही.

जेव्हा शेतकरी वाढीव मजुरी देत नाही असे म्हणतो तेव्हा त्याच्यावर दडपण येऊन मजुरी द्यावी लागते. मग त्याची जी अधोगती होत असते तिची गती वाढत जाते हे त्याच्या लक्षातच येत नाही. एकीकडे शेतकऱ्याची अधोगती होत राहते तर शेतमजुराची मजुरी वाढत राहते. या दृष्टीने पाहता आज मजुराची स्थिति शेतकऱ्यापेक्षा



बरी आहे. मजुराला शेतमजुरीशिवाय दुसरीकडे काहीतरी रोजगाराची शक्यता निर्माण होत आहेत. शेतकऱ्याला मात्र दुसरी कसलीच शक्यता निर्माण होत नाही.

आजपर्यंत शेतीमालाचे भाव खऱ्या अर्थाने वाढलेच नाहीत. रुपयाची किंमत जितक्या प्रमाणात कमी झाली तितक्यासुद्धा प्रमाणात वाढले नाहीत. मग प्रत्यक्षात भाव वाढले तर काय होईल? तो फायदा मजुरांपर्यंत पोहोचेल की नाही? आजपर्यंत मजुरीचे दर सर्वसाधारणपणे वाढत आले आहेत. त्याला पर्यायी रोजगार हे एक कारण आहे हे मान्य. पण तुम्ही उसाचे आंदोलन घ्या. आंदोलनामुळे आता उसाचे भाव वाढल्याचे जाहीर झाले आहे पण अजून शेतकऱ्याच्या हातात पैसे यायचे आहेत. तरीसुद्धा नाशिकला उसाच्या कामावरचा रोजगार ९ रु. झाला आहे. आम्ही सटाण्याच्या मेळाव्यात नुसतं जाहीर केलं की, 'किमान भाव अजून हातात येऊ लागला नसला तरीसुद्धा अधिक मजुरी द्यायला लागा.' लोकांनी टाळ्यांच्या कडकडाटात संमती जाहीर केली. शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष सांगेपर्यंत आम्हाला कळलेही नव्हते की, 'आम्ही मजुरीचे दर पाचऐवजी सात द्या' असे जाहीर केले होते तरी प्रत्यक्षात शेतकरी नऊ रुपये देऊ लागला आहे.

शेतीमालाचे भाव वाढल्यावर मजुरीचे दर वाढतात ते काही शेतकरी केवळ उदार मनाचा असतो म्हणून नव्हे हे उघड आहे. भाव वाढल्यावर उत्पादन वाढते, रोजगार वाढतो. म्हणून मग मजुरी वाढवून देणे भाग पडते आणि परवडते.

शेतीवर काम करणाऱ्या स्त्री आणि पुरुष मजुरांच्या मजुरीच्या दरात आपल्याला फरक आढळून येतो. स्त्रीला पुरुषापेक्षा कमी मजुरी दिली जाते. खरंतर कायद्याप्रमाणे स्त्री आणि पुरुष दोघांनाही सारखे वेतन मिळायला पाहिजे हा आज आंतरराष्ट्रीय नियम आहे आणि हिंदुस्थानने या आंतरराष्ट्रीय करारात भाग घेतलेला आहे. तेव्हा कायद्याच्या दृष्टीने त्यात काहीही फरक नाही. पण आपल्या भागात स्त्रियांच्या मजुरीचे दर कमी आहेत आणि त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे बहुतेक भागात घरगुती कामांमुळे स्त्रियांचं काम पाच तासांच्या वर होत नाही आणि पुरुषांचं काम कायद्यानं सांगितलेल्या तासांप्रमाणे होत. किमान वेतन कायद्यामध्ये तो अमलात आणताना जर कामाचे तास कमी होत असतील तर त्या प्रमाणात मजुरी कमी करण्याची तरतूद आहे. तेव्हा कमी तास काम करणाऱ्या स्त्रियांची मजुरी किमान वेतन कायद्याच्या वेतनाच्या एक तृतीयांशाने कमी धरता येते. आपल्याकडे परंपरेने स्त्रिया व पुरुष यांच्या मजुरीचे दर कमी धरले आहेत ते कामांच्या स्वरूपातील

फरकांविषयी वस्तुस्थिती लक्षात घेऊन ठरवले असणार अशी माझी कल्पना आहे. तसं शेतातल्या कामांमध्ये फरक करायचा झाला तर औताची कामे, खड्डे खणणे किंवा दगडाची कामे करणे अशा प्रकारची कामे करणारे पुरुष मजूर आणि खुरपणी, निंदणी किंवा पाणी देणे अशा प्रकारची कामे करणारे मजूर यांच्यातसुद्धा फरक करावाच लागेल आणि असाही फरक आपल्याकडे केला जातो. औताच्या मजुरांना, त्यातूनही पेरणी करणाऱ्या मजुरांना अधिक मजुरी दिली जाते.

किमान वेतन कायद्यानं किमान वेतन कोणत्या पातळीवरचं ठरवून दिलं आहे? स्त्रियांच्या पातळीवरचं की पुरुषांच्या पातळीवरचं? स्त्रियांना विशेषत: ज्या प्रकारची कामं आपण देतो ती वेगळ्या प्रकारची असतात, त्या ते चांगलं करतात, बारकाईनं करतात असं धरायचं आणि त्यांचा मजुरीचा दर तोच आहे असं धरायचं. त्यामुळे आता होतंय त्यापेक्षा आपलं जास्त वाईट काही होणार नाही. आपण जर कायम पगारी नोकर ठेवू लागलो तर कारखान्यांत स्त्रियांना जशी बाळंतपणाची रजा द्यावी लागते तशी भरपगारी रजा द्यावी लागेल. मग केवढा भुर्दंड बसेल पाहा. पण एकदा कामगारांना कशा पद्धतीने वागवायचे याचे नियम ठरले तर त्यात आपण हरकत घेण्याचे कारण नाही. त्यामुळे आपल्याला जो काही खर्च येईल तो आपल्या उत्पादनाच्या किमतीतून भरून निघाला म्हणजे प्रश्न सुटला. आज मालक-मजूर संबंध कसे आहेत? शेतमालाला रास्त भाव मिळाले तर शेतकरी शेतमजुराला त्याचा योग्य हिस्सा देईल या विचाराचं 'बीज' या संबंधात आहे काय? असा एक प्रश्न नेहमी विचारला जात असतो. इतकेच काय या प्रश्नाचे केंद्र करून काही राजकीय पक्ष एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात सतत असलेले दिसतात.

मी भाषणात नेहमी सांगत असतो की शेतमजूर आणि शेतमालक यांचे संबंध अजूनही घरोब्याचे आहेत आणि बहुतेक शेतमालक आणि शेतमजूर दुपारची भाकरी बांधावर एकत्र बसून खातात. त्यावर मी भाषणात एक वाक्य नेहमी वापरतो की 'शहरातली जी मंडळी आपल्या मोलकरणीला फुटक्या कानाच्या कपातून, जिन्याखाली जाऊन चहा प्यायला लावतात त्या मंडळींनी हा वाद वाढवू नये.' हे नुसतं भाषणापुरतं वाक्य नाही. त्याच्या मागे खोल विचार आहे. अशा प्रकारची वाक्यं किंवा वेगवेगळ्या अनुभवाच्या गोष्टी मी भाषणात मुद्दाम आणतो कारण हीच वाक्यं आणि गोष्टी उद्या गावोगाव प्रचाराची साधनं म्हणून फिरणार



आहेत. आपण आधी ज्यांची चर्चा केली ती अर्थशास्त्रीय वाक्यं ही तितक्या प्रभावीपणे खेडेगावात फिरणार नाहीत.

मालक म्हणून नुसता बांधावर उभा राहणारा आणि मालक असून बायको-पोरांसह शेतमजुरांबरोबर शेतात राबणारा अशा प्रकारचे शेतकरी किती किती प्रमाणात आहेत? याचा नीट अभ्यास केला तर आपल्या असं लक्षात येईल की निदान ९५% शेतकरी हा आपल्या कुटंबासह मजुरांबरोबर शेतात राबत असतो. परिस्थिती आणि स्थळकालानुरूप या प्रमाणात फरक झाला तरी हे प्रमाण फारसं कमी असणार नाही. हा जो शेतकरी आहे त्याचे शेतमजुरांबरोबरचे संबंध घरोब्याचे आहेत. अजिबात काम न करता बांधावर उभा राहणारा शेतकरी अल्प प्रमाणात आहे. मी, उदाहरणार्थ त्या प्रकारचा शेतकरी आहे. मी फक्त प्रयोग करण्याकरता शिकून घेण्याइतपतच शेतीत काम केले आहे. पण मग त्यामागील अर्थशास्त्र विचारात घेता मी ही कामं आता करीत नाही. मालक-मजूर यांच्यातील संबंध हे शेवटी त्या त्या माणसांवर लहानपणापासून झालेल्या संस्कारांमुळे त्यांचा जो स्वभाव बनलेला असतो त्यावर अवलंबून असेल असं नुसतं म्हणून सोडून देऊन चालणार नाही.

आपण अर्थशास्त्रीय विचार करताना पहिल्यांदा एक गोष्ट गृहीत धरायची आहे की प्रत्येक गोष्टीचं कारण हे आर्थिक असतं. अर्थकारणानं स्वभाव ठरतात, स्वभावानं अर्थकारण ठरत नाही. अगदी पुण्यामध्ये ब्राह्मण घरात जन्मलेले आणि लहानपणी स्नानसंध्या केलेले लोक अमेरिकेत गेल्यावर पहिल्याच आठवड्यात गोमांस भक्षण कसे करू लागतात हे मी पाहिलेलं आहे. ज्यांच्या आयुष्यात कधीही काही विशेष घडलेलं नाही तेही कसे बदलतात हेही पाहिलेलं आहे. याला कारण त्यांचं अर्थकारण बदललेलं असतं तेव्हा स्वभाव जो आहे तो अर्थकारण बदलल्याने बदलतो, स्वभावाने अर्थकारण बदलत नाही. अमुक एका माणसाचा स्वभाव असा का आहे हे समजून घ्यायचे असेल तर त्याचा स्वभाव तसा असण्याने/नसण्याने त्याचा फायदा/तोटा काय आहे हे समजून घ्यावे लागेल. एका काळी ब्राह्मणांनी किंवा उच्चवर्णियांनी हरिजनांना जे तुच्छतेनं वागवलं त्याचं कारण म्हणजे तसं वागवण्यात उच्चवर्णियांचा आर्थिक फायदा होता. मी तर असं म्हणेन की ४७ नंतर जातीयता जाणार जाणार म्हणत जे कायदे झाले तेसुद्धा उच्चवर्णियांच्या हितासाठीच झाले. जर पूर्वीचीच जातीव्यवस्था चालू ठेवली

असती तर ब्राह्मण किंवा क्षत्रियांना बुटाचे कारखाने काढायची परवानगी मिळालीच नसती, युनिव्हर्सिटीमधे मेटलर्जीच्या कोर्सला फक्त लोहार-तांबटांच्याच मुलांना प्रवेश मिळाला असता आणि आज असे जे अनेक उद्योगधंदे चालू झाले आहेत ते ज्या जातींना आम्ही आजपर्यंत हीन समजत आलो आहोत त्या जातीच्याच लोकांना करता आले असते आणि आमच्याकडे फक्त मास्तरकी राहिली असती. म्हणूनच हा जातीयवाद दूर झाला. माझे एक मित्र म्हणतात की, 'स्वातंत्र्यानंतर हरिजनांच्या पुढाऱ्यांनी म्हणायला पाहिजे होतं की हा जातीयवाद यापुढही चालूच राहिला पाहिजे.' हा वाद नष्टही होईल. पण केव्हा? जेव्हा ग्रामीण भागाच्या विकासाला सुरुवात होईल तेव्हा. तुम्ही जोपर्यंत ग्रामीण भागात राहता आहात, हरिजनांची वस्ती वेगळी आहे, दोघांना मिळून पुरेशी एक भाकरी मिळत नाही तोपर्यंत दुसरा काही उद्योगधंदा नाही म्हणून हा वाद चालूच राहणार आहे. कोणत्याही समाजाची विकासाची गती खुंटली की त्याची आपापसातली भांडणं चालू होतात. समाजाला एकाच ठिकाणी राहायलासुद्धा धावावं लागतं. स्वातंत्र्याच्या आधी तामिळनाडू राज्यात हिंदीच्या प्रसाराची गती सगळ्यात जास्त होती. स्वातंत्र्यानंतर जेव्हा सगळी गती खुंटली तेव्हा राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला सगळ्यात मोठा विरोध तामिळनाडूतच सुरू झाला. स्वातंत्र्यापूर्वी सगळीकडे राष्ट्रीय बंधुभाव होता. पण पुढे मुंबईत शिवसेनेसारखी प्रांतीय वृत्तीची चळवळ चालू झाली. अनेक ठिकाणी अशा संकुचित वृत्तीच्या चळवळी सुरू झाल्या. याचं मुख्य कारण देश पुढं जायचा थांबला. जो थांबला तो संपला. थांबल्यामुळे आपल्या जुन्या वृत्ती पुन्हा उफाळून वर आल्या आणि म्हणून अर्थकारणाला हात घातल्याशिवाय समाजकारण-समाजप्रबोधन पुरेसं ठरू शकत नाही. तुम्ही समाजातल्या सगळ्यांची गती पुढे जाणार अशी करा, हे बारीकसारीक फरक आपोआपच नाहीसे होतील. याच्यातला महत्त्वाचा मुद्दा एवढाच की स्वभावानं काही अर्थकारण ठरत नाही, उलट अर्थकारणानं स्वभाव ठरतो.

आपण या विषयाकडे पुस्तकांच्या चौकटीतून पाहता कामा नये. चांगले संबंध म्हणजे लाचारीचे संबंध नव्हेत. आमचं त्याचं काही भांडण नाही, हा येतो आणि आम्हाला सलाम करतो, कोपऱ्यात बिनतक्रार बसतो याला काही 'चांगले संबंध' म्हणत नाहीत. आपण आपल्या डोक्यात पुस्तकांची तयार केलेली चित्रं बाजूला ठेवून प्रत्यक्षात शेतावर मजुरांच्या बरोबर काम करणारी माणसं किती



आहेत हे पाहिलं पाहिजे. पुस्तकांच्या मर्यादेत अडकलं की बऱ्याचशा दिसणाऱ्या गोष्टी कलुषित दिसतात. मी जेव्हा कामाला सुरुवात केली तेव्हा माझासुद्धा शेतकऱ्यांवर हाच राग होता. त्यावेळी तिथे जे प्रांतऑफिसर होते त्यांच्याकडून भूमिहीनांना जमिनी मिळवून पहिली सामुदायिक शेती करण्याच्या विचारात होतो. म्हणजे माझ्याही डोक्यात पुस्तकातले जे विचार आहेत ते सुरुवातीला होते. पण शेती करायला लागल्यानंतर माझ्या असं लक्षात आलं की, पुस्तकांतून उभं केलेलं परिस्थितीचं चित्र आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यात निदान आमच्या भागात तरी फार वेगळेपणा आहे. आमच्या भागात एक आश्चर्यकारक गोष्ट सापडली की ज्याला भूमिहीन म्हटलं जाईल अस एकही उदाहरण सापडलं नाही. धुळे भागातसुद्धा भूमिहीनांचं प्रमाण नगण्य आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये ही परिस्थिती बदलू शकते. आमच्या गावांमध्ये आम्ही केलेल्या शिरगणतीत जेव्हा एकसुद्धा भूमिहीन मजूर नाही असं दिसलं तेव्हा माझ्या मनावर त्याचा परिणाम झाला आणि मी पुस्तकी चौकटीतून बाहेर आलो. आता आपण केवळ बांधावर राहणारा शेतमालक किती आणि मजुराच्या बरोबरीने काम करणारा शेतमालक किती याचा नीट विचार केला पाहिजे. म्हणजे मग आपण ज्या मालकाविषयी बोलतो आहोत त्याचा नेमका गुणधर्म काय आहे हे लक्षात येईल. नाहीतर आपण बोलायचं 'दो बिघा जमीन' सिनेमामधील जमीनदार लक्षात ठेवून आणि बोलत असायचं एखाद्या पागोटेवाल्याबद्दल, असं होता कामा नये.

एखाद्या भागातील कार्यकर्ते जर शेतकरी आंदोलनाचे समर्थन आणि शेतमजुरांना किमान वेतनाची मागणी या दोन्ही गोष्टी करत असतील- एकाच वेळी करत असतील तर ती चांगली गोष्ट आहे. पण आपलं शेतकरी आंदोलन उभं राहिल्यानंतर काही पक्षांच्या मंडळींनी सगळीकडे शेतमजुरांचे आंदोलन उभे करण्याचे आदेश आपल्या कार्यकर्त्यांना दिले आहेत. आपण त्यांच्या नादी लागता कामा नये. कारण त्यांना अशा तऱ्हेने शेतमजुरांचे आंदोलन उभे करून शेतकरी-शेतमजूर हा वाद जागता ठेवून आपलं शेतकरी आंदोलन पाडायचं आहे.

'मालकमजूर संबंध अगदी विकोपाला गेले आहेत' असे म्हणणारी मंडळी कोणत्या प्रकारच्या वर्गात मोडतात हे पाहूनच या गोष्टीतील सत्यता समजावून घेतली पाहिजे. दुर्दैवाने एक गोष्ट खरी आहे की आपण कितीही बोलत असलो की शेतमालक आणि शेतमजूर एक आहेत आणि एकत्र राहायला पाहिजेत तरी आज

ज्या प्रमाणात शेतमजूर आपल्या चळवळीत आणता यायला पाहिजेत त्या प्रमाणात आणता आलेले नाहीत. अर्थात असं भासण्याचं दुसरंही एक कारण आहे. महाराष्ट्रातल्या कुठल्याही जिल्ह्यामध्ये ज्याला भूमिहीन म्हणता येईल असा शेतमजूर धुळे जिल्हा सोडला तर फारसा सापडत नाही. बाकीचा जो अल्पभूधारक शेतमजूर आहे तो आपल्यामधे सामील होतो. पण सांगतो, 'मी शेतकरी आहे.' ५ ते १० टक्के भूमिहीन सोडले तर बाकीची मंडळी आपल्या अडीच एकरात काम करून शेजाऱ्याकडे मजुरीवर जातात. मागासवर्गीय जे आहेत ते बहुसंख्य भूमिहीन आहेत. त्यांच्यात जास्तीत जास्त एक टक्का हे शेतकरी आहेत. ही भूमिहीनांची संख्या मुख्यत: पूर्वी वाड्यातले जे वतनदार होते त्यांची आहे. बलुतेदारीची पद्धत गेल्यामुळे वतनाच्या जमिनी परत कराव्या लागल्या, त्यामुळे सगळे बलुतेदार भूमिहीन झाले.

आपल्या राज्यातील शेतकऱ्याची जमीनधारणाच इतकी कमी आहे की जवळ जवळ ९५ टक्के शेतकरी आपल्या कुटुंबीयांसहित शेतमजुराबरोबर राबत असतो. एका घरात एक कारभारी असतो. तो सोडून सगळेच शेतात कामं करतात. शेतीचं खातं एकाच्या नावानं असलं तरी घरातला दुसरा एखादा चलाख माणूस कारभारी असतो. त्याची बायको-मुलं जर शेतात काम करत असली तर तो शेतात काम करतो असंच धरलं पाहिजे. माझ्या शेतासंबंधी बाहेरची कामं, प्रयोगाकरता वेगवेगळ्या वस्तू तयार करून घेणं, त्या आणणं या कामातच मी अडकलेला असतो. माझ्या घरातीलही कुणी शेतीत काम करीत नाही. म्हणजे मी बांधावरचा शेतकरी आहे असं म्हणायला हवं. अशा शेतकऱ्यांचं एकूण प्रमाण किती?

गावामध्ये 'बागायती पिकं घेणारा' असा एक शेतकरी वर्ग वाढू लागला आहे. तो जास्तीत जास्त 'बांधावरचा' आहे असे दिसत असले तरी बागायती पिकं घेणारा शेतकरी हा स्वत: जास्त काम करतो. त्याला सतत २४ तास देखरेख करावी लागते. विशेषत: भाजीपाला करणारी मंडळी बांधावर बसून का होईना, काळजीनं अहोरात्र पाहणी करीत असतात. पानाला मागून कुठे कीड लागते काय, रोपाची वाढ होते की नाही, टोमॅटोचे पीक असेल तर झाडाला दोनच फांद्या राहिल्यात की तीन, एका फांदीला किती फळं राहातात, कलिंगड काढली तर एका वेलाला दोनच फळ राहतात की नाही अशा अनेक गोष्टीची पाहणी करून उपाययोजना करणे याचं शास्त्र इतकं प्रचंड झालं आहे की वरील सर्व पाहणी करणे हे एक कामच आहे. हे काम करणारा मजुरी करत नाही असं धरणं चूक आहे.



ज्वारी, भात यांच्या पिकातसुद्धा अशी कामे असतातच. कुठे चिकट्या पडलाय का, कीड लागलीय का हे लक्षपूर्वक पाहावंच लागतं. तेव्हा बांधावर राहून पाहणी करणं हेसुद्धा कामातच धरलं पाहिजे.

शेतकऱ्यांमध्ये नवीन एक वर्ग तयार होतो आहे. हा बांधावरचा न राहता 'तालुक्यावर' असतो. 'नंबर दोन'च्या पैशांवर उत्कृष्ट जमीन खरेदी करून अधिकाधिक पैसा खर्च करून अधिक उत्पादन काढतो. अर्थात उत्पन्नातून नफा सुटतो की नाही ही गोष्ट वेगळी. दोन नंबरचा पैसा लपविण्याचा त्यांचा उद्देश पार पडलेला असतो. पण हे लोक ५ टक्क्यांत बसतात. ते आठवड्यातून एखादवेळ शेतावर येतात, उरलेले दिवस तालुक्यात जाऊन आपला 'धंदा' सांभाळतात. त्यांना शेतीतील नफ्यातोट्यात स्वारस्य नसते. निव्वळ शेती करणारा मनुष्य जर बांधावर किंवा तालुक्यावर राहू म्हणेल तर त्याला दरवर्षी ५/१० एकर जमीन विकावी लागेल.

सारांश, इंडियात आणि भारतात, दोन्हीमध्ये वेगळे वेगळे विरोध आहेत. भारताच्या ग्रामीण भागात मोठे बागायतदार, छोटे बागायतदार, मोठे शेतकरी, छोटे शेतकरी, अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर, आदिवासी या लोकांमध्ये एकमेकातले काही विरोध आहेत. हे विरोध दूर करण्यासाठी अगोदर मुख्यत: शेतीमालाचं शोषण दूर करणे आवश्यक आहे. बाहेरून आलेला शत्रू समोर असताना जसं घरातील भांडण बाजूला ठेवून त्या बाहेरच्या शत्रूचा समाचार प्रथम जसा घ्यावा लागतो, त्याचप्रमाणे आपल्या दु:खाचं, दारिद्र्याचं जे महत्त्वाचं आणि मूळ कारण आहे- शेतीमालाचं शोषण- ते दूर करणे, शेतीमालाला भाव मिळवणे हे काम पहिल्यांदा हाती घेतलं पाहिजे. त्याऐवजी हे तात्त्विक पातळीवर मान्य आहे पण व्यावहारिक पातळीवर आपण जर असं ठरवू गेलो की शेतमजुरांचा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे, हरिजनांचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यांचं आंदोलन उभ करायला पाहिजे तर आज प्रत्यक्षामध्ये ग्रामीण भागामध्ये असं आंदोलन उभं करणं अशक्य आहे. त्यानं केवळ डोकेफोड होईल, हाती काही लागणार नाही. उलट आपला जो समान शत्रू आहे त्याचं मात्र फावेल. शेतीमालाला रास्त भाव मिळू लागल्यावर त्याचा फायदा शेतमजुरापर्यंत पोहोचणार नाही असं समजायला आजतरी काहीही कारण नाही. पण त्याचबरोबर शेतकरी संघटनेची अशी ठाम भूमिका आहे की आपण दारिद्र्याविरुद्ध लढा द्यायला निघालेली मंडळी आहोत;

केवळ शेतकऱ्यांचा स्वार्थ पुरा व्हावा इतकाच आपला हेतू नाही. तेव्हा जर का पुढे शेतीमालातील फायदा शेतमजुरापर्यंत पोहोचत नाही असं दिसलं तर त्यावेळी आपण निव्वळ शेतमजुरांचा लढा उभा करू. तशी आवश्यकता भासेल असं वाटत नाही. सध्या शेतीमालाला भाव प्रत्यक्षात मिळायला सुरुवात झाली नसताना, कांदा-ऊस आंदोलन झाल्यानंतर हवे ते भाव बांधून मिळाले नसताना शेतकरी संघटनेने आपणहून सटाण्याच्या मेळाव्यात शेतमजुरांना मजुरीचे दर वाढवून द्यावेत अशी घोषणा केली आणि तिचं मोठ्या उत्साहानं स्वागत झालेलं आहे आणि त्यानंतरचा अनुभव असा की आम्ही मजुरीचा जो दर जाहीर केला होता त्याहून अधिक मजुरी प्रत्यक्षात शेतकरी देऊ लागला आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

मग अशा तऱ्हेचे वादविवाद उपस्थित का केले जातात?

****



प्रकरण : ८

# इंडियाचं भारताच्या शोषणाविषयीचं पंचशील

शेतीमालाला भाव मिळाल्याशिवाय ग्रामीण भागातील वेगवेगळे विरोध दूर होणार नाहीत असे असताना शेतीमालाच्या भावाचा प्रश्न न हाताळता शेतकरी-शेतमजूर किंवा छोटे शेतकरी-मोठे शेतकरी असे वाद उपस्थित का केले जातात? अशा प्रकारचे वाद निर्माण करणे हा इंडियाचा भारताच्या शोषणविषयक पंचशीलाचा एक भाग आहे.

आपण आपल्या देशाचा इतर देशांशी संबंध ठेवताना जी तत्त्वं पाळतो त्यातील 'पंचशीला'चा फार उदो उदो झाला आहे. इंडिया भारताचं जे शोषण करतं त्यांचीसुद्धा पाच तत्त्वे आहेत.

शेतीमालाला भाव न देणे हे त्यातलं पहिलं तत्त्व आपण पुष्कळ तपशिलाने समजावून घेतलं आहे. शेतकऱ्याचं शोषण करायचं आणि त्यातून उद्योगधंद्यांकरिता भांडवल उभं करायचं असं हे पहिलं तत्त्व आहे.

दुसरं तत्त्व म्हणजे शेतीमालाला भाव मिळत नाही म्हणून शेतकरी चिडून उठू नये यासाठी त्याचं मन अन्य कुठेतरी गुंतवणे. शेतीमालाचं शोषण तर आपण करतो आहोत. पण हे असं कठोरपणे चालू राहिलं तर अगदी झोपी गेलेला शेतकरी जागा होईल आणि ही पद्धत तो बंद पाडून टाकील. म्हणून शेतकऱ्याला थोडं फार सहन करता आलं पाहिजे, त्याच्या मनासमोर काही तरी आशा टिकून राहिली पाहिजे, तो अगदीच निराश होता कामा नये यासाठी त्याला दूध तर द्यायचं नाही पण निदान खुळखुळा तरी वाजवित राहायचं अशा धोरणाने त्याच्यासाठी म्हणून योजना आखायच्या हे या तत्त्वाचं मुख्य अंग आहे. पंचवार्षिक योजनामधून ज्या ज्या विकास योजना आल्या त्या याच हेतूनं आल्या त्यातून इंडियाने दोन गोष्टी साधल्या. एक म्हणजे उत्पादन वाढवलं- देशातल्या लोकांना खाऊ तर घालायला हवं ना! उत्पादन वाढलं म्हणून किमती खाली आल्या आणि भांडवल संचय अधिक वेगानं झाला. धरणं, पाटबंधारे, कालवे इत्यादीनं बागायती वाढवण्याचा

हेतू उत्पादन वाढवणं हाच आहे- शेतकऱ्याचं उत्पन्न वाढावं हा नाही. जमिनीची सुधारणा करणे, कर्जाची व्यवस्था करणे, खतं, बी-बियाणं उपलब्ध करूण देणे हे सगळे मार्ग उत्पादन वाढावे म्हणून निर्माण केले आहेत. नवीन बियाणं आलंय-घ्या, कर्ज मिळतंय-घ्या, शेती सुधारा, बंधारे बांधा, बांध नीट करा, शेतीची पत सुधारा, उत्तम पिकं घ्या, शंभर शंभर टन ऊस एकरी काढा हे ऐकून सगळे शेतकरी धावत सुटले आणि तरीसुद्धा त्यांच्या लक्षात आलं ते हे की, इतकी धावपळ करून आपल्या हाती काही लागलं नाही.

शेतकरी कामगार पक्षाचे एक नेते श्री. दत्ता देशमुख यांनी १९७६ साली या विषयावर फार चांगला अभ्यास केला. १९५६ साली श्री. दाभोळकर यांनी याच एका मुद्यावर संकरित ज्वारीच्या बाबतीत अभ्यास करून सिद्ध केले की, संकरित ज्वारीचं पीक घेतलं तर पीक वाढतं, खर्चही वाढतो पण मिळालेला कडबा बैलांच्या फारसा उपयोगी नसतो, हे लक्षात घेतलं तरं शेतकऱ्याला तोटाच होतो. हे सर्व संकरित धान्यांच्या बाबतीत घडलं आहे. यात लक्षात घेण्याचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या विविध योजनांमुळे उत्पादन वाढत असलं तरी शेतकऱ्याचं उत्पन्न वाढत नाही. या विकास योजनांचा मुख्य हेतू म्हणजे शेतकऱ्याला झोपवून ठेवायचे-त्याला जागृत होऊ द्यायचे नाही. त्यात मग वेगवेगळ्या धर्मदाय योजना- फुकट शाळा बांधून देतो, दवाखाना काढून देतो, रस्ता बांधतो, कर्ज देतो, कर्ज असलं तर माफसुद्धा करतो अशा योजना निर्माण करायच्या की शेतकऱ्याला वाटत राहिलं पाहिजे की अरे, आपल्याकरता काही तरी होतंय. आपल्या शेजारच्या गावचा आमदार झाला, त्यानं त्याच्या गावाला या योजनांचा फायदा करून घेऊन बरंच काही करून घेतलं, आपल्या गावचा उद्या कधी आमदार झाला तर आपल्याही गावाचं भलं होईल अशा आशेवर टांगतं ठेवणं हे या योजनांचं उद्दिष्ट असतं.

अशा योजनांचा आणखी एक उद्देश आहे. देशाची शासनयंत्रणा जी चालायची, ती मग कोणत्या का पद्धतीची असेना, त्यासाठी निवडणुका होतात आणि निवडणुकांमध्ये मतं मिळवायची असतात. त्यात कितीतरी भानगडी ते करतात पण अखेर मतदान होतं आणि हे मतदान आपल्याकडे ओढायचं असलं तर काही तरी युक्ती लढवायला पाहिजे असं त्यांच्या लक्षात येतं. मग त्यांनी काय युक्ती योजली? सध्याच्या शासनयंत्रणेत, अर्थकारणात सगळ्या शेतकऱ्यांचं भलं करणं शक्य नाही तर मग गावोगाव म्हणा, तालुका पातळीवर म्हणा पाच पंचवीस लोकं



पकडायची आणि त्यांचं थोडं फार भलं करायचं म्हणजे मग ती मंडळी बाकीच्या लोकांची मतं ढिगांनी आणून देतात. बागायती शेतीचा (दिखावू) फायदा अशाच मंडळींकडे जातो किंवा बागायती शेतीचा फायदा होत असेल असेच लोक या कामासाठी निवडले जातात. शासनाचं विकेंद्रीकरण म्हणून जिल्हा परिषदा, पंचायत समित्या तयार झाल्या. विकेंद्रीकरण म्हणजे पूर्वी जी कामं मुंबईत होत ती आता जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी व्हावीत अशी कल्पना. प्रत्यक्षात काय होत? प्रत्यक्षात एवढंच होतं की जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांचे सभापती आणि इतर मंडळी आपल्या पदांचा पुष्कळशा प्रमाणावर वापर करून आपल्या खिशात फायदा पाडून घेतात आणि मग निवडणुकीच्या वेळी मत मिळवून देणाऱ्या लोकांची कामं करतात. अशा तऱ्हेने मतांचे ढीगच्या ढीग मिळवून देणारी मंडळी आपल्या भारतात इंडियाने तयार केली आहेत आणि त्यांच्या साहाय्याने ते आपलं राज्य भोगत आहेत.

कोणत्याही विकास योजनेचं स्वरूप तुम्ही पाहिलंत तर ते याच प्रकारचं दिसेल. उदाहरणार्थ, एकाधिकार खरेदीची योजना पाहा. या योजनेचा शेतीमालाच्या भावाशी फार जवळचा संबंध आहे. व्यापारी गावोगाव खरेदीला गेले की शेतकऱ्याला वजनात मारतात, भावात मारतात, तेव्हा शेतमालाला भाव मिळावा म्हणून जागोजाग कृषि उत्पन्न बाजार समित्या तयार करण्यात आल्या व शेतकऱ्याला योग्य वजन मिळावे, योग्य भाव मिळावा यासाठी मालाचा खुला लिलाव झाला पाहिजे म्हणून या कृषि उत्पन्न बाजार समित्या तयार झाल्या. सगळे शेतकरी या समित्यांच्या मार्केट यार्डात माल नेऊ लागले. त्यांचा काय अनुभव आहे? कोणत्या बाजारपेठेत खोटी वजनं होत नाहीत? कोणत्या ठिकाणी पूर्वीपेक्षा जास्त भाव मिळतो? कोणत्या मार्केट यार्डावर माल विकल्या विकल्या पैसे मिळतात? आतापर्यंत शेतकऱ्याला समाधान वाटेल असं काहीही झालेलं नाही. उलट कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये माल नेल्यामुळे अनेकवेळा शेतकऱ्याची परिस्थिती अधिक वाईट झाली आहे. उदाहरणार्थ, पूर्वी कांदा शेतावर राहत होता. नंतर व्यापारी घोड्यावरून, टांग्यातून किंवा सायकलवरून जायचे, माल बघायचे. मग भाव पटला तर शेतकरी माल देई नाहीतर अधिक भावाची वाट पाहत कांदा घरातच ठेवून देई. चाकण भागातला कांदा साधारणपणे फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या तीन महिन्यांत विक्रीला येतो. नेमका याच काळात वळीवाचा पाऊस पडतो. दुपारी ऊन

खूप तापतं आणि संध्याकाळी पाउस पडतो असं बऱ्याच वेळा घडतं. बाजार समितीत कांदा नेऊन टाकला की तो खपायला जितका वेळ लागेल तितका वेळ शेतकरी सारखा वर उन्हाकडे बघतो आणि ढगाकडे बघतो. कारण दुपारी कांदा उन्हात तापला आणि त्यावर संध्याकाळी जर पाऊस पडला तर त्या कांद्याचा चिखल होतो. समितीच्या, बाजारात त्याला काही संरक्षणच नसतं. तोच पूर्वी घरी कांदा असायचा तेव्हा त्याला निदान संरक्षण होतं. समजा या व्यापाऱ्याचा भाव पटला नाही तर दुसरा येईपर्यंत कांदा काही खराब होत नसे. बाजार समित्यांच्या निर्मितीमागील उद्देशसुद्धा जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांसारखंच आहे. बाजार समिती झाली म्हणजे समितीच्या पातळीवर १०/१२ माणसं मतांचे गठ्ठे आणणारी तयार होतात. असं हे पंचशीलातलं दुसरं तत्त्व आहे की भाव मिळाला नाही म्हणून शेतकऱ्यानं चिडून उठू नये, त्याचं कुठतरी मन रमवावं, त्याला खोट्या आशेवर झुलवत ठेवावं अशासाठी फसव्या विकास योजना तयार करणे.

तिसरं तत्त्व अतिशय महत्त्वाचं आहे. इंग्रजांनी राज्य करताना 'फोडा व झोडा' अशी नीती वापरली. कुठे हिंदूमुसलमानांत वाद लावा तर कुठे छोटे मोठे असे वाद लावा म्हणजे सगळी मंडळी एकमेकात भांडत राहातील आणि ही सगळी जणं मिळून उठून स्वातंत्र्य मागायला यायची नाहीत. त्याचप्रमाणे छोटे शेतकरी- मोठे शेतकरी, शेतकरी-शेतमजूर, बागायती-जिराईती असे वादविवाद लावण्यातील मुख्य हेतू हाच की शेतकरी आपापसात भांडत राहिले पाहिजेत. त्यांनी एक होऊन आपलं जे शोषण चाललं आहे ते थांबवा अशी मागणी करू नये.

या पंचशीलातलं चौथं तत्त्व म्हणजे शेतकऱ्यांविरुद्ध मोठ्या प्रमाणावर प्रचार करणे हे आहे. हा प्रचारसुद्धा किती हुशारीनं करतात!

सगळ्या मराठी चित्रपटांमध्ये ग्रामीण परिस्थितीचे जे वर्णन केलं जातं, जे चित्रण केलं जातं ते आणि ग्रामीण भागाची आपण जी परिस्थिति प्रत्यक्षात पाहतो, अनुभवतो त्यांचा काही संबंध आहे का? आपण ग्रामीण भागात काय पाहतो? पूर्वीच्या काळी वाडे बांधलेले असतील तर त्याच्या भिंती आता पडलेल्या आहेत. त्या सारवून घेण्याचीसुद्धा शेतकऱ्यात कुवत नाही. बाकी सर्व कुडांच्या झोपड्या. सिनेमातलं खेड असं नसतं. त्यातील वाडे मजबूत बांधलेले असतात, पाटलाच्या घरात रांजणांनी दागिने असतात, त्याचा मुलगा खांद्यावर बंदूक टाकून



दिवसभर हिंडत असतो आणि रात्री तमाशाला जातो. अगदी गरिबातल्या गरीब अशा आदिवासी माणसाचं चित्र जरी दाखवायचं झालं तरी एकतर तो फसवा असतो किंवा बावळट असतो, त्याची बायकोच नांदत नसते असं काही तरी चित्रण केलं जातं की तेथील शोषण, वाढतं दारिद्र्य ही वस्तुस्थिती प्रकाशात येऊ नये.

तुम्ही मराठीतल्या ग्रामीण भागावरील कथा-कादंबऱ्या पाहिल्यात तरी तुम्हाला असाच प्रकार आढळून येईल. ग्रामीण भागातील दुःखाला कुठंतरी हलकं करून पुढे त्याला विनोदी स्वरूप देऊन या कथा-कादंबऱ्या ग्रामीण भागाच्या दुःखाला हास्यास्पद करायचा प्रयत्न करतात.

पण याहीपेक्षा गंभीर प्रकारचा प्रचार विद्वानांनी चालवला आहे. ते म्हणत असतात की जगात मुळी ग्रामीण भागाचं शोषण होतच नाही. आपल्या देशात ४७ सालापासून शेतीमालाचा भाव हा कारखानदारी मालाच्या भावापेक्षा जास्त वेगाने वाढतो आहे. असं ते आकड्यांची करामत करून सिद्ध करतात. शेतकऱ्यांची एकूण परिस्थिती आता फार चांगली आहे, तो मोटारसायकलवरून फिरतो, जीप गाडीतनं हिंडतो वगैरे विधानं करून शेतकऱ्याच्या प्रश्नामागील गंभीरपणाकडील लक्ष दुसरीकडे वेधायचं असं हे प्रचाराचं तंत्र आहे.

पंचशीलातलं शेवटचं आणि पाचवं तंत्र म्हणजे दडपशाही- जेव्हा जेव्हा आंदोलन उभं राहील तेव्हा तेव्हा जास्तीत जास्त बळ वापरून ते दडपून टाकणे. अशी कित्येक उदाहरणं देता येतील. आपल्या आंदोलनांचा विचार आपण नंतर करु. पण जेव्हा जेव्हा शेतकऱ्यांची आंदोलनं उभी राहिली तेव्हा तेव्हा त्यांना दरोडेखोरांचं आंदोलन, अतिरेक्यांचं आंदोलन अशी नावं देऊन जास्तीत जास्त बळाचा वापर करून ती मोडून टाकण्यात आली. तेलंगणाचं उदाहरण सांगता येईल. आजही तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात जी आंदोलनं चालू आहेत त्यांचं उदाहरण ताजं आहे. आंदोलनाच्या मोठमोठ्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी शोधून काढून गोळ्या घालून ठार मारले आणि वर्णनं देताना मात्र त्यांनी पोलिसांशी झटापट केली, पोलिसांवर त्यांनी गोळीबार केला म्हणून पोलिसांना त्यांच्यावर गोळीबार करावा लागला असं सांगण्यात आलं. ज्याअर्थी पोलिस सांगतात त्याअर्थी ते खरं असलं पाहिजे असं आम्ही गेली दोन तीन वर्षे समजत होतो. पण आता न्यायमूर्ती तारकुंडे यांचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यामुळे आता असं उजेडात

आलं आहे की, जे कुणी शेतकरी आंदोलन उभं करतात असं दिसतं अशा शेतकरी कार्यकर्त्यांना पोलिसांनी निवडून काढलं आणि त्यांना गोळ्या घातल्या.

आज आपली आंदोलनं करताना आपण जी सावधगिरीची पावलं टाकतो, अतिरेक होऊ नये याची काळजी घेतो त्याच कारण ही दडपशाही आहे. ही दडपशाही पाहिल्यानंतर आपली गाडी दोनचार दिवस थांबवून थंड झाली तरी चालेल असा विचार केला पाहिजे. कारण आज नव्यानं उभा राहणारा शेतकरी अशा प्रकारच्या दडपशाहीपुढे आपल्या अपुऱ्या शक्तिनिशी अधिक काळ तग धरू शकणार नाही.

आपल्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनांच्या वेळचा आपला अनुभव काय आहे? शहरात कामगारांचा लढा चालू झाला, संप चालू झाला म्हणजे काही वेळा त्याच्यामध्ये दगडफेकही होते, कुठे गाड्या पेटवण्याचे प्रकार होतात. संप करणे, दगडफेक, जाळपोळ अशा कारणाखाली त्यांच्यावर खटले भरण्यास सुरुवात होते. पण संप मिटला की सर्वसाधारणपणे अनुभव असा येतो की खटले वगैरे काढून टाकले जातात किंवा काही काढले नाही तर फारसे जोमाने चालवले जात नाहीत. पण आमचं चाकणचं कांदा-आंदोलन होऊन, यशस्वी होऊन आज वर्ष होऊन गेलं तरी खटले मागे घ्यायचं तर बाजूलाच राहिलं पण अजूनही पोलिस वेगवेगळ्या भागात जाऊन एकेका माणसाला शोधून त्यांच्यावर नवनवीन खटले भरत आहेत. नाशिकच्या कांदा-उस आंदोलनात सत्याग्रही शांतपणे रेल्वे-रूळांवर बसले होते. तेव्हा त्यांना आमच्या अशा सूचना होत्या की प्रत्येकानं छातीवर हाताची घडी घालून बसायचं. काही झालं (अगदी गोळीबार झाला तरी) कुणी हाताची घडी काढायची नाही. (गोळी लागली तर तसेच हात असलेला मुडदा मिळाला पाहिजे.) अशा तऱ्हेने शांतपणे रूळांवर बसलेल्या माणसांना पोलिस अधिकाऱ्यानं म्हटलं, 'तुम्हाला तुमच्या नेत्यानं काय सांगितलं आहे? हात बांधून बसा, ना? मग बसा बघू हात बांधून. आता शांत बसा आणि मी काय सांगतो ते ऐका.' असं म्हणून त्यानं सांगितलं, 'आम्हाला रेल्वेगाडी चालू करायची आहे, तुम्ही इथून ताबडतोब निघा.' तेव्हा सत्याग्रहींनी शांतपणे पण ठामपणे सांगितलं, 'आम्हाला आमच्या नेत्यांनी सांगितल्याशिवाय आम्ही येथून उठणार नाही.' त्यांनी तीन वेळा असं सांगितलं आणि मग लगेच पोलिसांनी लाठीहल्ला आणि गोळीबार सुरू केला. खरं तर एखादा जमाव दंगेखोर असतो, प्रक्षुब्ध होतो, नासधूस करतो तेव्हाच गोळीबार



केला जातो. नासिकच्या आंदोलनाच्या वेळी केलेला गोळीबार हा समोर हाताच्या घड्या घालून बसलेल्या माणसांवर केलेला होता.

नासिकचे आंदोलन विस्कटून टाकण्यासाठी पोलिसांनी आणखी एका मार्गाचा वापर केला. आम्ही रस्त्यावर अडविलेल्या गाड्या हजाराहजारांनी नासिक जिल्ह्याच्या हद्दीबाहेर थांबलेल्या होत्या. पोलिसांनी तिथल्या सत्याग्रहींवर लाठीहल्ला केला, रात्री झोपलेल्या सत्याग्रहींवर लाठ्या चालवल्या आणि रस्ता खुला करून बाहेर थांबलेल्या गाड्या नासिक जिल्ह्यामधे आणून मध्येच उभ्या केल्या. नंतर त्यांना समजलं की मंगरूळपीर फाट्यावर ४० हजार शेतकरी रस्त्यावर बसून आहेत. त्यांना लाठीहल्ला करून रस्त्यावरून हलवण्याची हिंमत पोलिसांना झाली नाही. त्यामुळे गाड्या तिथं अडकून पडल्या. अशा तऱ्हेने अडकून पडलेल्या ट्रक्सच्या ड्रायव्हरना पोलिसांनी बाजूला नेऊन चिथावले की, 'तुमच्या या गाड्या थांबल्यात, तुमचं नुकसान होणार आहे. हे सर्व शेतकऱ्यांमुळे होत आहे. तेव्हा शेजारच्या गावात जाऊन आगी लावा.' प्रत्यक्षात असे आगी लावण्याचे प्रकार ट्रकड्रायव्हरनी केले, बैलांच्या शेपट्या कापल्या, डोळे फोडले. हा प्रकार पोलिसांनी अशासाठीच केला की काही करून शेतकरी आणि ट्रकड्रायव्हर यांच्यात भांडण जुंपेल आणि आंदोलन फिसकटेल. तेव्हा शेतकऱ्यांचं आंदोलन मोडून काढण्याकरता कोणत्याही प्रकारची उपाययोजना करायला शासन मागेपुढे पाहत नाही. ट्रकवरील बहुतेक ड्रायव्हर हे पंजाबी शीख होते. शासन एकीकडे देशाच्या ऐक्याचा- एकात्मतेच्या गोष्टी बोलत असते पण पोलिसांनी हे जे केलं त्यामुळे महाराष्ट्र आणि पंजाब यांच्यात कायमचा वाद निर्माण होईल याचीसुद्धा चिंता त्यांनी केली नाही. त्यावेळी गाड्या सोडून देण्याचा निर्णय जर आम्ही घेतला नसता तर पंजाबी आणि मराठी यात युद्ध सुरू झालं असतं आणि महाराष्ट्राच्या पंजाबमध्ये गेलेल्या गाड्या तिथं खलास झाल्या असत्या आणि पंजाबच्या इथं आलेल्या गाड्या खलास झाल्या असत्या. असं झाल तरी चालेल इतकं दुष्ट धोरण सरकार प्रत्यक्षात अवलंबतं.

तेव्हा या पंचशिलाचा सारांश म्हणजे त्यातील पाच तत्त्वे.

(१) शेतकऱ्याच्या मालाला भाव द्यायचा नाही.

(२) भाव न मिळाल्याने दरिद्री होत जाणाऱ्या शेतकऱ्याने चिडून उठू नये म्हणून त्यांना काही तरी खोट्या आशेची गाजरं किंवा मन रमविण्यासाठी खुळखुळा दाखवण्याकरता फसव्या विकास योजना

आखायच्या.

(३) शेतकऱ्यांमध्ये एकी होऊ द्यायची नाही. छोटे-मोठे शेतकरी, शेतकरी-शेतमजूर असे वाद जागते ठेवून 'फोडा-झोडा' नीतीचा अवलंब करायचा.

(४) शेतकऱ्याविरुद्ध प्रचार करून त्यांना आपल्या मागण्या संघटितपणे मांडता येऊ नयेत अशी परिस्थिती निर्माण करणे. आज आपण साधं आंदोलन निर्माण करण्याकरता एवढं मोठं तत्त्वज्ञान मांडतो त्याचं कारणसुद्धा हेच आहे की, या प्रचारयंत्रणेला आपल्याला तोंड देता आलं पाहिजे. आम्ही नुसतं आमच्या मालाला भाव मागतो आहोत असं नाही तर यामागे एक संपूर्ण तत्त्वज्ञान आहे, विचार आहे. हे तत्त्वज्ञान, विचार सर्वसामान्य जनतेसमोर मांडता यावे हा या पुस्तकाचा हेतू आहे.

(५) जेव्हा जेव्हा आंदोलन निर्माण होईल तेव्हा तेव्हा परिणामांची क्षिती न बाळगता कोणत्याही मार्गांनी ते तुडवून काढायचं.

****



प्रकरण : ९

# संघटनेला काय हवे आहे?

खरेदी यंत्रणा सरकारच्या हाती गेली तरी आपण मरतो आणि सगळं व्यापाऱ्याच्या हाती गेलं तरीही आपण मरतो. मग यावर काही उपाय नाही का? तर यावर आतापर्यंत वापरला गेलेला मार्ग म्हणजे शेतकऱ्यांची सहकारी सोसायटी स्थापन करणे. त्यात शेतकऱ्यांनी आपला माल विकण्याचा प्रयत्न करून त्यातून काहीतरी भाव मिळेल अशी आशा धरायची. प्रत्यक्षात सहकारी संस्थांचा अनुभवही वाईटच आहे. सुरुवातीला चारदोन माणसं प्रामाणिकपणे काम करू लागतात. पण त्या संस्थेला एकदा फायदा व्हायला सुरुवात झाली-थोडी फार शिल्लक साचायला लागली की आजचे सहकार महर्षी, सहकार सम्राट तिथं येतात आणि सगळी संस्था राजकारणाची तंत्र वापरून गडप करतात. अपवादादाखल ५/१० संस्थांची नावं घेता येतील; पण त्या सोडल्यास सर्व सहकारी संस्था या राजकारण्यांनी चावून खाल्ल्या आहेत. शेतकरी मात्र होता तिथेच आहे. म्हणजे हा जो उपाय आहे तोही फोल आहे. एकूण, सरकारी खरेदी असो, व्यापारी खरेदी असो किंवा सहकारी संस्थांची खरेदी असो आपण मरतो. यावर उपाययोजना कोणत्या प्रकारची असायला पाहिजे याच्यावर आपल्याला विचार केला पाहिजे.

या तीनही पद्धतींत शेतीमालाला भाव मिळत नाही याचं सगळ्यात महत्त्वाचं कारण म्हणजे शेतकऱ्यामध्ये माल थांबवून ठेवण्याची ताकद नाही. तो दारिद्र्यामध्ये इतका बुडाला आहे- अगदी नाकापर्यंत पाणी आलं आहे- की आज मिळेल तो भाव घेऊन शेतीमाल विकण्याची त्याला घाई असते. त्याशिवाय त्याला आपला पुढचा गुजारा करणे शक्यच नसते. ही त्याची सगळ्यात मोठी कमजोरी आहे. त्याच्या अंगी थांबण्याची थोडी जरी ताकद असती तरी तो सरकारी अधिकाऱ्यांना तोंड देऊ शकला असता आणि सहकारी संस्थांमधूनसुद्धा असे माजलेले पुढारी आले नसते. पण हीच थांबण्याची ताकद त्याच्यात नाही आणि ती कुणी येऊही देत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे व्यापाऱ्याला तोंड देण्यासाठी जी यंत्रणा लागते ती

त्याच्याकडे नाही. व्यापाऱ्याला तोंड द्यायचं ठरवलं तर साठवणीकरता पुरेशी गोदामं पाहिजेत, गोदामात माल ठेवला तर तो विकला जाईपर्यंत खर्चासाठी उचल म्हणून कर्जासाठी सोय झाली पाहिजे. अशा तऱ्हेची व्यवस्था काही काळ जर त्याला मिळाली तर तो माल थांबवून व्यापाऱ्यालाही तोंड देऊ शकेल. अशी व्यवस्था जर झाली तर तो आपल्या शेतीतील पीक बदलू शकेल किंवा आपल्या मालावर प्रक्रिया करण्याचे कारखाने काढू शकेल. पण यातील कोणतीही गोष्ट त्याच्या आर्थिक कमकुवतपणामुळे त्याला साधत नाही म्हणून तो अडचणीत सापडतो आहे.

आपण म्हणतो शेतकऱ्याच्या शेतीमालाला भाव द्या- भाव बांधून द्या. भाव हा मिळालाच पाहिजे. पण तो मिळवून कसा द्यायचा? भावासाठी सतत शासनावरच अवलंबून राहायचे काय? या प्रश्नाचाही आपण विचार करायला हवा.

आजपर्यंत आपली जी आंदोलने झाली- कांदा आंदोलन, ऊस आंदोलन- तेव्हा शेतमालाला भाव मिळू देत नाही म्हणून आपण शासनाविरुद्ध भांडत होतो. उसाच्या बाबत आपण म्हणत होतो की, 'तुम्ही सहकारी साखर कारखान्यांतून स्वस्त दरात साखर घेऊन जाता म्हणून आमच्या उसाला भाव मिळत नाही. तुम्ही साखरेला भाव वाढवून द्यायला पाहिजे. कोणत्याही स्थितीत आम्हाला उसाला टनाला ३०० रु. मिळायला हवेत.' महाराष्ट्रात कपाशी खरेदीची एकाधिकार पद्धती असल्यामुळे सगळा कापूस सरकारच खरेदी करते. त्यामुळे कापसाला वाढीव किंमत द्या अशी मागणी आपण सरकारकडेच करतो. पण याचा अर्थ प्रत्येक वेळी प्रत्येक वस्तूचा भाव शासनानेच बांधून द्यायचा आहे का? आपण कायमच शासनावर अवलंबून राहू इच्छितो काय? आणि शासनावर अवलंबून राहायचं म्हटलं तर आजचा अनुभव काय आहे? याच्यावर आपण विचार करायला हवा. कांद्याच्या बाबतीत आम्ही आंदोलन करून 'नाफेड'ची सरकारी खरेदी चालू करून घेतली. कापसाच्या बाबत सरकारची एकाधिकार खरेदी आधीपासून चालू आहे आणि दोनही खरेदी यंत्रणांचा अनुभव बिल्कुल चांगला नाही. जे सरकारी नोकर कापसाची किंवा कांद्याची पत ठरवायला येतात ते भ्रष्टाचार करतात. शेतकऱ्यांच्या सोयी गैरसोयीचा विचार न करता त्यांना कित्येक दिवस बाजारात अडकवून - रखडून ठेवतात. त्यांना अनेक तऱ्हांनी त्रास देतात आणि जो शेतकरी कुठंतरी जाऊन एखाद्या अधिकाऱ्याला पैसे चारील त्यालाच भाव मिळतो, त्याचं



काम झटपट होतं. असा सरकारी खरेदीचा प्रत्यक्ष अनुभव आहे. शेतीमालाला भाव मिळवायचा तर दुसरा मार्ग म्हणजे व्यापाऱ्यांनी तो आपल्याला यासाठी प्रयत्न करणे. पण याबाबतीतही काय परिस्थिती आहे ती आपण अनुभवतोच. ही परिस्थिती किती वाईट असू शकते हे आपल्याला निपाणीच्या तंबाखूच्या बाजारपेठेच्या उदाहरणावरून कळून येते. निपाणीला तंबाखूचा सगळा व्यापार खाजगी व्यापाऱ्यांच्या हातात आहे आणि त्या खाजगी व्यापाऱ्यांनी जर ठरवलं तर भाव मिळणे दूरच राहो पण ते एखाद्या शेतकऱ्याला आयुष्यातनं उठवूनसुद्धा लावू शकतात. याला काही फार मोठं कारण लागतं असं नाही. एखादा शेतकरी जर आपल्या घराच्या कोपऱ्यात बसून एखाद्या व्यापाऱ्याच्या विरुद्ध काही बोलला आणि ते जर त्याला समजलं तर तो व्यापारी बाजारपेठेत सांगतो की या शेतकऱ्याचा माल घ्यायचा नाही. म्हणजे मग एकही व्यापारी त्याचा माल कोणत्याही भावाने घेत नाही. दुसरं म्हणजे ते शेतकऱ्याला भावात मारतात. तिथल्या शेतकऱ्याचं शोषण काय प्रमाणावर होतं याचं उदाहरण पाहा. ज्या तंबाखूच्या ५ हजार विड्या बनतात आणि गिऱ्हाईक ज्या ११० रु. ला विकत घेतात त्या तंबाखूचे शेतकऱ्याला जास्तीत जास्त ५ रु. मिळतात.

मग यावर उपायच नाही काय? उपाय आहे आणि त्या उपायाची पहिली पायरी म्हणजे संघटना. संघटनेच्या स्वरूपाबद्दल आपण नंतर पाहू. तर या संघटनेने आपल्या कामाला काही एक पद्धत बसवून द्यायला लागणार आहे. सध्या सुरुवातीला म्हणून आपल्यासमोर एक विशिष्ट पद्धत आहे. सगळेच खरेदी व्यवहार सरकारने करावे असं आपल्याला म्हणायचं नाही. खाजगी व्यापाऱ्यांनी त्यांचे व्यवहार करीत राहावे; परंतु त्यामध्ये व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट होते किंवा ग्राहकांची लूट होते असं लक्षात आलं तर शासनानं त्या बाजारामध्ये लगेच आपलं काम- खरेदीविक्रीचं चालू करावं अशी मागणी आपल्याला करायची आहे. आगीचा बंब जसा आग लागली तरच एखाद्या ठिकाणी जातो इतर वेळी आपल्या ठिकाणीच राहतो तसं शासनाने काम करावं. बाजारातले व्यवहार सुरळीत असतील तर सरकारला तिथे हात घालण्याचं कारण नाही. उदाहरणार्थ, चाकण भागात फेब्रुवारी, मार्च या काळात टोमॅटो भरपूर प्रमाणात बाजारात येतो, अशा वेळी व्यापारी फार कमी भाव देतात. गेल्या वर्षी व्यापाऱ्यांनी ३ पैसे किलोने टोमॅटो घेतला. शासनानं जर ठरवलं की शेतकऱ्याला ५० पैशापेक्षा कमी भाव मिळता कामा नये आणि

ग्राहकाला १ रु. ५० पैशांपेक्षा जास्त भाव पडता कामा नये, तर शासनाला काय करता येईल? पुण्याला कृषि उत्पन्न बाजार समितीची बाजारपेठ काढली आहे. ही बाजारपेठ बांधण्याकरता अडीच कोटी रुपये खर्च झाले. सगळीकडे सिमेंटच्या शेडस् बांधल्या आहेत. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापतींसाठी एक खास कचेरी बांधली आहे. तो आपले पांढरेधोप कपडे, टोकदार टोपी घालून त्यात बसतो. यात शेतकऱ्याला मालाच्या भावात कुठेच फायदा झाला नाही. उलट गावाबाहेरच्या या बाजारपेठेत माल न्यायला लागल्यापासून त्याला भाव दोन पाच पैसे कमीच मिळायला लागला. कारण हा माल पुन्हा गावात न्यायला लागतो. वाहतुकीचा खर्च पुन्हा शेतकऱ्याच्याच डोक्यावर बसतो. हेच अडीच कोटी रुपये सरकारला वेगळ्या प्रकारानं वापरून शेतकऱ्याला दिलासा देता आला असता. उदाहरणार्थ, ५० लाख रुपयांचा एक याप्रमाणे पुण्याच्या सभोवती पाच कारखाने काढून त्यात शेतीमालावरील वेगवेगळ्या प्रक्रिया करण्याची व्यवस्था करायची. काही ठिकाणी नुसतं माल डबाबंद करण्याचं काम, कुठ रस काढणे, कुठ नुसतं सालं काढण्याचं काम अशा प्रकारच्या प्रक्रिया करण्याचे किमान पाच कारखाने अडीच कोटी रुपयात उभे करता आले असते. मग जेव्हा टोमॅटोची किंमत ५० पैशांच्या खाली येते तेव्हा शासनानं ५० पैशांनी खरेदी चालू करायची. हे काम त्यांनी स्वत:च केलं पाहिजे असं नाही. आज कृषि उत्पन्न बाजार समितीची ही जी मंडळी नुसती बसतात त्यांना हे काम दिलं तरी चालणार आहे. खरेदी-विक्री संघाला दिलं तरी चालेल. टोमॅटो विकत घेतल्यावर ते वेगवेगळ्या कारखान्यांत पाठवून तिथं त्यावर प्रक्रिया करून त्यांचा रस, सॉस, चटणी असे वेगळे वेगळे पदार्थ करून साठवून ठेवायचे आणि मुंबईत जेव्हा टोमॅटोचा भाव ९/१० रु. किलो होतो तेव्हा ते अशा प्रमाणात बाजारात आणायचे की ग्राहकाला टोमॅटोला १ रु. ५० पैशांपेक्षा जास्त पडता कामा नये. अशा तऱ्हेनं सरकारनं जर आगीच्या बंबाचं काम केलं तर शेतकऱ्यावर काही अन्याय होणार नाही आणि ग्राहकावरही अन्याय होणार नाही आणि मग सरकारी अधिकारी, व्यापारी मंडळी किंवा सहकारी मंडळी शेतकऱ्याला त्रास देऊ शकणार नाहीत. शासनानं ठरवलं तर अशी एक यंत्रणा उभी करता येईल.

यामध्ये पुन्हा कुठंतरी एक समाजवादी किंवा भांडवलवादी तत्त्वज्ञान डोकावतं. पण आजपर्यंत आम्ही समाजवादी आहोत म्हणून सगळ्याचं राष्ट्रीयीकरण झालं



पाहिजे किंवा आम्ही भांडवलवादी आहोत तेव्हा आम्हाला स्वतंत्र बाजारपेठ पाहिजे म्हणून सगळं व्यापारी मंडळींनीच केलं पाहिजे.या दोनही पुस्तकी विचारांमुळे शेतकऱ्यांना लुटलं गेलं आहे. आपल्याला अशी पद्धत शोधून काढली पाहिजे की जिच्या साहाय्याने आपण दोन्हीकडच्या चोरांपासून वाचू शकू. अशी यंत्रणा सुरुवातीला सरकारनं निर्माण करावी अशी आपली मागणी आहे. अर्थात सरकारकडून अशा प्रकारची मदत शेतकऱ्यांनी कायमची, वर्षानुवर्षे घेत राहायचं असं आपलं म्हणणं नाही. आपल्या संघटनेच्या सर्व विचारसरणीचा उद्देशच मुळी असा आहे की, याच्यापुढे शेतकऱ्याला लाचारपणे कुणाकडे भीक मागण्याची, कुणाकडून मदत घेण्याची गरज लागता कामा नये. आज ते त्याला मागून घ्यावं लागतं आहे. त्याला ताठ मानेनं अभिमानानं जगता येत नाही याचं कारण असं की त्याचं हक्काचं जे आहे ते लुबाडून नेतात आणि नंतर मग दयाबुद्धीचं ढोंग करून भीक घातल्यासारखी थोडी मदत करतात म्हणूनच शेतकऱ्याच्या माथी लाचारीचं जिण लादलं आहे. आपला शेतीमाल सरकारनं विकत घ्यावा किंवा त्याला भाव बांधून द्यावा इतकीसुद्धा लाचारी आमच्यामध्ये नको आहे. पण गेली कित्येक वर्षे सरकारनं शेतकऱ्यांच्या श्रमाचा फायदा (लुबाडून) घेतला आहे. दुष्काळात शेतकऱ्यांनी नुकसान सोसून सरकारला लेव्ही भरली आहे. तेव्हा आपलंसुद्धा सरकारकडून काही घेणं आहे. लेव्ही म्हणून सरकारला ज्वारी, बाजरी, भात देऊन हिंदुस्थानातल्या शेतकऱ्यांनी आतापर्यंत १४००० कोटी रुपयांचं नुकसान सोसलं आहे. आता त्याच्याबदली आम्ही आमच्यासाठी १०-१५ कोटी रुपये खर्च करा म्हटलं तर ती काय फार मोठी गोष्ट आहे? उलट १४००० कोटी रुपये दिल्यामुळं आम्हाला जे दारिद्र्य आलं आहे ते दूर करण्यासाठी सरकारनं काही प्रमाणात मदत करणे हे सरकारचं काम आहे. काही वर्षे शासनाने अशा तऱ्हेने खरेदीत लक्ष घालावे आणि त्यानंतर काय परिणाम होतात ते पाहावेत.

ऊस आणि कांद्याचं उदाहरण आपल्याला ठाऊकच आहे. आंदोलनांनंतर ऊस आणि कांद्याला भाव मिळाल्यानंतर सोसायट्यांची कर्ज फिटली, खाजगी गहाणवटीच्या जमिनी सुटल्या. आणखी दोन वर्षे जर असाच भाव मिळत राहिला तर या शेतकऱ्यांच्या अंगी माल थांबवून ठेवण्याची ताकद येणार आहे. मग त्याला कुणीही चिरडून टाकू शकणार नाही. तो म्हणेल आता नाही माल घेतला तर नंतर थोड्या वेळानं देऊ, आताच काय घाई आहे? एवढी ताकद त्याच्या अंगी आली

• की त्याला कुणी दडपण्याची भीती बाळगण्याचे कारण राहणार नाही. तेव्हा आज आपण 'भाव बांधून द्या' अशी जी मागणी करतो आहोत किंवा सरकारनं काही तरी करावं, मग ते आगीच्या बंबासारखं काम असो की 'नाफेड' सारखी खरेदी यंत्रणा असो असं जे म्हणतो त्याची गरज आपल्याला ३ वर्षांपेक्षा, जास्तीत जास्त ५ वर्षांपेक्षा अधिक काळ भासणार नाही. आज शेतकरी अगदीच गलितगात्र होऊन पडला आहे, त्याला थोडं सलाईन द्यायला हवं. तो उठला म्हणजे स्वत:ची काळजी स्वत:च घेईल. आपण अगदी ताठ मानेनं जगण्याच्या विचारात असून आपण सरकारला बांधून घ्यायला बघतो आहोत, सरकारच्या मेहेरबानीचीच अपेक्षा करीत आहोत असं आपल्याला कुणी म्हणेल. पण आज सरकारची ही मेहेरबानी आपल्याला सलाईन घेतल्यासारखी आहे. अगदीच त्राण राहिलेलं नाही, जरा उठून बसू द्या मग आमची काळजी आम्ही घेऊ. जेव्हा जेव्हा तुम्हाला भाव कशा तऱ्हेने बांधून हवेत, का म्हणून बांधून मिळावेत असं विचारलं जाईल तेव्हा आपण या विचारावर आधारलेली भूमिका मांडली पाहिजे. या विचारसरणीत कोणत्याही समाजवादाचा किंवा भांडवलवादाचा विचार नाही. समाजवादी समाजवादी म्हणतात राष्ट्रीयीकरण झालं पाहिजे, सगळं सरकारनं हाती घेतलं पाहिजे. आपला याला विरोध आहे. कारण या प्रकाराचा आपण फार वाईट अनुभव घेतला आहे. सगळं व्यापाऱ्यांच्या हाती दिलं तरी आपला अनुभव वाईट आहे आणि सहकारी पद्धतीतही आपला अनुभव वाईटच आहे. आज आम्हाला काही काळापुरती शासनाकडून अशी मदत मिळायला हवी आहे की जीमुळे या हलाखीच्या स्थितीत शेतकऱ्याला कुठंतरी थोडा आधार मिळेल, त्याला आपल्या पायांवर उभं राहता येईल. असं झालं की कुणाच्या दडपणाला न मानता शेतकरी आपल्याला पाहिजे तो भाव मिळेपर्यंत आपला माल राखून ठेवू शकेल इतकी ताकद त्याच्यात निर्माण होईल. त्यानंतर त्याला कुणाच्याही कुबड्यांची गरज भासणार नाही.

अशा तऱ्हेने शेतकरी 'सबल' होत गेला तर तो काही वर्षांनी शासन आणि व्यापारी यांच्याप्रमाणेच 'अडवणूक' करू लागेल अशी भीती निर्माण होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यात जी माल थांबवण्याची ताकद येणार आहे तिला इथे अडवणुकीची ताकद असा शब्दप्रयोग वापरला आहे. आज ही ताकद फक्त व्यापाऱ्यांकडे आहे. काही प्रमाणात ग्राहकांकडे आहे. ही आपण शेतकऱ्यांकडे आणू इच्छित आहो. याचा अर्थ तो जगाचा राजा होणार आहे असा नाही. जसं



जसं शेतकऱ्यांचं राहणीमान सुधारत जाईल तसं तसं त्याला दुसऱ्यांकडून वस्तू घ्याव्या लागतील. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी अडवणूक करतो म्हटलं तर दुसऱ्या बाजूने त्याचीही अडवणूक होऊ शकते आणि मग दोघेही एकमेकांच्या ताकदीचा आणि फायद्याचा अंदाज घेऊन कुठल्या तरी एका भावाच्या पातळीवर स्थिर होतील. यालाच 'मागणी-पुरवठा' म्हणतात. खर तर या दोन्ही बाजूंच्या ताकदीमुळे खरी 'रास्त किंमत' ठरणार आहे. आज आपण शेतीमालाची किफायतशीर किंमत जी म्हणतो ती मजुरीचा दर ५ रु. धरून कागदावर काढलेली किंमत आहे. आज बँकेचा कामगार किंवा L.I.C. चा कामगार संप करून त्याला योग्य पण आपल्याला अवास्तव वाटतं असं वेतन मागतो आणि मिळवून घेतो कारण त्याची ताकद तेवढी आहे. उलट आपल्याकडे ताकदच नाही.

शेवटी दोघांच्याही ताकदी जेव्हा निर्माण होतील आणि अडवणुकीच्या मार्गावरून फार पुढे गेलो तर आपण दोघेही मरू असं जेव्हा त्यांना समजेल तेव्हाच त्या ताकदीच्या वापरावर नियंत्रण येईल. आज ही सत्ता अनियंत्रित आहे. ती केवळ कारखानदार आणि व्यापारी यांच्या हातात आहे. शेतकऱ्याच्या हातात अशी ताकद आली म्हणजे त्या सत्तेला निर्बंध बसेल. किंबहुना भाववाढीच्या एकूण वृत्तीला हळूहळू आळा बसेल.

त्यातूनच इंडिया आणि भारत यांच्या संतुलनाकडे वाटचाल होऊ शकेल. संतुलन हे नेहमी संघर्षातूनच होत असतं. दोन्हीकडील ताकद जेव्हा सारखी होते तेव्हाच संतुलन शक्य असते. उदा. अमुक एका राष्ट्राकडे असे बॉंब आहेत तर तमुक एका राष्ट्राकडे आणखी कसले बॉंब आहेत. दोन्हीकडील बॉंब सारखेच विध्वंसक-विनाशकारक आहेत अशी परिस्थिती असेल तर ती दोन्ही राष्ट्रं शांततेचा स्वीकार करतात. संघर्ष सतत टिकून राहतात असे नाही. घराघरातसुद्धा असे वाद असतात पण ते काही संघर्ष असतात असे नाही. आपणं नातं लक्षात घेऊन त्यात समतोलाची परिस्थिती निर्माण करतो. अर्थात त्याचा जर कुणी गैरफायदा घेतला तर त्यावर दुसऱ्या बाजूने उपाययोजना होते. इतकी वर्षे दुसऱ्या बाजूने आपला गैरफायदा घेतला आहे आणि अजून त्यांची ही प्रवृत्ती लवकर जाईल असे दिसत नाही. आता आपण भाव वाढवून मागतो आहोत. लगेच व्यापारी, कारखानदार त्यांच्या पुढे जाऊ लागणार. खरं म्हणजे आपण अजून वाजवीपेक्षा कमीच भाव मागतो आहोत, अतिरेकी भावाचा प्रश्नही अजून कुठे निर्माण झाला नाही तरीसुद्धा

पुण्यामध्ये भाषा कशी होत आहे की आता पागोटेवाला आला की इंजेक्शनला पाचचे दहा घ्यायचे! ही जी गैरफायदा घेण्याची प्रवृत्ती आहे तिच्यामुळे आपल्याला संघटना बांधून उपाययोजना करावी लागत आहे. आपल्या विरुद्ध बाजूचे संख्येनं थोडे आहेत आणि आपण शेतकरी मोठ्या संख्येने आहोत. त्यामुळे त्यांची संघटना नेहमीच चांगली असणार. आपल्या संघटनेचं वैशिष्ट्य असं आहे की आपण उठताना हळूहळू उठू पण एकदा उठल्यावर आपण त्यांच्यापेक्षा जोरदार ठरू. हा दोन संघटनांतला फरक आहे. आपण आपल्या संघटनेच्या जोरावर एकदा आपली ताकद कमावली की मग नेमका समतोल राखला जाईल.

आपण ही जी शासनाकडून अपेक्षा करीत आहोत ती कितपत पूर्ण होईल? शेतकऱ्याचा अनुभव असा आहे की हा जो शासनाचा बंब आहे तो, आगीनं सर्व काही फस्त करून ती विझल्यानंतर मार्केटला येतो. उदा. सध्या शासनाने कांद्याला बांधून दिलेला भाव ३५ रु. क्विंटल असा आहे. त्यापेक्षा कमी भाव होऊ नये म्हणून शासन सध्या मार्केटिंग फेडरेशनमार्फत खरेदीला उतरलं आहे. प्रत्यक्ष परिस्थिती दिसते ती अशी आहे की, व्यापारी नेहमी मार्केटमध्ये असतो पण फेडरेशन मात्र मॅनेजर हजर नाही अशासारख्या साध्यासुध्या कारणांनी बंद असते.

आजवरचा हा जो अनुभव आहे तो सत्य आहे. ते येताना रिकामा, गळका बंब घेऊन येतात. इतकंच नव्हे तर जागेवर जाऊन आग लावायचाही प्रयत्न करतात. कारण त्यांचा मूळ हेतू शेतीमालाला भाव देऊ नये हाच आहे. आपण आपली संघटनेची, आंदोलनाची ताकद उभी करून त्यांना बळेच काही गोष्टी करायला भाग पाडतो. कांद्याची खरेदी करण्याचे गेल्या वर्षी त्यांनी कबूल केले. मोठ्या मिनतवारीने ते आले, नंतर मध्येच खरेदी बंद करून टाकली– त्याला काही वेगळीच राजकीय कारणं होती. ही खरेदी चालू होऊनसुद्धा गेल्या वर्षी १४ लाख पिशवी कांदा सडून गेला. यंदाही कांद्याबाबत तीच स्थिती आहे. त्यांनी खरेदी करायचं मान्य केलं म्हणून आपण आंदोलन थांबवलंय. पण आता ठिकठिकाणी या खरेदीची परिस्थिती अशी आहे की धुळ्याहून, लासलगावाहून आम्हाला तारा येऊ लागल्या आहेत की 'आम्हाला आता आंदोलन करायची परवानगी द्या, आता आम्हाला हे सहन होत नाही.' त्यांचं नुकसान होत आहे. आपली ताकद निर्माण होईपर्यंत हे चालूच राहणार आहे. गेल्या वर्षी या प्रकारात काही शेतकऱ्यांचं वाटोळं झालं आहे; परंतु आज भाव मिळविण्यासाठी आपल्यापुढे दुसरा मार्ग



नाही. आपलं शोषण करणाऱ्या या ज्या दोन ताकदी आहेत त्यांनाच एकमेकात खेळवून आपल्याला एकदोन पावलं पुढं गेलं पाहिजे. आपला प्रगतीचा मार्ग हा काही राजरस्त्यासारखा नाही. (आजचे सगळे राजरस्ते इंडियाच्या प्रगतीच्या दिशेनेच आखलेले आहेत.) आपण आपल्या अडचणींचा सगळा डोंगर दगडाधोंड्यातून वाट काढत चढतो आहोत. डोंगर चढताना जसं सांगता येत नाही की आपण चालतो आहोत तो आपल्याला हवा असलेलाच रस्ता आहे. त्याचप्रमाणे आपल्याला हा डोंगरवाटा शोधत शोधत चढावयाचा आहे. म्हणून आजच्या पद्धतींमध्ये आपण कोणत्या प्रमाणात शासनाला खरेदी करायला भाग पाडू शकतो याचा अंदाज घेऊनच पावलं टाकली पाहिजेत. आपल्याला जे व्हायला हवे ते झटकन पूर्ण होणार नाही. एखाद्या शेतकऱ्याचं आज नुकसान झालं असलं तरी सर्वसाधारण शेतकऱ्याला कांद्याला ६० ते ७५ रु. क्विंटलला भाव मिळाल्यामुळे त्यांची ताकद वाढली आहे. यंदा ज्याचं नुकसान झालं आहे त्याची ताकद पुढच्या वर्षी वाढेल. आपण एका शेतकऱ्याचा, एका व्यक्तीचा विचार करीत नाही. आज एखाद्याचं नुकसान झालं असलं तरी जमिनी मोठ्या प्रमाणावर सुटायला लागल्या आहेत, सोसायट्या फिटू लागल्या आहेत. आणखी दोन तीन वर्षांनी शेतकऱ्यात अशी ताकद येईल की, भाव मिळाल्याखेरीज आम्ही मालच देणार नाही असं तो म्हणू लागेल. एखाद्या वेळी त्याच्या लक्षात येईल की आपला माल नाशवंत माल आहे, आपण लढाई देऊ शकत नाही. मग तो ठरवील की आपण या मालाचं पीक घेऊ नये– दुसरा अधिक टिकाऊ माल काढू. आपल्यापुढे आखलेला असा सरळ मार्ग नाही म्हणून कुठे खाच दिसली तर तिथं पकडलं पाहिजे आणि पुढील हालचालीसाठी कुठे खाच दिसते ते शोधायला पाहिजे. हाही पुन्हा डावपेचाचा पवित्रा आहे. तुम्ही जर त्यांनी आखून ठेवलेल्या मार्गानं जाण्याचं ठरवलंत तर आपले विरोधक म्हणतील, 'ठीक आहे, या. आम्ही सगळं बरोबर करू' आणि नेहमीप्रमाणे पुन्हा फसवतील. आता जर तुम्ही मुंबईला गेलात आणि महाराष्ट्र फेडरेशनच्या गोपालकृष्णन्ना भेटलात तर ते म्हणतील, 'आम्ही फार चांगली खरेदी चालवली आहे.' हे असंच सगळे म्हणतील. पण त्यांची वृत्ती फार वेगळी – वाईट आहे. मी अनुभवलेला एक प्रसंग सांगतो. जेव्हा बाजारपेठेत १३२ रू क्विंटलने ज्वारी खरीदण्यासाठी फेडरेशनची माणसं आली नाहीत आणि शेतकऱ्याला ज्वारी ६० ते ७५ रुपयांनी विकावी लागली त्या वेळेस मी मुंबईस महाराष्ट्र

फेडरेशनच्या गोपालकृष्णन्ना भेटलो. मी तिथे बसलो होतो आणि ते ज्वारीच्या खरेदीबाबत प्रश्न निर्माण झाला आहे म्हणून टेलीफोनवरून मोठमोठ्या मंडळींना, अधिकाऱ्यांना आमंत्रण देत होते की, 'मुंबईच्या ओबेराय शेरेटन हॉटेलमध्ये आम्ही मेजवानी ठेवली आहे, तिथं या. ज्वारीच्या खरेदीच्या प्रश्नाची चर्चा तिथं होणार आहे.' इकडे शेतकरी ज्वारीच्या खरेदीकरता अडकून पडलाय, कुणी ज्वारी ६५ पैशांनी विकून राहिलाय आणि या ज्वारी खरेदीवाल्या अधिकारी मंडळींची चर्चा ओबेराय शेरेटनसारख्या शाही हॉटेलमध्ये होणार! यावरून आपल्याला त्यांची याबाबत वृत्ती काय आहे हे कळून येईल.

आज शासन आणि व्यापारी असे दोघेही आपल्या अंगावर चालून येत आहेत. मग आपण काय करायचं? आपण जरा बाजूला सरकून त्यांची धडक होते काय बघायचं. आजच्या परिस्थितीत आपल्याकडे याशिवाय दुसरा काही उपाय नाही. आहे या परिस्थितीमध्ये आपल्याला एकदम कसे काय पुढे जाता येईल?

शेतीमालाला रास्तभाव मिळाले पाहिजेत अशी मागणी पुढे मांडली की विशेषत: शहरी बुद्धिजीवी एक युक्तिवाद वारंवार करतात. शेतकऱ्यांना रास्त भाव मिळाला पाहिजे हे तर प्रामाणिकपणा ठेवून नाकारता येणे शक्य नाही. पण तसे झाल्यास स्वत:च्या खिशाला झळ पोचेल ही चिंता तर आहेच. या दोन संकटातून सुटका करून घेण्याकरता ते एक नवा तर्क लढवतात. शेतीमालाला भाव वाढवून मागण्यापेक्षा शेतीचा उत्पादनखर्च कमी करण्याचा प्रयत्न का करू नये? शेतीला लागणाऱ्या वस्तूंना शासनाने अनुदान दिले तर शेतकऱ्यालाही योग्य भावात मिळेल आणि ग्राहकालाही तोशीस पडणार नाही. या युक्तिवादाला अनुदान-युक्तिवाद म्हणूया. त्यातील खुबी नीट समजावून घेतली पाहिजे.

शेतकऱ्याने हक्काचे तेवढे मागावे. कोणत्याही मागणीला भीकेचे किंवा धर्मदायाचे स्वरूप असू नये. आम्हाला काहीतरी स्वस्तात द्या, काही तरी नादारीत द्या अशा तऱ्हेची मागणी पुढे मांडू नये हा संघटनेच्या विचारांचा पाया आहे.

आणि ठरविले तर किती गोष्टींबद्दल आपण अशी मागणी फेरणार? डिझेलचा भाव कमी करून पाहिजे. एंजिनचा भाव कमी करून पाहिजे, युरियाचा भाव कमी करून पाहिजे आणि वेगवेगळी तणनाशके, औषधे या प्रत्येकाचा भाव कमी करून पाहिजे. अशी मागणी करणे म्हणजे दुसऱ्याच्या घरात हात घालायला जाण्यासारखे आहे. खरे तर आमच्या शेतीमालाचा उत्पादनखर्च कळायला आम्हाला ३०-३५



वर्षे लागली, इतर वस्तूंच्या उत्पादनखर्चाची उठाठेव आपण कशाला करायची?

उदाहरणार्थ, एन्ड्रिनचा भाव कमी करून पाहिजे असे आपण समजू. एन्ड्रिन कशातून तयार होते. त्याचा उत्पादनखर्च, त्या कारखान्याचा प्रत्यक्ष खर्च किती आहे याचा सतत अभ्यास करत राहण्याची आपली काही यंत्रणा तयार आहे का? नाही. मग कोणत्या आधारावर तुम्ही असे मागणार आहात की एन्ड्रिनचा भाव कमी करून मिळावा? आणि अशा किती मागण्या करायच्या? शेतीला शेकडो गोष्टी लागतात. या शेकडो गोष्टींच्या किमती कमी करून मागण्याऐवजी उत्पादनखर्चावर आधारित भावाची हक्काची एकच मागणी अधिक फायदेशीर आहे. कारण या वस्तूंच्या किमती काही का असेनात त्यांचा खर्च शेतीमालाच्या रास्त भावातून भरून यईल.

शेतीमालाला रास्त भाव मिळत नसल्यामुळे खते, औषधे, डिझेलइंजिन वगैरे आवश्यक गोष्टींच्या किमती परवडत नाहीत. त्यांच्यासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करावयाची झाली तरी मग शेकडो वस्तूंसाठी ते मागावे लागेल. अनुदान काय किंवा रास्त भावापर्यंतची पडणार आहे. मग उत्पादन खर्चावर आधारित रास्त किमतीचा हक्क सोडून शेतकऱ्यांनी अनुदानाची भीक का मागावी?

अनुदान द्यावयाचे ठरवले तरी शासन ते खते, औषधे, अवजारे अशा विशिष्ट कारणासाठी देते. शासनाने अशा तऱ्हेने अनुदान देण्यास शेतकरी संघटनेचा अजिबात विरोध नाही. आमचे म्हणणे इतकेच आहे की, अनुदान दिले किंवा शेतीला लागणाऱ्या वस्तूंच्या किमती खाली आणल्या तरीसुद्धा त्याप्रमाणे शेतीमालाचा उत्पादनखर्च काढून रास्त भाव द्या म्हणजे झाले.

खरे तर अनुदानामुळे शेतीला लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादकांचा आणि व्यापाऱ्यांचाच फायदा होतो. हाती पैसा नसल्यामुळे शेतकरी या वस्तू गरजेइतक्या विकत घेऊच शकत नाही. त्यामुळे त्या बाजारात पडून राहतात. या वस्तूंचा उठाव होऊन त्यांच्या उत्पादकांचे नुकसान टाळावे हाच अनुदानामागील हेतू आहे असे म्हटल्यास ते अनुचित ठरणार नाही. जोवर शेतीमालाला रास्त भाव मिळत नाही तोपर्यंत ट्रॅक्टरसाठी मिळालेले कर्ज किंवा अनुदान हे कारखानदारांच्याच सोयीसाठी आहे. त्यातून अनुदानासारख्या धर्मदायातून या वस्तू मिळत असल्यामुळे त्यांच्या प्रतीबद्दल शेतकरी फारसा चोखंदळ राहू शकत नाही हे लक्षात घेऊन हलक्या प्रतीच्या वस्तू खपविल्या जातात. किंबहुना अशा तऱ्हेने खपविण्यासाठी कमी

प्रतिच्या वस्तूंचे उत्पादन केले जाते.

याउलट शेतीमालाला उत्पादनखर्चानुसार रास्त भाव मिळाला तर त्यातून नफ्याच्या रूपाने हातात राहणाऱ्या पैशाचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला राहते. अनुदानाची रक्कम शासनाने ठरवून दिलेल्या कारणासाठीच आणि ठरवून दिलेल्या मर्यादेमध्येच वापरावी लागते. पण भावातून मिळालेला पैसा वापरण्यासाठी त्याला अनेक पर्याय असू शकतात. औषधे खते चांगल्या प्रकारची वापरणी, शेतीची बांधबदिस्ती सुधारून तिचा पोत वाढविणे, जुन्या विहिरीची दुरुस्ती करून किंवा नवीन विहीर काढून पाण्याची व्यवस्था सुधारणे, एखादा छोटा उद्योगधंदा उभा करून जादा रोजगार तयार करणे अशापैकी आवश्यक त्या कामावर खर्च करण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला रास्त भावाने मिळणाऱ्या पैशातून असते. तसे स्वातंत्र्य अनुदानाच्या भीकेतून खर्च करण्याचे असूच शकत नाही.

याशिवाय अनुदान वाटपाचा फायदा सगळ्या शेतकऱ्यांना मिळत नाही. राजकारणी नेते आणि त्यांचे संबंधित हा फायदा लुटून घेतात आणि मग राहिलेल्यांपैकी जे पुढारी आणि अधिकारीवर्गाच्या समोर लांगूलचालनात अग्रभागी राहू शकतील अशांना या अनुदानाचा फायदा थोड्याफार प्रमाणात मिळतो.

हे अनुदान मिळतानासुद्धा भ्रष्टाचारामुळे ते पूर्णपणे मिळूच शकत नाही. बांगला देशात अनुदानासंबंधी मायकेल लिप्टन यांनी अभ्यास केला. त्यांना असे आढळून आले की, ६० रुपयांची एखादी वस्तू अनुदान-योजनेतून जर ३० रुपयांनी द्यावयाचे ठरले असेल तर प्रत्यक्षात ती मिळविण्यासाठी शेतकऱ्याला आणखी २० रुपये खर्च करावे लागतात. म्हणजे भ्रष्टाचारामुळे ६० रु.ची वस्तू ३० रुपयांना मिळण्याऐवजी शेतकऱ्याला ती घेण्यासाठी ५० रुपये खर्चावे लागतात आणि दुसऱ्या बाजूला त्या वस्तूची बाजारातील मागणी वाढल्यामुळे अनुदानाशिवाय घेणाऱ्या शेतकऱ्यांना ती वस्तू ६० रुपयांपेक्षाही 'अधिक किमतीला' घ्यावी लागते. म्हणजे अनुदानामुळे काही शेतकऱ्यांचा अल्पसा फायदा (?) होत असला तरी बहुसंख्य शेतकऱ्यांना खुल्या बाजारात भाववाढ झाल्यामुळे अधिक तोटा सोसावा लागतो.

म्हणून संघटना शेतीला लागणाऱ्या गोष्टींचे दर उतरवा अशी दुसऱ्याच्या घरात हात घालणारी किंवा अमुक अमुक वस्तूंसाठी अनुदाने द्या अशी भीकेची मागणी न करता शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भावाची मागणी करते.



शेतीची उत्पादकता वाढवली पाहिजे, त्यामुळे उत्पादन खर्च कमी होईल हे बरोबर आहे. पण हे साधावे कसे? शेतकरी उत्पादकता का वाढवत नाही?

डॉ. चारूदत्त दाभोळकर यांच्या शब्दात सांगायचे झाले तर शेतकरी आपला व्यवसाय तोट्यात चालतो याचा प्रदीर्घ अनुभव घेऊन जाणूनबूजून अकार्यक्षम शेती करतो ज्यामुळे जगून वाचून राहण्याची काही तरी शक्यता राहील (Survival technology). ज्या ज्या वस्तूला वाजवी किंमत मिळाली त्या त्या वस्तूचे उत्पादन शेतकऱ्यांनी वाढवल, शेतीचे तंत्रज्ञान आत्मसात केले, नवे तंत्रज्ञान तयार केले अशी स्पष्ट उदाहरणे समोर आहेत. द्राक्षाच्या लागवडीबाबत महाराष्ट्रातील शेतकऱ्यास आज तोड नाही. अपुऱ्या किमती हे अकार्यक्षमतेचे मूळ कारण आहे. रास्त भाव मिळू लागल्याखेरीज उत्पादन खर्च कमी होणार नाहीत. उलट शेती जितकी तोट्यात राहील तितका उत्पादनखर्च वाढेल.

कार्यक्षमतेच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर आज या देशांतील कोणताही उत्पादक नाही. याचा अर्थ त्याचा खर्च भरून येऊ नये असे नाही. शेती फायद्याची करणे हाच कार्यक्षमता वाढविण्याचा मार्ग आहे. एकूण शेतीच्या सर्व दुःखांचे मूळ आर्थिक आहे; शेती मालाला भाव मिळू न देण्याच्या शासकीय नीतीत आहे. अनुदानांनी किंवा कार्यक्षमता वाढवण्याच्या तुटपुंज्या मलमपट्ट्यांनी हा रोग दूर होणारही नाही.

****

प्रकरण : १०

# एक कलमी मागणीचे अर्थशास्त्रीय परिणाम

शेतकरी संघटनेचा कार्यक्रम हा केवळ शेतकऱ्यांसाठी नसून एकूणच देशातील दारिद्र्य दूर करण्याचा कार्यक्रम आहे असं आपण सुरुवातीपासून मांडतो आहोत. शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळू लागला म्हणजे शेतकऱ्याचं दारिद्र्य दूर होईल. पण यामधून सगळ्या देशाचं दारिद्र्य कसे काय दूर होईल? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी शेतीमालाला भाव मिळाला म्हणजे त्याचे काय काय परिणाम होतील याचा थोडा अभ्यास केला पाहिजे. हे परिणाम तीन टप्प्यांत काय काय होणार आहेत हे पाहणार आहोत. त्यातला पहिला टप्पा अल्पमुदतीचा म्हणजे भाव मिळाल्यानंतरचा साधारण वर्षभराचा आहे, दुसरा टप्पा भाव मिळाल्यानंतरच्या दीर्घ मुदतीचा-साधारण दोन तीन वर्षांचा म्हणजे मध्यम मुदतीचा, तर तिसरा दीर्घ मुदतीचा- साधारण तीन ते पाच वर्षांच्या मुदतीचा धरू या.

यामधील अल्पमुदतीच्या परिणामांचा आपल्याला थोडाफार अनुभव आलेला आहे. पुणे आणि नासिक जिल्ह्यांमध्ये ऊस आणि कांद्याला भाव मिळाल्यावर काय काय परिणाम झाले? शेतकऱ्याच्या हाती पैसा आल्यावर त्यानं खाजगी गहाणवटीच्या जमिनी सोडवून घेतल्या. ग्रामीण भागात असं दिसून येतं की लग्न, दशपिंड वगैरे निमित्ताने घेतलेल्या फार थोड्या रकमेवर फार मोठी जमीन गहाणवट म्हणून अडकून पडलेली असते. तेव्हा प्रथमतः या गहाणवट जमिनी सोडवून घेतल्या जातात. अर्थात् या जमिनी गावातल्या बड्या, पुढारी मंडळींनी काही हिशेब मनाशी ठेवून घेतलेल्या असतात, त्या सुटल्यावर त्या मंडळीचा आपल्यावर थोडा रोष होतो.

दुसरा अल्पमुदतीचा परिणाम जो आहे त्याबद्दल आपण काळजी घ्यायला पाहिजे. एखाद्या मालालाच भाव चांगला मिळाला की त्याचं उत्पादन लगेच फार मोठ्या प्रमाणावर वाढवलं जात. यंदा उसाला भाव मिळायला लागला असं दिसल्यानंतर पुढच्या वर्षी उसाचं अमाप पीक येण्याचा धोका निर्माण झाला आहे.



त्यामुळे आपोआपच यंदा आपण जे मिळविण्याचा प्रयत्न केला त्याच्या थोडं, दोन पावलं मागं जायच तयारी ठेवावी लागेल. याच्यावर आपल्याला नियंत्रण ठेवावं लागेल-ती आपली जबाबदारी आहे. हे आपण कसं करू शकतो? आम्ही नासिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कांद्याच्या बाबतीत अशी विनंती केली की, ज्यांच्या बागायती जमिनी आहेत त्यांनी या वर्षी पोळ कांदा काढू नये. कांद्याचं - विशेषत: पोळ कांद्याचं पीक फार वाढायला लागलं तर फार वाईट परिणाम होतील. आपण सूचना देऊ शकतो; पण त्यापलीकडे काही तरी वेगळं धोरण आखलं पाहिजे. सध्या आपण एखाद्या वस्तूच्या भावाकरता आंदोलन करतो, कारण त्या एका वस्तूच्या भावाबाबत आंदोलन करणं हे आम्हाला डावपेचाच्या दृष्टीनं शक्य होतं. शासनानं भाव बांधून देताना केवळ आंदोलन होतं म्हणून त्या वस्तूचे भाव बांधून द्यायचे असं अर्धवट धोरण ठेवून चालणार नाही- त्याचे अत्यंत वाईट परिणाम होतील. आज चाकण भागात कांद्याचे भाव बांधून मिळाले पण भुईमुगाच्या भावाची शाश्वती नाही, मिरचीच्या भावाची शाश्वती नाही, ज्वारीच्याही भावाची शाश्वती नाही. त्यामुळे साहजिकच कांद्याचं उत्पादन वाढलं- शेतकरी एवढा शहाणा निश्चित आहे. वस्तुत: चाकणच्या पहिल्या आंदोलनाच्या जाहीरनाम्यात आम्ही सरकारकडे अशी मागणी केली आहे की, जिल्ह्यातल्या निदान ४ ते ५ वस्तूंच्या किमती बांधून द्याव्यात. अशा वस्तूंची यादी त्या त्या जिल्ह्यात वेगळी वेगळी असेल. उदाहरणार्थ पुणे भागात या यादीत कांद्याबरोबर हरभरा, भुईमूग, मिरची, ज्वारी हे पदार्थ आले पाहिजेत; नाशिकमध्ये ऊस आला पाहिजे, कांदा आला पाहिजे. असे पदार्थ निवडून काढून त्यांचे भाव बांधून दिले नाहीत तर एखाद्या मालाचे अतोनात उत्पादन होईल आणि त्यामुळे आजच्या अर्थयंत्रणेत शेतकऱ्याचे नुकसान होईल हा मोठा धोका आहे.

अल्पमुदतीतील आणखी एक परिणाम म्हणजे ज्यांना भाव मिळाला ती मंडळी जास्त चांगल बियाणं आणतात, खत अधिक प्रमाणात वापरतात, औषधांचाही चांगला वापर करतात. त्यामुळे त्यांच उत्पादनही वाढतं.

नासिक जिल्ह्यात दिसून आलेला परिणाम म्हणजे शेतकऱ्यांनी भराभरा सोसायट्यांची पीक-कर्जे फेडून टाकली. आज सगळ्या सोसायट्यांची सगळी कर्ज फिटलीत. कुणावर सोसायटीचं कर्जच राहिलं नाही.

आणखी एक परिणाम दिसून येतो तो म्हणजे आजवर पैसा नसल्यामुळे कधी

करायला मिळाल्या नाहीत अशा चैनमौजा करण्याची प्रवृत्ती पैसा हाती आल्यावर दिसून आली. अर्थात् चैनमौज या शब्दाचा अर्थ शेतकऱ्याच्या आजच्या जीवनमानाच्या मानाने मर्यादित आहे. यावेळी कारभारणीला शेतकऱ्यानं १०० रुपयांचं एक लुगडं आणलं तर ती आपण चैन धरू या. शहरामध्ये कारकुनी करणाऱ्या माणसाच्या बायकोलासुद्धा आज एका वेळी १० ते १२ साड्या असतात; हे लक्षात घेतलं तर ही काय मोठी चैन आहे असं म्हणण्याचं कारण नाही. हौसमौज करणं ही प्रवृत्ती शेतकऱ्यात निर्माण झाली तर चांगलंच होईल. याच्यापुढे शेतकऱ्याला मनात कुठतरी उत्साहानं जगावं असं वाटलं, चांगल्या गोष्टींचा उपभोग घ्यावा, कुटुंबातली आपली जी मुलंमाणसं आहेत त्यांच्यासाठी काहीतरी चांगलचुंगल आणावं अशी वृत्ती त्याच्यात वाढली की त्याची उत्पादनक्षमता वाढेल, त्याच्यात महत्त्वाकांक्षा, जाणीव निर्माण होईल आणि संघटनेची ताकद वाढेल.

प्रत्यक्षात वाढलेले भाव हातात पडण्यापूर्वीच शेतमजुराच्या मजुरीचे दर वाढले आहेत.

हे झाले अल्पमुदतीत दिसून आलेले परिणाम.

मध्यम मुदतीचे परिणाम : हाती पैसा आल्यावर शेतकरी आपल्या जमिनीत सुधारणा करू शकेल. कुणाला विहीर बांधायची जरूरी असेल तर ती त्याला बांधता येईल, बांधबदिस्ती मजबूत करून घेऊ शकेल. अशा प्रकारच्या कामात तो आपला पैसा वापरू शकेल. आज ज्वारी करणाऱ्याला भुईमूग काढता येत नाही कारण त्याला बियाण्याचा खर्च परवडत नाही; किंवा भुईमूग घेणाराला बटाट्याचे पीक घेता येत नाही कारण त्याला बियाण्याचा खर्च झेपत नाही. पण पैसा हाती आला म्हणजे जी पिकं मोठे शेतकरीच घेऊ शकतात अशी कल्पना असते त्या पिकांकडे शेतकऱ्याला वळता येईल.

त्याचप्रमाणे शेतकऱ्याला लहान लहान का होईना साठवणुकीची व्यवस्था करून मालाला संरक्षण देता येईल असे प्रयोग कोरियात झाले आहेत.

दीर्घ मुदतीमध्ये अत्यंत महत्त्वाचे परिणाम होतात. शेतीतून मिळणार फायदा पुरेसा नाही त्यामुळं याच्या पलीकडे कुठंतरी पाऊल टाकलं पाहिजे असं शेतकऱ्याला वाटू लागतं. साठवणुकीची व्यवस्था केल्यामुळे मालाला चांगला भाव- हंगामातला भाव न मिळता तुटवड्याचा मिळू लागला तरी फायदा पुरेसा नाही म्हणून काही तरी उद्योगधंदे सुरू करण्यामागे शेतकरी लागेल. ग्रामीण भागात लहान लहान का



होईनात, उद्योगधंदे सुरू होतील. कुणी पिठाची गिरणी घालेल, कुणी नुसती मिरची विकण्याऐवजी मिरचीची भुकटी करण्याचं यंत्र आणून त्यावर मिरचीची भुकटी करून ती प्लास्टिकच्या पिशवीत भरून बाजारात आणेल, नुसतेच शेंगदाणे विकण्याऐवजी कुणी तेलाची नवीन यांत्रिक घाणी घेईल, कुणी निदान खारे दाणे करून विकेल. अशा तऱ्हेचे छोटे छोटे उद्योगधंदे ग्रामीण भागात सुरू होतील. हा मालाला भाव मिळाल्यामुळे होणारा दीर्घ मुदतीचा एक मोठा परिणाम आहे.

या सगळ्या परिणामाचा नीट अभ्यास केला तर आपल्या असं लक्षात येईल की, ग्रामीण भागात पुरेसा रोजगार नसल्यामुळे जे दारिद्र्य आपल्या देशात निर्माण झालेले आहे ते वेगाने दूर होईल.

आजपर्यंत अशा तऱ्हेचे उद्योगधंदे चालू होऊन रोजगार उपलब्ध व्हायला हवेत हे सगळेजण मान्य करीत होते. पण असे उद्योगधंदे चालू करण्यासाठी जी योजना आखण्यात आली तिच्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यामध्ये त्यासंबंधी कचेऱ्या सुरू करण्यात आल्या. पण शेतकऱ्यांकडे भांडवलच नसल्यामुळे तो काही उद्योगधंदे सुरू करू शकला नाही. शाळा-कॉलेजात शिकून इंजिनियर वगैरे झालेली मुलं त्यांच्या हाती थोडंफार भांडवल दिलं तर ग्रामीण भागात जाऊन कारखाने, उद्योगधंदे सुरू करतील अशी सरकारची कल्पना होती. पण प्रत्यक्षात असं काहीच झालं नाही. मुळात ग्रामीण भागात जर कारखानदारी व्हायची असेल तर ती ग्रामीण जीवनात रूळलेल्या, वसलेल्या माणसाकडनंच होईल. त्यामुळे ग्रामीण भागात उद्योगधंदे, रोजगार सुरू करण्याचा एकमेव उपाय म्हणजे ग्रामीण भागात राहणाऱ्या मंडळीच्या हाती भांडवल खेळते ठेवणे हा आहे. त्यासाठी त्यांचे आता चालू असलेले शोषण थांबवून त्यांच्या मालाला योग्य भाव देणे आवश्यक आहे.

****

प्रकरण : ११

# संघटनेची मागणी आणि ग्राहक

शेतीमालाला रास्त भाव न देण्याच्या नीतीमुळे उत्पादन व रोजगार याजवर विपरीत परिणाम घडून येतात. देशातील भयानक दारिद्र्य हे या नीतीचाच परिणाम आहे. शेतीमालाला योग्य भाव मिळाले तर हे दुष्परिणाम दूर होतील व गरिबी हटेल. देशाचा अंतर्गत रोग दूर झाल्यामुळे देश निसर्गसुलभतेने विकासाच्या पायऱ्या गाठील हे आपण पाहिले.

तरीही 'शेतीमालाला रास्त भाव' या मागणीला काही मंडळींचा प्रखर विरोध असतो. ही मंडळी मुख्यत: शहरी सुखवस्तू वा मध्यम वर्गातली असतात; विविध व्यवसायातली पण मुख्यत: नोकरी पेशाची असतात. शेतकरी संघटनेच्या विचारावर त्यांचे अनेक आक्षेप असतात. त्यातील प्रमुख दोन पुढीलप्रमाणे आहेत.

१) शेतीमालाला भाव वाढवून दिले तर कच्च्या मालाचे दर वाढतील. परिणामत: कारखानदारी मालाचे भाव वाढतील. त्यामुळे उत्पादनखर्च वाढल्याने शेतीमालाचे भाव पुन्हा वाढवून द्यावे लागतील. हे असे दुष्टचक्र चालू झाले तर भयानक चलनवाढ होईल.

२) शेतीमालाला भाव वाढवून दिले तर ग्राहकाला द्याव्या लागणाऱ्या किमतीही वाढतील. मध्यमवर्गीय ग्राहक आधीच कठीण ओढाताणीत सापडलेला असतो. खाद्यपदार्थांचे भाव वाढल्यास त्याला जगणेच अशक्य होईल.

या आक्षेपांचा आता बारकाईने विचार करू.

पहिला आक्षेप चलनवाढीसंबंधीचा. क्षणभर असं समजू या की हा आक्षेप तर्कशुद्ध आहे, योग्य आहे. म्हणजे असं मानू या की शेतीमालाचे भाव वाढल्याने चलनवाढ होणार आहे, तरीसुद्धा शेतीमालाला रास्त भाव मिळू नयेत-त्याचा उत्पादनखर्च भरून येऊ नये किंवा शेतकरी तोट्यातच राहिला पाहिजे असा निष्कर्ष त्यातून काढता येणार नाही.



शेतकरी जास्त भाव मागत नसून रास्त भाव मागत आहेत. शेती फायद्यात चालत असती आणि फायदा अधिक व्हावा अशी मागणी असती तर चलनवाढीचा धोका लक्षात घेऊन ती फेटाळणे योग्य झाले असते; पण चलनवाढीचा तथाकथित धोका टाळण्यासाठी ८० टक्के लोकांनी आपला व्यवसाय-शेती-तोट्यात चालवावा असे म्हणणे विपरीत होईल. किंबहुना प्रचलित अर्थव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी-तीत चलनवाढीचा दोष निर्माण होऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी रास्त भावापेक्षा कमी भाव स्वीकारले पाहिजेत म्हणजे कायमचे तोट्यात, दारिद्र्यात राहिले पाहिजे अशी जर परिस्थिती असेल तर 'जळो ती अर्थव्यवस्था. तिचा शेवट जितक्या लवकर होईल तितके चांगले' असेच म्हणावे लागेल.

पण शेतीमालाला भाव वाढवून दिल्यामुळे कारखानदारी मालाच्या किमती वाढणे खरोखरच अपरिहार्य आहे काय? कच्च्या मालाची किंमत कारखानदारीच्या एकूण खर्चाच्या किती टक्के असते?

१५ रुपये किमतीच्या कापसाचे कापड १५० रुपयांचे होते. ५ रु. किमतीच्या तंबाखूपासून ११० रु. च्या विड्या बनतात.

कच्च्या मालाच्या किमतीतील वाढ ही कारखानदारीच्या एकूण पसाऱ्यात आणि फायद्याच्या मोठ्या आवाक्यात सहज सामावून जाण्यासारखी आहे.

अन्नधान्याच्या, भाजीपाल्याच्या किमती वाढल्या म्हणजे ग्राहकांना द्याव्या लागणाऱ्या किमती आपोआप वाढतील ही कल्पना मुळात चूक आहे. दुसऱ्या आक्षेपाचा विचार करताना ही कल्पना आपण तपासून पाहणार आहोतच. पण सध्या एवढे म्हणणे पुरे की शेतीमालाच्या भावाच्या वाढीमुळे कारखानदारी मालाचे भाव वाढणे अपरिहार्य नाही.

याउलट शेतीमालाचे भाव न वाढताही कारखानदारी मालाचे भाव सतत वाढत असतात असे दिसून येते. कापूस एकाधिकार खरेदी चालू झाल्यापासून सात वर्षे कपाशीची किंमत स्थिर राहिली. एवढेच नव्हे तर दोन वर्षे ती प्रत्यक्षात घसरली तरीसुद्धा कापडाचे भाव याच काळात किती वाढले?

शेतीव्यतिरिक्त इतर क्षेत्रात मालाच्या भावात वाढ होते. ती देशातील आर्थिक व्यवस्थेमुळे, चलनवाढीमुळे, करांबद्दलच्या धोरणांमुळे. ही वाढ सतत चालू आहे. शेतीमालाचे भाव जवळ जवळ स्थिर असूनही ही भाववाढ झालेली आहे.

चलनवाढीचे चक्रही चालूच राहिले आहे. या चक्राचे तडाखे फक्त शेतकरी सहन करीत राहिला आहे. त्या चक्राचे जे फायदे आहेत त्यापासून मात्र तो अनेक वर्षे वंचितच राहिला आहे.

चलनवाढीच्या पुराचे पाणी वाढतच आहे. शेतकरी सोडून बाकी सगळे पाण्याच्या पातळीबरोबर तरंगत वर चढू शकतात. शेतकऱ्याचे पाय मात्र खाली बांधून ठेवलेले आहेत. त्याच्या खांद्यावर उभे राहून इतर आपली डोकी पाण्याच्या वर ठेवत आहेत आणि तोही वर आला तर आपण बुडू असा ओरडा करीत आहेत. ही व्यवस्था चालू शकणार नाही.

दुसरा आक्षेपही चुकीच्या पायावर आधारलेला आहे. शेतकऱ्याला मिळणारा भाव व ग्राहकाला द्यावी लागणारी किंमत यांचा तसा प्रत्यक्ष संबंध फार तोटका आहे.

शेतकऱ्याला मिळणारा भाव व ग्राहकाला द्यावी लागणारी किंमत यात फार मोठी तफावत असते. कांद्याचा भाव चाकण येथे १९७७-७८ साली १४ ते १५ रुपये क्विंटल झाला होता तेव्हा पुण्याला डेक्कन जिमखान्यावर तोच कांदा १ रु. २० पैसे किलोने किरकोळीत विकला जात होता.

यावर नैसर्गिक आणि ताबडतोबीची प्रतिक्रिया अशी की हा सगळा व्यापारी, दलाल इत्यादी मध्यस्थांचा खेळ आहे. या मध्यस्थांना काढून टाकले, सहकारी वा सरकारी यंत्रणा उभारली म्हणजे ही लूट थांबेल.

प्रत्यक्षात जेव्हा सरकार मध्यस्थीची कामे करायला उतरले (उदा. गहू) किंवा यासाठी सहकारी यंत्रणा उभारण्यात आली (उदा. कांदा, तंबाखू, ऊस) त्या त्या वेळी अनुभव असा आला की, व्यापाऱ्यांची नफेखोरी परवडली पण सहकाऱ्यांची आणि अधिकाऱ्यांची नफेखोरी नको.

भारत व इंडिया यातील दरीमुळे मध्यस्थाच्या कामात प्रचंड फायद्याची संधी तयार असते. भारतातल्या परिस्थितीत शेतकऱ्याला जी कमीत कमी किंमत देऊन चालेल ती द्यायची. इंडियातल्या परिस्थितीत ग्राहकाकडून जास्तीत जास्त जी किंमत उकळता येईल ती उकळायची.

ज्या देशात कंबरेत वाकलेली म्हातारी पाच पैशाचे नाणे हातातून पडले तर खाली बसून धूळ सावडून नाणे सापडल्याखेरीज पुढे जात नाही तेथे माल विकत घ्यायचा आणि जेथे लहान मुलेसुद्धा एका संध्याकाळच्या मौजमजेसाठी पाचपन्नास रुपये सहज खर्चतात तेथे तो माल विकायचा. व्यापारी मध्यस्थांना तस्करांची संधी आणि धोका मात्र काहीच नाही.



इंडियातील उत्पन्नाची पातळी आणि भारतातील उत्पन्नाची पातळी यातील तफावतीमुळे शेतकऱ्याच्या भावात आणि ग्राहकाच्या किमतीत तफावत पडते. येथून स्वित्झर्लंडमध्ये भुईमूग पाठवला. येथे ८ रु. किलो, पाठवण्याचा खर्च ४ रु. किलो. पण तेच दाणे स्विझर्लंडमध्ये काही १२ रु. किलोने विकले जात नाहीत, ते विकले जातात ५२ रु. किलोने. ही स्वीस किंमत ठरली तेथील अर्थकारणाने, तुल्य वस्तूंचे भाव आणि ग्राहकांची ताकद लक्षात घेऊन.

शेतकऱ्याला जितकी किंमत जास्त दिली जाईल तितका मध्यस्थांचा फायदाच कमी होत जाईल. कारण ग्राहकाकडून जास्तीत जास्त जे उकळता येण्यासारखे आहे ते आजही उकळले जात आहे. त्यात वाढ करायला फारसा वाव नाही. शेतीमालाला भाव देताना शहरी उत्पन्नावर योग्य नियंत्रण ठेवले तर ग्राहकावर काहीही विपरीत परिणाम होणार नाहीत; किमतीची पातळीही वाढणार नाही. केवळ मध्यस्थांची नफेखोरी आटेल.

ग्राहकांच्या प्रश्नांवर विचार करताना आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावयास हवी. 'ग्राहक' हा शब्द वापरताना आपल्या डोळ्यासमोर केवळ शहरी, सुखवस्तू ग्राहकच उभा राहतो. ग्राहक केवळ 'इंडिया'तच आहेत असे नाही. भारतातही ग्राहक आहे. शेतकरी हा सर्वात मोठा ग्राहक आहे. त्याच्या गरजा प्रचंड आहेत. दारिद्र्य अपार आहे. पण क्रयशक्ती नाही. रास्त भावाने त्याच्या हाती क्रयशक्ती येणार आहे आणि शतकांची भूक भागविण्याची शक्यता प्रथम निर्माण होणार आहे. ग्राहकाचा म्हणून जर विचार करावयाचा असेल तर ग्राहकाचे रास्त भावाच्या कार्यक्रमाने कल्याण होणार आहे. ग्राहक म्हणून जर आपण मूठभर शहरी पांढरपेशाचाच विचार करणार असलो तरीही त्यांचे अकल्याण काहीच होणार नाही.

आणि समजा या शहरी ग्राहकांना द्याव्या लागणाऱ्या किरकोळ किमती वाढल्या तर असे कोणते आभाळ कोसळणार आहे? शहरातील कमी कष्टाचे बौद्धिक तसेच शारीरिक काम करून शेतकऱ्यांच्या मानाने ते आनंदात दिवस काढत आहेत.

आंदोलनाविषयी एक ग्राहक तक्रार करीत होते. त्यांना स्पष्ट सांगितले, 'तुमची अडचण होणार आहे हे मान्य. पण मला सांगा तुम्हाला सदरे किती आणि तुमच्या पत्नीकडे साड्या किती आहेत? शेतकरी आंदोलन त्यांच्यासाठी आहे ज्यांच्याकडे दोन जुनी लुगडी एकत्र शिवून वापरले जाते. तुमच्याकडे घालायला दोनच चांगले शर्ट आहेत आणि दोनच धड साड्या आहेत अशी वेळ आली म्हणजे आपण तुमच्या परिस्थितीचाही विचार करू. दुधाचे भाव वाढल्याने लहान मुलांचे दूध कमी करावे लागेल याची चिंता अनेकांना वाटते. पण दूध उत्पादक शेतकरी क्वचितच घरच्या पोराबाळांकरता कपभर दूध ठेवतो याची जाण कोण ठेवतो!

भारत व इंडिया यातील असमतोल दूर करावयाचा असेल तर भारतातील परिस्थिती सुधारावी लागेल. क्वचित इंडियातील परिस्थिती काही प्रमाणात अनाकर्षक करावी लागेल, त्यात बिघडले कोठे? शहरी वाढीने निर्माण होणारे प्रश्न सोडवायला त्याने मदतच होईल. ज्वारीला व भाताला योग्य भाव मिळाला तर झोपडपट्ट्यांचा आणि फुटपाथवासीयांचा प्रश्न सोडविता येईल- अन्यथा नाही.

या एकूण कार्यक्रमात, मला वाटते सर्वच ग्राहकांचा एक मोठा फायदा होणार आहे. प्रचलित व्यवस्थेत उत्पादन वाढल्यावर त्यातून तयार होणारे उत्पन्नाचे स्त्रोत प्रस्थापितांकडेच जातात. ऊस वाढला, उत्पन्न गेले मधुमेहाच्या रोग्यांकडे आणि ३० टक्के लोकांना साखर पाहायला नसली तरी ओरडा होतो अति उत्पादनाचा; अगदी प्रकांड पंडित अर्थशास्त्रज्ञसुद्धा या कांगाव्यात सामील होतात.

क्रयशक्तीच्या विस्तारामुळे देशातील बाजारव्यवस्थेत मोठा फरक पडू शकेल. मर्यादित बाजारपेठेसाठी मर्यादित उत्पादन करायचे व दर वस्तूमागे जास्तीत जास्त नफा मिळवायचा ही आजची सरकारनीती आहे. त्याऐवजी उद्योजकांना उत्पादन जास्तीत जास्त करून दर वस्तूमागे किमान फायदा घेऊन विक्री वाढविण्याची नीती स्वीकारावी लागेल आणि त्यातून कारखानदारी मालाच्या किमती उतरताना दिसू लागतील.

****



प्रकरण : १२

# संघटनेचे सध्याचे स्वरूप

आपल्याला शेतकऱ्यांची संघटना निर्माण करायची आहे. अशी संघटना निर्माण करताना आपल्याला अनेक अडचणींना तोंड द्यावं लागणार आहे.

गेल्या वर्षभरातील यश आणि अपयश यांच्या अनुभवावरून असं दिसून येतं की, आपली सगळ्यात मोठी अडचण म्हणजे आपण ग्रामीण भागात काम करतो आहोत. वेगवेगळ्या खेड्यांतील अंतर खूप मोठी आहेत. अनेक खेड्यांमध्ये पावसाळ्याच्या ६/७ महिन्यांत जाताही येत नाही अशी परिस्थिती आहे. एखाद्या जिल्ह्यापुरत जर शिबिर घ्यायचं ठरवलं तरी सगळ्या गावांतून निरोप द्यायचा म्हणजे केवढं प्रचंड काम आहे! त्या दृष्टीनं कामगारांची संघटना बांधणं ही सोपी गोष्ट आहे. कारखान्याच्या गेटसमोर एकेका पाळीच्या सुटण्याच्या वेळी एकदा मिटिंग घेतली की सगळ्यांना निरोप कळतो. लगेच सगळे कामगार तुमच्या बाजूला येतील असं नाही; पण निदान निरोपाचं तरी काम होतं. पण निरोप जाणं हीच मुळात शेतकरी संघटनेच्या बाबतीत अत्यंत कठीण गोष्ट आहे.

एखाद्या गावात गेल्यावर त्या गावातील मंडळींना एकत्र आणण्याचे काम होईल किंवा नाही याची शाश्वती नसते. दोन शेजारच्या गावात भांडण आहेत, या गावची माणसं आली तर त्या गावची येत नाहीत, गावातली या घरची आली तर त्या घरची येत नाहीत, गावातली आली तर वाड्यातली येत नाहीत आणि वाड्यातली आली तर गावातली येत नाहीत असे अनेक प्रकारचे वादविवाद ग्रामीण भागात इतके आहेत की, त्या सगळ्या शेतकऱ्यांना एकत्र आणणे ही गोष्ट कठीण आहे आणि सगळे फरक आणखी ठळक करण्याकरता राजकीय पक्षांनी आता प्रत्येक गावात आणखी फटी पाडून ठेवल्या आहेत. अमुक एक मनुष्य- समजा पाटील अमुक एका पक्षाच्या माणसाबरोबर गेला की सरपंच आणि त्याची माणसं नेमकी उलट्या बाजूला जाणार. हे वाद इतके विकोपाला नेऊन राखले आहेत की एखाद्या गावात जाऊन तुम्ही एखाद्या माणसाला भेटलात आणि तो जर

म्हणाला की मी शेतकरी संघटनेच्या विरुद्ध आहे, तर लगेच दुसरे येऊन म्हणणार आम्ही शेतकरी संघटनेच्या बाजूचे आहोत. गावागावामधील भांडणं, वादविवाद, शेतकऱ्या-शेतकऱ्यातील फरक-उसाचा शेतकरी, शाळूचा शेतकरी, बागायती शेतकरी, मळेवाला, हरभऱ्याचा शेतकरी असे फरक, धर्माचे फरक आहेत, जातीचे फरक आहेत, पक्षांचे फरक आहेत. असे एकेका गावामध्ये शेतकऱ्यांचे हे वादविवाद त्यांना एकत्र आणण्यातील अडचणी आहेत.

एखाद्या गावात जाऊन तुम्ही बसलात आणि शेतकरी संघटनेच्या प्रचाराला सुरुवात केलीत तर तुमच्या असं लक्षात येईल की, काही विशिष्ट गटाचीच मंडळी आल्याचे तुम्हाला दिसेल. हा आला म्हणून तो येत नाही अशी परिस्थिती असल्यामुळे तुम्हाला दोघांना वेगळ वेगळ भेटावं लागेल - त्यांना सांभाळून आणावं लागेल. तरीसुद्धा बैठकीला बसल्यावर ज्या त्या शेतकऱ्याच्या विचाराची पद्धत अशी असते की, आपली जी वैयक्तिक अडचण आहे ती या शेतकरी संघटनेकडून सोडवून घ्यावी. मग कुणाला आपली मामलेदार ऑफिसमध्ये अडकून पडलेली केस सोडवून घ्यावीशी वाटते, तर कुणी आपल्या गावाला लिफ्ट योजना मिळवावी असं म्हणतो. कारण त्याखाली त्याची आणि आणखी ५/१० जणांची जमीन भिजते-बाकी लोकांना नाही का पाणी मिळेना! कुणी वीज मिळत नाही म्हणून तक्रार करतो. ज्याला त्याला असं वाटतं की आता शेतकऱ्यांचं वेगळं काही करू म्हणतायत तर आपण यातनं आपला व्यक्तिगत प्रश्न सोडवून घेता येतो का बघू या. अशी फक्त स्वत:पुरतं पाहण्याची दृष्टी आज शेतकऱ्यांत आहे. याचं कारण शेतकऱ्यांना आज सर्वसाधारणपणे आपल्याला काही हक्काने मागून मिळेल, आपण ताठ मानेने जगू शकू अशी आशाच उरलेली नाही. कुणी जर गावात आलं तर याच्याकडून काही भीक मिळते का, कुठे कर्जाची सोय होते का, काही धर्मदाय मिळतं का, त्यामुळे आजचा दिवस निभून उद्याचा बघायला मिळतो का इतक्या लाचारीच्या पायरीला शेतकरी गेलेला आहे.

वेगवेगळी गावे लांबलांब अंतरावर आहेत. शेतकऱ्यांच्यात पराकोटीचे वादविवाद आहेत, आपल्या नशिबातच काही नाही तेव्हा कुठं याचना करून आपलं तरी भलं करता येतं का ते पाहू अशी शेतकऱ्यावर लादली गेलेली लाचार वृत्ती या अडचणींवर मात करून संघटना कशी बांधता येईल यावर खूप विचार करायला हवा.



गावे लांब लांब अंतरावर असल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी आम्ही वेगळे वेगळे उपाय योजून पाहिले. अर्थात सगळीकडे सारखेच उपाय योजता येतील असे नाही. प्रत्येक भागात त्या भागातील परिस्थिती पाहून उपाय अमलात आणावे लागतील.

आपण संघटना करताना जिल्हा किंवा तालुका अशा पातळीवर करता कामा नये. रेव्हेन्यू खात्याच्या ज्या हद्दी आहेत त्या आणि शेतकरी संघटनेची व्यवस्था यांचा काहीही संबंध नाही. आपण शेतीमालाच्या भावाकरता प्रयत्न करतो आहोत तेव्हा आपलं केंद्रस्थान त्या मालाची बाजारपेठ असली पाहिजे. आजूबाजूच्या वेगवेगळ्या गावाची मंडळी त्या ठिकाणी आठवड्यातून एकदा-दोनदा येतात. आपली जी काय कार्यकर्ती मंडळी असतील ती बाजाराच्या दिवशी बाजाराच्या आसपास असायला हवी. नाही म्हटलं तरी जाणाऱ्या येणाऱ्या मंडळींचा तिथं संपर्क होतो आणि निरोप पाठवता येतो. आम्ही चाकणला एक प्रयोग करून बघितला. बाजाराच्या जवळ शेतकरी संघटनेचं नावाला का होईना एक छोटसं कार्यालय काढलं आणि सगळीकडे निरोप पाठविले की, 'प्रत्येक गावच्या माणसानं बाजाराला आल्या आल्या इथं डोकावून जायचं' पण त्याचा उपयोग फार मर्यादित झाला. कारण येणारी मंडळी धावत पळत येतात आणि मग त्यांनी घेतलेला निरोप नेहमीच पोचतो असं होत नाही. मग कळवलं की, 'बाजार संपल्यावर इथं येऊन अर्धा पाऊण तास बसत जा.' हाही प्रयोग यशस्वी झाला नाही. याचा फारसा परिणाम दिसून न आल्यामुळे आम्ही बाजारच्या दिवशी निघणारं छोटंसं साप्ताहिक काढलं आणि सबंध तालुक्यामधील प्रत्येक गावात, मग तेथे कुणी वर्गणीदार असो, नसो त्याच्या एक दोन प्रती गेल्याच पाहिजेत अशी व्यवस्था केली. या प्रती आम्ही गावागावांत जाऊन दोन तीन तरुण मंडळी निवडून त्यांच्या नावे पाठवायला सुरुवात केली आणि त्यांच्यावर अशी जबाबदारी टाकली की, हे साप्ताहिक आल्यानंतर गावातल्या सगळ्या मंडळींना एकत्र करून संपूर्ण वाचून दाखवायचं. कारण गावात वाचता न येणारी मंडळीच जास्त. साप्ताहिकातील माहिती वाचून समजावून दिली पाहिजे आणि एखादी गोष्ट समजावून देणं जमलं नाही तर ती आपल्याला समजली नाही असं लिहून कळवलं पाहिजे अशी त्यांच्यावर जबाबदारी टाकली. याचा उपयोग चांगल्या तऱ्हेने होऊ लागला. या साप्ताहिकाचा दुसरा एक चांगला परिणाम झाला. गावच्या शेतकऱ्यांना ज्या अनेक अडचणी येतात-

सरकारी अधिकारी त्रास देतो किंवा व्यापारी त्रास देतो अशासारख्या ज्या अडचणी येतात त्या आमच्याकडे लिहून येऊ लागल्या. ज्या शेतकऱ्यांनी आमची नावं छापू नका असं सांगितलं त्यांच्या तक्रारीसुद्धा आम्ही पूर्ण चौकशी करून नावाशिवाय छापल्या. कांदा आंदोलनानंतर शेतकरी संघटनेचा दबदबा इतका वाढला की या साप्ताहिकामध्ये छापलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल चटकन घेतली जाऊ लागली. त्यामुळे लोकांनाही या साप्ताहिकामध्ये स्वारस्य वाटू लागलं.

एखाद्या भागातील दारिद्र्य इतकं पराकोटीचं असतं की तिथे शेतीमालाच्या विक्रीचा प्रश्न बाजूलाच राहतो पण खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी इतरत्र रोजगार शोधावा लागतो. अशा ठिकाणी भावाच्या आंदोलनाची पाळीच येत नाही. मग अशा ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी काय तसंच बसून राहायचं नाही. त्या भागामध्ये ज्या स्थानिक आणि सामायिक अडचणी असतील त्या घेऊन आंदोलन केलं पाहिजे. आम्ही तीन विषय मुख्यत: निवडले आहेत. रस्ता, वीज आणि पाणी. यात कुठं वादाला वाव नाही. हे प्रश्न सुटले तर सगळ्या भागाचा फायदा होणार आहे. तेव्हा हे किंवा ज्यांच्यावर एकमत होऊ शकेल असे प्रश्न हातात घेऊन स्थानिक पातळीवर आंदोलन उभं करून तिथं संघटना बांधली पाहिजे. एखादा अंमलदार जर जुलूम करत असेल तर त्याच्या विरुद्धही स्थानिक पातळीवर आंदोलन उभारायला हरकत नाही. याखेरीज कुणाचंही खाजगी काम हातात घ्यायचं नाही– मग त्याला कितीही वाईट वाटो. कुणी म्हणाला, 'माझी अमुक अमुक अडचण आहे, निस्तरा,' तर सरळ सांगून टाकायला पाहिजे, 'माझ्याकडून व्हायचं नाही.' उगीच खोटं हो म्हणून चालणार नाही. आजवर लोकांना अनेक पुढाऱ्यांनी 'हो हो बघतो, करतो' असं सांगून बनवलेलं आहे. त्यामुळे तुमच्यासारखा माणूस भेटला आणि त्यानं सांगितलं, 'माझ्या हातान हे व्हायचं नाही' तर त्याला तितकं वाईट वाटत नाही असा माझा अनुभव आहे. उलट ते म्हणतात, 'प्रामाणिक आहे. पहिल्याच झटक्यात सांगून टाकलं.' तेव्हा खाजगी कामं किंवा गावातल्या एखाद्या गटाची कामं घ्यायची नाहीत. ज्या प्रश्नाबाबत एकमत आहे तो घेऊन आंदोलन उभं करायला हरकत नाही.

परंतु मुळात शेतीमालाला भाव मिळवून घेणं हे शेतकरी संघटनेचं एक कलमी धोरण आहे हे लक्षात ठेवलं पाहिजे.

संघटना बांधताना किंवा आंदोलन उभं करताना आणखी एक विलक्षण त्रास



होतो. प्रत्येक गावात वेगवेगळ्या पक्षांची मंडळी असतात. त्यांच्या मनात शेतकरी संघटनेविषयी एक शंका निर्माण होते आणि सध्या शेतकरी संघटनेचा प्रसार ज्या गतीनं होतो आहे हे पाहून त्यांना फारच भीती वाटते की, हे आपल्या तोंडचा घास काढून घेतायत की काय किंवा आपल्या तोंडातील हाडूक काढून घेतात की काय? आपली शेतकरी संघटना म्हणजे राजमार्गाने चाललेला हत्ती आहे. आजूबाजूच्या कुणालाही हे आपलं हाडूक घेऊन जातायत की काय अशी भीती पडण्याचे कारण नाही. आपली पक्षाविषयीची भूमिका स्पष्ट आहे. शेतीमालाला भाव मिळण्याबाबत सर्व पक्षांचं धोरण सारखंच आहे– शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळता कामा नये असं आहे. त्यामुळे त्यांच्यातून चांगली वाईट निवड करायला कुठे वाव नाही. पण म्हणून काही पक्षांच्या सगळ्याच लोकांना आपण दूर फेकायचे नाहीत. आपण संघटना करायला निघालो आहोत. तुमच्या असं लक्षात येईल की, प्रत्येक गावामध्ये चांगली चांगली माणसं उत्साहाच्या भरात पण खऱ्या कळकळीनं, सदिच्छेनं, कोणत्या ना कोणत्या पक्षाचं काम करायला लागली आहेत– कोणत्या ना कोणत्या पक्षात गेलेली आहेत. तिथं गेल्यावर त्यांच्या मनात जाणीव झालेली आहे की, आपण करायला गेलो एक आणि भलतंच काहीतरी निवडणुकीचा प्रचार करत बसलो आहोत; आपल्याला जे काही साधायच होतं, समाजाचं कल्याण करायचं होतं ते काही यातनं होत नाही. शेतकऱ्यांचं काही भलं होत नाही हे त्याला कुठतरी खुपतं. पण आता ही मंडळी कुठंतरी सरपंच, सभापती किंवा आमदार होता येईल अशा कसल्यातरी स्वप्नात अडकली आहेत. म्हणजे चांगल्या हेतूनं निघाले देवाच्या आळंदीला आणि येऊन पोहोचले चोराच्या आळंदीला अशी त्यांची गत झालेली आहे. ही मंडळी आपल्याला तोडून चालणार नाही. आपल्या कामाला ती लावायची आणि आपण त्यांच्याबद्दल एक धोरण ठेवलं पाहिजे की– तू कोणत्या पक्षाचा? –इंदिरा पक्षाचा काय? ठीक आहे. तुझा काय वीस कलमी कार्यक्रम आहे का? फार छान. आमच्या या एका कलमापुरता तू आमच्याबरोबर राहा. मग तुझी जी काय बाकीची कलमं असतील ती तू, तुझा पक्ष आणि निवडणुका बघून घ्या. आम्ही काय तुमच्याविरुद्ध निवडणुका लढवायला येणार नाही किंवा डाव्या आघाडीचा कुणी असला तर– तुझा काय चाळीस कलमी कार्यक्रम ना? ठीक. आमच्या एका कलमापुरता तुझा पक्ष बाजूला ठेव; मग तुझी ती कलमं, पक्ष आणि निवडणुका तुझं तू पाहून घे, आम्ही त्यात

ढवळाढवळ करायला येणार नाही.

नासिक जिल्ह्यामध्ये दोन लाख शेतकरी उभे राहिले. त्यात वेगवेगळ्या पक्षांच्या बाजूचे लोक आहेत. माझ्या अगदी जवळच्या सहकाऱ्यांमध्येसुद्धा इंदिरा काँग्रेस, अरस काँग्रेस, जनता, डावे उजवे कम्युनिस्ट, भाजप अशा सर्व पक्षांची मंडळी कमी अधिक प्रमाणात आहेत; लक्ष्मण पगारसारखा नक्षलवादीसुद्धा आहे. या सगळ्या लोकांनी कबूल केलं आहे की, शेतीमालाला भाव मिळविण्याच्या प्रश्नाबाबत आम्ही शेतकरी संघटनेच्याच बाजूचे राहू. त्या आमचे पक्षभेद आड येऊ देणार नाही. या पद्धतीने आपल्याला कार्यकर्ते गोळा करायला हवेत.

संघटना बांधत असताना दुसरी महत्त्वाची गोष्ट आपल्याला अशी करायला पाहिजे की, कोणत्याही गावामध्ये गेल्यानंतर जितक्या लवकर जमेल तितक्या लवकर गावातील शेतकरी स्त्रियांमध्ये आपल्या विचाराचा प्रसार होण्याची व्यवस्था करणे. यासाठी स्त्री-कार्यकर्त्या तयार करायला पाहिजेत. आपलं आंदोलन जर गावात खऱ्या अर्थानं पसरायचं असेल तर ते शेतकरी स्त्रियांपर्यंत पोहोचल्याखेरीज पसरायचं नाही. आज नासिक जिल्ह्यात संघटना अशा प्रकारे स्त्रियांपर्यंत पोहोचली आहे. नासिक जिल्ह्यात एखाद्या खेडेगावात गेलो की गावातल्या सगळ्या स्त्रिया हातातलं काम टाकून येतात. हे जेव्हा घडतं तेव्हाच खरी जागृती होते. आजपर्यंत राजकीय प्रचाराची पद्धत अशी राहिली आहे की कुणी पुढारी गावात आला की बायका आधी घरात पळून जातात आणि दारं लावून घेतात. मग कुणी तरी दोन माणसं पकडून त्यांना लोकं जमा करून आणायला पिटाळायचं. मग जी काय सभा असेल ती व्हायची. संतमार्गाच्या वेळी किंवा भक्तिमार्गाच्या वेळी ज्याप्रकारे गावातील शेतकरी आणि त्याच्या घरची मंडळी निर्भयपणे कोणतीही शंका मनात न बाळगता एकत्र जमतात त्याच पद्धतीनं आज नासिक, धुळे भागांत लोक शेतकरी संघटनेच्या कामासाठी एकत्र येऊ लागले आहेत. याचा अर्थ असा की आता शेतकरी संघटना मोडली जाऊ शकणार नाही.

संघटना बांधत असताना एखाद्या गावामध्ये चुकून जरी तुम्ही एखाद्या गटाच्या माणसाचा हात धरून गेलात तरीसुद्धा लवकरात लवकर दुसऱ्या गटाच्या माणसांशी संपर्क साधून तुम्ही काही त्या गटाकरताच आलेले नाही याची खात्री पटवून दिली पाहिजे. हे जर लवकरात लवकर केले नाही तर गावातले निम्मे लोक आपोआपच तुमच्या विरुद्ध जातील. हे अजिबात होता कामा नये.



गावामध्ये जो वाडा-हरिजनवाडा असतो- आम्ही त्याला राजवाडा म्हणतो- तेथील मंडळी, आजूबाजूला काही आदिवासी मंडळी असतील तर ती मंडळी यांच्याशीही लगेच संबंध जोडायला हवेत. नाहीतर ताबडतोब त्यांची अशी समज होईल की हे फक्त बड्या मंडळींसाठी आहे, आपल्याला यातनं काही मिळणार नाही. जर शेतकरी संघटनेतर्फे एखादी योजना तुम्ही राबवत असाल, रस्ता-पाणी-वीज यासारखी- तर तिचा फायदा पहिल्यांदा अशा वस्त्यांना मिळेल याची काळजी घेतली पाहिजे. धाकट्या भावाला थोडं जास्त लाडानं वाढवावंच लागतं. आईसुद्धा त्यातल्या त्यात लहान मुलाची जास्त काळजी घेते. हरिजन आणि आदिवासींच्या प्रश्नांकडे आपल्याला त्याच दृष्टीनं बघायला पाहिजे.

एखादी संघटना म्हटली की आज आपल्या डोळ्यासमोर एक विशिष्ट चित्र उभ राहतं. पण जर आताच आपण शेतकरी संघटना म्हणजे एक कचेरी काढायची, तिथं अध्यक्ष नेमायचा, एक कार्यकारिणी निवडायची, लेटरहेड काढून त्यावर सगळयांची नावं छापायची अशा आतापर्यंत चालत आलेल्या पद्धतींनीच चालणारी एक यंत्रणा आहे असं तिला स्वरूप देण्याचा प्रयत्न करू गेलो तर आजवर राजकीय पक्षांचं जे वाटोळं झालं तेच शेतकरी संघटनेचंही होईल. आज आम्ही संघटनेची घटनासुद्धा लिहून काढलेली नाही. आम्हाला आमचं उद्दिष्ट ठाऊक आहे. 'शेतीमालाला भाव मिळविणे' हा आमचा एक कलमी कार्यक्रम आहे. त्यापलीकडे वेगळी काही योजनासुद्धा केलेली नाही. आम्ही निधीसुद्धा गोळा केलेला नाही. कारण असा निधी गोळा झाला म्हणजे त्याभोवती स्वार्थी लोक फिरू लागतात. जिथं जिथं जो खर्च पडेल, तो तो त्या जागीच त्या वेळी शक्य असेल त्या तातडीनं जमा करायचा असं आपलं सध्या धोरण आहे. संघटनेचं काम शक्यतो अत्यंत कमी खर्चात चालवायचं. आम्ही नासिक-पिंपळगाव-सटाणा अशा ठिकाणी साठ साठ हजारांचे मेळावे घेतो तर लोकांना दिसावं एवढ्या उद्देशानं फक्त एक उंचवटा करतो. बाकी सगळं उघडं माळरान.

घटना करायची नाही ही शिस्त आम्ही लावून घेतली आहे त्यालासुद्धा तसंच कारण आहे. समजा आपण घटना तयार केली म्हणजे मग कार्यकारिणी बनवावी लागेल. मग या कार्यकारिणीवर कोण कोण यायला पाहिजेत? प्रत्येक गावचा एक तरी प्रतिनिधी पाहिजे. मग तो कसा निवडायचा? आज वेगवेगळ्या गावांमध्ये राजकारणी मंडळींचं इतकं वजन आहे की आपल्या कार्यकारिणीवर

सगळी त्यांची हस्तक मंडळीच येणार. आज तरी त्यांची एवढी ताकद आहे.

आपल्या शेतकरी संघटनेत कुणालाही भाग घेता येईल असं नाही. भाग कुणाला घेता येईल? ज्याला आपला विचार पटला आहे त्यालाच भाग घेता येईल. शेतकऱ्याचं दारिद्र्य त्याच्या मालाला भाव न मिळाल्यामुळे आलं आहे. सरकार आणि इतर पक्षांचं 'शेतीमालाला भाव मिळू नये' हे सारखंच धोरण आहे, शेतीमालाला भाव मिळाला तरच हे दारिद्र्य दूर होईल, आपल्या देशाचं दारिद्र्य दूर व्हायला पाहिजे या गोष्टी ज्याला मान्य आहेत त्यालाच आपल्या संघटनेत भाग घेता येईल. मार्क्सवाद्यांची-कम्युनिस्टांची जशी एक विचारसरणी आहे तशीच 'शेतीमालाला भाव मिळाला तरच दारिद्र्याचा प्रश्न संपूर्ण सोडवता येतो' ही आपली विचारसरणी आहे- नवीन विचारसरणी आहे. कम्युनिस्ट पक्षातसुद्धा वाटेल त्याला सभासद होता येत नाही. काही काळ काम केल्यानंतर- प्रशिक्षण घेतल्यानंतरच त्याला सभासद होता येतं. त्याचप्रकारे आपल्याकडे काही प्रशिक्षण झालेल्या, अनुभव घेतलेल्या, त्याग केलेल्या, संघटनेच्या कामात झोकून दिलेल्या माणसालाच शेतकरी संघटनेच्या पातळीपर्यंत पोहोचता येईल. तेव्हा अशी परिस्थिती निर्माण होईपर्यंत कार्यकारिणी बनविण्याचा विचार बाजूला ठेवला पाहिजे. अशी परिस्थिती येण्याची वाट न पाहता कार्यकारिणी केली तर काय होईल? समजा आम्ही नासिक भागामध्ये कार्यकारिणी करण्याचे ठरवले तर सगळे आमदार, खासदार आणि त्यांचे हस्तकच तिथं येतील. कारण आपण शेतकऱ्यांच्या जरी सभेत बसलो आणि विचारलं, 'तुमचा प्रतिनिधी कोण?' तर त्यातल्या त्यात जो गावचा आजवरचा म्होरक्या असतो त्याचंच नाव सुचवलं जातं- बाकी कुणाचं नाव घ्यायला घाबरतात. मग अशा कार्यकारिणीचे ठराव कसे असतील? आपण दिंडीत भाग घेतला पाहिजे किंवा आपण दिल्लीच्या मेळाव्याला गेलं पाहिजे. दिंडीवाले म्हणणार शेतकऱ्यांची स्थिती वाईट आहे आणि दिल्लीचे मेळावावाले म्हणतील की शेतकऱ्यांची स्थिती चांगली आहे. म्हणजे मग शेतकऱ्यात फूट पडून आपल्या संघटनेचा मूळ जो पाया आहे त्याच्या विरुद्ध वर्तन झालं. यासाठीच आंदोलन होऊन माणसांची पात्रता कळेपर्यंत घटना करू नये, समित्या करू नयेत.

घटना जरी केली नाही तरी आता काहीतरी करायला पाहिजे असं वाटू लागलं आहे. आज शेतकरी संघटनेपुढे मोठा प्रश्न उभा राहिला आहे. शेतकरी संघटनेच्या विचाराचा जो प्रसार व्हायला दहा वर्षे लागतील असं वाटलं होतं तो



दहा महिन्यात झाला आणि जावं तिथं, महाराष्ट्रातच नव्हे तर इतर वेगवेगळ्या राज्यांतसुद्धा शेतकरी संघटनेबद्दल फार अपेक्षा तयार झाल्या आहेत असं दिसतं. अर्थात् त्या अपेक्षा ज्या आपल्याला पुऱ्या करता येणार नाहीत त्या आपण हातात घेणार नाही. उत्तरेतल्या सगळ्या राज्यांनी शेतकरी संघटना करण्याचे ठरवले आहे, तिकडे हैदराबादला दक्षिणेतल्या राज्यांनी अशीच संघटना बांधण्याचे ठरवले आहे. ते म्हणतात, 'तुम्ही येऊन हे काम करा.' मी म्हटलं, 'माझ्या हातनं व्हायचं नाही.' आमचं अजून आमच्या राज्यात पूर्ण काम नाही. कुठेतरी तीन साडेतीन जिल्ह्यांत सगळं मिळून काम आणि निघाले अखिल भारतीय संघटना बांधायला! असल्या खोट्या फळ्यांना आणि खोट्या नाळ्यांना काही अर्थ नाही. ज्या दिवशी आवश्यक वाटलं तर बिहारमधील आंदोलनालासुद्धा महाराष्ट्रातला शेतकरी तयार होईल तेव्हा खऱ्या अर्थानं महाराष्ट्रातील संघटना तयार झाली असं म्हणता येईल तरीसुद्धा आपल्या आंदोलनामुळे देशात जे वातावरण निर्माण झाले आहे त्याचा फायदा आपण काही प्रमाणात घेतला पाहिजे. काही प्रमाणात जर आपण लोकांपर्यंत पोहोचलो नाही तर काही दिंडीकर आणि मेळावेकर त्याचा फायदा उठवून लोकांना पुन्हा चुकीच्या रस्त्याला पोहोचवतील. त्यामुळे काही एका प्रमाणात आपल्याला लोकांपर्यंत पोहोचायलाच पाहिजे- आणि त्यासाठी आपल्याला तितकी ताकद निर्माण करायला हवी.

आज पाचपंचवीस माणसांच्या व्यक्तिगत धावपळीवर ही संघटना उभी राहते आहे. ही माणसं घरचं जवळ-जवळ सगळं सोडून फकीर होऊन फिरतायत. संघटनेच्या प्रसाराच्या या वेगात त्यांच्यावरील हा ताण असह्य होईल. त्यासाठी लवकरात लवकर काही उपाय योजना हातात घेतल्या पाहिजेत. उदाहरणार्थ, सगळीकडे निरोप पाठवायचा आहे म्हटल्यावर काय करणार? त्यासाठी एखादं दैनिक काढायला पाहिजे. दैनिक जर काढलं तर हा भार पुष्कळशा प्रमाणात कमी होईल. पण दैनिक काढायचं म्हटलं की संघटनेची यंत्रणा आलीच. एक कुणीतरी संपादक नेमावा लागेल, गावोगावी बातमीदार तरी नेमायला हवेत. त्याला पगार जरी देता आला नाही तरी 'तुमच्याकडून बातम्या येऊ द्या' असं तरी त्याला सांगायला पाहिजे ना? म्हणजे तिथं एक लहानशी संघटना उभी राहिली पाहिजे.

मी अंबाजोगाईला शिबिरात चर्चा करीत बसलो होतो. नासिकमध्ये नुकतंच मोठ आंदोलन होऊन गेलं होतं. चर्चा करीत असताना एकीकडे माझ्या मनात

विचार येत होते, 'मी इथं कालपासून बसलो आहे, नासिकमध्ये पुष्कळ मोठं आंदोलन झालं, तिथल्या लोकांनी पुष्कळ सहन केलं, त्याच्या नंतर उसाला भाव मिळाला, कांद्याची खरेदी चालू झाली. तिथल्या मंडळींचा चार दिवसांनी मेळावा आहे. मी इथे बसलो आहे पण ती मंडळी मेळावा यशस्वीपणे पार पाडू शकतील की नाही अशी मला चिंता लागून राहिली आहे. कारण आमच्यात काही संपर्क नाही.' तिथून काही निरोप मिळेपर्यंत साहजिकच मला चिंता वाटत राहिली. चांगला अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यालासुद्धा परीक्षेच्या आधी जशी चिंता वाटते तशी. काही तरी पत्राच्या स्वरूपानं नियमितपणे मला बातम्या पोहोचतील अशी व्यवस्था झाली नाही तर मग आंदोलन मोठ्या प्रमाणात उभं राहू शकणार नाही. मी आज निपाणीकडे गेलो तर विदर्भात काय चाललंय मला कळत नाही. नासिकला काय चाललंय, मराठवाड्यात काय होईल काही कळत नाही. याच्या करता बातम्यांची काहीतरी नियमित व्यवस्था करायला पाहिजे. त्यासाठी माणसं तावून सुलाखून निवडायला हवीत.

आज नासिक भागामध्ये आंदोलन होऊन गेल्यामुळे लोकांची परीक्षा झाली आहे. आम्ही शेतकरी संघटनेच्या बरोबर आहोत असं म्हणणारी काही मंडळी अटक करून घ्यायची वेळ आली तेव्हा पार उसात जाऊन लपली असाही अनुभव आला. पण त्याच्या पलीकडे एकेका गावात कुणीकुणी काय काय धावपळ केली आहे हे काही आता कुठं लपून राहणार नाही. तिथल्या गावामध्ये आता काही अशी परिस्थिती राहिलेली नाही की 'शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता कोण' असं विचारलं तर गावचा नेहमीचाच म्होरक्या दाखवतील. त्यामुळे नासिक भागात समिती करण्यासारखी स्थिती निर्माण झाली असे वाटते, तरी अजून निश्चित निर्णय घेतलेला नाही. पण आज जर तुम्ही इथं तशी कार्यकारिणी करतो म्हटलं तर ते चुकीचं होईल. आंदोलनाचा खूप अनुभव असला तरी शेतकरी संघटनेचं आंदोलन झालेले नाही, अशा भागात हा विचार पुढे ढकलला पाहिजे.

ज्या वेळी लोक म्हणतात काहीतरी घटना करायला हवी, पदाधिकारी नेमायला पाहिजेत त्या वेळी मी ठाम नकार देतो त्याला आणखी एक कारण आहे. आपण जर समित्या करायला सुरुवात केली तर ठिकठिकाणी आपल्या विचारसरणीशी संबंधित नसलेली, तिचा अभ्यास नसलेली माणसं आपली आपली शेतकरी संघटना स्थापन करू लागतील असा धोका आहे. नासिकच्या आंदोलनाचे विचार



चालू झाल्यानंतर अनेकांनी आपल्या आपल्या संघटना तयार केल्या-आम्हाला त्याचा पत्ताच नाही. अशीच अहमदनगर जिल्ह्यातल्या माणसानं संघटना तयार केली आणि स्वत:ला अखिल महाराष्ट्र शेतकरी संघटनेचा अध्यक्ष म्हणून घोषित केले आणि आपलं नासिकचं आंदोलन चालू झाल्यानंतर दोन तीन दिवसांनी त्यानं जाहीर करून टाकलं की 'आम्ही हे आंदोलन मागं घेत आहोत.' झालं. वर्तमानपत्रांनी सगळ्यात मोठी बातमी दिली- सगळी जागा या बातमीनं भरली आणि इकडं आंदोलन चालूच होतं. त्यामुळं एकदम गोंधळ उडून गेला. मी कोपरगावला गेलो आणि त्या माणसाबद्दल चौकशी केली तर कोपरगावचे लोक म्हणाले, 'असा कुणी माणूस आमच्या माहितीत नाही!' आणि म्हणे अखिल महाराष्ट्र शेतकरी संघटनेचा अध्यक्ष! तेव्हा पदाधिकारी नेमणं जर टाळता येणार नसेल आणि कुठंतरी अशी माणसं घोटाळे उडवून देणार असतील तर आंदोलनाच्या भागातील आपला निश्चित मनुष्य कोण हेही पाहायला हवे. त्याच्यातसुद्धा वेळ पडल्यास फेरबदल करावे लागतील. घटना, कार्यकारिणी हे विषय अखिल महाराष्ट्र पातळीवर अध्या तरी विचारात घेणं उपयोगाचं नाही.

****

प्रकरण : १३

# आंदोलनाचे तंत्र

शेतकऱ्यांची आंदोलनं कशी उभारायची, त्याची तंत्र काय, साधनं कोणती याचा आता विचार करू या.

आंदोलनाचा हेतू शेतीमालाला भाव मिळवून घेणे हा आहे. मग त्याला तंत्र काय वापरायचं? व्यापारी जे तंत्र वापरतात तेच वापरायचं. व्यापारी जसं एकमेकांत ठरवतात की आज कुणीही व्यापाऱ्यानं अमुक एका मालाला अमुक अमुक याच्यावर भाव द्यायचा नाही. त्याचप्रमाणे आपण उलट ठरवायचं आहे की अमुक इतका भाव मिळाल्याखेरीज आपण आपला माल विकायचा नाही. इतकं सोपं तंत्र आहे. तुम्हाला वाटेल की हे दिसायला सोपं आहे; तरी प्रत्यक्षामध्ये कठीण आहे. कारण आज शेतकऱ्याची नड आहे, घाई आहे; त्याला दम काढता येत नाही. हे खरं असलं तरी याचा अर्थ असा नाही की दुसऱ्या बाजूला वाटेल तितका दम काढता येईल. दुसऱ्या बाजूलाही घाई आहे. पण आमची नड आम्हाला इतकी वाटते की त्यांची घाई कुठे सुरू होते याचा आम्ही अंदाजच घेत नाही. आपल्या ऊस आंदोलनाच्या वेळी आम्ही सांगितलं होतं की कुणीही आपल्या शेतातला ऊस १५ नोव्हेंबरपूर्वी कापू देऊ नका. कारण २३ आक्टोबर ते १५ नोव्हेंबर या तीन आठवड्यांत समोरच्या बाजूची नड इतकी होईल की साखरेचा भाव ५० रु. पर्यंतसुद्धा जाईल. लोकांनी आपल्या शेताच्या बांधावर बसून ऊस कापू न देण्याचा निर्धार केला आणि आंदोलन सुरू केले. पण साखर कारखान्यांचे अध्यक्ष आणि इतर मंडळींनी हरामखोरी करून कारखाने सुरू केले. त्यामुळे आंदोलनात वेगळं तंत्र अवलंबवावं लागलं. पण मुळात उसाच्या बाबतीच दुसऱ्या बाजूची नड ही केवळ तीन आठवड्यांची आहे. आपल्या दुसऱ्या बाजूलाही नड असतेच- काही बाबतीत ती तीन आठवड्यांची असेल तर काही बाबतीत सहा आठवड्यांची. तंबाखूच्या बाबतीत तर अशी नड सात महिन्यांची आहे. कारण त्यांना यंदा जो तंबाखू विडीसाठी वापरायचा असतो तो मागल्या वर्षीचा असतो. तंबाखू वर्षभर



बखारीत ठेवून वापरायचा असतो. तेव्हा आज जरी शेतकऱ्यांनी तंबाखू विकला …ी तरी विडी कारखानदार वर्षभर विड्या पुरवू शकतात. असे वेगवेगळ्या …मालाबाबत दुसऱ्या बाजूला नड असण्याचे काळ वेगळे वेगळे असतात. आंदोलनाच तंत्र असं की समोरच्या माणसाची-व्यापाऱ्याची किंवा ग्राहकाची थांबण्याची ताकद जितकी आहे तितकी ताकद शेतकऱ्यांत निर्माण केली पाहिजे. मग हे कसं करायचं? याला मार्ग म्हणजे संघटना करणे हा आहे.

शेतकऱ्याची मुख्य अडचण भाकरी. माल विकला नाही तर भाकरी मिळत नाही, ही खरी अडचण आहे. माल विकला नाही तर इथं गावच्या पातळीवर भाकरीची सोय होत नसेल तर ती त्याला आणखी कुठून मिळवून देता येते काय बघायचं. गावात माणसांकडे शिल्लक धान्याची पोती असतात. काही माणसांकडे नसतात ही खरी गोष्ट आहे, पण गावच्या पातळीवर संघटना बांधून आपण गावात माल न विकल्यामुळे उपाशी राहणार नाही अशी काळजी घेऊ शकलो तर ९९ टक्के लढाई जिंकल्यासारखी आहे. भाकरीचा प्रश्न सुटल्यावर बाकीचे प्रश्न सोपे असतात आणि समजा ते गावच्या पातळीवर झुंजता येत नसतील तर आपल्या संघटनेची तालुका-जिल्हा पातळीवरील ताकद वापरून ते आपल्याला सोडवता येतील. तेव्हा प्रथम आपण 'अमुक इतकी ज्वारी देऊ शकतो का?' 'भाकरीची व्यवस्था करू शकतो का?' हे प्रश्न सोडवले पाहिजेत. निपाणीच्या तंबाखू उत्पादकांनी सांगितले की, त्यांच्याकडे तंबाखूशिवाय काही होत नाही. त्यांनी जर तंबाखू विकला नाही तर त्यांना उपजीविकेचे दुसरे साधन नाही. त्यांना मी सांगितले की, 'तुमचा लढा जर उभा करावा लागला तर आपण महाराष्ट्राच्या जिल्ह्या-जिल्ह्यातून तुमच्यासाठी ज्वारी आणू.' अशा तऱ्हेची संघटना करून आपल्याला जर हा भाकरीचा प्रश्न सोडवता आला तर बाकीच्या ज्या अडचणी आपल्यापुढे येतात त्या काही फार कठीण नाहीत.

बाकीच्या अडचणीतील मुख्य अडचण म्हणजे शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाची असते. धान्य विकलं नाही, शेतीमाल विकला नाही तर कर्ज फेडता येत नाही. त्यामुळे सोसायटी किंवा बँकेची जीप घरची भांडी उचलायला येते. आज अशा तऱ्हेने सोसायटीची किंवा बँकेची जीप जप्तीसाठी दारावर आली म्हणजे शेतकऱ्याला आपला, आपल्या घराण्याचा किंवा आपल्या नावाचा कुठं तरी अपमान होतो आहे असं वाटतं. आपल्याला कर्ज फेडता येत नाही म्हणजे आपण

दिवाळखोर झालो आहोत अशी बोच लागून राहते. अशी भावना होणे ही अत्यंत वाईट गोष्ट आहे. आपण संघटना करून तिच्या बळावर गावात एक ताकद निर्माण केली पाहिजे आणि गावात असं वातावरण निर्माण केलं पाहिजे की, आपल्याला कर्ज फेडता येत नाही ही जी आपली परिस्थिती आहे ती इंडियानं आपलं शोषण करकरून आपल्यावर लादलेली आहे, त्यात आपला काही दोष नाही. त्यामुळे त्यात आपल्याला अपमान वाटण्यासारखे काही नाही. उलट या स्थितीत आंदोलनाच्या काळात जो माल विकून आपलं कर्ज फेडण्याची धडपड करील त्याच्याच घराण्याच्या नावाला कलंक लागेल असं एक वातावरण तयार झालं पाहिजे. त्यासाठी संघटनेची ताकद वापरली पाहिजे. असं वातावरण निर्माण करणं काही कठीण नाही. आम्ही आमच्या चाकण भागात असं वातावरण निर्माण करून आंदोलनात एक कार्यक्रम राबवला आहे. गेल्या वर्षी कांद्याचा भाव ४५ ते ६० रु. दर क्विंटलला असा शासनाने जाहीर केला. त्याच्या मागच्या वर्षी भाव ५० ते ६५ रु. असा होता. म्हणजे क्विंटलला ५ रु. कमी भाव जाहीर झाला. आम्ही असं जाहीर केलं की हे क्विंटलमागे ५ रु. जास्तीचे जोपर्यंत मिळत नाहीत तोपर्यंत कुणीही शेतकरी सोसायटीचं किंवा बँकेचे कर्ज फेडणार नाही आणि मग गावात सोसायटीची किंवा बँकेची जीपगाडी जप्तीसाठी आली तर काय करायचं? तर प्रत्येक गावामध्ये सर्व बायामंडळींनी एकत्र व्हायचं, येताना घरातनं एक एक झाडू घेऊन यायचं आणि ज्याच्या घरची भांडी उचलणार असतील त्याच्या दारात जाऊन उभं राहायचं आणि गावातल्या पुरुषांनी बाजूला जाऊन उभं राहायचं आणि फक्त म्हणायचं की, 'आमच्या बायामाणसांच्या अंगाला हात लागता कामा नये.' त्यावेळी एकाही ठिकाणी जप्ती झाली नाही. जमिनीची जप्ती जर करायची असली तर खुशाल करू द्या. काय कागद इकडचे तिकडे करायचे ते करतील. लिलावा बोलायला कुणी येणार नाहीत. ते काय जमीन दिल्लीला घेऊन जाणार आहेत?

शेतकऱ्याला आजपर्यंत इतकं नागवलं आहे की, त्यांच्याकडे कर्जवसुलीकरिता घेण्यासारखं काही राहिलेलंच नाही. आता गमवायला काही राहिलंच नाही तर जप्तीला कशाला घाबरायचं? तेव्हा इथे कर्जाच्या भीतीचा प्रश्नच नाही, प्रश्न हिमतीचा आहे. मी तंबाखूच्या शेतकऱ्यांना सांगितलं की, 'तुमची भाकरीची अडचण आम्ही कुठूनही ज्वारी आणून भागवू शकतो; पण एक गोष्ट आम्ही देऊ शकत नाही ती म्हणजे तुमची हिम्मत. ती तुमची तुम्हालाच कमवायला पाहिजे.



हिम्मत असल्याखेरीज तुम्हाला किंमत मिळणार नाही. तंबाखूचं पीक काढताना त्याबरोबर एक एक हिमतीचं झाड लावता येत नाही. ती आपली आपणच तयार करायला हवी आणि त्यासाठी आपली संघटना व्हायला हवी.'

त्याच्याशिवाय आणखी बारीक सारीक अडचणी निर्माण होतात- माल न विकल्यामुळे. घरच्या मुलीचं लग्न असतं त्यासाठी पैसा उभा करायचा असतो. माल विकल्याशिवाय ते शक्यच नसतं. अशा वेळी संघटनेने गावात असं वातावरण निर्माण केलं पाहिजे की, 'आधी लगीन कोंडाण्याचे, मग रायबाचे.' तुमच्या मालाला भाव मिळाला म्हणजे द्या ना धूमधडाक्यात लग्न लावूत. अशा तऱ्हेचं वातावरण निर्माण केलं पाहिजे.

निपाणी भागात आणखी एक प्रकार आहे. तिथले शेतकरी यल्लमाच्या यात्रेला जाण्याकरिता काय असेल तो तंबाखू मिळेल त्या भावाने विकून टाकतात. कितीही कमी भाव मिळो पण यात्रेला जायचंच. अशा प्रकारच्या रूढी शेतकऱ्यांच्यात खूप खोलवर भिनलेल्या आहेत. आपण आपल्या संघटनेबद्दल, आपल्याबद्दल, आपल्या कार्यकर्त्यांबद्दल शेतकऱ्यांत जो आदरभाव निर्माण झालेला आहे याचा वापर करून याच्यातल्या काही रूढी मोडून काढायला शेतकऱ्यांना तयार केले पाहिजे. अशा रूढींना चिकटून राहिल्यामुळे इंडियाचं शोषणतंत्र अधिक सुलभतेने आपलं शोषण करतं हे त्यांना पटवून दिलं पाहिजे. प्रसंगी असंही सांगितलं पाहिजे की, शेतकऱ्यांचा हा लढा अत्यंत महत्त्वाचा आहे, पवित्र आहे, धार्मिक आहे. तेव्हा लढा मोडून यल्लमाच्या जत्रेलासुद्धा जो कुणी जाईल त्याला यल्लमाचा शाप लागेल. आता कुणाच्या घरी दशपिंड घालायचाच प्रसंग आला तर लग्न जसं पुढं ढकलता येतं तसं दशपिंड काय पुढं ढकलता येणार आहेत? पण त्यालाही गावात वातावरण तयार केलं पाहिजे. शालिनीताई नाशिकला म्हणाल्या होत्या की, 'जोशी ब्राह्मण आहे. ठीक आहे. पण मी काही स्वत:ला ब्राह्मण म्हणून म्हणवून घेत नाही. पण प्रसंग पडला तर मी असं म्हणतो की, 'मी ब्राह्मण म्हणून तुम्हाला सांगतो की आता आंदोलन चालू असताना जर तुम्ही माल विकून दशपिंड घातलेत तर तुमच्या पितरांना पिंड पोहोचणार नाहीत.' आपल्या संघटनेच्या साहाय्याने असं एक वातावरण निर्माण केलं पाहिजे की, शेतकरी शोषणास पूरक अशा या रूढींच्या प्रभावी पकडीतून बाहेर पडून त्याची ताकद वाढेल. आज आपली मुख्य अडचण भाकरीची आहे. फाटके कपडे घालायची सवय नाही असा

शेतकरी सापडणारच नाही. त्याला कापडचोपड उशिरा घ्यायला लागलं तरी चालेल. भाकरीचा प्रश्न जर सोडवला तर मग आपली नड आणि ग्राहकाची किंवा व्यापाऱ्याची नड यांची सांगड घालता येईल, तरीही नाही जमलं तर काय करायचं?

आम्ही उसाच्या शेतकऱ्याची नड आणि साखर कारखान्यांची नड यांची सांगड घालता येईल म्हणून उसाच्या आंदोलनाला बसलो. १५ नोव्हेंबरपर्यंत जर ऊस कापू दिला नाही तर नाक मुठीत धरून आ ला ते भाव देतील अशी स्थिती होती. पण सगळ्या साखर कारखान्यांच्या अध्यक्षांना साखर कारखाने सुरू करण्यास प्रवृत्त करण्यात आले. कुणाला तिकीट देतो म्हणून सांगितले, कुणाला पाकिट देतो म्हणून सांगितले, तर कुणाला तुम्ही कारखाना सुरू केला नाहीत तर तुमचं 'ते ऑनमनीचं प्रकरण काढतो', 'हे लफडं काढतो नाही तर ते लफडं काढतो' असा दम भरण्यात आला. मग त्या अध्यक्षांनी शेतकऱ्यावर वजन आणायला सुरुवात केली. त्यांच्याही हातातली हत्यारं असलीच. तुझ्या पोराला नोकरी आहे तिथनं त्याला काढून टाकतो- किंवा अमुक एक रस्त्याची योजना आहे तो रस्ता तुझ्या शेतातनं न्यायला लावतो. असे एक ना अनेक प्रकार. अशा तऱ्हेने मोगलाईपेक्षाही भयानक प्रकारची दडपणं आणून त्यांनी शेतकऱ्यांकडून ऊस कारखाने, थोड्याफार प्रमाणात का होईना चालू केले. या अध्यक्षांनी असं जर केलं नसतं तर काय झालं असतं हे पंजाबमध्ये अनुभवायला मिळालं. पंजाबच्या लोकांनीही ऊस कापू न देण्याचं आंदोलन सुरू केलं होतं. तिथं १५ नोव्हेंबरपर्यंत एकही कारखाना उघडला नाही. त्यामुळे त्यांना टनाला २३०/- रु. भाव बांधून मिळाला.

आपल्याकडे साखर कारखान्यांनी आपलं ऐकलं नाही. मग आम्ही काय केलं. आम्हाला वाटलं होतं की त्यांना कळ लागेपर्यंत आपल्याला कळ काढता येईल. पण ते जमलं नाही. त्याला आणखी एक कारण आहे. त्या काळामध्ये आक्टोबरच्या सुरुवातीपासून सबंध नासिक जिल्ह्यात पाउसच झाला नाही. त्यामुळे विजेचा तुटवडा आला. शासनाने मुद्दामहून आंदोलनाच्या भागातील वीज तोडायला सुरुवात केली. हेतू, उभ्या पिकाला पाणी देता येऊ नये. पाऊसही नाही. त्यामुळे शेतकऱ्याला उसाविषयी चिंता वाटू लागली. आपल्याला आंदोलन करायचं आहे ते शत्रूला वठणीवर आणण्यासाठी करायचं आहे, आपलं नुकसान करण्यासाठी नाही. मग इथं जर त्यांना कळ लागत नसेल तर दुसरीकडे कुठेतरी चिमटा काढायला पाहिजे. या विचारानेच आपलं उसाचं बांधावरील आंदोलन रस्त्यावर



आलं. अशा प्रकारे रस्ताबंदी, रेल्वेबंदी, साराबंदी, कचेरीबंदी ही हत्यारं- तशी ही यादी करायची म्हटली तर फार मोठी होईल. ही सर्व हत्यारं दुसऱ्या टप्प्याची- पूरक हत्यार आहेत. यातलं कुठलंही मुख्य हत्यार होऊ शकत नाही. मुख्य हत्यार आहे माल मागे ठेवून घेणे. कारण तुमचा जर बाजारपेठेवर ताबा नसला तर कितीही दिवस रस्ता अडवा तुमचं आंदोलन यशस्वी होणार नाही. तुम्ही जर म्हटलंत की आज उठून इथं भाताचं आंदोलन सुरू करू या तर ते यशस्वी होणार नाही. कारण सगळ्या देशातलं फक्त साडेचार टक्के भात महाराष्ट्रात होतं. त्यामुळे तुम्हाला बाजारपेठ काही ताब्यात ठेवता येणार नाही. महाराष्ट्रातलं शेतीमालाच्या भावाविषयी पहिलं आंदोलन इगतपुरी भागात भाताविषयी झालं. अनेक शेतकरी तुरुंगात गेले. भाताचा भाव तोच राहिला. कारण बाजारपेठेवर ताबा असल्याशिवाय इतर कोणत्याही मार्गाचा परिणाम होऊच शकत नाही. आपल्या आंदोलनाचं तंत्र कसं आहे? तुम्ही काही वेळेला गोष्टी ऐकल्या असतील की, मुंबईच्या अमुक एक व्यापाऱ्यानं बाजारपेठेचा चांगला अभ्यास केला आणि मग खरेदी-विक्रीचे असे काही व्यवहार केले की, तो एका रात्रीत कोट्यधीश होऊन गेला. आपलंही तंत्र तेच आहे. बाजारपेठेचा बारकाईनं अभ्यास करायचा आणि मग शेतकऱ्याला अशा तऱ्हेनं उठवायचं-विक्री अशा तऱ्हेनं थांबवायची की, ज्याचा फायदा सर्व शेतकऱ्यांना मिळायला पाहिजे. तंत्र तेच पण फायदा एकालाच मिळण्याऐवजी सगळ्या शेतकऱ्यांना मिळणार. या दृष्टीनं आपण आजपर्यंत आंदोलनाची आखणी केलेली आहे. ज्याप्रमाणे शेतकरी-शेतमजुरांबद्दल सगळे लोक प्रश्न विचारतात की शेतकऱ्याला फायदा झाला तर तो शेतमजुरापर्यंत पोहोचेल याची शाश्वती काय? त्याचप्रमाणे आणखी एक प्रश्न सतत विचारला जातो की कांदा, ऊस, कपाशी अशा नगदी पिकांसाठीच शेतकरी संघटनेने आतापर्यंत आंदोलन केले आहे, शेतकरी संघटना ज्वारीसारख्या सर्वसामान्य मालासाठी का आंदोलन करीत नाही? किंवा त्यासाठी केव्हा आंदोलन करणार? यालाही कारणं आहेत. ती नीट समजावून घ्यायला हवीत. आपलं तंत्र काय? तर बाजारपेठेवर ताबा ठेवून मालाला भाव मिळविणे. जिथं जिथं आपण माल पाठविण्याचं थांबवलं तिथं तिथं त्याचा परिणाम झाला. केवळ रस्ता थांबवून किंवा रेल्वे थांबवून आंदोलन यशस्वी होत नाही. तुम्ही अगदी चिक्कार माणसं बसवली रस्त्यावर आणि सरकारनं ठरवलं की आंदोलन मोडून काढायचं तर ते अगदी पार सैन्य पाठवून मोडून काढू शकेल. पण

त्याच्या मागोमाग जर बाजारपेठ तुमच्या हातात असेल तर सरकारला काही करता येणार नाही. तेव्हा बाजारपेठ ताब्यात असणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

मग आम्ही पहिल्यांदा आंदोलनासाठी कांदा का निवडला? सबंध देशामध्ये कांद्याच जे पीक येतं त्यापैकी ६० ते ७० टक्के कांदा एकट्या महाराष्ट्रात होतो. असं दुसरं कोणतंही पीक नाही. या ७० टक्क्यांपैकी ५० टक्के कांदा हा नाशिक व पुणे जिल्ह्यांच्या पाच तालुक्यांत होतो. म्हणजे देशातला निम्मा कांदा पाच तालुक्यांत होतो. या पाच तालुक्यांपैकी चाकण भागात दोन अर्ध्या तालुक्यांत संघटना आहे-मावळ भागात थोडी आणि खेड भागात थोडी. पण या दोन तालुक्यातील तेवढी ताकदही पुरेशी आहे. बाजारपेठेत हालचाली करायला काही १०० टक्के माल तुमच्या हातात असावा लागत नाही; चांगल्या प्रतीचा २० ते ३० टक्के माल तुमच्या हातात असला तरी त्यामुळे बाजारावर ताबा आणता येतो. (वेगवेगळ्या मालाच्या बाबतीत त्याची बाजारपेठ ताब्यात ठेवण्याची ही ताकद वेगळी वेगळी असेल.) म्हणून कांद्याचं आंदोलन पहिल्यांदा घेतलं. दुसरं एक कारण म्हणजे त्यावेळी कांद्यावर निर्यातबंदी घातल्यामुळे कांद्याचा भाव एकदम कमी झाला होता. त्यामुळे लोकांमध्ये चिडेची जाणीव होती, लोक उठायला तयार होते.

उसाचं आंदोलन चालू केलं त्यामागचंही कारण हेच. आकडेवारी पाहा. देशामध्ये तयार होणाऱ्या एकूण साखरेपैकी ३५% साखर महाराष्ट्रात तयार होते आणि इतर कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र दुसऱ्या राज्यांना जास्त साखर पाठवतो. सगळ्यात मोठा साखरेचा गड्डा म्हणजे महाराष्ट्र. त्यामुळे उसाचं आंदोलन सुरू केलं.

भुईमुगाचं आंदोलन करू म्हणून जाहीर केलं होतं. पण प्रत्यक्षात केलं नाही. त्यांच पहिलं कारण म्हणजे भुईमुगाला यंदा चांगला भाव मिळाला त्यामुळे आंदोलन करण्यात काही अर्थ नव्हता, लोकांना उठवणं अधिक कठीण झालं असतं. दुसरं कारण असं की गुजरात, आंध्र, तामिळनाडू येथील बाजारपेठांशी सहकार्य केल्याखेरीज भुईमुगाचा लढा जोमदारपणे उभा राहू शकत नाही.

आज तंबाखूचा लढा उभा करायचा म्हणून आम्ही जाहीर केलंय. पण आम्हाला काय चिंता लागून राहिलीय? तिकडे अहमदाबादेत दंगे चाललेत, गोळीबार चाललेत त्यामुळे आमचे गुजरातचे जे शेतकरी इकडे विचारविनिमयासाठी



येणार होते ते अडकून पडलेत, आम्हाला अजून त्यांच्याशी संपर्क साधता आलेला नाही आणि गुजरातमध्ये तंबाखूच्या लढ्यात लढायची तयारी झाली नाही तर एकट्या निपाणी भागात तंबाखूचा लढा कसा काय द्यायचा ही चिंता आहे तरीसुद्धा तंबाखूचा लढा निपाणीला द्यायचा ठरवले आहे. त्याला एक महत्त्वाचं कारण आहे. समजा गुजरातचे शेतकरी लढ्यात नाही आले तरीसुद्धा निपाणी भागातील तंबाखूच्या गुणवत्तेवर हा लढा उभा राहू शकतो. विडीमध्ये वापरला जाणारा तंबाखू कुठलाही असो त्यात आक्कोळी किंवा निपाणी भागातील थोडा तरी तंबाखू मिसळल्याखेरीज विडी (चवदार) होतच नाही. म्हणजे कुठं तरी बऱ्याचशा प्रमाणात बाजारपेठ हातात आहे. म्हणूनच तो लढा देता येईल.

कपाशीबाबतही परिस्थिती फायद्याची आहे. देशातील २०% कापूस महाराष्ट्रात पिकतो.

तेच जर तुम्ही म्हणालात आज ज्वारी विकत नाही तर सरकार म्हणेल, 'बरंच झालं. फार बरं झालं. आम्ही मध्य प्रदेशातून, आंध्रातून वाटेल तितकी ज्वारी आणतो.' मग कुठं झाला का तुटवडा? बाजारपेठेवर ताबा ठेवता येतो का? मग ज्वारीचा लढा कसा द्यायचा त्याचं तंत्र वेगळंच असलं पाहिजे.

आपल्या या आंदोलनांचा परिणाम काय झाला? दिनांक १६ फेब्रुवारी १९८० ला पहिला सत्याग्रह होऊन चाकणचा कांद्याचा लढा सुरू झाला. जून महिन्यापर्यंत शेतकरी संघटना दोन जिल्ह्यांमध्ये सर्वसाधारणपणे पसरली, संघटनेची कल्पना संपूर्ण महाराष्ट्रभर पसरली. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये कांदा आणि ऊस आंदोलन चालू झाल्यानंतर संघटना अडीच जिल्ह्यांत पसरली. साखरेच्या परिणामाने संघटनेचा विचार निदान सहा जिल्ह्यांमध्ये पसरला. आंदोलन स्थगित झाल्यापासून विदर्भ मराठवाडा या भागांत आपला विचार पसरू लागला आणि कार्यकर्ते तयार होऊ लागले. आपला विचार सगळ्या देशाभर झाला. शेतकरी संघटनेची ताकद वाढत गेली. ती इतकी वाढली आहे की जर उस-कांद्याचा प्रश्न सुटला नाही तर ऊस कांदा यांच्याबरोबर कपाशी-तंबाखू घेऊन त्याचबरोबर २५ मेचं दूध-भात आंदोलन आधी करायचं ठरवून १४ मार्चलासुद्धा आपण सबंध महाराष्ट्रभर आंदोलन उभं करू शकतो.

आता दूधभात अस आंदोलन का घेतलं ते सांगतो. ज्वारीपेक्षा भाताचा प्रश्न अत्यंत बिकट आहे. ज्वारीचा लढा हाती घ्यायच्या आधी भुईमूग आणि

मिरची यांचे भाव ठरवून घ्यावेत अशी आमची योजना होती. का ते तुम्हा शेतकऱ्यांना समजू शकेल. भाताच्या शेतकऱ्याला 'भाव कमी मिळतो ना मग तू भात करू नको' असं सांगण्यात काही अर्थ नाही. कारण त्याला त्याच्या शेतातनं दुसरं कोणतंही पीक काढता येणं शक्य नाही. मग भाताचा लढा लढायचा कसा? म्हणून दूध आणि भात या गोष्टी एकत्र घेतल्या. कारण दूध हे फार मजबूत आहे. चार दिवस जरी दूध नाही दिलं तर धावपळ उडते. मग त्या दांडगट भावाचा फायदा घेऊन त्यातल्या त्यात जो दुबळा भाऊ आहे त्या भाताचा फायदा करून घ्यायचा. म्हणून दूध भात आंदोलन. मग तुम्ही असं म्हणाल दूध-भात-ज्वारी का नाही? यादी फार मोठी केली की त्या मागणीचा जोर जातो. म्हणून नुसतं दूधभात आणि ज्वारीच्या आंदोलनाकरता आणखी एक मार्ग आहे. आतापर्यंत तुम्हाला आंदोलनाच्या तंत्राविषयीची कल्पना दिली. त्यावरून ज्वारीचा लढा कोणत्या प्रकारे लढवता येईल याचा तुम्हीच अंदाज बांधा. हा अंदाज बांधताना तुम्ही एक गोष्ट लक्षात ठेवा की, आजपर्यंत आपण जे लढे दिले ते नगदी पिकांसाठी दिले. हा माल १०० टक्के बाजारात जातो. पण धान्याच्या बाबतीत परिस्थिती वेगळी आहे. ७० टक्के धान्य आपण शेतकरीच खातो. तेव्हा धान्याच्या लढ्याबाबत विचार करताना ३० टक्के धान्य बाजारात जाते हे लक्षात घ्यायला हवे आणि आपण आंदोलन कशा तऱ्हेने आखतो? आपल्याला काडीही मोडायची नाही आणि आपला डोळाही फोडायचा नाही. तेव्हा ज्वारीच्या आंदोलन तंत्राबाबत तुम्ही अंदाज करा-आम्ही काही जाहीर करू शकत नाही.

भावाच्या पातळीवर उभं करण्याचं हे शेतकरी आंदोलन आता लोकप्रिय होऊ लागलं आहे. असं आंदोलन उभं केलं म्हणजे शेतकरी मागे येतात हे कळल्यावर बऱ्याच लोकांना असं वाटायला लागलंय की आपणही असं आंदोलन उभं केलं पाहिजे. इतके दिवस काही त्यांना जाग आली नव्हती. एखादा सिनेमा चांगला चालला की कसं होतं? 'जय संतोषी माँ' या सिनेमाला खूप लोकप्रियता मिळाली. लगेच लोकांना वाटलं, 'अरे, भक्तीचा सिनेमा चांगला चालतो.' की मग लागले भक्तीचे सिनेमे काढायला! अशा पद्धतीने शेतकरी आंदोलनं उभी राहू पाहतायत. एका पक्षानं जाहीर करून टाकलं की आम्हाला ज्वारीला २०० रु. भाव मिळाला पाहिजे म्हणून आमचं आंदोलन. इतका भाव का मिळाला पाहिजे, कशासाठी मिळाला पाहिजे वगैरे काही नाही. ते आपलं जाहीर करून टाकतात.



पण ही मंडळी आंदोलन कधी चालू करतात, ते बंद कधी करतात याकडे हल्ली लोक लक्षच देत नाहीत. कारण लोकांच्या मनात आता त्यांच्याविषयी काही अपेक्षाच राहिल्या नाहीत. लोक त्यांना प्रश्नही विचारत नाहीत की तुम्ही हे असं का केलं? मला लोक येऊन प्रश्न विचारतात की, 'तुम्ही अमुक अमुक आंदोलन स्थगित का केलं?' आणि शंका निरसन करून घेतात. याचा अर्थ असा की लोकांच्या मनात शेतकरी संघटनेविषयी आशा आहे. म्हणून ते येऊन आपल्याला विचारतात. 'दिंडी का बंद केली?' असं कुणी विचारतयं का? किंवा 'ती दिंडी झाली आता कशाला आणिक दिंडी काढताय तुम्ही?' 'काय भाव मिळाले का? ....नाही? मग तुम्ही गप्प का? असे प्रश्न त्यांना कुणी विचारत नाहीत. उलट-दिंडी वगैरे काढून गप्प बसलेली मंडळीच आपल्यावर टीका करीत सुटलीत की, 'हे आंदोलन केव्हाही सुरू करतात आणि केव्हाही बंद करतात.' त्यामागील भूमिका समजून घेण्याची त्यांची तयारीच नसते.

अशा पद्धतीने आंदोलनाचा कार्यक्रम राबवित असताना जे अनुभव आले त्यावरून काही गोष्टी आपण लक्षात ठेवायला हव्यात. उदाहरणार्थ-

आपण शेतकरी हा आंदोलनात पहिल्यादा उतरवतो आहोत. स्वातंत्र्याच्या लढ्यातसुद्धा शेतकरी मोठ्या प्रमाणावर तुरुंगात गेला नाही. आज नासिक, नगर या भागातील ३१ हजार शेतकरी तुरुंगात जाऊन राहिले आहेत. ही फार प्रचंड ताकद आहे. शेतकऱ्याने एकदा जरी तुरुंगाच्या आतला भाग बघितला आणि एकदा त्याची तेथील घोंगड्याची, वाडग्यांची आणि ताटल्यांची भीती गेली की मग तो कुणाच्या बापाला भिणार नाही. ही एक मोठी गोष्ट आपण या आंदोलनातनं मिळविली आहे. शेतकऱ्याला आंदोलनात उतरवताना आपल्या पोळ्या पटकन भाजून घ्यायच्या आहेत तेव्हा त्याला जास्तीत जास्त उठवा, जास्तीत जास्त पेपरातून जास्तीत जास्त प्रसिद्धी करा अशी वृत्ती ठेवता कामा नये. असा बेत जर तुम्ही आखाल तर तुमचा डाव पडेल. या नव्या पहिलवानाला आंदोलनाच्या आखाड्यात अशा तऱ्हेनेच उतरवायला पाहिजे की तो मोडणार नाही, त्याच्या कुस्त्या त्याच्या ताकदीच्याच घेतल्या पाहिजेत.

आज दुसरी भावना महाराष्ट्रात आहे की, 'काय या जोशींना करावं? हे आंदोलन स्थगित करतात, नाही तर आम्ही आता जाऊन आंदोलन केलं असतं.' घोडं असं फुरफुरत राहायला हवं. उलट जर असं म्हणायला लागले की, 'काय

करावं, जोशी आम्हाला आंदोलनात फार पाठवतात,' तर लक्षात ठेवा की आपलं कुठतरी चुकतं. तेव्हा आपण नवीन माणसाला, सबंध नवीन समाजाला आंदोलनात उभं करतो आहोत याची जाणीव सतत ठेवून त्याला भलत्यावेळी आणि कारण नसताना आंदोलनात उतरवता कामा नये. त्याला आपण काहीतरी करतो आहोत असं समाधान वाटत राहिलं पाहिजे, जावं आणि आंदोलन करावं असं वाटत राहिलं पाहिजे. आंदोलन म्हणजे आनंद देणारी गोष्ट झाली पाहिजे, कष्टाची-जुलूम जबरदस्तीची गोष्ट होता कामा नये. एकदा का ती त्याला जुलूम-जबरदस्तीची गोष्ट झाली तर एकदा जरी तो साथ द्यायला आले असले तरी पुढच्या वेळी आंदोलनात उतरायचे नाहीत.

आंदोलनात कसं उतरायचं, हत्यारं कशी बदलायची यालासुद्धा एक विचारसरणी हवी. आम्ही आंदोलन सुरू करतो, स्थगित करतो, पुन्हा सुरू करतो, आणखी काय काय पन्नास गोष्टी करतो आणि त्यामुळे शहरातल्याच नव्हे तर गावातल्याही लोकांच्या डोक्यांत चिंता पडते की, 'अरे, हे काय करतात तरी काय?-त्यांचं काय चाललं आहे?' यावर साधं उत्तर म्हणजे, 'हे विमान चालविणाऱ्या वैमानिकाला मागच्या एखाद्या प्रवाशानं सांगण्यासारखं आहे की, 'तुम्ही असं काय विमान चालवता?' विमान चालविणारा तिथं बसलेला असतो, त्याला हवामानाची परिस्थिती ठाऊक असते, विमानाची परिस्थिती माहीत असते. त्याप्रमाणे तो विमान चालवीत असतो. पण तो त्या प्रश्नाचं उत्तर देऊ शकणार नाही.' किंवा 'गावस्कर हा क्रिकेट संघाचा प्रमुख आहे. त्याच्या सामन्याचं वर्णन आम्ही रेडिओवर ऐकायचं आणि इथं बसून म्हणायचं, 'हे असं नको होतं करायला, काही तरी वेगळं करायला हवं होतं.' यात काही अर्थ नाही. कारण त्याच्यासमोर ज्या गोष्टी असतात त्या त्याला माहीत असतात. त्याप्रमाणे तो आपले निर्णय घेत असतो. त्याच्या समोर ज्या गोष्टी असतात त्यांची आपल्याला माहिती नसते. आम्ही फक्त तिथल्या खेळपट्टीचं वर्णन वाचलेलं किंवा ऐकलेलं असतं. प्रत्यक्ष त्या क्षणाला ती कशी दिसते हेही आपल्याला कधी माहीत नसते?' अशा प्रकारे टीका करायची काही लोकांना सवयच असते. याहून भयानक प्रकार पाहा. बांगला देशचं युद्ध चालू असताना रेडिओवरून तासातासाला बातम्या दिल्या जात. त्या ऐकून आपलं सैन्य कुठं कुठं गेलंय हे बघायचं आणि म्हणायचं की, 'हे चूक आहे. माणकेशानं इकडून सैन्य न्यायला हवं होतं- इकडून न्यायला नको होतं....वगैरे.



अशा टीकांना काही अर्थ नसतो. आमच्या नासिक आंदोलनाच्या काही गोष्टी पाहा. त्याविषयी वर्तमानपत्रांतून ज्या बातम्या आल्या त्या पन्नास टक्के तरी चूक होत्या. काही बातम्या चुकीच्याच जातील अशी आम्ही दक्षता घेतली होती. हे आर्थिक आंदोलन आहे, डावपेचांचं आंदोलन आहे. जर सगळेच आम्ही सांगत सुटलो तर आमचे डावपेच लागू होणार नाहीत. आंदोलनामध्ये खरं काय घडलं याचं मूल्यमापन करायचं असलं तर ते आंदोलनानंतर दोनपाच वर्षांचा काळ गेल्यानंतरच करायला हवं. नासिकच्या आंदोलनातील काही निर्णय आम्ही कशा परिस्थितीत घेतले आहेत पाहा.

१ ऑक्टोबरपासून तिथं पाऊसच पडला नव्हता. १० नोव्हेंबरला आम्ही रस्ता बंद केला आणि १२ नोव्हेंबरला संध्याकाळी सबंध जिल्हाभर पाऊस झाला. फार मोठा पाऊस झाला. सगळे शेतकरी दीड महिना पावसाची वाट पाहत होते. पाऊस पडल्यावर ऑक्टोबरसारखी थंडी पडली. आम्ही बायकामुलांसहित माणसं रस्त्यावर आणून बसवली होती. रात्री बसून राहायचं म्हटलं तरी थंडीचा प्रश्न होताच. त्यात दीड महिना वाट पाहिल्यानंतर पडलेला पाऊस पाहून शेतकऱ्याच्या मनाची स्थिती काय होत असेल हे एक शेतकरीच जाणे. पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्याला जी काही कामं करायची असतात ती जाऊन करावीशी वाटणारच. अशा वेळी आंदोलनाच्या तंत्रात थोडा फार बदल करायला नको का? हे लक्षात घेऊनच आम्ही २४ ते ४८ तासांची सुटी जाहीर केली. तेव्हा सगळ्या लोकांनी आंदोलन स्थगित केलं म्हणून जोराजोरात टीका केली. पण जिल्हाभर झालेल्या पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीबद्दल कुणी अक्षरही काढलं नाही. आपण ही दोन दिवसांची माघार घेताना आंदोलनाची परिस्थिती की ११ नोव्हेंबरच्या रात्रीपासून १२ नोव्हेंबरच्या दुपारपर्यंत जवळजवळ ९ हजार शेतकरी लाठ्या खाऊन जखमी झाले होते. बाहेर राहणाऱ्या मंडळींना 'आंदोलन आणखी चालत राहायला हरकत नाही.' असं वाटत राहून काय उपयोग? खर तर ही मंडळी घाबरून आंदोलनात भाग घ्यायला कचरत होती. उलट स्थगिती जाहीर केली तरी शेतकरी मागे हटायला तयार नव्हते. मंगरूळ फाट्यावर जे ४० हजार शेतकरी रस्त्यावर बसून होते त्यांची परत जाण्याची व्यवस्था आम्ही करायला गेलो होतो त्यावेळी त्यांना म्हटलं की, 'तुम्हाला पुन्हा इकडे यायला ट्रॅक्टर वगैरे पाठविण्याची व्यवस्था करतो.' त्यावेळी ते म्हणाले, 'ट्रॅक्टर वगैरे नाही पाठविलात तरी चालेल

पण दारूगोळा पाठवा.' लोक इतके उत्तेजित झालेले होते, की दोन ठिकाणी पुलांवर उखळी खणून त्यात सुरुंगाची दारू भरून त्यात वाती घातलेल्या होत्या. लोकांची समजूत घालून मला त्या स्वत: काढून टाकाव्या लागल्या.

कसबे-सुकेण्याला जे रेल्वे रोको आंदोलन झालं तिथं चारशे स्त्रिया सत्याग्रहाला बसल्या होत्या. तिथं चार चार एस्.आर.पी. नी एकेका स्त्रीला दोघांनी दोन हात आणि दोघांनी दोन पाय धरून उचलून बाजूला नेण्यास सुरुवात केली. असं होत असताना एका बाईची साडी निसटली आणि चोळी फाटली. ग्रामीण भागात या प्रकाराचा परिणाम काय होईल याची कल्पना सगळ्यांनाच आहे. बाईच्या अंगाला हात लागला तर त्याबद्दलचा ग्रामीण भागातील संताप फार भयानक असतो. हा प्रकार झाल्यानंतर मला तिथं पोहोचायला तासभर वेळ लागला. पण तोपर्यंत एका बाजूला रेल्वेची दोन इंजिनं धडाडा पेटलेली होती आणि जिथं जिथं नाला आहे. तिथं तिथं गवत टाकून रूळांखालचे स्लीपर्स जाळायला सुरुवात झालेली होती. अशा या (भावनात्मक) उद्रेकाच्या वेळी जर आंदोलन मागे घेण्याचा निर्णय झाला नसता तर मनमाड ते नासिक या रेल्वेरस्त्याचा काहीही भाग सकाळपर्यंत जाग्यावर राहिला नसता. तसं जर झालं असतं तर तुम्हाला वाटलं असतं की, 'आंदोलन फार चांगलं झालं; ऊस आणि कांद्याच्या बाबत चांगली धमकी तयार झाली होती.' पण अशी धमकी शासनाला देताना आपण एका सशस्त्र ताकदीसमोर आपली ताकद उभी करतो आहोत, तिला आव्हान देत आहोत हे लक्षात घ्यायला हवे. आपण जे युद्ध लढतो आहोत ते चालविण्याची आपली ताकद नेमकी किती आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. नाहीतर हजारोंनी माणसं मेली तरी चालतील अशी तयारी ठेवली पाहिजे. पण आपण लढतो आहोत ते दिडक्यांचं युद्ध. मालाला भाव मिळावा म्हणून स्वातंत्र्याकरिता कुणी म्हटलं की हजारो माणसांनी जीव द्यायला हवा तर ठीक आहे. पण उसाला भाव मिळायला पाहिजे म्हणून काही अगदीच जीव टाकायची आवश्यकता नाही. तेव्हा असं तंत्र सांभाळून आंदोलन करायचं आहे. शक्य तितक्या कमी वेळाच आंदोलन करायचं, जास्तीत जास्त वेळा आंदोलनाची धमकी वापरूनच काही पदरात पाडून घेता येतं का पाहायचं. आंदोलन हे आपल उद्दिष्ट नाही, आंदोलन हे आपलं साधन आहे. त्याच्या साहाय्याने आपल्याला आपल्या मालाला भाव मिळवून घ्यायचा आहे. तेव्ह आंदोलन उभं करताना, स्थगित करताना, बोलणी करताना नेहमी हिशेब



करायला पाहिजे की आंदोलन उभं करणं जास्त महत्त्वाच आहे, आज आपल्याला जे मिळालं आहे त्यापेक्षा जास्त आंदोलन उभं केलं तर मिळण्याची शक्यता आहे की वाटाघाटी चालू असताना आंदोलन स्थगित ठेवण्यात नुकसान होणार नाही? की वाटाघाटी चालू असताना त्या मुद्दाम उधळून लावून शासनातील काही प्रमाणात ज्या व्यक्ती बऱ्या असतात त्यांची मनं मुद्दाम दुखावून जर आंदोलन चालू केलं तर यशाची शक्यता वाढणार आहे की वाढणार नाही?

शेवटी वाटाघाटींबाबत राग ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. खरं तर आंदोलन चालू करण्यापूर्वी वाटाघाटींची जी जी शक्यता आहे ती संपवून मगच आंदोलन सुरू केलं पाहिजे. काही लोकांचं मत असं दिसत नाही. पण आंदोलन चालू झाल्यानंतर पोलिस कसे वागतील हे आपल्याला सांगता येणार नाही आणि आपली माणसंही कशी वागतील हेही आपल्याला सांगता येणार नाही. आंदोलन झाल्यानंतर आंदोलनात बळी पडलेल्या माणसांच्या घरी जाण्याचा ज्यांच्यावर प्रसंग आलेला आहे त्यांच्यापैकी कुणी असं नक्कीच म्हणणार नाही की, 'वाटाघाटी राहू द्या बाजूला, आंदोलन झालचं पाहिजे.' काही झालं तरी चालेल पण आंदोलन हे झालंच पाहिजे असं फक्त बेजबाबदार माणसंच म्हणू शकतात. माझा असा आरोप आहे की असं म्हणणारी किंवा हे आंदोलन स्थगित का करतात, चालू का करत नाही असं म्हणणारी जी मंडळी आहेत त्यांनी आंदोलन काळात काहीही केलेलं नसतं. ज्यांनी प्रत्यक्षात आंदोलनात भाग घेतला, काही सोसलं त्या नासिक जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी असं कधी म्हटलं नाही. आता कांद्याबद्दल कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे तरी माझ्याकडं तारा येऊन पडल्यात की, 'तुम्ही आम्हाला शब्द द्याल तेव्हाच आम्ही आंदोलन सुरू करू त्याशिवाय नुकसान आलं तरी करणार नाही.' कारण त्यांची खात्री आहे की, 'ज्यावेळी आंदोलन करायला पाहिजे त्या वेळी मी आपणहून सांगेन.' आंदोलनाच्या तंत्राबद्दल शेतकऱ्यांची काही तक्रार नाही. पण टीका करणाऱ्यांचा थयथयाट चालला आहे. त्याचं तसंच कारण आहे. शेतकऱ्याला आपल्या स्वार्थाकरता राबवून घ्यायला सोकावलेली ही मंडळी आहेत. हे शेतकरी आंदोलनही आपल्या स्वार्थाकरता राबवून घेण्यासाठी ही पक्षीय मंडळी टपून बसली होती. पण आंदोलन स्थगित केल्यामुळे त्यांची फार निराशा झाली. त्यांचे हिशेब चालले होते की हे सरकार पडलं तर मी मुख्यमंत्री होईन, मंत्री होईन, कसला तरी चेअरमन होईन. तवा

चांगला तापत चालला आहे हे पाहून यांनी कणिक मळायला घेतली आणि यांची कणिक मळून होईपर्यंत आम्ही तवा काढून घेतला म्हणून यांना इतका राग आला. याच्यापलीकडे या रागाला काही अर्थ नाही आणि या रागाकडे आपल्याला लक्ष देण्याचं कारण नाही.

मुख्य मुद्दा असा की शेतकरी आंदोलन हे आर्थिक आंदोलन आहे. ते काही लोकांना पेटवून देऊन चालत नाही. हे पोटाच्या खळीतनं निर्माण झालेलं आंदोलन आहे. आपण ते अशा शिस्तीने चालवलं पाहिजे की जेव्हा बंद करा असा आदेश येईल तेव्हा बंद होईल आणि चालू करा असा आदेश येईल तेव्हा चालू होईल.

यावर डावी मंडळी-कॉम्रेड घुमे, अहिल्या रांगणेकर यांच्यासारखी मंडळी टीका करतात. त्याला कारण त्यांची आंदोलनांची आजवरची पद्धत आहे. काही एका भागामध्ये एखादा वादाचा मुद्दा उपस्थित झाला की, तिथे लोकांना पेटवून द्यायचं आणि पेटवून दिल्यानंतर तिथं जे घडेल त्याला आंदोलन म्हणायचं आणि ते सतत चालू ठेवायचं कारण असं आंदोलन एकदा थंड झालं की पुन्हा पेटत नाही. एखादी गाडी कशी किल्ली देऊन सुरू होत नाही, तिला धक्का मारावा लागतो, मग कुठं थांबायची वेळ आली की ड्रायव्हर म्हणतो, 'बंद नको करायला, चालूच राहू द्या.'

आमचं आंदोलन किल्ली फिरवून केव्हाही चालू होण्याची खात्री आहे म्हणून इंजिन बंद करायची आम्हाला भीती वाटत नाही.

आंदोलन करताना काही गोष्टी विशेषत्वाने लक्षात ठेवायला हव्यात. आंदोलन करताना किंवा आंदोलनाचे हत्यार निवडताना कोणत्या पदार्थाचा तुटवडा केव्हा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आम्ही २५ मे ला दूध आंदोलन करू म्हणून जाहीर केले आहे. मे, जून, जुलै हा काळ म्हणजे दुधाच्या तुटवड्याचा मोठा काळ आहे. अशा काळात दूध थांबवलं तर शेतकऱ्याचं कमीत कमी नुकसान होऊन दुसऱ्या बाजूला जास्तीत जास्त कळ लागेल. त्याचप्रमाणे २५ मे ही तारीख ठरवताना आणखी एक गोष्ट लक्षात घेतली ती म्हणजे २५ तारखेनंतर लग्नाचे मुहूर्त येतात. त्यामुळे दूध पुरवलं नाही तर परिणाम जास्त होईल. युद्ध आखताना जसं त्या रणभूमीवर कुठं कुठं काय आहे, कुठं टेकडी आहे, कुठं झाडं आहेत, कुठं नदीनाला आहे हे लक्षात घ्यायला पाहिजे तसंच आपलं आंदोलनही तयार झालं पाहिजे. त्याचप्रमाणे नवीन पिकं वगैरे केव्हा निघणार आहेत याचाही अंदाज



घेतला पाहिजे.

हवामानही फार महत्त्वाचं आहे. आम्ही २८ नोव्हेंबरला रस्त्यावरचं आंदोलन जेव्हा बंद केलं तेव्हा टीकाकारांनी एका गोष्टीचा उल्लेख कुठे केलाच नाही. नासिकमध्ये २४/२५ नोव्हेंबरपासूनच अतोनात थंडी पडू लागली होती. त्यावेळी लोकांना, लहान मुलांना रस्त्यावर बसवणं शक्य नव्हतं किंवा मग सगळ्यांना घोंगड्या-बिंगड्या असा ढीग आणावा लागला असता. त्यामुळेच २८ नोव्हेंबरनंतर रस्त्यावरचं आंदोलन चालू ठेवणं शक्य नव्हतं. त्याच्यानंतर सटाण्याच्या मेळाव्यात जो कार्यक्रम आम्ही जाहीर केला तो नीट तपासून पाहा. आम्ही जाहीर केल्याप्रमाणे पुढील कार्यक्रम हा कचेऱ्यात जाऊन बसण्याचा आहे, रस्त्यांवर नव्हे. तेव्हा हवामानाचा अंदाज जरूर घ्यायला हवा. डिसेंबरच्या पहिल्या पंधरा दिवसांत नासिक जिल्ह्यात गव्हाच्या पेरणीचा हंगाम असतो. त्यात पाऊस पडला. त्यामुळं शेतींच्या कामाकरता लोकांना मोकळं करणं आवश्यक आहे हे लक्षात घेऊनच २८ नोव्हेंबरला आंदोलन मागं घेतलं.

आंदोलनाच्या बाबतीत आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आंदोलन कोणत्याही पद्धतीचं का असेना ते संपूर्णत: शांततेने आणि अहिंसेने झाले पाहिजे. जर का आंदोलनाला हिंसक वळण लागलं तर ती मोठी दुर्दैवाची गोष्ट ठरेल. कारण मग तुमचं आंदोलन दडपून खलास करून टाकलं जाईल त्यावेळी तुम्हाला वाटेल की दोन दिवसांत तुमचं आंदोलन खूप वाढलं पण दीर्घ मुदतीत शेतकरी आंदोलन आणि शेतकरी संघटना संपून जाईल. शेवटी आपली ताकद कुठं उद्ध्वस्त करण्यात किंवा पेटवण्यात नाही. आपली ताकद संख्येत आहे. देशात ५२ कोटी शेतकरी आहेत. हे सगळेच्या सगळे शेतकरी आपण केव्हा उभे करू शकू? नासिक जिल्ह्यात दोन लाख शेतकरी एकत्र झाले आणि आपण उसाला ३०० रु. टन भाव मिळवला. महाराष्ट्रात १० लाख शेतकरी ज्वारी पिकविणारा आहे. हा दहा लाखांचा आकडा जर आज तुरुंगात जायला एकत्र झाला तर उद्या ज्वारीच्या किलोला २.३० चा भाव मिळवून घेता येईल. पण ही संख्या जोवर उभी करता येत नाही तोवर नुसतं तुम्ही कांद्याचाच प्रश्न आधी का घेतला आणि उसाचाच आधी का घेतला असं म्हणण्यात काही अर्थ नाही. माझा व्यवहार चोख आहे. तुम्ही १० लाख माणसं द्या, मी उद्या ज्वारीला भाव मिळवून देतो. पण जर कुणाची कल्पना असेल की जसं आमदार-खासदार आले की त्यांना आपण

म्हणतो की, 'साहेब, आमचं हे एवढं काम करून द्या.' तसं जोशींना सांगितलं, 'आमच्या ज्वारीला भाव मिळवून द्या.' की भाव मिळून जाईल तर ते चूक आहे. अशानं काही भाव मिळणार नाही. ज्वारीचा भाव तुमचा तुम्हाला मिळवायचा आहे. निपाणीला एका वक्त्यानं एक चांगलं उदाहरण वापरलं- ''तुम्ही असं समजू नका की शेतकरी संघटना किंवा शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आले आहेत. त्यांना सांगायचं की, 'जरा झाडावर चढा आणि आंबे काढा. तुम्ही काढल्यावर मग ते आपण मिळून खाऊ आणि जर तुम्ही झाडावरून पडलात तर आम्ही म्हणू, 'तुम्हाला झाडावर चढता येत नव्हतं तर चढलात कशाला?' तेव्हा आंदोलन म्हणजे असं काही नाही. ते सगळ्यांनी मिळून लढायचं आहे.'' सगळीकडे मिळून आपली ताकद काय आहे ते लक्षात घेऊन नेमक्या ठिकाणी प्रहार करायचा आहे. मराठ्यांच्या इतिहासात ज्याला गनिमी कावा म्हणतात त्या तंत्रानं हे आंदोलन चालवायचं आहे आणि संख्या हे त्याचं बळ आहे.

बाजारपेठेवर ताबा ठेवणे हे आपलं आंदोलनातील मुख्य हत्यार आहे. पण कांदा, ऊस आंदोलनांच्या वेळी आपण त्या मार्गाने सरकारचे नाक दाबू शकलो नाही. शेवटी आपल्याला रास्ता रोको, रेल्वे रोको या मार्गानीच सरकारचे नाक दाबावे लागले. त्याचा परिणामही झालेला दिसला. मग याच मार्गांचा सुरुवातीलाच वापर करायला काय हरकत आहे असं कुणाला वाटून जाईल.

कांदा आणि ऊस दोनही बाबतीत बाजारपेठ पूर्णपणे आमच्या ताब्यात नव्हती. म्हणून मग 'चिमटा' जास्त लागण्यासाठी आम्ही रस्ताच वापरला. पण आम्ही जर नुसते रस्तेच बंद केले असते आणि बाजारपेठेत आमची काहीच ताकद नसती तर पोलिसांनी रस्ते कधीच स्वच्छ केले असते. बाजारपेठेत ताकद असल्याशिवाय दुसऱ्या मार्गांचा काहीच उपयोग नाही. जर साखर थांबविण्याची ताकद आमच्यात नसती तर दोन लाख माणसं रस्त्यातनं काढणं पोलिसांना अजिबात कठीण नाही. त्यांना आदेश मिळाले की ते आपलं काम झटपट करतात. त्यांना त्याचं शिक्षण मिळालेलं असतं. ११ तारखेच्या रात्री पोलिसांनी दोन लाख माणसं अत्यंत कार्यक्षमतेनं रस्त्यातून बाजूला केली. त्यांनी दहा गाड्या हमालांच्या आणि दहा एस्.आर.पी.च्या रस्त्यातून फिरवल्या. १० गाड्यांतून २५० हमाल उतरायचे आणि रस्त्यावरचे दगड, झाडं काय असतील ते भराभरा बाजूला करायचे तर दुसऱ्या १० गाड्यांतून तितकीच एस्.आर.पी.ची माणसं उतरून सत्याग्रहींच्या



मधून फिरत त्यांच्या डोक्यांत काठी घालून त्यांना बाजूला करीत. त्यांनी झोपलेल्या सत्याग्रहींनाही झोडपले. सायकली-मोटारसायकलींची त्यांच्यावर मोठमोठे दगड घालून मोडतोड केली. एका ठिकाणी तर एक मोटारसायकल पुलाखाली टाकून दिली होती. अशा पद्धतीने ते सबंध रस्त्यात झोडपत झोडपत गेले. त्यांना याचं शिक्षण मिळालेलं असतं. तेव्हा आपण रस्ता कायमचा अडवून ठेवू शकू ही कल्पना चुकीची आहे. तिथं मग आंदोलनाला हिंसक वळण लागेल.

चाकणचं रास्ता रोको आंदोलन यशस्वी झालं त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे तिथं वापरलं गेलेलं बैलगाड्यांचं तंत्र नवीन होतं. शासनाला काय करावं याचा विचार सुचायच्या आत परिस्थिती त्यांच्या हाताबाहेर गेली. ५/१० हजार माणसं चाकणला शांतपणे बसली होती. तिथं गोळीबार किंवा लाठीहल्ला झाला नाही यालाही कारणं आहेत. एवढ्याशा लहान गावातच मी स्वत: उपोषण करीत बसलो होतो. नासिकच्या आंदोलनासंदर्भात हा फरक आहे. एकदा तुमची आंदोलनाची पट्टी २५० कि.मी. वर गेली-महाराष्ट्रभर गेली की जो काही एखाद्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाचा भाग असतो त्याचा परिणाम इतक्या मोठ्या क्षेत्रात जाणवत नाही. तेव्हा रस्ता मोकळा करायचा म्हटले की केला. दुसरी गोष्ट म्हणजे नासिकला आपण मुंबई-आग्रा रस्ता अडवला म्हणजे सबंध देशाचचं नरडं दाबलं. त्यात ३६ तास रेल्वे लाईनही बंद पाडली. त्यामुळे दिल्ली-मथुरेपासून गाड्या रेल्वेलाईनवरच उभ्या होत्या. (इतकं हे प्रभावी हत्यार आहे.) त्यामानाने पुणे-नासिक रस्ता कमी महत्त्वाचा.

चाकणलासुद्धा रस्ता अडविल्यानंतर ४८ तासांनंतर आम्ही एसटी गाड्या सोडून दिल्या. नंतर एसटी गाड्या यायच्याच बंद झाल्या. पण पहिल्या ४८ तासांत तिथे सुमारे १२० गाड्या साठल्या. त्यामुळे तिथेही एक उलट दबाव निर्माण झाला. १२० गाड्या म्हणजे ६००० प्रवासी अडकून पडले आणि आमचे सत्याग्रही होते फक्त ३५००. त्या गाड्यांमध्ये एक कुठल्यातरी मुलींच्या शाळेच्या ट्रीपची गाडी होती. आम्ही त्यांच्यासाठी दुधाची, जेवणाची वगैरे व्यवस्था केली. पण तिथं असं एक वातावरण तयार झालं होतं की त्या मुलींचा मोर्चा घेऊन त्यांचे शिक्षक आले आणि आम्हाला सोडा असं म्हणू लागले. म्हणजे उलट्या बाजूनेसुद्धा दबाव सुरू झाला. त्यामुळे त्या गाड्या सोडणे भाग पडले. तेव्हा रस्ता रोको किंवा अशी जी साधने आहेत ती नेमकी, अगदी तोळामासा मोजून वापरली पाहिजेत.

ती जर फार अतिशयोक्तीने वापरली तर त्याच्यामध्ये आपल्यालाच मार पडतो. शेवटी आपली ताकद ही बाजारपेठेत असणे हे मुख्य हत्यार आहे हे लक्षात ठेवायला पाहिजे.

आपलं आंदोलन शांततामय असलं पाहिजे आणि अशा तऱ्हेचं शांततामय आंदोलन चालू असताना जर शासनानं दडपशाही सुरू केली तर आंदोलक जमावाची सहनशक्ती संपण्याची शक्यता आहे आणि जमाव हिंसक होण्याची शक्यता आहे. आंदोलकांची सहन करण्याची मर्यादा ज्या क्षणी संपेल त्या क्षणी मी आंदोलन मागे घेईन पण त्याला हिंसक वळण लागू देणार नाही. मी मुळीच 'अहिंसा' तत्त्वज्ञान मानणारा नाही. इथं गांधीवादी अहिंसेचा प्रश्नच निर्माण होत नाही. पण हा डावपेचाचा प्रश्न आहे. कोणत्याही तऱ्हेची हिंसा करणे हे तुमच्याच पायावर धोंडा पाडण्यासारखे आहे. जी दोन माणसांची डोकी फुटली किंवा दोन माणसं मेली तरीसुद्धा आज त्याची हिंसक प्रतिक्रिया होता कामा नये. हे अत्यंत महत्त्वाचं आहे. कारण आपण ज्या शक्तीशी लढतो आहोत तिची ताकद प्रचंड आहे. आपल्या देशात सशस्त्र आंदोलनाचा प्रयत्न झालेला नाही कारण १९१४ सालापर्यंत लष्कराच्या हाती जी काही शस्त्र असायची आणि जनतेच्या हातात जी शस्त्र असायची यांच्यात फारसा फरक नसे. आज त्याच्यामध्ये फार फरक आहे. अशा स्थितीत जर अहिंसक मार्ग सोडून किंवा सविनय सत्याग्रहाचा मार्ग सोडून दुसऱ्या कोणत्याही मार्गानं जायचं असेल तर त्याला संपूर्ण यादवीखेरीज दुसरा मार्ग नाही. तात्पुरतं शौर्य गाजवल्यासारखं वाटेल पण त्यामध्ये शेवटी आपला पराभव निश्चित आहे. तेव्हा युद्धामध्ये हत्यार कोणतं वापरतो यापेक्षा बुद्धी कितपत वापरतो हे जास्त महत्त्वाचं.

****



## परिशिष्ट क्र. १

# भारतीय शेतीची पराधीनता

# प्रस्तावना

शेतकरी संघटनेचे पहिले अधिवेशन जानेवारी १९८२ मध्ये सटाण्याला भरले होते. मी या अधिवेशनाला हजर राहिलो. त्या अधिवेशनातील शेतकऱ्यांचा उत्साह, सामान्य कार्यकर्त्यांची भाषणे व श्री. शरद जोशींचे तेथील मार्गदर्शन यामुळे मी संघटनेच्या विचाराकडे व आंदोलनाकडे ओढला गेलो. त्यावेळी वृत्तपत्रांतील संघटनेवरील टीकेचा फोलपणा लक्षात आला आणि भारताच्या दारिद्र्याच्या मूलभूत कारणांचे प्रथमच एवढे लख्ख भान आले.

वर्धा येथे १ जानेवारी ८१ रोजी भरलेल्या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या शिबिराच्या कॅसेटस् प्रा. म्हात्रे यांच्याकडून मिळाल्या त्या ऐकल्या आणि संघटना व शरद जोशी यांच्या तत्त्वज्ञानासंबंधीच्या माझ्या धूसर कल्पना अधिक स्पष्ट झाल्यानंतर सर्व कॅसेट्सचे शब्दांकन केले. त्यातील पुनरावृत्ती व विवेचनाच्या ओघात अनावश्यक वाटलेल्या अशा मजकुराला दूर ठेवून, पुनः सर्व लिहून काढले. हे येणार नाही याची मुख्य काळजी घेतली. त्यांची शैली हा या पुस्तकाचा, विचारांइतकाच महत्त्वाचा भाग आहे, असे वाटते.

या सर्व कामाने मला अत्यंत आनंद झाला. एका प्रगल्भ, बुद्धिवादी मनाच्या सान्निध्यात माझे हे कामाचे दिवस अक्षरशः सार्थकी लागले. अर्थात् त्यासाठी मी प्रा. डॉ. अरविंद कुलकर्णी व प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे यांचाही आभारी आहे.

या पुस्तकामुळे कार्यकर्त्यांना खेडोपाडी प्रचार करताना फायदा निश्चितच होणार आहे. शेतीचे अर्थशास्त्र, शेतीतील तोट्याची मीमांसा, शेतकऱ्यांच्या पद्धतशीर होणाऱ्या नागवणुकीचे स्वरूप, संघटनेचा विचार, आंदोलनाची तंत्रे या सर्व गोष्टीसंबंधीची चर्चा या पुस्तकात आलेली आहे. हे पुस्तक परिपूर्ण आहे असा दावा अर्थातच नाही. शिबिराची वेळ व चर्चेचा प्रवाह या दोन मर्यादा मुख्य आहेत. पण शेतकरी संघटनेच्या तत्त्वज्ञानाचा जो ग्रंथ पुढे तयार होईल तेथवर

पोहोचण्याची ही एक पाऊलवाट आहे.

स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील या स्वप्नाच्या मृगजळावर शेतकरी जगले. पण शोषणव्यवस्था स्वातंत्र्यानंतरही पद्धतशीरपणे जोपासली गेली. शेतकऱ्यांच्या रास्त भावाच्या आंदोलनाला चिरडून टाकण्याचे शासकीय प्रयत्न म्हणजे या शोषणव्यवस्थेला टिकवून धरण्याचे प्रयत्न आहेत. हा क्रूर डाव शरद जोशींनी विचार व आंदोलनांमधून शेतकऱ्यांच्या लक्षात आणून दिला. हे त्यांचे महान कार्य आहे. म्हणूनच ते स्वातंत्र्यानंतरचे सर्व श्रेष्ठ (क्रियाशील) विचारवंत ठरतात.

या पुस्तकाने जोशी व संघटना यांच्यावर ऊठसूट टीका करणाऱ्या, विपर्यस्त बातम्या देणारी वृत्तपत्रे, नेतेमंडळी यांचाही फायदा होणार आहे. आधी टीका करून नंतर ती मागे घ्यायची किंवा काही सारवासारव करायची असे त्यांना आता, हे पुस्तक वाचल्यावर करण्याची जरूरी नाही. शेतकरी प्रकाशनाच्या तीन पुस्तकांनी त्यांचा स्व-प्रबोधनाचा मार्ग मोकळा झाला आहे.

या पुस्तकाचे काम-कॅसेट्सचे शब्दांकन करून-सौ. लीलाताई जोशी यांनी सुरू केले होते. शेतकरी संघटनेच्या प्रारंभापासून त्यांनी शेतकऱ्यांसाठी कार्य करायला सुरुवात केली होती. परदेशातील सुखासीन जीवनाचा त्याग करून त्यांनी हे कार्य हाती घेतले होते. विविध आंदोलनांच्या वेळी शरद जोशी व इतर नेते तुरुंगात असताना त्यांनी कणखरपणे कार्य चालू ठेवलेले होते. आपणा सर्वांच्या दुर्दैवाने आज त्या आपल्यात नाही.

हे पुस्तक मी सौ. लीलाताई जोशींच्या स्मृतीला अर्पण करतो.

१० डिसेंबर १९८२
आनंद भुवन, अलिबाग.

**सुरेश घाटे**



# भारतीय शेतीची पराधीनता

१ जानेवारी १९८१ रोजी भरलेल्या विदर्भातल्या पहिल्या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या शिबिराचे उद्घाटन झाले असे मी जाहीर करतो. या शिबिराचा उद्देश प्रथमतः स्पष्ट करायला पाहिजे. शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीच्या प्रश्नांविषयी विशेषतः विदर्भात जेवढा विचार, अभ्यास व लिखाण झाले आहे तेवढे माझ्या माहितीप्रमाणे महाराष्ट्रात तरी निदान कोणत्याही भागात झालेले नाही. कदाचित् पंजाब आणि हरियाना या समृद्ध प्रदेशात असा विचार झालेला असेल. पण जेव्हा येथे विदर्भात गावोगावी फिरताना वेगवेगळ्या कार्यकर्त्यांनी छोट्या पुस्तिकांच्या स्वरूपातसुद्धा शेतीमालाचा उत्पादन खर्च, शेतीमालाचं अर्थशास्त्र यावर लिखाण केलेले मला आढळले, त्याने मी थक्क होऊन गेलो. आज गेल्या काही वर्षांमध्ये सर्व शेतकऱ्यांना व्यावसायिक प्रश्नावर-निदान महत्त्वाच्या व्यावसायिक प्रश्नांवर-संघटित करून एक नवीन ताकद उभारण्याचा प्रयत्न शेतकरी संघटनेतर्फे होतो आहे. त्या निमित्ताने वेगवेळ्या भागात शेतकरी सभा, मेळावे होतात. अशा मेळाव्यांमध्ये तास दीड तास भाषण होऊ शकते. नंतर चर्चेची शक्यता नसते. आज हे शिबिर भरवण्याचा हेतू असा आहे की, ज्यांनी सर्वसाधारणपणे एखादी तरी सभा ऐकली आहे आणि हा नवीन विचार काय आहे असे कुतूहल ज्यांच्या मनात तयार झालेले आहे, ज्यांनी थोड्याफार कामाला सुरुवात केलेली आहे, प्रामुख्याने अशा कार्यकर्त्यांचे हे शिबिर आहे अर्थात येथे येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला शेतकरी संघटनेचा सर्व विचार पटलेला आहे असे मुळीच गृहीत धरलेले नाही. सतत दीड दिवस इथं बसून शेतकरी संघटनेच्या विचाराची जी पद्धत आहे, चौकट आहे तिचा आणि तपशिलाचा सखोल अभ्यास आणि चर्चा व्हावी हा या शिबिराचा मुख्य हेतू आहे. ही चर्चा कशासाठी व्हावी? तिचा हेतू व्यावहारिक आहे.

गेल्या दहा महिन्यांत शेतकरी संघटनेचा विचार हा देशभर इतक्या झपाट्याने पसरलेला आहे. विशेषतः शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अपुऱ्या उत्पन्नाची जाणीव इतक्या मोठ्या प्रमाणावर झाली आहे, की कार्यकर्त्यांची फौज, पलटण तयार करणे आवश्यक झाले आहे. थोड्या माणसांचे हे काम नव्हे. शेतकऱ्यांच्या मनात ज्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत त्या पाहिल्या तर आपापल्या भागात हा विचार स्वयंभूपणे

मांडू शकतील अशी कार्यकर्ती मंडळी तयार करणे आवश्यक आहे. अशा मंडळींच्या प्रशिक्षणाचा हेतू या शिबिरामागे आहे.

या शिबिरात कोणत्या प्रकाराने काम होणार आहे याची रूपरेषा मी सांगतो-

शेतकरी संघटनेच्या विचाराच्या चर्चेच्या सोयीकरिता मी तीन भाग पाडलेले आहेत :-

(१) अर्थशास्त्रीय विचार, ज्यात मुख्यत: विचारांची चौकट चर्चिली जाईल.

(२) शेतकरी संघटनेची बांधणी, त्यातील अडचणी आणि योजावयाचे मार्ग

(३) शेतकरी आंदोलने, त्यांची तंत्रे आणि साधने.

अर्थशास्त्रीय विचार करताना मूळ चौकट आपल्याला अशी लक्षात घ्यायची आहे की, जो तो या देशात आपल्या वर्गाचा किंवा व्यवसायाचा स्वार्थ बघतो आहे. याला कोणतीही संघटना अपवाद नाही. माझ्या कल्पनेतील जी शेतकरी संघटना आहे, ती जरी शेतकऱ्यांची असली तरी ती एका वर्गाच्या किंवा व्यवसायाच्या हितसंबंधाचे रक्षण करणारी नाही. हा बहुसंख्य वर्ग शेतकरी आहे आणि जे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे तेच देशातील आमजनतेच्या हिताचे आहे; एवढेच नव्हे, तर शेतीचा प्रश्न सुटल्याखेरीज दारिद्र्याचा प्रश्न सुटू शकत नाही म्हणून शेतकऱ्यांचा प्रश्न महत्त्वाचा आहे. या पायावर शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र उभे आहे. शेतकऱ्यांच्या, देशाच्या दारिद्र्याचे मूळ हे शेती व्यवसायातील आहे म्हणून आपण शेती व्यवसायाचा प्रामुख्याने विचार करतो आहोत. त्यामध्ये शेती व्यवसायाचे स्वरूप, त्याच्यातील नैसर्गिक घटक आणि शासकीय धोरण यावर चर्चा होईल. शेतीमालाच्या बाजारभावासंबंधाने होणारे आर्थिक शोषण हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यानंतर आजपर्यंतच्या विकासयोजनांमध्ये जे काही वेगवेगळे प्रकल्प हाती घेण्यात आले, किंवा जी काही योजनांची बांधणी करण्यात आली त्यात शेतकऱ्यांची म्हणजे बहुजनांची फसवणूक कशी होत होती, हा विचार केला जाईल. विशेषत: जमीन वाटप, उत्पादन वाढ आणि धर्मादाय- म्हणजे शाळा, दवाखाने उघडणे- या प्रकारच्या योजना. या तीन वर्गांमध्ये वेगवेगळे प्रकल्प व योजना यांचा विचार तपशीलवार करण्यात येईल. त्या नंतर हा जो सगळा अर्थशास्त्रीय विचार आहे त्याचा संबंध जागतिक अर्थशास्त्राच्या इतिहासात कुठे बसतो, त्याचा काही संबंध लागतो का, याचाही थोडा अभ्यास करणे आवश्यक आहे आणि एवढा विचार झाला की आपला एखादा कार्यकर्ता अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाला तोंड द्यायला तयार होईल



असे आपण गृहीत धरु.

ही चर्चा आजच्या दिवसात संपेल अशी मला आशा नाही. निरनिराळे महत्त्वाचे मुद्दे आहेत. उद्या सकाळचा निम्मा वेळ तरी यात जाणार आहे. प्रत्येक वेळी एकेक मुद्दा घेतल्यानंतर मी किंवा शेतकरी संघटनेचे दुसरे कोणीही कार्यकर्ते, ५/१० मिनिटात प्रास्ताविक करून आजपर्यंतचा यावर विचार काय आहे, हे सांगतील. त्यानंतर खुली चर्चा होईल. ज्याला ज्याला चर्चेत भाग घ्यायचा आहे, त्याने अवश्य घ्यावा. शिबिराचे स्वरूप हे शिबिराचेच राहावे; शिबिर म्हणजे १।। दिवसाची सभा होऊ नये. एकाच माणसावर बोलायची वेळ येऊ नये; अशी अपेक्षा आहे. हे संपल्यानंतर उद्या ११/११।। च्या सुमारास 'शेतकरी संघटना, अडचणी आणि मार्ग' याविषयी चर्चा होईल आणि त्यात प्रामुख्याने बागायतदार शेतकरी, मोठा-लहान शेतकरी. शेतकरी-शेतमजूर वगैरे वेगवेगळ्या लोकांचे आंदोलनाच्या दृष्टीने काय संबंध आहेत, त्यांच्यामध्ये संघर्ष कितपत आहेत-आपण त्यात शेतकरी व ग्राहक हाही संबंध घालू शकतो-याचा आपण विचार करू. या बरोबरीनेच शेतकऱ्यांची जुनी, नवी आंदोलने यांचा तात्त्विक विचाराच्या अनुषंगाने विचार करू. आजपर्यंतचा आपला अनुभव काय आहे, आंदोलनात वापरण्यासारखी कोणकोणती हत्यारं शेतकऱ्याकडे आहेत, ती वापरताना कोणती तंत्रे वापरावी लागतात, कोणती सावधगिरी बाळगावी लागते या सर्वांचाच, वेळेच्या मर्यादेत जसा होईल तसा विचार करू. आपण एकेक शेतीमालाची वस्तू घेऊन आंदोलने लढवली. जसजशी शेतकरी संघटनेची ताकद वाढत जाईल तसतसे आंदोलनाचे स्वरूपही व्यापक होत जाईल. ही भूमिका आजपर्यंत योग्य ठरली. त्याविषयीही चर्चा करू. पुढे हेच तंत्र वापरायचे आहे की वेगळी काही तंत्रे वापरायची आहेत याचाही विचार करता येईल. तेव्हा थोडक्यात या शिबिरातील चर्चा तीन भागात होईल :-

१) अर्थशास्त्र २) संघटना ३)आंदोलन.

हे शिबिर अभ्यासाचे शिबिर आहे. ज्यांनी कुणी येताना कागद वगैरे आणलेले नसतील त्यांनी अजूनही सांगावे. आपण काहीतरी व्यवस्था करू. कारण हा वर्ग आहे. ही जाहीर सार्वजनिक सभा नाही किंवा लोकसभाही नाही, येथे अभ्यास करायचा आहे.

**आम्ही शेतकऱ्यांनी शेतीव्यवसाय गंभीरपणे घेतला नाही. शेतकऱ्यांची आंदोलने यशस्वी का झाली नाहीत? शेतकरी–मजूर ही फूट नको, एकजूट हवी. म. गांधींनी इंग्रज शोषक होते म्हणूनच लढा उभारला ना? शेतकऱ्यांमधील भेद कसे दूर होणार?**

मी जेव्हा शेतकरी शब्द वापरतो, तेव्हा त्यात शेतमजूरसुद्धा आहेत. शेतकरी दरिद्री का? त्याच्या मालाला भाव नाही म्हणून. त्याच्या मालाला भाव का नाही? हे सरकारी धोरण आहे म्हणून. याच्याकरिता काय करायला पाहिजे? सर्व शेतकऱ्यांनी एकत्र व्हायला पाहिजे. जात, धर्म, पक्ष कशाचाही विचार न करता एकत्र व्हायला पाहिजे. या तीनच गोष्टी लक्षात ठेवा. शेतमजुराचे नाव घेऊन तुमच्यामध्ये कुणीतरी भांडणं लावील. कारण या दोघांची एकी झाल्यावर शेतकऱ्यांच्या मालाला भाव देणे भाग पडेल, हे टाळण्यासाठी काहीजण सांगतील की हा शेतकरी आहे आणि तू शेतमजूर आहेस? काय फरक आहे शेतकरी व शेतमजुरात? आज समजा एखाद्याकडे ५६ एकर जमीन आहे. पुढच्या पिढीत त्याच्या चार मुलांना प्रत्येकी १४ एकर जमीन राहील. नवीन जमीन घेणे शक्य नाही. त्यानंतरच्या पिढीतील त्याचे नातू शेतमजूर होतील व नंतरचे भूमिहीन. म्हणजे बाप बागायतदार, मुलगा छोटा शेतकरी व पुढच्या पिढ्या शेतमजूर!

**दुधाच्या लढ्यासंबंधी संघटनेची भूमिका कोणती आहे? हे आंदोलन केव्हा होईल? तेव्हाच का?**

शेतीमालाच्या बाजारभावासंबंधी जी आंदोलने होतील ती आर्थिक स्वरूपाची आहेत. राजकीय नाहीत. काहीतरी मनामध्ये आकडा घ्यायचा, जाहीर करायचा आणि कुठेतरी एक आंदोलन चालू करायचे, हे शेतकऱ्यांच्या घाताचे आहे. कालच मी वर्तमानपत्रात वाचले; विदर्भाच्या एका भागात दुधाला तीन रु. लिटर भाव मिळावा म्हणून एक छोटे चार दिवसांचे आंदोलन झाले. काय उपयोग झाला त्याचा? शेतकऱ्यांचे दूध तेवढे फुकट गेले! मिळाले काहीच नाही. दुधाचा उत्पादन खर्च सध्या आम्ही काढतो आहोत आणि आजपर्यंत जो अभ्यास झालेला आहे, त्यावरून दुधाचा उत्पादनखर्च ३.५० रु. पेक्षा निश्चित कमी नाही. कोणत्याही मालाचा उत्पादन खर्च काढणे हे सोपे काम नाही. ते एक वेगळे शास्त्र आहे आणि



ज्याला शेती जमते, ज्याला दुधाचा धंदा जमतो, त्याला उत्पादन खर्च काढता येतोच असे नाही. शिवाय ज्यांना चार वेळा भागाकार करायला सांगितले तर चार वेगळी उत्तरे येतात, त्यांनी या फंदात पडू नये.

दुधाच्या लढ्याकरिता कार्यक्रम ठरलेला आहे. २५ मे १९८१ या दिवशी महाराष्ट्रभर दूध–भाताचा लढा चालू करण्याचे ठरलेले आहे. दुधाचा तुटवडा केला जाईल, पण मागणी केली जाईल दूध आणि भात यांच्या भावांची. हे का? हे दोन पदार्थ का? या वेळीच का? अभ्यास केल्यावर हे समजण्यासारखे आहे. आमच्या पुढाऱ्यांना हे समजायचे नाही. शेतकऱ्यांना फक्त समजते. आत्ता दूध उत्पादन भरपूर आहे. आत्ता दूध थांबवले तर पंजाबातली मंडळीही इथे दूध पाठवायला तयार होतील. गुजरातमधली तर पाठवतीलच. मग तुम्हाला दुधाचा लढा यशस्वी करायचा असेल तर मे आणि जुलै या महिन्यातच केला पाहिजे. मे चांगला. कारण त्यावेळी लग्नाचे मुहूर्त असतात. तेव्हा दूध थांबवल्याचे परिणाम लगेच होतील आणि उन्हाळ्यात छोट्या शेतकऱ्यांच्या घरी दूध कमी असते. त्यांच नुकसान कमी होईल. म्हणून २५ मे १९८१ हा दुधाचा मुहूर्त आहे. दुसरा कुणी आला आणि तुम्हाला पंचांग दाखवायला लागला तर त्याच्याकडे लक्ष देऊ नका. मुंबईमध्ये झाडू कामगार संप करतात तो नेहमी पावसाळ्याच्या सुरुवातीला. ७/८ जूनला झाडू कामगारांचा संप! कारण गटारे त्याच वेळी तुंबतात. त्याच वेळी त्यांचा लढा यशस्वी होऊ शकतो. त्याचप्रमाणे शेतकरी आंदोलनाची काही तत्त्वे आहेत, काही डावपेच आहेत. ज्यांनी शेतकरी आंदोलनाचा अनुभव घेतलेला नाही, त्यांनी आम्हाला सांगू नये.

**किती दिवसात यश येईल? कोणत्या कारणांनी स्थगित होऊ शकेल?**

नाशिकचे आंदोलन चालू असताना १३ तारखेला आम्ही ते २४ ते ४८ तास स्थगित केले. सगळी कारणे काय आहेत, हे जेव्हा या आंदोलनाचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हाच सांगता येतील, आत्ता ती सांगितली तर पोलिसांना कळतील. पण १२ तारखेला संध्याकाळी नाशिक जिल्ह्यात पाऊस झाला होता. आठ आठवड्यानंतर पाऊस येत होता. शेतकरी वाट पाहत होते. मी टीकाकारांना विचारले : जर अशा तऱ्हेचा पाऊस झाला तर तुमच्या मते त्याचा शेतकरी आंदोलनावर परिणाम होईल की नाही? जर गव्हाच्या पेरणीची वेळ आली तर

आंदोलन स्थगित करायला पाहिजे की नको? शहरातल्या कामगारांच्या आंदोलनाचा तुम्हाला जो काही अनुभव असेल त्याच्या आधारे शेतकरी आंदोलनाविषयी कुणीही उठावं आणि काहीही बोलावं याला अर्थ नाही. मुद्दा हा की, लोकांना बोलू द्या. यांचे आपण ३३ वर्षे ऐकलेय. काय कल्याण झालेय? आता शेतकरी संघटनेच्या विचाराला दोन वर्षे तुम्ही द्या. जर नाही जमले तर सोडून द्या. मतं मागायला काही आम्ही तुमच्याकडे येणारच नाही. जा तुमच्या नेहेमीच्या पुढाऱ्यांच्या मागे. आम्ही तुमचे कल्याण इच्छीतो. पण जर काही शेतकऱ्यांचे भले व्हावे असे वाटत असेल आणि शेतकऱ्याला केवळ लाचारीने जगावे लागू नये, ताठ मानेने, अभिमानाने जगता यावे असे वाटत असेल तर या कार्याला दोन वर्षे पाठिंबा द्या. आजपर्यंत पुढाऱ्यांनी पुष्कळ सोन्याची कौले चढवली तुमच्या घरावर!

फक्त हे काम करा : गावोगाव जा. सगळीकडे जाणे मला किंवा कार्यकर्त्यांना शक्य नाही. तुमच्यापैकी प्रत्येकजण शेतकरी संघटनेचा पुढारी आहे, नेता आहे, कार्यकर्ता आहे. आमच्याकडे कुणी अध्यक्ष नाही आणि पुढारी नाही. ज्याने त्याने आपल्या घरचे हे काम आहे असे समजून गेले पाहिजे आणि हा विचार गावोगाव समजावून सांगितला पाहिजे. टीका करणाऱ्या कोणालाही दोन प्रश्न विचारायचे :

शेतमालाला भाव देता की नाही ते बोला आणि इतकी वर्षे तुम्ही काय केले?

विदर्भातील ऐतिहासिक परंपरा अशी आहे की, मी तर ५०,००० लोक म्हणतो आहे! आज इथे बसलेल्या मंडळींनी किंवा शिबिरात आलेल्या मंडळींनी जरी आज ठरवले तरी येत्या १० दिवसांत ही मंडळी १० लाख शेतकरी उभे करू शकतील. एवढी एकी, परंपरा विदर्भात आहे.

हे करून दाखवा आणि कोणत्याही शेतकऱ्याला दोन वर्षांमध्ये लाचारीने जगायची वेळ येणार नाही, एवढे मी तुम्हाला आश्वासन देतो.

**सरप्लस, दूरच, मीठ–मिरचीसाठीही ज्याला धान्य विकावे लागते, असा मोठा वर्ग आहे. त्याबद्दलही जोशी यांनी विचार मांडावे. पूर्ण शोषण होते आहे अशा भूमिहीन शेतमजुरासंबंधीही विचार मांडावे.**

विनिमयाच्या पद्धतीमध्ये आणि पैशाच्या पद्धतीमध्ये आल्याबरोबर भांडवली विकासाच्या पद्धतीचा जो फरक पडतो आणि शोषणाची जी प्रक्रिया सुरू होते,



त्यामध्ये उत्पादनखर्चावर आधारित भाव मागण्याची जी पद्धत आहे ती भांडवली विकासाच्या इकॉनॉमी पद्धतीप्रमाणे नाही काय? आणि जर आपल्याला भांडवली विकासाची ही पद्धत अभिप्रेत असेल तर आपल्या पद्धतीमध्ये याचा अंतर्भाव आवश्यक नाही का?

शेतकरी व शेतमजूर हा वाद इंडियावाल्यांनी भारतात फूट पाडण्यासाठी काढलेला आहे हेही तर्कशुद्धतेने तपासायला हवे. शेतकरी, शेतमजूर हा कुणाचा जेन्यूइन प्रश्न असू शकतो. दुसरे असे की विजय जावंधियांनी जे म्हटले की तात्यासाहेब हा काही नैसर्गिक कारणामुळे आज श्रीमंत आहे, तर ते नैसर्गिक कारण समजून घ्यायला पाहिजे. भारतातील आजची विषमता दोन कारणांमुळे आहे. एक, जमीन तुमच्याजवळ किती आहे व दुसरे, तुमची जात कोणती आहे आणि जमीन धारणेतील विषमता व जातीतील विषमता नैसर्गिक नाही. ती मानवनिर्मित आहे. भारतातील गरिबीतील विषमता हे मानवनिर्मित धोरण आहे, तो नैसर्गिक अपघात नाही.

तिसरी गोष्ट जी शरद पाटलांनी सांगितली की, खेड्यामधील आमदार–तात्यासाहेब– त्याची नजर खासदाराच्या खुर्च्यांवर आहे, म्हणून तो इंडियाचाच भाग आहे. मला असे वाटते की तात्यासाहेब हा भारताचा भाग आहे. त्याला आपण भारताच्या बाहेर ढकलू शकत नाही. शेतकरी आंदोलनांमध्येसुद्धा तात्यासाहेब फार मोठ्या प्रमाणावर आहे व ही आनंदाची गोष्ट आहे. कारण त्यांच्या हातात शक्ती व प्रभाव आहे. त्यांनी या आंदोलनात जरूर असावे.

बोकरे साहेबांनी कपाशीचे जे भाव काढले आहेत ते माझ्या हातात आहेत. भाव काढताना खेळत्या भांडवलावरील व्याज, स्थायी भांडवलावरील व्याज, **Rental Value of Land** आणि १२॥% नफा आणि बाजारखर्च याबद्दल माझे काही म्हणणे नाही. पण मग हे धरताना मजुराची मजुरी ४.८८ रु. का धरली हो? ७०० रु. भाव ८ रु. मजुरी का नाही धरली? १० रु. का नाही धरली? त्यावेळी शेतकऱ्यावर होणारे सगळे अन्याय दूर करण्याचा तुम्ही प्रयत्न केला परंतु मजुरावर होणारा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला नाही. कारण हे भाव शेतकऱ्याने काढलेले आहेत. हेच जर शेतमजुराने काढले असते तर हे झाले नसते, ही पहिली गोष्ट.

आम्हाला भाव वाढवून मिळाले की आम्ही मजुरीही वाढवून देऊ हा शेतकऱ्यांचा दावा! यातला भ्रामकपणा असा आहे की ७०० रु. कापसाचा भाव धरला आहे

तेव्हा त्याच्यामध्ये शेतकरी असे दाखविण्याचा प्रयत्न करतो की त्या भावात मजुरी ४.८८ रु. आहे. यात नेमकी फसवणूक अशी आहे की ४.८८ रु. हा भाव ५१७ रु. ने काढला आहे. त्यानंतर जेव्हा २५% **Inflation** ने तुम्ही गुणता तेव्हा मजुरीला २५% ने गुणा आणि ती गुणली तर ६.१० रु. रोजी येते. पुरुषाला ७ रु. व स्त्रीला ५ रु. द्या. पण ७०० रु. कापसाच्या भावामध्ये हे मजुरीचे दर धरलेले आहेत हे सत्य जाहीरपणे सांगायला हा शेतकरी तयार नाही. हा दुसरा मुद्दा.

तिसरा मुद्दा असा की ओलीत शेती असूनही नाशिक जिल्ह्यामध्ये मजुरीचा दर ४ रु., ५ रु. होता. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातात पैसा आला किंवा ओलीत शेती वाढली म्हणजे मजुराकडे पैसा येतो हे काही मला खरे वाटत नाही. मुद्दा असा की शेतमजुरांच्या फायद्यासाठी ते आज या आंदोलनात येऊ शकतात. म्हणजेच संघटनेच्या आंदोलनात शेतमजुराचाही फायदा अंतर्भूत व्हायला हवा. त्यातून उद्याचा शेतकरी व शेतमजूर हा लढा थांबवण्याची सुवर्णसंधी आपल्याला लाभेल.

माझी स्थिती अशी झाली आहे की चवथ्या, पाचव्या धड्याचा अभ्यास करून ठेवावा आणि प्रश्न येतील म्हणून वाट पाहावी; तर प्रश्न यावेत दहाव्या, बाराव्या धड्यावरचे! मी मुद्दाम पायरी पायरीने जात होतो ते अशाकरिता की शेवटी या चर्चेचा उपयोग करून इथे जमलेल्या कार्यकर्त्यांना शेतकरी संघटनेची बाजू गावोगाव जाऊन समर्थपणे मांडता येईल; म्हणून मी थोडा ढ विद्यार्थ्यासारखा हळूहळू जात होतो आणि इथे बसलेले सगळे विद्यार्थी फार हुशार आहेत. ते आधीच सर्व वाचून ठेवून प्रश्न विचारत आहेत.

शेतकरी, शेतमजूर; बागायतदार, कोरडवाहू शेतकरी; छोटा-मोठा शेतकरी या सगळ्या संबंधीची यादी मी शेतकरी संघटनेच्या स्ट्रॅटेजीच्या विभागात मुद्दाम टाकली होती. कारण शेतकऱ्यांकडून शेतमजुरांचे आज शोषण होत आहे याला कुणालाही काडीमात्र शंका घेण्याचे कारण नाही. हे शोषण का होतय? तर शेतकरी सांगू लागले की आम्हाला भाव मिळत नाही म्हणून आम्ही तुमचे शोषण करतो, तर शेतमजूर त्याला काय उत्तर देईल? तुला जर भाव मिळवता येत नसेल आणि तुला शेती परवडत नसेल तर तू शेती सोडून निघून जा. माझ्या कष्टाचे फळ देणे ही मला काम देणारा म्हणून, तुझी जबाबदारीच आहे. समजा एखादा कारखानदार म्हणू लागला की मला तुझ्या मजुरीचा दर देता येणे शक्य नाही कारण सध्या बाजारात मंदी आहे, मालाला उठाव नाही आणि मला चांगला भाव मिळू शकत नाही तर



ते कुणी ऐकून घेणार नाही. त्याला दिवाळे काढावे लागेल. याच प्रकारचा युक्तिवाद मी अनेक ठिकाणी शेतकऱ्यांशी बोलताना केलेला आहे. एका बाजूला मी स्वत:ची अशी खात्री करून घेतलेली आहे की, आजच्या परिस्थितीमध्ये शेतकरी व शेतमजूर या दोघांचेही शोषण होते आहे. दोघेजण मिळून जर दोन भाकऱ्यांसाठी कष्ट करीत असले तर दोघांना मिळून एकच मिळते आणि मग साहजिकच शेतकरी आज त्यातल्या त्यात मजबूत स्थितीत असल्यामुळे शोषणाचा जितका मोठा भाग शेतमजुरावर ढकलून देता येईल तितका तो ढकलून देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करतो. त्यात तो नेहमीच यशस्वी होतो असे नाही. ज्या भागात उद्योगधंदे आहेत, दुसरे रोजगार मिळू शकतात- उदा. पुण्याच्या आसपास- तेथे हे शक्य होत नाही. पण जितके आत जावे-उदा. माझ्या शेतीच्या आसपास- अशी परिस्थिती आहे की शेतमजुरांना उन्हाळ्याच्या दिवसामध्ये १।। आणि २ रु. इतकी मजुरीसुद्धा आज पुणे जिल्ह्यात आहे. या परिस्थितीच्या सत्यतेबद्दल आणि इथे काही तरी लढा व्हायला पाहिजे याबद्दल कुठेही वाद असू शकत नाही.

तेव्हा पहिल्यांदा गैरसमजाचे मुद्दे दूर करतो :

दुसरा मुद्दा कपाशीबद्दलचा! मला असे आठवतेय की आर्वीच्या सभेमध्ये मी अशी घोषणा केली होती की, या हिशोबात जरी ६ रु. धरलेले असले तरी त्याच्यावर किमान आठ आणे मजुरी जास्त दिली जाईल, असा प्रयत्न आपण सर्वांनी केला पाहिजे. हे काही शेतकऱ्यांनी उत्पादन खर्च काढला म्हणून कमी मजुरी धरली असे नाही. हे तर सरकारी उत्पादनखर्चाचे तक्ते आहेत. आम्ही जे उत्पादनखर्चाचे तक्ते भरतो, त्यात प्रत्यक्षात मजुरीचे दर काय असतात हे लक्षात घेतो. कारण हे तक्ते सरकारपुढे मांडण्यासाठी तयार केलेले असतात आणि तेथे सरकार किमान वेतन कायद्याप्रमाणे काय मान्य करेल हा विचार ठेवून आम्ही मांडणी करतो. म्हणून यामध्ये उत्पादनखर्च काढताना शेतमजुराला कमी मजुरी मिळावी ही भावना असण्याचे शेतकऱ्याला काहीही कारण नाही. मी मुंबईत मराठी पत्रकार संघामध्ये असे म्हटले होते-जेव्हा दांडेकरांच्या श्रममूल्याचा प्रश्न पुढे आला- की आम्हाला आज किमान वेतन कायद्याप्रमाणे जी काही मजुरी द्यावी लागते ती जरी धरली तरी ते भावसुद्धा शासनाकडून मंजूर होत नाहीत आणि अशावेळी श्रममूल्याविषयीचा थोडा ॲकॅडेमिक प्रश्न तयार करणे यामध्ये प्रत्यक्ष आंदोलनाच्या किंवा संघटनेच्या दृष्टीने काहीही अर्थ नाही. मी आज मान्य करतो

की दांडेकरांनी म्हटल्याप्रमाणे बँकेतल्या कारकुनाला जर बोनस वगैरे धरून रोजी रु.३० मिळत असतील तर शेतावर काम करणाऱ्या मजुरालाही रु. ३० मिळायला पाहिजेत. मी एकदा हा हिशेब केला होता व बोनस वगैरे न धरल्यामुळे मी रु.२० आकडा काढला होता आणि मुं.म. पत्रकार संघामध्ये मी असे आवाहन केले होते की, आम्ही कधीही मजुरीचा दर २० रु. धरायला तयार आहोत. पण २० रु. उत्पादन खर्चात धरा व तेवढा भाव मिळेल अशी व्यवस्था करा किंवा तेवढा भाव मिळणार नाही अशी जी तुम्ही व्यवस्था केली आहे ती दूर करा. हे जर केलेत तर २० रु. म्हणा, ३० रु. म्हणा जे काही श्रममूल्य ठरवले जाईल, तितके श्रममूल्य मजुराचे प्रत्यक्षात येईल अशी व्यवस्था करता येईल; परंतु श्रममूल्याचा विचार हा उत्पादन खर्चाच्या विचारापेक्षा वेगळा नाही. एकदा श्रममूल्याची पातळी तुम्ही ठरवलीत की ती व्यवहारात येणे हे जर मिळणाऱ्या भावावर अवलंबून असेल तर उत्पादन खर्चाच्या चौकटीत ते श्रममूल्य कोठेतरी बसवायला पाहिजे. मग ते तुम्ही कितीही ठरवा. शेतमजुरांचा रोज आपोआप वाढतो असे म्हणणाऱ्यांपैकी मी नाही. दबाव निश्चितपणे आणावा लागतो.

पण हेही लक्षात घ्या की, आजपर्यंतच्या माझ्या अनुभवावरून शेतकऱ्याला भाव मिळाल्यास शेतमजुराकडे तो फायदा जात नाही, जाणार नाही असा काही पुरावा मला दिसलेला नाही. (कांदा व साखरेचे भाव लक्षात घ्या.) मग मी त्याला उत्तर दिले की हे आत्ता नाही झाले, तर पुढे लढा करू, तर ते माझे संपूर्ण उत्तर नाही. मी हेही जोडतो की या उत्पादन खर्चामध्ये जो मी मजुरीचा दर धरलेला आहे त्याच्यावर शेतमजुरीचा दर दिला जाईल अशी हमी शेतकरी संघटना घेईल आणि आजच्या आजसुद्धा उत्पादनखर्चामध्ये ज्याला जीवनवेतन म्हणता येईल असा मजुरीचा दर धरायला आम्ही तयार आहोत. त्यात नुकसान व्हायचे काही कारण नाही.

मला आज बरे असे वाटत आहे की, या सगळ्या चर्चेची सुरुवात मी दारिद्र्याच्या प्रश्नापासून जेव्हा केली, तेव्हा मला थोडे वाईट वाटत होते की आपण शिबिराचा वेळ वाया घालवतो आहोत. आता आनंद होतोय की याचा विचार जो आम्ही केला तो शेतकऱ्यांच्या भल्यासाठी केवळ केला नाही तर दारिद्र्याचा प्रश्न हटवण्याच्या दृष्टीने केला. त्यातून शोषणाची कल्पना आली. आज दारिद्र्य ज्या शोषणातून येते ती अंतर्विरोधाची रेषा इंडिया आणि भारतामध्ये आहे.



पण याचा अर्थ दुसऱ्या तशाच रेषा अस्तित्वात नाहीत असा नाही. इंडियात जसे वेगवेगळे भेद आहेत, तसेच ते भारतातही आहेत; परंतु त्याच्यातील एकेका भेदाचा काळ यायचा आहे आणि त्या काळी, त्या रेषेवर केलेला लढा परिणामकारक ठरेल. शेतकरी-शेतमजूर हा वेगळा गट करणे, तशी कल्पना करणे चूक आहे. त्या विषयावर मी नंतर येतो, कारण आज 'भारतातल्या' लोकांचा समान बिंदू कोणता आहे, त्याचा विचार प्राधान्य मिळवणार. विरोधाचे बिंदू पुष्कळ आहेत. गाव, जाती यात भांडणे आहेत. पोळ्याच्या दिवशी कोणाचा बैल कमानीखालून पहिल्यांदा जातो यावरूनसुद्धा पिढीजात भांडणे आहेत. मग आपण जेव्हा संघटना बांधतो तेव्हा जास्तीत जास्त समान भूमिका कोणती मिळते आहे हे पाहावे आणि त्याकरिता इंडिया आणि भारत ही आजची अंतर्विरोधाची महत्त्वाची रेषा आहे. याहूनही महत्त्वाचा मुद्दा असा की हा शेतकरी-शेतमजुरांचा भेद मुद्दाम केला जातो. मी असे म्हणतो याचे कारण सांगतो. शेतकरी संघटनेचे आंदोलन तयार झाल्यानंतर डाव्या पक्षाच्या एका पुढारीणबाईंनी असे जाहीर केले की, ही चळवळ आम्हाला मान्य नाही आणि आम्ही ताबडतोब आता शेतमजूर आंदोलन चालू करणार आहोत. माझ्या काही सहकाऱ्यांना आश्चर्य वाटले की, आपण दारिद्र्याविरुद्धचा लढा म्हणून हा लढा चालू करतो आणि डावी म्हणविणारी मंडळी याच्याविरुद्ध शेतमजुरांचे आंदोलन उभे करतात ही काय भानगड आहे? कम्युनिस्ट पक्षाच्या बाई या! कोणत्या डाव्या, उजव्या की मार्क्सिस्ट हे मी सांगत नाही; परंतु सर्व कम्युनिस्ट वाङ्मयामध्ये- येथे मी मुख्य उल्लेख प्रियाबेझिन्स्की, बुखारीन आणि लेनिनच्या **Agrarian Policy** वरील स्टॅलिनची कॉमेंट- या सर्वामध्ये उघडपणे ही मंडळी सांगतात की शेतमजूर आणि शेतकरी यांना वेगळे पाडले पाहिजे. शेतकऱ्यांचा क्लास हा नामशेष झाला पाहिजे. जी मंडळी औद्योगिक संबंधांमध्ये सगळ्या कामगारांनो एक व्हा म्हणून घोषणा करतात, तीच मंडळी ग्रामीण भागात आल्यावर फूट कशी पडेल, एक वर्ग नामशेष कसा होईल याकडे लक्ष देतात ही चूक त्या मंडळींचीच आहे. मूळ पुस्तक लिहिणारांची आहे असे मी मानत नाही. पण अशी पोथीनिष्ठा घातक असते. मग ती भगवद्गीतेवरील असो किंवा दासकॅपिटलविषयी असो आणि मनामध्ये कोठेतरी अशी कल्पना धरली की दोन एकर, तीन एकर जमीन जरी असली तरी तो जमिनीचा मालक आणि जर का त्याच्या जमिनीवर काम करीत असेल तर तो शेतमजूर, आणि मग **Workers of the world Unite**

याच्यात जमीन नसलेलाच मजूर फक्त येतो– यातून मग अशा तऱ्हेने फुटीचे निष्कर्ष निघू लागतात. तेव्हा त्यांनी शहरामध्ये किंवा ग्रामीण भागामध्ये – ज्याला मी इंडिया– भारत म्हणतो, रोझा लक्झेंबुर्गने ज्याला टाऊन आणि कंट्री म्हटले आहे– अर्थातच शेतकऱ्यांमध्ये फूट पाडणे आवश्यक ठरते. शेतकरी संघटितपणे राहिले तर उद्योगधंद्याच्या वाढीसाठी आणि समाजवादाच्या विकासासाठी लागणारा भांडवल संचय होणार नाही, असे उघड लिहिले आहे. तेव्हा जी मंडळी पोथीनिष्ठेने बोलतात त्यांच्याबद्दल मी ही फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे दोनदा नाही चारदा म्हणेन. त्याचे कारण असे आहे की शेतकरी जेव्हा एकत्र येईल तेव्हा आपली सगळी समीकरणे बदलणार आहेत, हा विचार त्यांना सहन होत नाही. शेतीमध्ये कुठेही आजच्या परिस्थितीमध्ये फायदा नाही, हा मूलभूत मुद्दा. यात काही अपवादात्मक गोष्टी असू शकतात. उदा. काही एखादे नवीन प्रकारचे बियाणे आणून जर फुले काढली तर वर्ष दोन वर्ष फायदा होऊ शकतो. टोमॅटोचे नवीन बियाणे आल्यानंतर पुष्कळ शेतकऱ्यांना पुष्कळ फायदा काही वर्षे होऊन गेला. पण अशा तऱ्हेचे फायदे हे अपवादात्मक. ते नियमात बसू शकत नाहीत. तेव्हा एकदा शेती हे फायद्याचे कलम नसून तोट्याचे कलम आहे असे धरले की मग सगळीच समीकरणे बदलू लागतात. मग मजुरापेक्षा तीन एकर जमीन असणारा शेतकरी हा कमी भाग्यवान म्हणावा लागेल. कारण शेतमजुराला निदान हे तोट्याचे कलम तरी नाही. मग अल्पभूधारक पाच एकरी याला विशेष मदतीची गरज आहे आणि दहा एकराच्या शेतकऱ्याला मदतीची गरज नाही हे समीकरणही उलटे होते. ५ एकरांमध्ये जर ५०० रु. तोटा आहे तर १० एकरांमध्ये निदान ९०० रु. तोटा आहे असे आपोआपच उत्तर येते. जर शेती ही तोट्याची गोष्ट असेल तर भूमिहीनांच्या गळ्यामध्ये जमीन बांधणे हेही मूर्खपणाचे होईल, हेही त्या समीकरणावरून कळेल. कारण ज्याला आधीच काही खायला प्यायला नाही, त्याच्या गळ्यात तुम्ही एक भाकड गाय बांधून देता, किंवा पांढरा हत्ती बांधून पोसायला सांगता, असा याचा अर्थ आहे. याचा अर्थ असा की एकदा शेती फायद्याची नाही असे तुम्ही मान्य केल्यानंतर आजपर्यंत पोथीतून किंवा थोर व्यक्तींनी सांगितलेल्या विचारातून ग्रामीण भागाच्या प्रश्नांसंबंधी जी मते ठरविली आहेत, ती पुन्हा सगळी तपासून घ्यायला हवीत. कारण यातले मूळचे जे गृहीतक की शेती ही फायद्याची गोष्ट आहे ते बदलल्यामुळे सगळ्या समीकरणाच्या वजाबाकीच्या व अधिकाच्या खुणा बदलतात



आणि मग वेगळीच उत्तरे हाती येतात.

परंतु यावरून असे समजू नका की हा लढा आत्ता द्यायचा आणि तो नंतर द्यायचा. हा भाव मागताना त्यात मजुरीचा दर जो धरलेला आहे, तो दर मिळवून द्यायची हमी आम्ही शेतकरी संघटनेतर्फे देतो. दूरगामी परिणाम– ग्रामीण नवे रोजगार इ.– यांची चर्चा सविस्तर करू. पण जेव्हा केवळ मजुरी वाढवून द्यायच्या ऐवजी आहे त्या जमिनीचेसुद्धा आणखी तुकडे करून ते शेतमजुरांना देण्यात यावेत असे म्हणतात तेव्हा त्या लोकांच्या हेतूविषयी शंका घेणे आवश्यक आहे. आम्ही तेव्हा म्हणू, की काय हो, नुसती शेतीच काय वाटता? जर काही माणसे भूमिहीन आहेत, मालमत्ताहीन आहेत म्हणून त्यांना काही द्यायचे आहे तर मग टाटा–बिर्लांच्या कारखान्यातल्या चाकांचेही वाटप व्हायला पाहिजे. या फुटीच्या योजनेला डावे, मध्यम डावे आणि अति उजवे, सर्वांचाच पाठिंबा आहे. त्यामुळे भूमिहीनांचा प्रश्न सोडवायचा म्हणजे तुमची तुम्ही जमीन आपापसात वाटून घ्या– 'भारतामध्ये! आमच्या इंडियात नको! हीच मंडळी औद्योगिक कामगारांना मात्र मजुरी वाढवून द्या, बोनस द्या म्हणून मागणी करतात! कारखान्यातली चाके वाटून घ्या म्हणून नाही मागणी करत!

जे काही उत्पादक युनिट आहे ते तसेच ठेवून, त्याची उत्पादकता वाढवून मजुरी वाढवून द्यावी हीच मागणी योग्य आहे. यासाठी इ.स. २००० पर्यंत तुम्हाला शेतीवर राहणारी निदान ७० टक्के माणसे शेतीवरून काढून दुसऱ्या व्यवसायात टाकणे आवश्यक आहे आणि ते रोजगार जर तयार व्हायचे असतील तर त्याला आजची औद्योगिकीकरणाची स्ट्रॅटेजी चालणार नाही, त्याला ग्रामीण भागात तयार होणाऱ्या कमी भांडवली खर्चाची स्ट्रॅटेजीच घ्यावी लागेल आणि हे केवळ शेतीमालाला भाव देऊन, भांडवल समुच्चय गावामध्ये, शेतकऱ्याकडे ठेवल्यानेच शक्य होईल.

शेतकरी आणि शेतमजूर यांच्यात तेढ नाही असे नाही, पण त्या दोघांच्याही प्रश्नाला उत्तर काढायचे असेल तर त्यासाठी शेतमालाचे शोषण थांबवणे आवश्यक आहे. शेतकरी शोषणानंतर शेतमजूर होतो, शेवटी शहरात भीक मागायला रवाना होतो. शेवटी शेतकरी, शेतमजूर यांच्यातला फरक हा जात्यातले कोणते आणि सुपातले कोणते एवढाच राहतो. शेवटी सर्वांनाच भरडले जायचे आहे.

शेतमजुरीत वाढ हे आपल्या विचाराचे महत्त्वाचे अंग आहे. दारिद्र्य हटविण्यासाठी– शेतकरी, मजूर, आदिवासी कुणाचेही– आपण उत्पादनखर्चावर

आधारित अशा भावाची मागणी करतो. यासाठी आधारभूत धरलेल्या मजुरीचा मिळायला हवा; परंतु फूट पाडणे काहींच्या हिताचे आहे. शेतकरी व शेतमजूर यांच्यात फूट पाडावी, बाजारात माल आणू शकणारा एक वर्ग नामशेष करावा, बाकीच्या सगळ्यांना एकत्र करून त्यातून जास्तीत जास्त शोषण करून औद्योगिक प्रगतीची गती वाढवावी हा विचार उघडपणे व लेखी मांडला गेलेला आहे. शिवाय शेतमजुरांच्या हिताचा कळवळा सांगणारी मंडळी, भूमिहीनांसाठी काम करतो म्हणून सांगणारी मंडळी ज्या तऱ्हेचे कार्यक्रम हाती घेतात ते पाहता, त्यांच्या हेतूच्या शुद्धतेबद्दल शंका येण्यास जागा राहते. मजुरांच्या चांगल्या राहणीमानासंबंधी प्रश्न कुठेच नाही. प्रश्न निर्माण होतो पद्धतीबद्दल! कारखान्यातल्या कामगाराला श्रमाचा योग्य मोबदला देऊन त्याचे राहणीमान वाढवता. पण जी काही कारखान्याची मालमत्ता आहे, यंत्रसामग्री आहे- ती सर्वांची आहे, ती वाटून घ्यावी असे कधी आपण सांगत नाही. शेतीबाबत मात्र शेतमजूर आणि भूमिहीनांचा प्रश्न सोडवताना जमिनीच्या वाटपाची कल्पना मांडली जाते. यातून कहीही साधणार नाही. भिकाऱ्याला हत्ती देणे आणि विधवेला कुंकू लावून तू सधवा आहेस असे सांगणे यात आणि भूमिहीनाला जमीन वाटप करणे यात फरक नाही.

ही फूट पाडण्याच्या प्रयत्नाचे आणखी एक उदाहरण : शेतकरी संघटनेने गेल्या तीन वर्षांत आंदोलनाला सुरुवात केल्यानंतर आमच्या मुंबई-पुण्याच्या संपादकांच्या पोटात कळ आली आणि हे आंदोलन मोठ्या शेतकऱ्यांचे आहे असे ते म्हणू लागले. मला या संपादकांना नेहमीच विचारावेसे वाटते :- आमची संघटना लहान आहे. आंदोलन अजून बाल आहे. आम्हाला जे जमते ते आम्ही करतो. समजा, आम्ही फक्त बागायतदारांची बाजू घेतो आहोत; पण तुम्हाला असे म्हणायचे आहे का की बागायतदारांना त्यांचा उत्पादनखर्च पुरून उरू नये? टाटा, बिर्ला उत्पादनखर्चाचा विचार करत नाहीत काय? मी उत्पादनखर्च भरून निघावा अशी रास्त मागणी करतो आहे. शेतमजुरांकरिता प्रयत्न करू नये असे मी म्हणत नाही. तुम्ही या ना शेतमजुरांकरिता प्रयत्न करायला- अग्रलेख लिहिण्यापेक्षा! बाकीच्यांना ज्या आंदोलनात स्थान मिळत नाहीये अशी तुमची जी कल्पना आहे त्याच त्यांचे काम करायला तुम्ही या की! शेतकरी संघटना म्हणजे काही इंदिरा गांधी नाही. त्यांनी सर्व वर्गांच्या हितकर्त्यांची जबाबदारी घेतलीय! अशी काही जबाबदारी संघटनेने घेतलेली नाही. पण तसं नसतानासुद्धा प्रत्येक अग्रलेखामध्ये शेतकऱ्यांनी



शेतमजुरांच्या प्रश्नासंबंधी लिहायचे हे खरे नव्हे!

हे खरे आहे की, पक्षातीत एवढी संघटना आपण बांधली तरी शेतमजूर, आदिवासी, हरिजनमंडळी ज्या प्रमाणात सामील व्हायला पाहिजे होती त्याप्रमाणात सामील झालेली नाहीत; हे मी मान्य करतो. पण मुळात शेतकऱ्यांनाच रास्त भाव मिळाल्याशिवाय मजुरांना काही मिळण्याची शक्यता नाही, हे लक्षात ठेवा.

शिवाय मी भारत आणि इंडिया ही कल्पना कशाकरिता मांडतोय? एवढ्याकरिताच की भांडवलवादी व कम्युनिस्ट यांच्या मते शेतकरी आणि शेतमजूर ही फूट पडावी, एकी होऊ नये. म्हणून मी त्यांना विचारतो की का हो, समजा मी हे आंदोलन चालू केले, शेतीमालाला भाव हा एक कलमी कार्यक्रम असा काढला की जेथे वाद होऊ नये. तरीसुद्धा वादविवाद किती होतायत, ते आम्ही बघतो. समजा सुरुवातीला मी जी २७/२८ गावे घेतली तेथे मी गेलो असतो आणि शेतमजुरांची संघटना करायला सुरुवात केली असती तर काय झाले असते? डोकेफोड झाली असती, नुसती गावातल्या गावात. शेतकऱ्यालाच पुरेसा पैसा मिळत नाही. शेतमजुरी जास्त द्यावी हे पटूनसुद्धा ती परवडली पाहिजे की नको? तिथे जर तुम्ही वादविवाद केलात तर गावात डोकी फुटण्यापलीकडे काही झाले नसते आणि नेमके हेच व्हावे ही इंडियातल्या लोकांची इच्छा आहे आणि ही आमची इंडियाकडून लाच खाल्लेली मंडळी, सत्तेची लालच लागलेली मंडळी नेमके हेच करायला बघताहेत. पण अजूनही मी आपले मानतो की ही जुनी मंडळी आहेत. आपले आंदोलन नवीन आहे. नवीन पिढीने मात्र हा विचार समजून घ्यायला हवा. प्रत्येक वेळी नवे आंदोलन सुरू झाले की जुने सरदार, मनसबदार हे बाजूला पडतात. त्यांचा उपयोग राहत नाही, पहिल्या बाजीरावच्या वेळी त्याला शिंदे-होळकर नवीन तयार करावे लागले. शिवाजीलाही जुन्या मनसबदार, देशमुखांनी मदत केली नाही. नवे सरदारच त्याला तयार करावे लागले. हे प्रत्येक वेळी घडते आणि आज आपले नवे सरदार सगळे या नव्या पिढीतून येणार आहेत.

**भारतीय दारिद्र्याचा प्रश्न शेतमालाच्या रास्त भावाशी कसा निगडित आहे? पक्ष-उपपक्षांनी पोखरलेल्या शेतकऱ्यांच्यात संघटनेचे बीज मूळ कसे धरणार?**

उत्पादन, फायदा व वितरण यांचा दारिद्र्याशी संबंध जवळचा आहे. उत्पादन

खर्च कारखान्याच्या बाबतीत किती ठरतो हे कारखान्याच्या उत्पादकतेवर व यंत्रसामग्रीची ताकद काय आहे यावर अवलंबून असते. पण शेतीसंबंधी हीच तत्त्वे लावली जात नाहीत. कारण ज्या टेक ऑफची ५१ सालापासून नियोजन मंडळात बसलेली 'कविमंडळी' वेळ सांगत आहेत ती येतच नाहीये. या विमानाला वेग येऊन एका क्षणी ते उड्डाण करेल त्या घटिकेची आम्ही वाट बघत बसलो. तेहतीस वर्षे झाल्यानंतर असे लक्षात येऊ लागले आहे की हे विमानच नव्हते. बैलगाडीच होती. चालता चालता तिचे एक चाकही गळून पडले आहे, उडायची शक्यता राहिलेली नाही.

ही जर टेक ऑफची वेळ यायची असेल तर ग्रामीण भागातील गरजांचे रूपांतर मागणीत झाले पाहिजे आणि त्यासाठी शेतमालाला भाव मिळणे आवश्यक आहे. शेतमालाला भाव मिळाल्यामुळे शेती हा व्यवसाय म्हणून किफायतशीर होतो, हे एक; शेतमजुराला योग्य ते राहाणीमान मिळू शकते, हे दोन; दीर्घ काळात भारतात ग्रामीण भागाला योग्य अशा तऱ्हेचे औद्यागिकीकरण होईल, तीन आणि इंडियामध्ये जी आपण एक औद्योगिक सत्ता निर्माण केली आहे तिचीसुद्धा उत्पादनक्षमता व कार्यक्षमता वाढावी अशा तऱ्हेची मागणी ग्रामीण भागात तयार होईल हा चौथा मुद्दा!

या दृष्टीने शेतीमालाला भाव मिळणे हा फक्त शेतकऱ्याच्या भावाचा प्रश्न नसून हा खरोखरच दारिद्र्याचा प्रश्न सोडविण्याची जादूची कांडी आहे. पुष्कळजण शोधताहेत जादूची कांडी. दारिद्र्य हटविणे हा कार्यक्रम सोपा आहे. ते हटविण्यासाठी काही करण्याची गरज नाही. दारिद्र्य टिकावे आणि वाढावे यासाठी तुम्ही आज जो भगीरथ प्रयत्न करत आहात ते थांबवा. शेतीमालाला वाजवी भाव मिळू नये म्हणून जे प्रयत्न करण्याची यंत्रणा उभारण्यात आली आहे ती यंत्रणा थांबवा म्हणजे दारिद्र्य आपोआप दूर होईल.

हा जो विचार आपण मांडतोय् त्याला एका दृष्टीने ऐतिहासिक महत्त्व आहे. औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली आणि कारखानदारीचा प्रारंभ झाला. तेव्हापासून कारखादारीच्या वाढीकरिता श्रमशक्तीचे, कामगारांचे शोषण सुरू झाले. त्याचप्रमाणे कच्च्या मालाचेही शोषण सुरू झाले. श्रमशक्तीच्या शोषणासंबंधी अनेक ग्रंथ लिहिले गेले, अनेक तत्त्वज्ञाने मांडली गेली, क्रांत्याही झाल्या. कच्च्या मालाच्या शोषणाचा प्रश्न धसास लागलाच नाही. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीबरोबरच कच्च्या



मालाचा तुटवडाही निर्माण झाला. त्यासाठी बाहेर जाणे आवश्यकच होते आणि पक्का माल फायद्याने विकायचा असेल तर हुकमी बाजारपेठेचीही त्यांना आवश्यकता होती. त्यातून मग औद्योगिक क्रांती न झालेल्या देशांमध्ये ब्रिटिशांच्या वसाहती निर्माण होऊ लागल्या. काही एका इतिहासाच्या घडामोडीनंतर अशा तऱ्हेची राजकीय सत्ता टिकवणे कठीण झाले. त्याचवेळी हुशार व्यापारी, कारखानदार मंडळींनी असा बनाव घडवून आणला की इंग्रज गेले तरी प्रत्यक्ष कच्चा माल उपलब्ध होण्याची जी प्रक्रिया आहे, ती मात्र चालू राहिली पाहिजे. म्हणजेच ४७ नंतर जुन्या वसाहतवादाचा काळ संपला आणि इंग्रजांच्या राज्यानंतर इंडियाचे राज्य आले. नव-वसाहतवाद चालू राहिला. शेतकऱ्यांची मागणी कुणीच पुढे मांडली नाही. काल बंग साहेबांनी हेविस मिचेलच्या एका पुस्तकाचा उल्लेख केला. त्याच्यामध्ये विशेषत: पूर्व यूरोपमध्ये शेतकऱ्यांनी या प्रश्नावर किती झगडा दिला- कम्युनिस्ट पक्षाच्या आत व बाहेर- याचा संपूर्ण इतिहास आहे. पण त्यावेळीसुद्धा जे झगडे झाले ते जमिनीच्या मालकी हक्काबद्दल आणि आकाराबद्दल जास्त झाले. औद्योगिक क्रांती, त्यातून होणारे श्रमशक्ती व कच्च्या मालाचे शोषण, श्रमशक्तीच्या शोषणाबद्दल सगळा घडलेला इतिहास ही त्या झाडाची एक फांदी झाली. दुसऱ्या फांदीला कच्च्या मालाचे शोषण हे नव-वसाहतवादी मार्गाने चालू राहिले.

आणि आज ज्यांचे शोषण होत आहे तो शेतकरी, अशा प्रकारच्या शोषणाविरुद्ध संघटितरीत्या उभे राहण्याचा प्रथमच प्रयत्न करीत आहे, ही या विचाराची ऐतिहासिक बाजू आहे.

म्हणूनच उत्पादनखर्च भरून निघू शकेल अशा रास्त भावाची मागणी संघटना करते.

या मागणाचेही शास्त्र आहे, पद्धती आहेत. **APC**- मध्ये एक पद्धत आहे. रॅंडम सॅम्प्लिंग पद्धत. प्रत्यक्ष शेत बघून, खर्च (खते इ.) काय झाला यांचा हिशेब करायचा. या पद्धतीतील मोठा धोका स्पष्ट आहे, की बहुतेक नमुने लहान शेतकऱ्याचे असतात. त्यामुळे तो वरखते किंवा सुधारलेल्या पद्धती वापरत नाही. त्यामुळे किमती येत नाहीत आणि किमती येत नाहीत म्हणून सुधारलेल्या पद्धती वापरता येत नाहीत, हे दुष्टचक्र सुरू आहे. शेतीमाल आयोगाने ही पद्धत सोडून देणे आवश्यक आहे. शेतकरी संघटनेची उत्पादनखर्च काढण्याची पद्धत वेगळीच आहे. आम्ही तिला नमुनेदार शेतीची पद्धत म्हणतो. अशा अर्थाने की आज लहान शेतकऱ्याला

खर्च कारखान्याच्या बाबतीत किती ठरतो हे कारखान्याच्या उत्पादकतेवर व यंत्रसामग्रीची ताकद काय आहे यावर अवलंबून असते. पण शेतीसंबंधी हीच तत्त्वे लावली जात नाहीत. कारण ज्या टेक ऑफची ५१ सालापासून नियोजन मंडळात बसलेली 'कविमंडळी' वेळ सांगत आहेत ती येतच नाहीये. या विमानाला वेग येऊन एका क्षणी ते उड्डाण करेल त्या घटिकेची आम्ही वाट बघत बसलो. तेहतीस वर्षे झाल्यानंतर असे लक्षात येऊ लागले आहे की हे विमानच नव्हते. बैलगाडीच होती. चालता चालता तिचे एक चाकही गळून पडले आहे, उडायची शक्यता राहिलेली नाही.

ही जर टेक ऑफची वेळ यायची असेल तर ग्रामीण भागातील गरजांचे रूपांतर मागणीत झाले पाहिजे आणि त्यासाठी शेतमालाला भाव मिळणे आवश्यक आहे. शेतमालाला भाव मिळाल्यामुळे शेती हा व्यवसाय म्हणून किफायतशीर होतो, हे एक; शेतमजुराला योग्य ते राहाणीमान मिळू शकते, हे दोन; दीर्घ काळात भारतात ग्रामीण भागाला योग्य अशा तऱ्हेचे औद्यागिकीकरण होईल, तीन आणि इंडियामध्ये जी आपण एक औद्योगिक सत्ता निर्माण केली आहे तिचीसुद्धा उत्पादनक्षमता व कार्यक्षमता वाढावी अशा तऱ्हेची मागणी ग्रामीण भागात तयार होईल हा चौथा मुद्दा!

या दृष्टीने शेतीमालाला भाव मिळणे हा फक्त शेतकऱ्याच्या भावाचा प्रश्न नसून हा खरोखरच दारिद्र्याचा प्रश्न सोडविण्याची जादूची कांडी आहे. पुष्कळजण शोधताहेत जादूची कांडी. दारिद्र्य हटविणे हा कार्यक्रम सोपा आहे. ते हटविण्यासाठी काही करण्याची गरज नाही. दारिद्र्य टिकावे आणि वाढावे यासाठी तुम्ही आज जे भगीरथ प्रयत्न करत आहात ते थांबवा. शेतीमालाला वाजवी भाव मिळू नये म्हणून जे प्रयत्न करण्याची यंत्रणा उभारण्यात आली आहे ती यंत्रणा थांबवा म्हणजे दारिद्र्य आपोआप दूर होईल.

हा जो विचार आपण मांडतोय् त्याला एका दृष्टीने ऐतिहासिक महत्त्व आहे. औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली आणि कारखानदारीचा प्रारंभ झाला. तेव्हापासून कारखादारीच्या वाढीकरिता श्रमशक्तीचे, कामगारांचे शोषण सुरू झाले. त्याचप्रमाणे कच्च्या मालाचेही शोषण सुरू झाले. श्रमशक्तीच्या शोषणासंबंधी अनेक ग्रंथ लिहिले गेले, अनेक तत्त्वज्ञाने मांडली गेली, क्रांत्याही झाल्या. कच्च्या मालाच्या शोषणाचा प्रश्न धसास लागलाच नाही. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीबरोबरच कच्च्या



मालाचा तुटवडाही निर्माण झाला. त्यासाठी बाहेर जाणे आवश्यकच होते आणि पक्का माल फायद्याने विकायचा असेल तर हुकमी बाजारपेठेचीही त्यांना आवश्यकता होती. त्यातून मग औद्योगिक क्रांती न झालेल्या देशांमध्ये ब्रिटिशांच्या वसाहती निर्माण होऊ लागल्या. काही एका इतिहासाच्या घडामोडीनंतर अशा तऱ्हेची राजकीय सत्ता टिकवणे कठीण झाले. त्याचवेळी हुशार व्यापारी, कारखानदार मंडळींनी असा बनाव घडवून आणला की इंग्रज गेले तरी प्रत्यक्ष कच्चा माल उपलब्ध होण्याची जी प्रक्रिया आहे, ती मात्र चालू राहिली पाहिजे. म्हणजेच ४७ नंतर जुन्या वसाहतवादाचा काळ संपला आणि इंग्रजांच्या राज्यानंतर इंडियाचे राज्य आले. नव-वसाहतवाद चालू राहिला. शेतकऱ्यांची मागणी कुणीच पुढे मांडली नाही. काल बंग साहेबांनी हेविस मिचेलच्या एका पुस्तकाचा उल्लेख केला. त्याच्यामध्ये विशेषतः पूर्व यूरोपमध्ये शेतकऱ्यांनी या प्रश्नावर किती झगडा दिला- कम्युनिस्ट पक्षाच्या आत व बाहेर- याचा संपूर्ण इतिहास आहे. पण त्यावेळीसुद्धा जे झगडे झाले ते जमिनीच्या मालकी हक्काबद्दल आणि आकाराबद्दल जास्त झाले. औद्योगिक क्रांती, त्यातून होणारे श्रमशक्ती व कच्च्या मालाचे शोषण, श्रमशक्तीच्या शोषणाबद्दल सगळा घडलेला इतिहास ही त्या झाडाची एक फांदी झाली. दुसऱ्या फांदीला कच्च्या मालाचे शोषण हे नव-वसाहतवादी मार्गाने चालू राहिले.

आणि आज ज्यांचे शोषण होत आहे तो शेतकरी, अशा प्रकारच्या शोषणाविरुद्ध संघटितरीत्या उभे राहण्याचा प्रथमच प्रयत्न करीत आहे, ही या विचाराची ऐतिहासिक बाजू आहे.

म्हणूनच उत्पादनखर्च भरून निघू शकेल अशा रास्त भावाची मागणी संघटना करते.

या मागणाचेही शास्त्र आहे, पद्धती आहेत. **APC**- मध्ये एक पद्धत आहे. रँडम सँप्लिंग पद्धत. प्रत्यक्ष शेत बघून, खर्च (खते इ.) काय झाला यांचा हिशेब करायचा. या पद्धतीतील मोठा धोका स्पष्ट आहे, की बहुतेक नमुने लहान शेतकऱ्याचे असतात. त्यामुळे तो वरखते किंवा सुधारलेल्या पद्धती वापरत नाही. त्यामुळे किमती येत नाहीत आणि किमती येत नाहीत म्हणून सुधारलेल्या पद्धती वापरता येत नाहीत, हे दुष्टचक्र सुरू आहे. शेतीमाल आयोगाने ही पद्धत सोडून देणे आवश्यक आहे. शेतकरी संघटनेची उत्पादनखर्च काढण्याची पद्धत वेगळीच आहे. आम्ही तिला नमुनेदार शेतीची पद्धत म्हणतो. अशा अर्थाने की आज लहान शेतकऱ्याला

काही गोष्टी– काही **Inputs** वापरता येत नाहीत, तरीसुद्धा तो त्या वापरतो आहे असे गृहीत धरून त्याला किंमत द्यायची आहे. जास्तीत जास्त काय परिणाम होईल? त्याला एक वर्ष आधी शेती सुधारायला दिली, असे होईल; परंतु असे जर नमुनेदार शेतीचे तत्त्व वापरले जाते आहे असे गृहीत धरले नाही, तर मग शेतीचे तत्त्व वापरले जाते आहे असे गृहीत धरले नाही, तर मग शेतीच्या कल्पनांत सुधारणा होणार नाही, उत्पादन वाढ होणार नाही आणि शेतकऱ्याचे दारिद्र्यही हटणार नाही. या नमुन्याच्या पद्धतीबद्दल आणखी एक शास्त्रीय भाग आहे. **APC** ने आतापर्यंत अनेक वेळा टीका केली आहे की, शेतीमालाचा उत्पादनखर्च काढणेच शक्य नाही. उत्तर प्रदेशातील गव्हाच्या उत्पादन खर्चापेक्षा नाशिकमधील गव्हाचा उत्पादन खर्च तिप्पट आहे वगैरे विधाने ते करतात. आता या गप्पा चालायच्या नाहीत. यातील बनवेगिरी आपण ओळखली पाहिजे.

शेतीमध्ये उत्पादनखर्च काढताना उत्तर प्रदेशात कमी खर्च येतो व नाशिकमध्ये खूप जास्त खर्च येतो. याच्यात जी मूलभूत गृहीत तत्त्वे आहेत ती चुकीची आहेत. आमच्या नमुन्याच्या पद्धतीत हा दोष दूर होतो. उदा : गव्हाची ४,००० रु. एकराची जमीन धरली (रस्त्यापासून दूर असेल तर २,००० रु.), रस्त्याला जवळ, पाण्याला जवळ असेल तर १०,००० रु. धरा. आपण १०,००० रु. व ४००० रु. यांची तुलना केली तर १०,००० रु. च्या जमिनीमध्ये मशागतीचा, खताचा, खुरपणीचा, निंदणीचा खर्च कमी झाला पाहिजे; कारण ती जमीन चांगली आहे. एवढेच नव्हे तर त्या जमिनीत पीकही जास्त निघायला पाहिजे. रस्त्याजवळच असल्याने वाहतुकीचा खर्चही कमी. अशा प्रकारे १०,००० रु. ची जमीन धरली आणि त्यावरचे पर्यायमूल्य म्हणून १००० रु. एकरी धरले तरी त्या १००० रु.पैकी बहुतेक रक्कम, चालू खर्चात बचत झाल्यामुळे वाचते. तीच जर ४,००० रु. एकराची जमीन तुम्ही घेतलीत तर मशागत इ. खर्च वाढेल, पीक कमी येईल, वाहतुकीचा खर्च वाढेल. हे लक्षात घेतले तर या दोन्ही व्यवहारांमधील प्रत्यक्ष खर्चातील फरक फार थोडा राहतो. तेव्हा उत्पादन खर्चात फरक पडतो म्हणून तो काढणे शक्य नाही, हा युक्तिवाद चूक आहे.



### उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धती :

१) प्रातिनिधिक शेत घेऊन त्याचा उत्पादनखर्च काढायचा.

२) शेतीमाल आयोगाची रँडम सँप्लिंग पद्धत.

३) नमुनेदार शेतीची पद्धत, जी आम्ही वापरतो.

आम्ही काही कॅलिफोर्नियातील शेती घेतली नाही. पण आज जी शेती आहे त्यापेक्षा पुढल्या वर्षी एक पाऊल तरी वर काढले पाहिजे, अशा तऱ्हेने शेतीच्या मागण्या घेऊन त्याचा खर्च काढायचा अशी आमची कल्पना आहे. हा प्रश्न बिकट आहे. गणित करून ते लगेच सार्वजनिकरीत्या जाहीर करून, वेगवेगळ्या जागी आंदोलने सुरू केली तर जेव्हा खरे आंदोलन सुरू होईल, तेव्हा त्याला या घिसाडघाईचा त्रास होण्याची शक्यता आहे. याही जबाबदारीची जाणीव उत्साही मंडळींनी ठेवावी.

आणखी एक गोष्ट लक्षात घ्या.

तेल किंवा खाणीचे जे व्यवसाय असतात, त्यामध्ये Depletion Allowance धरला जातो. (Depreciation वेगळं) की हे जे तेल काढले जातेय, ते काही पुन्हा येणार नाही. त्याची व्यवस्थाही उत्पादन खर्चात व्हायला हवी. पुण्यात हडपसर ते उरुळीकांचन या भागात खूप मोठे ऊस बागायतदार आहेत. मंत्री वगैरेंनी उसाच्या जमिनी तिकडे घेतल्या आहेत आणि त्यांची कल्पना अशी आहे की, आपल्याला उसामध्ये फार चांगला फायदा मिळून राहिलेला आहे. आज प्रत्यक्षात त्या भागात स्थिती अशी आहे की बारमाही पाण्यावर पीक घेत असल्यामुळे सगळे जमिनीतील क्षार वर येत आहेत आणि थोड्या दिवसांत त्या जमिनीत गवताचे पातेसुद्धा उगवणार नाही, अशी स्थिती येणार आहे. आज त्यांना काही त्या खर्चाचा अंदाज नाही. बरं चाललेय, असे वाटतेय. Depletion ही काही शेतीच्या बाबतीत अजून मान्य झालेली पद्धत नाही. पण आम्ही आमच्या मॉडेल पद्धतीत रासायनिक, सेंद्रिय खतांचे दोष धरताना, अशा तऱ्हेने विचार करतो, की शेतीचे नुकसान कमीत कमी व्हावे पण त्यानेही भागत नाही. बांधबंदिस्तीचा खर्चही दर ४/५ वर्षांनी करावा लागतो. त्याची सोय नको का? त्यासाठी दुसरी लहानशी युक्ती–प्रथमतः दुधाच्या बाबतीत काढली आहे.

दुधाच्या बाबतीत आम्ही एक एकर आणि ४० गाईंचे एक युनिट धरले आहे. त्याला तारेचे कुंपण हवेच. त्याशिवाय दुधाचा व्यवसाय करणे शक्य नाही. एका

एकराला तारेचे कुंपण घालण्यासाठी आज ४०,००० रु. च्या खाली काही खर्च येणार नाही. मग दुधाचा खर्च कुठच्या कुठे जाईल. त्याच्याकरिता आम्ही मग पुन्हा नमुन्याचीच पद्धत घेतली. दर वर्षी एका गाईमागे १०० रु. विकासनिधी धरला आहे; जसा कारखान्यामध्ये धरला जातो. म्हणजे एका गाईमागे-२।। हजार लिटरमागे १०० रु. ही अगदीच किरकोळ रक्कम विकासनिधी म्हणून ठेवायची. येथवर शेतीच्या रोगाचे निदान आपण केले. आता उपायांकडे वळू.

शेतीमालाला भाव मिळवायचा म्हणजे आम्ही सरकारकडे पदर पसरून जातो असे नव्हे. यात केंद्रीकरणालाही मदत करत नाही. आजच्या परिस्थितीमध्ये भाव मागतो याची पार्श्वभूमी अशी आहे की, दुष्काळाच्या काळामध्ये तीस वर्षे नुकसान सोसून आम्ही सरकारला धान्य दिलेले आहे. त्याअर्थी शासनाने शेतीमालाच्या किमती या केवळ मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वाने ठरत नाहीत, त्याला काहीतरी **Regulatory price mechanism** किंवा **Public utility price mechanism** आहे असे गृहीत धरले आहे असे मी समजतो. आमची मागणी अशी की याच कारणाकरिता शासनाने भाव बांधून द्यावेत, असे आम्ही समजतो.

जगातील बहुतेक सर्व विकसित देशात, शेतीमालाला अनुदान नाही असा एकही देश राहिलेला नाही. तेव्हा नवीन औद्योगिकीकरणाकडे जाणाऱ्या देशांमध्ये जर आर्थिक मुद्रेची समतोलता राखायची असेल तर शेतीमालाला अनुदान हे आवश्यक समजावे हे एक गृहीत तत्त्व आहे; परंतु मी सतत म्हणत असल्याप्रमाणे शेतकरी संघटनेचा विचार शेतकऱ्याला पैसे मिळवून द्यावे हा नाही; तर शेतकऱ्याला ताठ मानेने, अभिमानाने जगता यावे हा त्यामागचा एक तात्त्विक विचार आहे. जर आपण शासनाकडे दर वेळा भीक मागायला जाणार असलो तर, या विचाराचा नाश होणार नाही का? भाव बांधून घेताना दोन गोष्टी महत्त्वाच्या : दुष्काळामध्ये तुम्ही आमच्याकडून सक्तीने कमी भावाने धान्य नेलेत, म्हणून मुबलकतेच्या काळामध्ये निदान उत्पादनखर्च भरून येईल असे भाव मिळतील अशी व्यवस्था करणे हे शासनाचे काम आहे असे आम्ही समजतो. पण जर का शासन असे म्हणत असेल की किती दिवस शेतकऱ्याला भीक घालायची, तर माझे म्हणणे असे आहे की, शेतकऱ्यांनी असे सांगायला पाहिजे की तुम्हाला जर आमचा माल विकत घ्यायचा नसेल, जर आधारभूत किमती तुम्हाला द्यायच्या नसतील तर मग निदान खुल्या बाजारपेठेचे तत्त्व तरी तुम्ही संपूर्णत: मान्य करा. कोणते तरी एक तत्त्व मान्य करा,



जर तुटवडा असेल तर नियंत्रण आणि मुबलकता असेल तर खुली बाजारपेठ, असे खेळ चालणार नाहीत. जर कृषिमालाला खुली बाजारपेठ द्यायचे तत्त्व कबूल केलेत तर आज मी ते स्वीकारायला तयार होईन. दोन अटी स्पष्ट आहेत. पहिली अट अशी की पुन्हा कधी या देशात दुष्काळ पडला तर आमच्याकडून लेव्ही मिळायची नाही. बाजारपेठेतील भावानेच तुम्हाला धान्य आमच्याकडून घ्यावे लागेल व दुसरी अट अशी की खुली बाजारपेठ ही खरोखरीच खुली असायला हवी.

आज कांदा, कापूस, साखर, भुईमूग या सगळ्या गोष्टी परदेशात अत्यंत किफायतशीर दराने निर्यात करणे शक्य आहे. साखरेची आंतरराष्ट्रीय किंमत ८।। ते ९ रु. आहे. कपाशीचा खर्च आम्हाला इथे ७०० रु. भरून देत नाहीत; परंतु निर्यातीवर मात्र नियंत्रण ठेवले आहे. कांद्याला किलोला ५५-६० पैसे मिळत नाहीत म्हणून आंदोलने करावी लागतात. निर्यातीत १.९० पैसे मिळू शकतात. ८।। रु. ने भुईमुगाची २५० कोटींची मागणी आता माझ्याजवळ आहे. नाशिक जिल्ह्यात ज्वारी ६५ पै. किलो आहे. तीच मध्यपूर्वेत कोंबड्यांच्या खाद्यासाठी २.३० रु. ने वाटेल तेवढी निर्यात करता येईल.

मात्र खुली बाजारपेठ पूर्ण खुली हवी. **Imperial preferance** प्रमाणे 'इंडियन प्रेफरन्सचे' धोरण आखले गेले आहे, तेही सोडावे लागेल. यापैकी कोणताही पर्याय सरकारने निवडावा. त्याच्याबद्दल मी मत द्यायला तयार नाही. कारण मी जर म्हटले की हाच पर्याय योग्य तर टीकाकार लगेच म्हणतील हे समाजवादी आहेत, किंवा साम्यवादी आहेत! मी जर म्हटले खुली बाजारपेठ हवी तर हे म्हणणार मी भांडवलशाहीवादी आहे. कोणतीही पद्धत निवडा. पण ओली किंवा सुकी; दोन्ही वेळी फक्त शेतकरी मरणार, ही तऱ्हा काढून टाका.

उत्पादनखर्च भरून निघण्याचे पर्याय तीन :

१) मालाच्या साठवणुकीची व्यवस्था करणे. एकाच वेळा सगळा माल शेतातून निघतो, बाजारात एकदम येतो, म्हणून भाव पडतात. त्याची साठवणूक करणे, त्याच्यावर बँकांकडून उचल मिळविणे.

२) जी काही आपली पारंपरिक पिके आहेत, ती कमी करणे. त्याच्याऐवजी नवीन प्रकारची पिके घेणे.

३) तयार केलेला माल कच्च्या स्वरूपात बाजारात न नेता, त्यावर प्रक्रिया करणे.

संपूर्ण नियंत्रण आणि खुली बाजारपेठ याच्यामध्येही एक मार्ग आहे.-ज्याला मी **Safety- fuse- mechanism** म्हणतो. दाब जास्त झाला की आधीच व्यवस्था करून ठेवून पाणी वाहून जाईल अशी व्यवस्था करायची. पूर्णपणे शासनावर अवलंबून राहायची आमची इच्छा नाही. तीन मार्गांनी शेतकऱ्याला भाव मिळविता येतील.

१) संपूर्ण नियंत्रणाची पद्धत.

२) खुल्या बाजारपेठेची पद्धत.

३) सरकारने आवश्यक तेव्हाच बाजारात येण्याची पद्धत.

या तीनही पद्धतींनी शेतकऱ्याला न्याय मिळू शकेल. न्याय मिळणे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. एकाधिकार कापूस खरेदी ही पहिली पद्धत. दुसरी पद्धत म्हणजे संपूर्ण नियंत्रणे काढून टाका. शेतकऱ्याला जेथे जास्त भाव मिळेल तेथे तो माल विकेल. आवश्यक वाटले तर निर्यात करेल आणि तिसरी पद्धत अशी की शासनाने असे सांगावे की शेतकऱ्यांनी बाजारात त्यांना मिळेल तो भाव घ्यावा, पण उत्पादनखर्चाच्या सीमेखाली भाव जाणार नाही, याची हमी आम्ही घेतो. शेतकऱ्याला बाजारपेठेत जो अनुभव येतो, त्यावरून कोणती पद्धत सोयीस्कर वाटणे शक्य आहे? याचा विचार करा. नाफेडचा अनुभव व शेतकऱ्याच्या यातनाही लक्षात घ्या.

त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट : जर सरकारने ठराविक किमतीला माल विकत घ्यावा अशी आपली अपेक्षा असेल-तर एक धोक्याचा दिवा दाखवून ठेवतो. आम्ही उत्पादन करू तेवढा सर्व कांदा, कपाशी आम्ही सांगू त्या भावाने विकत घ्यायलाच हवा अशी मागणी आज चालून जाते, उद्याही चालून जाईल, पण फार दिवस चालणार नाही. जेव्हा किमतींवर आपण नियंत्रणाची भाषा करतो तेव्हा आपोआपच एकूण होणाऱ्या उत्पादनावरील नियंत्रणाची कल्पना आपण मान्य करतो. तुम्ही कितीही कांदा काढा आम्ही तो विकत घेऊ, हे कोणत्याही शासनाला शक्य होणार नाही. कॅलिफोर्नियात मोसंब्याला जर मोठा बहर आला तर स्प्रे करून ठराविक मोसमात तो मोहोर पाडून टाकावा लागतो. कारण शासन जेव्हा त्या भावाची हमी देते, त्यावेळी तुम्ही असे नाही म्हणू शकत की तुम्ही फक्त एवढाच कांदा विकत घ्या, बाकीचा आमचा आम्ही विकू. हे चालणार नाही. तुम्ही, आमचे आम्ही बघून घेऊ म्हटले, म्हणजे तुम्ही तो कांदा खाजगी रीतीने बाजारात नेणार आणि मग बाजारातील किमती खाली येणार. तेव्हा तो माल शेतामध्ये तयारच होता



कामा नये अशा तऱ्हेचेसुद्धा उत्पादनावरील नियंत्रण, नियंत्रित किमतींच्या मागणीबरोबरच येते, हे लक्षात घ्या.

**Appropriate technology (सुयोग्य तंत्रज्ञान) आणि जमिनीप्रमाणेच यंत्रावरील सीलिंग महत्त्वाचे नाही का? प्रक्रियांचे कारखाने हा प्रश्न सोडवायला मदत करतील की नाही?**

शेतकऱ्याच्या शेतमालाला जर रास्त भाव मिळायचा असेल तर साठवणूक, त्यावरील उचल आणि प्रक्रिया या तीनही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या आहेत आणि शेवटी भाव याच पद्धतींनी मिळणार आहे. पण आज प्रक्रियेचे कारखाने काढण्याची तुमची ताकद किती आहे? आणि तुमच्यापुढचा प्रश्न किती लाख खेड्यांचा आहे? त्यासाठी किती भांडवलसंचय लागेल? तो कसा करणार? भाव वाढल्याखेरीज भांडवलसंचय नाही आणि त्याशिवाय उद्योगधंदे नाहीत आणि उद्योगधंदे झाल्याखेरीज भाववाढ नाही अशा दुष्टचक्रात आपण सापडतो. हे चक्र आपल्याला फोडायचे आहे. ते आपण रास्त भावाच्या मागणीने फोडतो आहोत. प्रक्रियेचे कारखाने अवश्य काढायला हवेत. उलट मी जेव्हा असे म्हणतो शेतीमालाला भाव वाढवून देणं हा एक कलमी कार्यक्रम नसून ही बहुगुणी गुटी आहे आणि या लहानशा गोळीमध्ये सर्वांगीण विकासाची बीजे आहेत, त्याचा अर्थ हाच आहे.

दीर्घ मुदतीत शेतमालाला भाव मिळाल्याने दोन महत्त्वाचे परिणाम होतील. उदा. गेल्या वर्षी पहिल्यांदा चाकणला कांद्याला भाव बांधून दिले गेले; ताबडतोब खाजगी शेतकऱ्यांनी आपल्या गहाणवट जमिनी सोडवून घेतल्या. यंदाच्या वर्षी बँकांची आणि सोसायट्यांची कर्ज फिटणार आहेत आणि मला असा आत्मविश्वास वाटतो की, दोन ते तीन वर्षांच्या आत चाकणच्या परिसरात नुसतीच लाल मिरची बाजारात पाठवायच्या ऐवजी निदान तिची भुकटी करून प्लास्टिकच्या पिशवीत भरून देण्याचे कारखाने चालू होतील. तेलाच्या गिरण्याही निघतील. असे अनेक पदार्थ आहेत. पुणे-मुंबई जवळ आहे. इंडियातल्या लोकांना ज्या काही चैनीच्या वस्तू लागतात त्या पुरवणे फायद्याचे आहे. आज ते होऊ शकत नाही. दीर्घ मुदतीत भारतातील परिस्थितीला योग्य असे औद्योगिकीकरण होणार आहे. कारण द्रव्यसंचय हा ग्रामीण भागात वाढू लागेल, हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत शासनाकडून घेतलेले

पैसे, बँकांकडून घेतलेली कर्जे यांच्या आधारावर ज्या संस्था चालू होतात, त्यांच्यामध्ये पैशावर हात मारणाऱ्यांचीच भाऊगर्दी जमते. हा धोका लक्षात घेऊन आपली कार्यकर्त्यांची जी मर्यादित शक्ती आहे ती आपण या कार्यात किती लावायची हा फक्त पर्यायाचा आणि निवड करण्याचा प्रश्न आहे. म्हणजे आजच कुठेतरी कॅपिटल इन्व्हेस्टमेंट चालू व्हायला हवी. यासाठी भाव मिळविणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट ठरते.

विषय निघालाच आहे म्हणून याच स्वरूपातील पुढचा मुद्दा मांडून ठेवतो.

अर्थशास्त्राचे जे विद्यार्थी आहेत, त्यांना हे माहिती आहे की वेगवगळ्या काळी किंवा ठराविक काळानंतर येणाऱ्या आर्थिक संकटांवर, अरिष्टांवर अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेली जी उपाययोजना आहे, तिचा उपयोग विकासासाठी होत नाही, हे सर्वमान्य आहे. त्यामुळे फक्त चलन फुगवटा होतो; परंतु प्रत्यक्षात त्याच तत्त्वांचा उपयोग करून विकासाच्या कार्यक्रमाकरिता, केन्सचे तत्त्व, शेतीमालाला भाव मिळवून देणार आहे. जेथे ग्रामीण भागात पैसा खेळू लागतो आणि त्यामुळे भांडवलसंचय तेथल्या तेथेच राहिल्यामुळे औद्योगिकीकरण होऊ शकते. त्याहूनही एक मोठा परिणाम म्हणजे आज इंडियातील उद्योगधंदे- जे केवळ लहानशा बाजारपेठेवर अवलंबून आहेत - मर्यादित उत्पादन करावे आणि उत्पादनाच्या प्रत्येक घटकावर जास्तीत जास्त फायदा घ्यावा- त्यातून हाय कॉस्ट इकॉनॉमी तयार झाली आहे. त्याच्याऐवजी जर लो कॉस्ट इकॉनॉमी तयार करायची असेल तर त्याला चांगला मार्ग म्हणजे 'भारताच्या' बाजारपेठेतील गरजांचे रूपांतर मागणीत करायचे.

**शासन, राजकीय पक्ष व शेतकरी संघटना यांचे परस्परसंबंध कसे असतील? शासनाच्या विविध मदत योजनांबद्दल संघटनेचे धोरण कोणते?**

इथले वातावरण, स्टेज, प्रतिष्ठित मंडळी, लाऊडस्पीकर पाहून कदाचित कुणाची अशी गैरसमजूत होण्याची शक्यता आहे की शेतकरी संघटनेचा मेळावा, हा इतर राजकीय पक्षांनी भरवलेल्या सभांपैकीच एक सभा असेल. शेतकरी संघटना राजकीय पक्ष जरी नसला, तरी पक्षाची मंडळी ज्याप्रमाणे विचार मांडतात, त्याच प्रकारचा विचार येथे मांडला जातो. पण यापलीकडे साम्य नाही. शेतकऱ्यांचा मेळावा म्हणजे जेथे सगळे शेतकरी जमतात. तो कोणत्याही जातीचा, धर्माचा किंवा पक्षाचा असो. त्याची जमीन ५०/६० एकर असो वा ५ एकर असो; किंवा



अजिबात जमीन नसल्यामुळे तो शेतमजुरी करणारा असो, ज्यांच ज्यांच आयुष्य शेतीवर अवलंबून आहे अशा सगळ्या मंडळींनी एकत्र यायचे आणि आपल्या व्यवसायातील अडचणींचा विचार करायचा. शेती का फायद्यात चालत नाही? निरनिराळे प्रयोग केले, तंत्रे सुधारली, वरखते वापरली, औषधे वापरली, खर्च अनेक पटींनी वाढला आणि त्याचबरोबर कर्जेच वाढत गेली. पाहावे तेव्हा उत्पन्नाची बाब कमीच का? ज्याने त्याने दारी बसून केवळ विचार करून यातून कसे सुटायचे? एकट्याला परिस्थितीचा मुकाबला करणेही शक्य नाही. म्हणून जगभरच्या सर्व व्यावसायिकांची जी रीत आहे, त्यानुसारच आपण एकत्र येऊन विचार करतो आहोत.

आपण एकत्र होऊ नये म्हणून फूट पाडण्याचे प्रयत्न चालू आहेत. ते आपण यशस्वी होऊ देता कामा नये. म्हणूनच राजकीय पक्षांचा वारा लागू देऊ नका.

आणखी एक गोष्ट आधीच स्पष्ट करून ठेवतो की, मेळाव्याचे नियोजन करणारी जी मंडळी असतात ती साहजिकच आलेल्या पाहुण्यांची ओळख करून देतात. त्यांचे मागचे आयुष्य काय होते आणि त्यांनी हे केले आणि ते केले वगैरे सांगतात आणि त्यामुळे विनाकारण अशी कल्पना होते की शेतकऱ्यांच्यामध्ये जी नवीन जागृती होऊ लागली आहे, - आपला उत्पादनखर्च काय आणि आपल्याला प्रत्यक्ष उत्पन्न काय मिळते याबद्दलची जाणीव- ही जागृती किंवा जाणीव कुणी तरी एका माणसाने केली आणि त्या एकट्या माणसाचे हे श्रेय आहे ही चुकीची कल्पना पसरायला लागेल. त्यातून दुर्दैवाने असे घडते की एखाद्या माणसाचे नाव- एखाद्या चुकीने का होईना - वर्तमानपत्रात सारखे येऊ लागले की साहजिकच इतर काही व्यक्तींना त्याच्याबद्दल मत्सर, असूया वाटू लागते व त्यामुळे संघटनेची हानी होते. राजकीय पक्षांची एकाच व्यक्तीला मोठे करीत राहण्याची ही वृत्ती इथे नको. माझ्या दृष्टीने मी ही गोष्ट स्पष्ट करू इच्छितो. नाशिक, चाकण येथील आंदोलनात शेतकऱ्यांनी १२ दिवस बैलगाड्या ठेवून रस्ता अडवला आणि जो कांदा निव्वळ कचऱ्याच्या भावाने जात होता, त्याला ४५ ते ६० रु. क्विं. हा भाव मिळाला. नाशिकच्या आंदोलनात- देशात प्रथमच- १।। ते १।।। लाख शेतकरी रस्त्यावर आणि रेल्वेवर येऊन बसले. या सगळ्याचे श्रेय कोणाही एका माणसाला नाही, शरद जोशींना नाही. आमच्या नाशिक जिल्ह्यातील कार्यकर्ते मोरे, कराड-पाटील किंवा बागलाण तालुक्यातील रामचंद्र बापू पाटील यांच्यापैकी एकालाही त्याचे श्रेय नाही. हे श्रेय

आहे शेतकऱ्याला! आज अनेक वर्षे दु:ख, दारिद्र्य सोसल्यानंतर केवळ अजिबात सहन होत नाही आणि यापुढे मरायचेच आहे तर निदान झगडा करून मरावे अशी ऊर्मी जेव्हा देशातील वेगवेगळ्या राज्यातील शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे झाली तेव्हाच हा लढा उभा राहिला. उभ्या राहिलेल्या लढ्याबद्दल बातम्या देताना, खुणेचा जसा दगड असावा, तसे एखाद्या माणसाचे नाव घातले जाते; परंतु कोणाही एका माणसाला या जागृतीचे श्रेय नाही. हे श्रेय फक्त काळाला आहे. माझ्यासारख्या एखाद्या माणसाने आंदोलन चालू करून जर का शेतकऱ्यांशी द्रोह केला, त्यांचा घात केला, तर शेतकरी त्या माणसाला बाजूला सारून आणि प्रसंगी पायदळी तुडवून पुढे जातील. शेतकरी आता जागा झाला आहे. कोणीही पुढाऱ्याने त्याला विरोध केला तरी ही जागृती थांबणारी नाही. ही शेतकऱ्यांची, शेतकऱ्यांनी केलेली, शेतकऱ्यांसाठी राबवली जाणारी जागृती आहे. तेव्हा या सबंध आंदोलनामध्ये कोणाही एका व्यक्तीचे काहीही महत्त्व नाही आणि जरी समजा माझ्यासारखा एखादा मनुष्य, परदेशातील ऐषारामाची नोकरी सोडून या कामाला आला असला तरी त्याचा अर्थ असा नव्हे की म्हणून त्याचे उपकार मानून तो म्हणेल ते तुम्ही खरे म्हणा. नाही! आजपर्यंत शेतकऱ्यांनी हीच चूक अनेक वर्षे केलेली आहे. निवडणुकीच्या आधी पुढारी येतात, आश्वासने देतात. आम्ही त्यांना भुलतो. दारिद्र्य हटविणे कठीण गोष्ट आहे असे ते सांगतात. त्यांच्यावर आम्ही विश्वास ठेवला. त्यांच्या खांद्यावर मान टाकली आणि या सर्व पुढारी मंडळींनी आजपर्यंत नियमितपणे शेतकऱ्याच्या मानेवरून सुरी फिरवली. शेतीमालाला रास्त भाव मिळू नयेत म्हणून प्रयत्न करणाऱ्यात सर्व राजकीय पक्ष आहेत. शेकडो वर्षे हे प्रयत्न चालले आहेत. पुढारी आले की त्यांना आपण विचारले पाहिजे की बाबांनो, तुम्ही आमच्या गावाला रस्ते, दवाखाने देता, शाळा देता, आमच्या घरावर सोन्याची कौले घालू म्हणता; हा सगळा धर्मदाय, ही सगळी भीक तुम्ही आम्हाला का घालायची? ही भीक घालण्यापेक्षा तुम्ही आमच्या हक्काचे आहे तेवढे का देत नाही? इतक्या अहवालांमध्ये जे लिहिलेले आहे की शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल होता कामा नये, म्हणजे उत्पादन खर्च भरून येता कामा नये तेवढे दूर करा ना! त्याच्याबद्दल तुमचे काय धोरण आहे? आणि तेहतीस वर्षे तुम्ही शेतकऱ्यांसाठी काय केलेत? कुठे तरी तुम्ही खोटे बोलताय्. का म्हणून तुमच्या शासनाने असे धोरण राबवले की आमचा सहा वर्षांचा मुलगा पहाटे उठून शेण गोळा करायला



जातो, त्याच्या श्रमाला मोल नाही? शेतकऱ्याच्या घरातील पोक आलेली सत्तर-ऐंशी वर्षांची म्हातारी खुरपे घेऊन शेतात काम करते. कारण तिच्या मनामध्ये धाक आहे की आपला पोरगा इतका काही परिस्थितीमध्ये गांजून गेलाय् की कदाचित् चिडून एक दिवस म्हणायचा की, 'म्हातारे, तू मरतसुद्धा नाही– फुकट खाती!' तिच्या कष्टाला मोबदला नाही, असे तुमच्या शासनाने का केले? या एका प्रश्नाचे उत्तर द्या. बाकी काहीही गाजरे आम्हाला दाखवू नका. हे सर्व पक्षांचे धोरण आहे याचे लेखी पुरावे आहेत.

आमच्याकडे कांद्याचे उत्पन्न १९८० साली जास्त झाले. शेतकरी मरू लागला. शेतकऱ्यांचे एक शिष्टमंडळ अन्नमंत्र्यांना भेटायला गेले. अन्नमंत्र्यांनी सांगितले की, सरकार शेतकऱ्यांकरिता नुकसान सोसायला तयार नाही. 'कुणाकुणाकरिता आम्ही नुकसान सोसायचे? महाराष्ट्रातल्या कांद्याकरिता की उत्तर प्रदेशातील गव्हाकरिता, की पंजाबातील बटाट्याकरिता? आम्ही कोणाकरिताही नुकसान सोसणार नाही.' असे राव वीरेंद्रसिंग म्हणाले. अरे! १९४७ ते ७७ या तीस वर्षांत तुम्ही शेतकऱ्याकडून लेव्ही वसूल केली आणि शेतकऱ्यांनी नुकसान सोसले. रकमेचा अंदाज करा– हजारो कोटींचे नुकसान शेतकऱ्यांनी सोसले आणि जर शेतकऱ्यांवर एक दिवस वाईट प्रसंग आला तर सरकार मदतीला यायला तयार नाही. सरकारचे धोरण असे असते की दुष्काळ असला म्हणजे लेव्ही लावायची, माल सक्तीने घेऊन जायचा आणि मुबलकता आली की दुर्लक्ष करायचे. म्हणजे तूट असली की लूट आणि मुबलकता असली की मागणी –पुरवठ्याच्या तत्त्वाप्रमाणे लिलाव! शिवाय निर्यातीवर बंधने.

शहरातील कारखानदार काहीतरी एक वस्तू काढतो आणि त्याने ती परदेशात निर्यात केली तर केवढे कौतुक! हे नवे देशभक्त! परकीय चलन मिळविणारे! म्हणून त्यांचे सन्मान होतात. त्यांना पद्मश्री, पद्मभूषणे मिळतात. एवढेच नव्हे तर उत्पादनखर्चाच्या २० ते २५% रक्कम त्यांना अनुदान म्हणून दिली जाते. मग शेतकरी जेव्हा कापूस निर्यात करतो तेव्हा तो परकीय चलन मिळवतो की चिंचोके मिळवतो? मग त्याच्या निर्यातीवर बंधने का? घरी बसल्या बसल्या देशातच त्याला योग्य भाव मिळेल अशीही व्यवस्था करायची नाही. म्हणजे बाप भीक मागू देत नाही आणि आई जेवू घालत नाही, अशी शेतकऱ्याची स्थिती. असे आतापर्यंत सर्व सरकारे मुद्दाम करतात.

याचा स्फोट होऊ नये म्हणून मग काय लबाड्या करतात? शाळा काढतो, दवाखाने काढतो-! अरे कशाला आम्हा शेतकऱ्यांना तुमच्या भिकेची लालूच दाखवता! आमच्या कपाशीला ७०० रु. भाव मिळू द्या, आम्हाला जि.प.च्या शाळेची गरज नाही. बहुसंख्य खेड्यांमध्ये या शाळा गळक्या देवळात भरतात आणि तेथे मास्तर महिन्यातून कधीतरी एकदा आला तर येतो आणि मास्तर नाही म्हणून मुलं जनावरांच्या मागे दिवसभर फिरतात. कशाला पाहिजे आम्हाला तुमचा जि.प.चा, प्राथमिक आरोग्यकेंद्राचा धर्मदाय दवाखाना! जिथे आम्ही गेलो की रांगेत उभे राहायचे, गड्यानेदेखील हडतहुडत करायचे, पाठीवर तापाने फणफणलेले पोर घेऊन डॉक्टरच्या मिनत्या करायच्या, औषधाची चिठ्ठी दवाखान्यात दाखवून किंमत विचारायची व परवडत नाही म्हणून हिरमुसल्या मनाने पोराला तसेच परत घेऊन जायचे! साखरेची गरज आहे तर पोरांना औषधाची गरज नाही काय? औषधाच्या कारखान्यावर तुम्ही लेव्ही का नाही लावत? गरिबांना औषधं स्वस्त तरी मिळतील! पण शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळू नये हे धोरण आहे ना! कशासाठी पाहिजे असला दवाखाना! रास्त भाव मिळू द्या, प्रत्येक गावात **M.B.B.S.** डॉक्टर जाऊन दवाखाने काढतील. कारण तुमच्याकडे पैसा आहे हे त्यांना कळेल. त्यांच्याकडे गेलात तर तुम्हाला चांगला नमस्कार घालून हसतील!

सकस आहाराचे तेच! अरे, आम्ही काय जनावरे आहोत, तुम्ही आम्हाला सकस आहार घालायला! आम्ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत उन्हात, पावसात, थंडीत कष्ट करतो आणि आम्हाला, आमच्या पोराबाळांना कुणीतरी येऊन सकस आहार भीक म्हणून घालतो! आम्हाला लाज वाटायला पाहिजे, शहरातल्या मुलाच्या बरोबरीने आम्हाला आहार मिळायला पाहिजे, कपडे मिळाले पाहिजेत. हे मिळू नये म्हणून रास्त भाव दिले जात नाहीत. तुमची परिस्थिती हलाखीची केली, तरी तुम्ही उठून बंड करू नये, संघटना करू नये म्हणून मग, 'शाळा देतो, दवाखाना देतो, कर्जमाफी करतो.' कशाला ही माफी? माफी गुन्हेगाराला करतात, आम्ही काय गुन्हेगार आहोत?

या योजना म्हणजे निव्वळ धूळफेक आहे. शेतकऱ्याच्या मालाला रास्त भाव मिळू लागला की हे प्रश्न आपोआप सुटणार आहेत.

हीच राजकारणी मंडळी तुम्हाला शेतमजूर-शेतकरी अशी भाषा ऐकवतील या भेदनीतीलाही भुलू नका. संघटनेची भूमिका मी स्पष्ट केलीच आहे. शेतकऱ्याला



फायदा मिळाला की मजुरीचेही दर वाढतील. शेतकऱ्याला हे शहाणपण कुणी शिकवायला नको आहे. पण जी शहरातील मंडळी मोलकरणीला फुटक्या कपातून चहा प्यायला देतात आणि न्हाणीघरात जाऊन तिला तो प्यायला लावतात, ती मंडळी आम्हाला शहाणपण शिकवतात! शेतकरी आणि शेतमजूर हे वेगळे वर्ग नाहीत, त्या फक्त वेगळ्या पिढ्या आहेत. पण मुद्दा, हे राजकारणी लोक तुमच्यात भांडणे लावण्यासाठी वापरतात. पक्ष, जात, धर्म यापैकी काही मनात आणू नका. शेतकरी तेवढा एक, असे चोख उत्तर राजकारणी मंडळींना द्या.

राजकीय पक्षांपासून नेहमी जपून राहा, नीट विचार करा. आज तुम्ही ऐकताहात म्हणून जर मी उद्या तुमच्यासमोर मते मागण्यासाठी आलो तर तुमच्या पायातील जोडा काढून मला मारा. हा प्रश्न मते, सत्ता, खुर्ची मिळविण्याचा नाही. कसल्या घाणेरड्या महत्त्वाकांक्षा आहेत या! आमदार, खासदार, मुख्यमंत्री व्हावे म्हणून हे शेतकऱ्यांचा घात करतात. अरे, या देशात ५२ कोटी शेतकऱ्यांना पोटाला अन्न नाही अशी परिस्थिती असताना, जर त्यांना कुठे दोन दिवस सुखाचे येतील असे काही केले, तर त्याला अर्थ आहे. याच्याहून कोणती मोठी महत्त्वाकांक्षा? शेणातल्या किड्याप्रमाणे छोट्या महत्त्वाकांक्षा ठेवू नका. आम्हाला माहिती आहे तुमचे पक्ष वगैरे शहाणपण! एक पक्षाचे तिकीट मिळाले नाही की जी मंडळी-एका घाणीवरून माशा दुसऱ्या घाणीवर जाव्यात त्याप्रमाणे- पक्ष सोडतात, ती दुसऱ्या दिवशी येऊन आम्हाला शहाणपणा सांगतात-'आमच्या पक्षाचे मत असे आहे.' असे का? तेव्हा कोणत्याही पक्षाचा येथे संबंध नाही. आमचे कार्यकर्ते हे सगळ्या पक्षांचे आहेत. कुठल्या ना कुठल्या पक्षात आमच्या गावातील सर्व चांगली, तरुण, उत्साही, अनुभवी मंडळी अडकलेली आहेत. ती निघाली फार चांगल्या बुद्धीने- देशातील दारिद्र्य हटावे या बुद्धीने! पण परिस्थिती अशी झाली की निघावे देवाच्या आळंदीला आणि जाऊन पोचावे चोराच्या आळंदीला! तशी त्यांची गत झाली. तेव्हा बाकीच्या ३९ किंवा १९ कलमांकरिता तुम्ही खुशाल कुठल्याही पक्षात राहा, निवडणुका लढवा. काय वाट्टेल ते करा. या एका कलमासाठी मात्र सर्व पक्षांचे जोडे बाहेर ठेवून या.

तुम्हाला भाव मिळत नाहीत याचे कारण सर्व राजकीय पक्षांचे ते धोरण आहे. तुमच्या घामावर दुसरी मंडळी मौज उडवताहेत, भाव मिळाले तर ही मौज थांबेल. हे भाव भांडून मिळवावे लागतील. 'आमच्या इंदिराबाई तुम्हाला भाव देतील' असे

कोणी सांगत येईल. चूक. भाव इंदिराबाई देणार नाहीत. आपल्याला या मंडळींनी कोंबड्यासारखे खूप झुंजवले व दाणे काढून नेले. यापुढे पक्षांची भांडणे निवडणुकीच्या वेळी! जेव्हा शेतीमालाला भाव मिळविण्याचा प्रश्न येईल तेव्हा इतर मतभेद मनात ठेवू नका. एक व्हा. अहो शेतकरी ५२ कोटी आहे या देशात. नुसते सगळे जण मिळून थुंकले तरी सगळे शत्रू वाहून जातील.

राजकीय मंडळी व वृत्तपत्रांमधील टीकाही एकच प्रकारची, फूट पाडणाऱ्या नीतीची आहे. जोशी हा विकला गेलेला माणूस आहे असे त्यांनी म्हणायचे व मी नाही, होय म्हणायचे, याला अर्थ नाही. मी नाही म्हटले तरी ज्यांच्या मनामध्ये काही पेरायचे आहे, त्यांच्या मनातले कायमच राहणार आहे. याचे उत्तर शेवटी इतिहास देणार आहे. कोणत्या निष्ठेने संघटना लढा लढते, विकला गेलेला मनुष्य पुन: दीड लाखाऐवजी तीन लाख शेतकरी रस्त्यावर आणायची व्यवस्था करतो का? हे तुमचे तुम्ही ठरवायचे आहे. जर तुम्हाला पटले की मी विकला गेलेला आहे, अप्रामाणिक आहे तर मला बाजूला सारा; पण आंदोलन पुढे चालवा. मात्र आजपर्यंतच्या ज्या मंडळींनी तुम्हाला व्यवस्थितरीत्या कायम फसवले आहे त्यांच्यामागे जाऊ नका. विचारांच्या मागे जा.

म्हणून महत्त्वाची गोष्ट अशी की संघटनेचे आंदोलन हे संपूर्णत: पक्षीय राजकारणाच्या व्यतिरिक्तच चालले पाहिजे. एकदा जर ते राजकारणाच्या चिखलात फसले तर पहिली निवडणूक आल्यावर निम्मे शेतकरी एका व उरलेले दुसऱ्या पक्षाकडे जातील. संघटन खलास होईल. आपला विचार नि:पक्षपणे, आर्थिक मागणी म्हणूनच मांडला गेला पाहिजे, तरच तो यशस्वी होईल. राजकारणाच्या प्रश्नावर मी अजिबात तडजोड करीत नाही. आपण स्वच्छ, वेगळे राहावे. हे जर जड जाणार असेल तर आपण मनाची एकच तयारी ठेवा, की असे पक्षीय पाठिंबा असलेले आंदोलन तुम्हाला काहीही मिळवून देऊ शकणार नाही. तुम्हाला पक्ष मिळेल, पण भाव नाहीत.

तसेच धर्मादायावरही विसंबून राहू नका. आपल्या एक कलमी कार्यक्रमाने ही लाचारी संपणार आहे. आता शेतकऱ्याला ही गोष्ट कळली आहे की त्याचे दारिद्र्य दूर करण्यासाठी कोणाच्या भिकेची, धर्मदायाची गरज नाही. जो माणूस मुंग्यांना साखर घालून व्यापारास जातो तो दिवसभर कुणाचे तरी गळे कापत असतो.



**संघटनेचे लढे व शासकीय दबाव – नीती यांविषयीचे आतापर्यंतचे अनुभव काय आहेत?**

शेतमालाला रास्त भाव द्या ही मागणी सरकार सहजपणे कधीही मान्य करणार नाही. त्यासाठी प्रचंड शक्ती उभी करावी लागेल. आपला निकाल शेवटी आपल्या ताकदीवरच ठरणार आहे. त्यात डावपेचामध्ये वेगवेगळे पक्ष भांडत असाताना, आपण बाजूला होऊन दोघांची टक्कर कशी होऊ द्यावी वगैरे डावपेचाचे मुद्दे आहेत. बोलण्यांचा घोळ घालत बसायला सत्ताधाऱ्यांना नेहमीच वेळ असतो. यातून आंदोलनाची तीव्रता कमी होते असे मी मानत नाही. आपल्याला शासनाच्या झोपेचे ढोंग दूर करायचे आहे. केंद्रसरकारात अकरा वर्षे शेतकीमंत्री म्हणून काम केलेल्या अण्णासाहेब शिंद्याबरोबर माझी चर्चा झाली. ते म्हणाले, 'जोशी तुम्ही फार बरोबर मुद्दा काढला आहे.' ते पूर्वी कम्युनिस्ट पक्षात होते. 'माझ्या मनात हा विचार अनेक वर्षे आहे. पण मला असे वाटत होते की कृषिमूल्य आयोग नेमल्यावर हा प्रश्न सुटेल. योग्य तऱ्हेने उत्पादन खर्च काढले जातील आणि भाव मिळेल. आज माझ्या असे लक्षात येते आहे की शेतकऱ्याला रास्त भाव देण्यासाठी जी काही राजकीय इच्छा– **Political Will**– लागते तीच नाही!' ही पोलिटिकल विल आपल्याला आणायची आहे, हा मुख्य मुद्दा आहे.

शेतकऱ्याला जर शेवटी दीर्घ मुदतीचे आंदोलन बांधायचे असेल तर माझी निष्ठा अशी आहे की, आंदोलन नेहमी अहिंसेने आणि शांततेनेच चालले पाहिजे. चुकीचा पाय पडला तर तो शेतकरी संघटनेला घातक ठरेल. म. गांधींनी चौराचौरीच्या वेळी जो सत्याग्रह मागे घेतला तो याचकरिता! आंदोलन केव्हा करायचे, केव्हा थांबवायचे याचे सबंध एक नवीन तंत्र तयार होते आहे. आपल्याला रजपुतांसारखे सगळे दरवाजे उघडून जाऊन 'जय एकलिंगजी' म्हणून सगळे सैन्य खलास करायचेय की गनिमी काव्याने लढायचेय्? जमेल तेव्हा सैन्य अमुक ठिकाणी उतरवायचे. नाही तेव्हा मागे घ्यायचे, दुसरीकडे उतरवायचे, मला असे वाटते की शेतकरी संघटनेचा विचार जेवढा नवा आहे तेवढेच आंदोलनाचे तंत्र नवे आहे.

आंदोलन सुरू झाले की ते स्थगित करण्याची किंवा मागे घेण्याचीसुद्धा तंत्रे आपण नवी वापरणार आहोत. उगाच भडकावून द्यायचे, दगड फेकायचे आणि त्याला आंदोलन म्हणायचे यावर माझा विश्वास नाही. कसबे–सुकाणे येथे एक

प्रसंग घडला. तिथे बायका रेल्वे रूळांवर बसल्या होत्या. रेल्वे लाईन मोकळी करायची म्हणून SRP ची चार चार पुरुष माणसे एकेका बाईला दोघे दोन हात आणि दोघे दोन पाय धरून उचलून बाजूला ठेवत होते. असे करत असताना एका बाईची साडी सुटली आणि चोळी फाटली. ग्रामीण समाजात अशा प्रसंगी काय उद्रेक होतो याची आपल्याला कल्पना आहे. सगळा जमाव संतप्त झाला आणि त्याने जमेल त्या ठिकाणी गवत रचून आगी लावायला सुरुवात केली होती. तेव्हा जर आपण कुठेतरी ब्रेक लावला नसता, तर मनमाड ते नाशिक रेल्वे लायनीचा एक रूळ शिल्लक राहिला नसता. तुरुंगामधील अनुभवांनी आमच्या १२००० शेतकऱ्यांची भीतीही दूर झाली आहे. आमची तीन लाख माणसे आज तुरुंगात जायला तयार होतात. त्यामागे निश्चितच काही नवी आंदोलनाची तंत्रे आहेत. टीका करणारांनी काय हो! तीन लाख माणसे तुरुंगात पाठवण्याची तयारी दाखवून जे काम होणार आहे, ते आंदोलन भडकू देऊन होणार नाही. मला फक्त ऊस, कापूस आणि कांद्याच्या शेतकऱ्यांचे कल्याण साधायचे नाही. मला शेतकरी आंदोलनाचा दीर्घ व्यापक कार्यक्रम राबवायचा आहे आणि आंदोलन म्हणजे काही सर्कस नाही की दररोज चार वाजता तिचा खेळ झालाच पाहिजे!

शासन दबाव आणणारच! कारण ते शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्यांच्या पाठिंब्यावर जगते.

उदाहरण देतो. पिंपळगाव-बसवंताला जी सभा झाली ती यशस्वी होऊ नये म्हणून सरकारने फार प्रयत्न केले. आदल्या दिवशी रात्री ११।। वाजेपर्यंत सभेला परवानगी दिली नाही. जी मंडळी स्वत:हून ट्रकने, ट्रॅक्टरने येण्याचा प्रयत्न करीत होती, त्यांना अडवण्यात आले, वाहनांचे लायसन्स जप्त करण्यात आले. त्या दिवशी संध्याकाळी मी कलेक्टरांशी बोललो आणि त्यांना सांगितले की, 'जेव्हा मंत्र्यांची सभा होते तेव्हा ट्रकने, ट्रॅक्टरने माणसे आणू देता. एवढेच नव्हे तर ट्रक पुरवण्याचीसुद्धा व्यवस्था करता. या सभेला जर तुम्ही अशा तऱ्हेने अडथळा आणला तर तुम्ही पहिल्यांदा शेतकरी संघटनेच्या आंदोलनाबद्दल दुष्टपणाचे कृत्य केले आहे, असे मी गृहीत धरीन.' ही चर्चा झाल्यानंतर ट्रक-ट्रॅक्टरना व सभेलाही परवानगी देण्यात आली. त्याच्या तीनच दिवस आधी नाशिकच्या कॉलेजातल्या अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी केवळ एक अर्थशास्त्राचा अभ्यास म्हणून माझे भाषण त्यांच्या कॉलेजमध्ये ठेवले होते- हॉलमध्ये! सार्वजनिक नाही. त्यालासुद्धा सरकारने



बंदी घातली. पण या सभेला परवानगी दिली. पिंपळगाव-बसवंतसारख्या ठिकाणी प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रातून जवळजवळ ७०,००० शेतकरी जमा झाले होते.

सभा, आंदोलनाचा जोर व संघटना यातून जी शक्ती उभी राहते, तिला डावपेचाचे व संयमाचे महत्त्व फार आहे. डावपेचही युद्धासारखेच असतात. सविनय सत्याग्रह हा मुख्य भाग आहे. खेरवाडीला SRP च्या लोकांना केलेला अत्याचार, गोळीबार- ज्याची न्यायालयीन चौकशी आम्ही मागितली आहे- तो सोडल्यास कुठेही शांततेचा भंग झाला नाही. अशा परिस्थितीत पोलिसांनी येऊन शांतपणे शेतकऱ्यांना अटक करून नेले पाहिजे. त्याऐवजी पोलिसांनी रात्रीच्या वेळी येऊन, रस्त्यावर झोपलेल्या सत्याग्रहींवरसुद्धा लाठीहल्ला केला, आणि शेतकऱ्यांचे म्हणणे असे होते की आम्ही यापुढे अशा तऱ्हेने मार खाऊन घेणार नाही. त्यामुळे तेथल्या वकील मंडळींशी सल्ला मसलत करून पिंपळगावच्या सभेत मी असे सांगितले की, 'जर का पोलिस हे दरोडेखोरासारखे वागू लागले; घरामध्ये घुसणे, दरवाजे कुऱ्हाडीने फोडणे, घरातल्या बायका-माणसांनासुद्धा लाठीने मारणे, घरातील घड्याळे किंवा इतर वस्तू चोरून नेणे- हे प्रकार जर पोलिस करू लागले तर ते फक्त पोलिसाच्या वेषातील दरोडेखोर ठरतात आणि भारतीय दंडविधानाखाली प्रत्येकाला आपल्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी स्वसंरक्षणाचा हक्क आहे.' मी ही घोषणा जेव्हा केली तेव्हा त्या ७०,००० शेतकऱ्यांनी टाळ्यांचा इतका प्रचंड कडकडाट केला की, सरकारच्या हे लक्षात आले की, यापुढे हे आंदोलन अशा तऱ्हेने त्यांना हाताळता येणे शक्य नाही.

तेव्हा आंदोलनाच्या बाबतीतही मळलेली चाकोरी किंवा आजकालचे सांकेतिक वळण आपल्याला टाळायला हवे. ही गोष्ट आमच्या टीकाकारांच्या लक्षात जेवढी यायला हवी तेवढी आलेली नसली तरी शासनाच्या लक्षात निश्चितच आलेली आहे. ते अधिक हिंस्र व आक्रमक होतील हे आपण आजच लक्षात घेतले पाहिजे.

मला शेवटी एका गोष्टीचा पुनरुच्चार करायचा आहे. आपली आंदोलने माझ्यासारख्या व्यक्तीचे नव्हे, पण शेतकरी संघटनेचेही महत्त्व वाढविण्यासाठी मुळीच नाहीत. सतत नाकारल्या गेलेल्या न्यायाच्या मागणीसाठी अपरिहार्यपणे करावी लागणारी- एका दृष्टीने लादली गेलेलीच म्हणा- ती एक कृती आहे. आज समोर असलेल्या निगरगट्टांकडे पाहता ती अनिवार्य आहे. नुसत्या अर्ज विनंत्यांनी हे काम होण्यासारखे असते तर मी तुम्हाला रस्ता रोखायला बोलाविले नसते आणि

समजा मी बोलाविले असते तरी तुम्ही नक्कीच आला नसता.

एक गोष्ट पुन्हा एकदा स्वत:शी स्पष्ट करून घ्या. आपला लढा हा कोण्या एका शासनाविरुद्ध वा पक्षाविरुद्ध वा व्यक्तिविरुद्ध नाही. तसे असते तर आपले काम खूपच सोपे झाले असते. शासन ताब्यात घेणे हे आपले ध्येयही होऊ शकले असते. म्हणजे आपल्या हालचालींना एक सर्व परिचित असे राजकारणाचेच अधिष्ठानही प्राप्त झाले असते. पण आपला लढा एका व्यवस्थेच्या विरोधात आहे आणि तो पूर्णपणे आर्थिक पातळीवरील आहे. आपल्याला शासन ताब्यात घ्यायचे किंवा राज्य मिळवायचे नाही. आज शेतीव्यवसाय हा पूर्णपणे पराधीन झाला आहे. ही पराधीनता आपल्याला काढून टाकायची आहे. त्याचसाठी आपल्याला फक्त आपल्या शेतीमालाचे रास्त भाव मिळवायचे आहेत. तसं पाहिले तर आपली मागणी अतिशय साधी व निरुपद्रवी आहे.

आपला प्रयत्न गरीब शेतकऱ्याला श्रीमंत करण्याचा नाही. आपला प्रयत्न खरा आहे तो देशातील दारिद्र्य दूर करण्याचा. आपल्या हालचाली कधीही देशाचे स्वास्थ्य धोक्यात आणणाऱ्या नाहीत. ज्यांच्या दुस्थितीमुळे देशात दारिद्र्य नांदत आहे त्या शेतकऱ्यांची आर्थिक हलाखीतून मुक्तता हे आपले ध्येय आहे. त्यासाठी झगडणे व ते हस्तगत करणे ही कृती देशविघातक कशी बरे होईल?

तेव्हा सध्यातरी आपण सर्वांनी रास्त भावाच्या एक कलमी मागणीवर एकारले पाहिजे. जितके आपण जास्त संघटित होत जाऊ तितके या मागणीच्या पूर्ततेच्या जास्त जवळ जाऊ. म्हणजेच देशाच्या दारिद्र्याला दूर दूर हटवत नेऊ.

****



अशिक्षित शेतकऱ्यांना हा विषय समजायला कठीण नाही कारण प्रत्येक शेतकऱ्याला वर्षातून एकदा तरी 'उलट्यापट्टी'चा अनुभव येतो. उलटी पट्टी म्हणजे दलालामार्फत भाजीपाल्यासारखा शेतीमाल बाजारात पाठविल्यावर त्याच्या किमतीची जी पट्टी येते त्यात वाहतूक, दलाली, हमाली, पॅकिंग वगैरेंचा खर्च वजा जाता काही शिल्लक न राहता शेतकऱ्यांच्याच अंगावर काही देणे राहते. हा अनुभव ज्याला एकदा आलेला आहे त्याला शेतमालाच्या किमतीचा प्रश्न समजावून देणं आणि त्यांनी तो समजावून घेणं कठीण राहत नाही.